Box No-3



**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **06-Apr-19**

**Item No.** **2** **Resolution No.** **1369**

विषय : श्री. श्री. ग. सहस्त्रभोजनी / जनसंपर्क अधिकारी यांची कंत्राटी नेमणूक १ वर्षाकरिता वाढविण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
जागतिक बँक प्रकल्पाचे भूखंड वितरणाचे कामकाज प्रगतीच्या टप्प्यावर आहे. त्याचा व्यापही खूप वाढणार आहे. याबाबतची प्रसिद्धी जनमानसात होणे आवश्यक आहे. याकरिता यासर्व कामाची माहिती / कामकाज जनसंपर्क अधिकाऱ्यांमार्फत होत असते. हे कामकाज सन १९९० पर्यंत असल्यामुळे सतत जनमानसात प्रसिद्ध होणे अत्यावश्यक असल्यामुळे स्वतंत्र जनसंपर्क अधिकारी यांची आवश्यकता आहे.
वरील परिस्थिती लक्षात घेता निरनिराळी प्रसिद्धीची कार्ये पार पाडण्यासाठी श्री. श्री. ग. सहस्त्रभोजनी/जनसंपर्क अधिकारी यांची सेवेची निकड आहे. तेव्हा श्री. श्री. ग. सहस्त्रभोजनी यांना कंत्राटी पद्धतीनुसार नेहमीच्या शर्ती-अटींवर दिनांक २.७.८७ पासून सध्याच्या सेवाशर्तीनुसार आणखी १ वर्षाची मुदत वाढ देण्यात येत आहे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **07-Apr-19**

**Item No.** **2 A** **Resolution No.** **1369**

विषय : जालना येथे विडी कामगारांसाठी गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
जालना येथे विडी कामगारांकरिता गृहनिर्माण योजना राबविणे जरूरीचे आहे. असे विचारात घेऊन जालना येथे स. नं. ४८८ मधून उपलब्ध झालेल्या ४ हेक्टर शासकीय जमिनीवर विडी कामगारांसाठी विशेष गृहनिर्माण योजना राबविण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावयास तसेच याबाबत जरूर ती सर्व काही कार्यवाही करण्यास प्राधिकरण संमती देत आहे. प्राधिकरण याबाबत पुढील कार्यवाही करावयाचे अधिकारी प्रशासक/उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देत आहे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **08-Apr-19**

**Item No.** **3** **Resolution No.** **1370**

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथे निवासी भूखंडाबाबत करार नाम्यातील कलम भंग नियमाधीन करण्याविषयी प्राधिकरणाने घेतलेले निर्णय.

ठराव : जुहू-विलेपार्ले विकास योजनेमध्ये निवासी कारणासाठी देण्यात आलेल्या भूखंडाची प्रलंबित प्रकरणे नियमित करण्यासाठी प्रत्येक प्रकरणांचे स्वयंपूर्ण स्वतंत्र प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविण्याबद्दल ठराव क. १३१८ दि. २९.१२.८६ अन्वये घेतला होता त्यांच्याऐवजी सदर प्रकरणी विहीत धोरणानुसार मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांना नियमित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. मात्र विहीत मार्गदर्शक तत्त्वाच्या बाहेरील प्रकरण प्राधिकरणाकडे मंजूरीसाठी पाठवावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 13-Apr-19

**Item No.** 4 **Resolution No.** 1371

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचारी व अधिकारी वर्गाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना देण्यात आलेले भूखंड.

ठराव : कर्मचारी कल्याण योजना अंतर्गत प्राधिकरणातील कर्मचारी/अधिकारी वर्गाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना वसाहतीतील मोकळे भूखंड देण्याचा निर्णय प्राधिकरणाने ठराव क्र. ९६१, दिनांक ७ जानेवारी, १९८५ मध्ये घेतला होता.

वरील बाब टिप्पणीत सादर केल्याप्रमाणे खालील कर्मचारी सहकारी गृहनिर्माण मंडळाच्या मुख्य प्रवर्तकांनी भूखंडाचे अधिमूल्य भरून भूखंड ताब्यात घेण्याबाबत कोणतेही स्वारस्य दोन वर्षांच्या कालावधीत दाखविलेले नाही. यामुळे खाली नमूद केलेल्या कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्थांना देण्यात आलेले भूखंडाचे वितरण रद्द करण्यात येत आहे. रद्द करण्यात आलेल्या भूखंडाचा विनियोग मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने अन्य कारणांसाठी त्वरित करावा. जेणेकरून भूखंडावर अतिक्रमण होणार नाही याची काळजी तत्परतेने घेण्यात यावी.

| अ. क्र | मुख्य प्रवर्तकाचे व संस्थेचे नाव | वसाहत | भूखंडाचे क्षेत्रफळ चौ. मी. |
|---|---|---|---|
| १) | श्री. सी. एस. साळवी | सुंदरनगर, सांताक्रुझ (पूर्व) | १४१९ |
| २) | श्री. ए. के. ब्रद (आनंदविहार) | ओशिवरा, सं.नं.४१ (भाग) | १२३० |
| ३) | श्री. चि. शं. केकाणे (शुभकरोति) | सिद्धार्थनगर, गोरेगाव | १०९४.३७ |
| ४) | श्री. बी. डी. लोहार | सिद्धार्थनगर, गोरेगाव | १२२४.६२ |
| ५) | श्री. व्ही. जे. वाणी | नेहरूनगर, कुर्ला | ७०३.५० |
| ६) | श्री. व्ही. एस. गोगवेकर | चित्तरंजन नगर, राजावाडी, घाटकोपर | ९२२.२५ |
| ७) | श्री. वाय. आर. घुमकर | मजासवाडी, मेघावाडी | १३५७ |
| ८) | श्री. दिनकर उतेकर | ओशिवरा, सं.नं.४१ (भाग) | १५६० |
| ९) | श्री. रमेश तिवारी | ओशिवरा, सं.नं. ४१ (भाग) | १२०० |

**Item No. 5** **Resolution No. 1372**

विषय : पुणे येथे विडी कामगारांकरिता गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,

पुणे येथे विडी कामगारांसाठी गृहनिर्माण योजना राबविणे जरूरीचे आहे. असे विचारात घेऊन पुणे-अहमदनगर रस्त्यावरील खराडी गावातील सर्व्हे क्र. ३७/१ येथील सुमारे ५ हेक्टर क्षेत्राची जागा तसेच येरवडा येथे गोल्फ क्लब जवळील शासनाची जागा या योजनेसाठी पाडवावयास तसेच याबाबत जरूर ती सर्व कार्यवाही करण्यास प्राधिकरणास संमती देत आहे. प्राधिकरण याबाबत पुढील कार्यवाही करावयाचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देत आहे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **16-Apr-19**

**Item No.** **6** **Resolution No.** **1373**

विषय : सक्षम प्राधिकारी (३) पदावर कंत्राटी नेमणूक केलेले श्री. व्ही. जी. डोईजोडे, सेवानिवृत्त शहर दिवाणी न्यायाधीश आणि अतिरिक्त छत्र न्यायाधीश यांना मुदतवाढ देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
श्री. व्ही. जी. डोईजोडे, सक्षम प्राधिकारी (३) यांना दिनांक १९.५.८७ पासून आणखी तीन महिन्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात प्रशासक/प्राधिकरण यांनी मंजूरी दिली आहे. तत्पूर्वी योग्य व्यक्ती उपलब्ध झाल्यास श्री. डोईजोडे यांची सेवा तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल.

**Item No.** **7** **Resolution No.** **1374**

विषय : अंधांसाठी घरांकरिता आणि अपंगांसाठी व्यवसायाकरिता भूखंडांची विशेष योजना - भूखंड वाटप नियमाखाली खास योजना.

ठराव : निर्णय घेतला की, अंधांना वाटप करण्यासाठी मुंबई मंडळाने तयार केलेल्या मालवणी, मालाड येथील ७६ निवासी भूखंडांच्या त्याप्रमाणे अपंगांना वाटप करण्यासाठी ओशिवरा, कांदिवली आणि कुर्ला या वसाहतीत १७ दुकानांसाठी व १२ स्टॉल्ससाठी वाटप करावयाच्या भूखंडांच्या योजनेस मान्यता देण्यात यावी. यापैकी निवासी भूखंडांचे वाटप जाहिरात देऊन अर्ज मागवून व आलेल्या अर्जामधून सोडत काढून करण्यात यावे. दुकाने व स्टॉल्ससाठी द्यावयाच्या भूखंडाचे वाटप जाहिरात देऊन पूर्व नियोजित किंमतीत अर्ज मागवून करण्यात यावे. वाटपाच्या अटी बाब टिप्पणात सुचविल्याप्रमाणे असाव्यात.

**Item No.** **8** **Resolution No.** **1375**

विषय : जागतिक बँक प्रकल्प विभागाचे आस्थापनेवर मिळकत व्यवस्थापक (महसूल) या दर्जाचे पद निर्माण करण्याबाबत.

ठराव : मिळकत व्यवस्थापक (महसूल) या दर्जाचे रु. ६००-३०-७५० द. रो. ४०-११५० या वेतन मानातील श्रेणी २चे एक पद निर्माण करण्यास या ठरावान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **20-Apr-19**

**Item No.** **9** **Resolution No.** **1376**

विषय : श्री. टी. के. मॅथ्यू यांची यंत्रण विश्लेषक (सिस्टिम ॲनेलिस्ट) म्हणून इलेक्ट्रॉनिक्स डेटा प्रोसेसिंग कक्षामध्ये नेमणूक करण्याबाबत.

ठराव : जागतिक बँक प्रकल्पामध्ये इलेक्ट्रॉनिक्स डेटा कक्ष उघडले असून त्यामध्ये प्रकल्पाची सर्व कार्ये लेखा, व्यवस्थापन, देयक बनविणे आणि त्या अनुषंगाने होणारी इतर कामे संगणकावर राबविण्यात येत आहेत.

जागतिक बँक प्रकल्प/वॉशिंग्टन तज्ज्ञ यांच्या मतानुसार जागतिक बँक प्रकल्पातील सर्व कार्यक्रम संगणकावरच राबविणे योग्य ठरेल. त्या दृष्टीकोनातून इलेक्ट्रॉनिक्स डेटा प्रोसेसिंग कक्षाचा विस्तार सुद्धा होणार आहे. आणि साहजिकच त्याचा व्यापही खूप वाढणार आहे.

वरील परिस्थिती लक्षात घेता, इलेक्ट्रॉनिक्स डेटा कक्षामध्ये संगणक तज्ज्ञाची अत्यंत निवड आहे. तेव्हा यंत्रणा विश्लेषक (सिस्टीम ॲनेलिस्ट) हे पद शासनाने मंजूर केलेल्या पर्यवेक्षकीय पदामधून रुपये १५००-५०-१५५०-७५-१९२५ या वेतन श्रेणीत मंजूर करण्यात येत आहे. केंद्र शासनाने सी.एम.सी. लिमिटेडच्या शिफारशीनुसार ज्या अधिकाऱ्यांचे नाव सुचविण्यात येईल त्यांचा अनुभव आणि शैक्षणिक अर्हता तपासून मा. संचालक/जा. बँ. प्र. यांनी त्यांची नियुक्ती करण्यात यावी.

**Item No.** **10** **Resolution No.** **1377**

विषय : औद्योगिक कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांची विक्री योजना.

ठराव : निर्णय घेतला की, औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांची बाकी किंमत किंवा पूर्ण किंमत तसेच संपूर्ण थकबाकी एकरकमी भरल्यास किंमतीत अतिरिक्त १० टक्के (एकूण ३० टक्के) सूटीचा लाभ ज्या इमारतीतील गाळेधारकांना उपलब्ध आहे, त्यांना तो देण्यासाठी दि. ३०.९.१९८७ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी. तसेच गाळ्यांची बाकी किंमत किंवा पूर्ण किंमत आणि थकबाकी एकरकमी भरल्यास अशा बाकी रकमेवर ५ टक्के सूट (डिस्काउंट) देण्यासाठी देखील ३०.९.१९८७ पर्यंत मुदत वाढ देण्यात यावी.

**Item No.** **11** **Resolution No.** **1378**

विषय : गृहनिर्माण योजनेसाठी लाभार्थीचा प्रत्यक्ष सहभाग यासंबंधी चित्रफित तयार करणे.

ठराव : निर्णय घेतला की,

५०० फूट लांबीची चित्रफित तयार करण्यासाठी येणाऱ्या खर्चास रक्कम रु. ४०,०००/- (अक्षरी चाळीस हजार फक्त) मंजूरी देण्यात येत आहे व सदर काम शासनाच्या माहिती व जनसंपर्क संचालनालयाकडे सोपविण्यास किंवा त्याच्या सल्ल्यानुसार करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या रकमेची परतफेड शासनाकडून मागविण्यात यावा.

**Item No.** 14 **Resolution No.** 1381

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ'मध्ये दर्शविलेल्या एक्सर, बोरिवली, मुंबई येथील नागरी गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून १०१.१८ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 22-Apr-19

**Item No.** 12 **Resolution No.** 1379

विषय : उपनगर परिसरात ठाणी व पोलीस चौक्या उभारण्यासाठी कुर्ला, घाटकोपर, विक्रोळी, जोगेश्वरी, कांदिवली व दहिसर येथे राखून ठेवलेल्या जागेबाबत.

ठराव :

१) उपनगरात पोलीस ठाणी व चौक्या उभारण्याकरिता जे ९ भूखंड मुंबई गृहनिर्माण मंडळाने (कुर्ला, घाटकोपर, विक्रोळी, जोगेश्वरी, कांदिवली व दहिसर येथे) राखून ठेवले आहेत त्यापैकी जे भूखंड २५० ते ३५० चौ. मी. क्षेत्रफळाचे आहेत त्यावर केवळ पोलीस चौक्या बांधण्यात व इतर भूखंडाचा वापर पोलीस खाते भूखंडाचे अधिमूल्य त्वरित भरणार असल्यास 'पोलीस चौकी व कर्मचारी निवास' असा संयुक्त करावा अशा अटींवर वितरित करण्यात यावा.

२) पोलीस चौकी किंवा पोलीस स्थानकांसाठी राखीव असलेल्या भूखंडाचा वापर खास बाब म्हणून निवासी उपयोगासाठी प्राधिकरणाच्या प्रचलित जमिनीच्या किंमतीनुसार भूखंडाची आगाऊ संपूर्ण किंमत वसूल करून भूखंडाचे वितरण करण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 23-Apr-19

**Item No.** 13 **Resolution No.** 1380

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अधिकार क्षेत्रातील गाळे, भूखंड, दुकानांचे वाटप करण्याकरिता वाटप समितीची नेमणूक.

ठराव : कोकण मंडळाच्या अधिकार क्षेत्रातील गाळे/भूखंडाचे वाटप करण्यासाठी खालीलप्रमाणे वाटप समिती नेमण्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्याचा निर्णय घेतला -

१) मुख्य अधिकारी, कोकण मंडळ - अध्यक्ष
२) प्रशासकीय अधिकारी व मिळकत व्यवस्थापक, कोकण मंडळ - सदस्य
३) ज्या जिल्ह्यातील गाळे/भूखंड/दुकाने असतील तेथील जिल्हाधिकाऱ्यांचे प्रतिनिधी (तहसीलदार या पदापेक्षा कमी दर्जाचे नसलेले पद धारण करणारा) - सदस्य
४) जिल्हा समाजविकास अधिकारी (जिल्हा परिषद) किंवा त्यांचे प्रतिनिधी - सदस्य
५) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा प्रतिनिधी (मिळकत व्यवस्थापकाच्या पदापेक्षा कमी दर्जाचे नसलेले पद धारण करणारा) - सदस्य

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 28-Apr-19

**Item No.** 15 **Resolution No.** 1382

विषय : माध्यमिक श्शाळांच्या भूखंडाच्या वाटपासाठी मुंबई गृहनिर्माण मंडळाने फेब्रुवारी, ८६ मध्ये वृत्तपत्रांत भूखंडाच्या वाटपाकरिता दिलेल्या जाहिरातीबाबत.

ठराव : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने फेब्रुवारी, १९८३ मध्ये माध्यमिक शाळांच्या भूखंडाच्या वाटपासाठी केलेल्या जाहिरातीमधील शर्तीना व प्राधिकरणाच्या माध्यमिक शाळेला द्यावयाच्या भूखंडाच्या शर्तीना आधीन राहून त्याचप्रमाणे उपसंचालक, शिक्षण यांचे अभिप्राय लक्षात घेऊन जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील माध्यमिक शाळांसाठी आरक्षित करण्यात आलेल्या सुमारे ३८७१ चौ. मी. क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वितरण 'सुमती विद्या केंद्र' या शैक्षणिक संस्थेला खालील अटी व शर्तीवर करण्यात येत आहे.

अ) प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार भूखंडाच्या अधिमूल्याचे अवलंबन करण्यात यावे.

ब) भाडेपट्ट्याचा काळ प्रथम ३० वर्षांचा धरण्यात यावा.

क) शिक्षण मराठी माध्यमातूनसुद्धा देण्यात यावे.

ड) ज्या प्रयोजनासाठी भूखंड वितरीत करण्यात आला आहे त्या प्रयोजनासाठीच भूखंडाचा उपयोग होत आहे याची खात्री करण्याकरिता त्याचप्रमाणे वसाहतींतील रहिवाश्यांच्या मुलांना 'प्रवेश प्राधान्य' देण्याच्या कार्यवाहीसाठी प्राधिकरणाचा प्रतिनिधी संस्थेच्या कार्यकारी मंडळावर घेण्यात यावा.

इ) प्राधिकरणाच्या इतर नियमांचे व अटींचे पालन करण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 29-Apr-19

**Item No.** 16 **Resolution No.** 1383

विषय : पुणे, नागपूर व औरंगाबाद या शहरातील गलिच्छ वस्त्यांसाठी 'मास्टर प्लॅन' श्री. राजगोपालाचारी, समंत्रक, हैद्राबाद तयार करणेबद्दल.

ठराव : विषय टिप्पणीतील प्रस्तावाचा विचार करून प्रशासक/प्राधिकरण यांनी, निर्णय घेतला की, पुणे, औरंगाबाद, नाशिक, पिंपरी-चिंचवड, सोलापूर या पाच शहरांतील गलिच्छ वस्त्यांबाबत मास्टर प्लॅन तयार करण्याचे काम या विषयातील शासन पुरस्कृत तज्ञ श्री. राजगोपालाचारी, हैद्राबाद यांच्या 'इमपॅक्ट सेंटर' ला २.४० लाख रुपयांत करण्यास देण्यास मान्यता देण्यात येत आहे. हा खर्च 'निवारा प्रकल्पात जनप्रतिनिधीत्व' या कार्यक्रमांसाठी शासनाकडून उपलब्ध झालेल्या १९८५-८६, १९८६-८७, १९८७-८८ या वर्षातील अनुदानातून भागविण्यात यावा. याबद्दल शासनाच्या बैठकीस मान्यता दिलेली आहे. तसेच हे काम तातडीने चालू करावे व श्री. राजगोपालाचारी यांना सुरुवातीला एक लाख रुपये अदा करावे, यास पण मान्यता देत आहे. हा प्रस्ताव शासनाकडून रितसर मंजूर करून घ्यावा. या अटीच्या अधीन राहून ही मान्यता देण्यात येत आहे. श्री. राजगोपालाचारी यांनी आपल्या पत्र दि. २१-४-१९८७ प्रमाणे हा कार्यक्रम पूर्ण करून मास्टर प्लॅन अहवाल सप्टेंबर १९८७ मध्ये प्राधिकरणास सादर करावा. व तसेच त्यांना तीनऐवजी पाच शहरांच्या मास्टर प्लॅनवरील रकमेस करण्यास प्राधिकरणाने प्रवृत्त करावे.

---

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 04-May-1

**Item No.** 1 **Resolution No.** 1384

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडे कंत्राटदारांचे नोंदणी करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अखत्यारीतील कामे प्रदान करण्यासाठी तयार केलेल्या नोंदणी यादीमध्ये 'मे. बजाज इलेक्ट्रिकल' यांचे नाव वर्ग - 'अ' समाविष्ट करण्यास प्रशासक/प्राधिकरण मान्यता देत आहेत.

---

**Item No.** 2 **Resolution No.** 1385

विषय : गोखलेनगर येथील उच्च उत्पन्न गटाच्या ३२ व ६४ गाळ्यांची वाढीव किंमत भरण्यास सवलत मिळण्यासंबंधात.

ठराव : निर्णय घेतला की,
गोखलेनगर वसाहतीतील बांधकामाच्या प्रगतीनुसार किंमत घेऊन गाळ्यांचे वाटप करण्याकरिता बांधलेल्या उच्च उत्पन्न गटाच्या ३२ व ६४ गाळ्यांच्या योजनेच्या मूलभूत स्वरूपांत बदल न करता गाळ्यांची जाहिर केलेली किंमत भरल्यानंतर गाळ्यांचा ताबा लाभार्थींना देऊन, जाहिर किंमतीची वाढलेली रक्कम (फरक) एक वर्षाच्या मुदतीत चार हप्त्यामध्ये योजनेतील दराने व्याज आकारून घेण्यात यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 05-May-1

**Item No.** 4 **Resolution No.** 1387

विषय : बी. डी. डी. चाळी व नेहरूनगर, कुर्ला येथील इमारत क्र. ५२, ५६, ८४ यांच्या दुरुस्तीबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
जिल्हाधिकारी मुंबई यांनी स्थानिक निकडीच्या कामासाठी प्राधिकरणाला रु. ५८५०/- लाखाचा खास निधी आदेश दि. २० मार्च ८७ नुसार उपलब्ध करून दिला. त्यापैकी रु. ४५.०० लक्ष हे बी. डी. डी. चाळी व म्हाडाचे गाळे यांच्या खास दुरुस्तीसाठी आहेत. बी. डी. डी. चाळी ह्या शासनाच्या मालकीच्या आहेत. त्यांची दुरुस्ती करण्यास शासनाचा आदेश लक्षात घेऊन प्राधिकरण मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या परवानगी देत आहे

---

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 06-May-1

**Item No.** 3 **Resolution No.** 1386

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाचे प्रशासकांची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : हाऊसिंग एन्ड अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (हुडको) यांनी विहीत केलेल्या अटींवर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण हुडको अर्थसाहाय्यित जळगाव/सोलापूर/नांदेड/उस्मानाबाद/गडचिरोली/चंद्रपूर/परभणी/कोल्हापूर/वर्धा/पुणे व ठाणे जिल्हा येथील बेघर भूमिहीनांकरिता ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी एकूण २२६.८६ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

---

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 08-May-1

**Item No.** 5 **Resolution No.** 1388

विषय : वांद्रे पुनःप्रापण योजनेतील कोड क्र. ०७१ च्या अंतर्गत उच्च उत्पन्न गटाच्या गाळ्यांकरिता कॅप्टन पी. के. कपूर यांनी केलेला अर्ज.

ठराव : निर्णय घेतला की,
कॅप्टन पी. के. कपूर यांनी वांद्रे पुनःप्रापण योजनेतील कोड क्र. ०७१ च्या अंतर्गत उच्च उत्पन्न गटाच्या गाळा मिळण्यासाठी केलेला अर्ज संरक्षण दलातील लोकांसाठी असलेल्या, नियमांतील श्रेणी क्रमांक ५ व ६ किंवा केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या श्रेणीत ज्यादा गाळ्यांच्या उपलब्धतेनुसार समाविष्ट करून, पात्रता ठरविण्यासाठी त्याचा विचार करण्यात यावा. यापैकी कोणत्याही श्रेणीत जादा गाळे उपलब्ध नसल्यास सुविधा पुरविण्यासाठी राखून ठेवलेल्या गाळ्यांमधून एक गाळा वाटप करण्यासाठी अर्जाचा समावेश सर्वसाधारण लोकांसाठी असलेल्या श्रेणीत करून पात्रता ठरविण्यासाठी त्याचा विचार करण्यात यावा. मात्र अर्जदारांचा समावेश यापैकी कोणत्याही श्रेणीत केला तरी पात्रतेचे निकष अर्जदार सर्वसाधारण लोकांसाठी असलेल्या श्रेणीतील आहे असे समजून काढण्यात यावे. याप्रमाणे छाननीत अर्जदार पात्र ठरल्यास त्याला गाळ्याचे वाटप करण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 15-May-1

**Item No.** 6 **Resolution No.** 1389

विषय : मेघावाडी-जोगेश्वरी येथील भूखंडाचा बालविकास विद्यामंदिराने शाळेसाठी केलेला वापर नियमाधीन करून भाडे पट्ट्यावर भूखंड देण्याबाबत.

ठराव : बाल विकास विद्यामंदिर या संस्थेला ठराव क्रमांक ११२० दिनांक ११-११-८५ अन्वये मेघावाडी जोगेश्वरी येथे वितरीत करण्यात आलेल्या भूखंडाचे अधिमूल्य खालील प्रमाणे आकारण्यात यावे.

१) अधिमूल्य -
मूखंडाचे अधिमूल्य वेटेड ॲव्हरेजनुसार रु. १६०/- प्रति. चौ. मी.

२) मरपाई
अधिमूल्याच्या रक्कमेच्या ५० टक्के

३) -अ- भाडेपट्टा
१९८१-१९८६ सहा वर्षाच्या कालावधीसाठी अधिमूल्याच्या एकूण रकमेच्या १ टक्का

अ) -ब-
त्यानंतर प्रचलित धोरणानुार नाममात्र वार्षिक रु. १/- आकारण्यात यावा.
प्राधिकरणाच्या इतर प्रचलित शर्ती व अटींचे पालन करण्यात यावे.

**Item No.** 7 **Resolution No.** 1390

विषय : नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळासाठी स्थायी वकीलांची नेमणूक पुढे चालू ठेवण्याबाबत.

ठराव : असा निर्णय घेतला की,
श्री. ओ. के. डे यांच्या स्थायी वकील म्हणून केलेली नेमणूक दरमहा रुपये १०००/- या स्थायी वेतनावर दिनांक २७-१२-८६ पासून पुढील दोन वर्षासाठी चालू ठेवावी.
मंडळाचे सर्व कायदेविषयक प्रश्न हायकोर्ट व्यतिरिक्त नागपूर शहरातील तसेच नागपूर बाहेरील इतर सर्व न्यायालयात प्राधिकरणातर्फे नागपूर मंडळाची न्यायालयीन प्रकरणे त्यांनी हाताळावयाची आहेत. त्याबद्दल त्यांना वेगळी फी दिली जाणार नाही. नागपूर बाहेरील काम चालविण्यासाठी श्री. डे यांना वर्ग १ च्या अधिकाऱ्यांना मिळणारा प्रवास व दैनिक भत्ता दिला जाईल.
मंडळाची नागपूर येथील हायकोर्टातील कायदे विषयक प्रकरणे सुद्धा श्री. डे यांना मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ यांच्या दिग्दर्शनानंतर चालवायची आहेत व या कामासाठी श्री. डे यांना सरकारने तद्संबंधी केलेल्या नियमांत सहाय्यक सरकारी वकीलांना ठरवून दिलेली फी देण्यात येईल.

**Item No. 8 Resolution No. 1391**

विषय : 'फ्रेन्सड ऑफ मराठवाडा ट्रस्ट' या संस्थेने त्यांच्या समाजकल्याण केंद्राकरिता जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील भूखंड क्रमांक ६८-६९ च्या केलेल्या मागणीबाबत.

ठराव : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील मोकळे भूखंड क्रमांक ६८-६९ सांस्कृतिक व इतर समाजकल्याण योजनेसाठी 'फ्रेन्ड्स ऑफ मराठवाडा ट्रस्ट' या संस्थेला खालील अटींवर ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्यात यावा.

१) महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील भूखंडाचे बलिच्यासाठी असलेले आरक्षण बदलून घेण्याची जबाबदारी सर्वस्वी ट्रस्टची राहील.
२) भूखंडाचे अधिमूल्य प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतीच्या धोरणानुसार 'सांस्कृतिक व समाजकल्याण' कार्यासाठी द्यावयाच्या भूखंडाच्या प्रवर्गानुसार जमिनीच्या विकासावरील कार्यासह आकारण्यात यावेत.
३) अधिमूल्याच्या रकमेच्या एक टक्का वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा.
४) भूखंडावरील अतिक्रमणापासून रक्षण करण्यासाठी ट्रस्टला त्यांच्या स्वखर्चाने तारेचे कुंपण घालण्यात परवानगी देण्यात यावी. त्यासाठी ट्रस्टकडून रुपये १०,०००/- एवढी अनामत रक्कम आगाऊ घेण्यात यावी. भूखंडाच्या हस्तांतरणानंतर सदरहू रक्कम भूखंडाच्या अधिमूल्याच्या रकमेत समाविष्ट करण्यात यावी.
५) ट्रस्टने अंगिकारीलेले सामाजिक व लोक कल्याणाच्या सुविधांचे फायदे मुंबई मंडळाच्या वसाहतीतील रहिवाश्यांना देण्यात प्राधान्य देण्यात यावे.
६) इमारतीच्या बांधकामाचे नकाशे मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ त्याचप्रमाणे मुंबई महानगरपालिका यांच्याकडून मान्य करून घेण्यात यावे.

**Item No. 9 Resolution No. 1392**

विषय : मजासवाडी, जोगेश्वरी येथे सर्व्हीस इंडस्ट्रीकरिता राखून ठेवलेल्या भूखंडाचे वितरणाबाबत.

ठराव : १) मजासवाडी, जोगेश्वरी येथील मुंबई मंडळाने सर्व्हीस इंडस्ट्रीकरिता राखून ठेवलेला सुमारे ३०४५ चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड श्री. महेंद्र गड्डाणी यांना रु. १०००/- प्रति चौ. मी. या दराने ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याच्या कालावधीकरिता देण्यात यावा व अधिमूल्यांच्या १ टक्का वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा.
२) करारपत्र श्री. महेंद्र गड्डाणी यांच्याबरोबर करण्यात यावे व सर्व्हीस इंडस्ट्री गाळेधारकांच्या सोसायटीस सबलीज करण्यास परवानगी देण्यात यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 22-May-1

**Item No.** 10 **Resolution No.** 1393

विषय : कन्नमवारनगर, विक्रोळी या वसाहतीत वाचनालयासाठी आणि मासळी मार्केटसाठी भूखंड मिळणेबाबत डॉ. वा. रा. शेरेकर, आमदार यांची विनंती.

ठराव : कन्नमवारनगर, विक्रोळी येथील वसाहतीमधील खालील दोन भूखंडाचे वितरण मुंबई महानगरपालिकेला वाचनालय व मासळी मार्केटसाठी करण्यात यावे.
१) वाचनालयासाठी :-
इमारत क्रमांक १७७ व १७९ समोरील सुमारे ३८९ चौ. मी. चौकोनी आकाराचा भूखंड.
२) मासळी मार्केटसाठी :-
इमारत क्रमांक ८० जवळील ४ फूट रुंदीच्या रस्त्याला लागून असलेला सुमारे ३१६ चौ. मी. आकाराचा भूखंड.
वरील दोन भूखंड मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतीच्या प्रचलित धोरणानुसार भूखंडाचे अधिमूल्य व भाडेपट्टा आकारून ३० वर्षांच्या भाडेपट्टयाने करण्यात यावे.
प्राधिकरणाच्या इतर अटी व शर्ती यांचे अवलंबन करण्यात यावे.

---

**Item No.** 11 **Resolution No.** 1394

विषय : शिव-कोळीवाडा येथील संक्रमण शिबिर क्र. दोन पुनर्विकसित योजनेतील ९४८ गाळ्यांपैकी, बांधावयाच्या २३७, गाळ्यांच्या निविदा मंजूर करणेसंबंधी (जोत्यावरील बांधकाम)

ठराव : शिव-कोळीवाडा येथील संक्रमणे शिबिर क्र. दोन, पुनर्विकसित योजनेतील २३७ गाळ्यांच्या, जोत्यावरील बांधकामासाठीची रु. ५२,५७,२०० ची (रु. ५३,७१,०६७ या अंदाजित किंमतीच्या २.१२ टक्के कमी) मे. आश्विमा कन्स्ट्रक्शन यांची निम्नतम निविदा स्वीकारावी.

---

**Item No.** 12 **Resolution No.** 1395

विषय : मागाठाणे, बोरिवली (पूर्व) येथील शॉपिंग सेंटर मधील गशाळा क्र. ४ च्या मागे किंवा पुढे दुकान वाढविण्यास परवानगी मिळणेबाबत.

ठराव : श्री. यशवंत गणपतराव देसाई, प्रोप्रायटर गीता प्रोव्हीजन ॲन्ड जनरल स्टोअर्स यांना मागाठाणे बोरिवली (पूर्व) येथील शॉपिंग सेंटरमधून वितरीत केलेला गाळा क्रमांक - ४ च्या मागील बाजूस सुमारे १० बाय ९ आकाराचा मोकळा भूखंड प्रथम दहा वर्षांच्या भाडेपट्टयाने प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतीच्या प्रचलित धोरणानुसार इतर अटी व शर्तींना आधिन राहून व भूईभाडे आकारून देण्यात यावा.
२) वाढीव बांधकाम करण्यापूर्वी महापालिकेची परवानगी घ्यावी.

---

**Item No.** **13** **Resolution No.** **1396**

विषय : गाळ्यांच्या वाटपास लागलेल्या विलंबाच्या कालावधीसाठी व्याज आकारून काढण्यात येणाऱ्या किंमतीत सवलत देणे.

ठराव : निर्णय घेतला की, गाळे/भूखंडाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही प्रशासकीय कारणांसाठी त्यांच्या वाटपास विलंब झाल्यास विलंबाच्या कालावधीसाठी किंमतीवरच व्याज आकारताना, किंमतीतील नफ्याचा अंश बाजूला काढून येणाऱ्या किंमतीच्या रकमेवर व्याज आकारण्यात यावे. तसेच एखाद्या विशिष्ट कालावधीचे व्याज आकारण्याऐवजी, विलंबाच्या पुढील कालावधीसाठी, मूळ किंमतीवर (भांडवलीकृत व्याजाची रक्कम वगळून) व्याज आकारून किंमत काढण्यात यावी, मात्र किंमत आकारण्यातील व या सवलतींचा लाभ जेथे वाटपातील विलंब हा प्रशासकीय कारणांसाठी झाला आहे व अर्जदार त्या विलंबासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार नाही त्या प्रकरणांपुरताच मर्यादित ठेवण्यात यावा. जेवढ्या प्रकरणी स्वतंत्र किंमत कळविण्यात आली नाहीत्या प्रकरणी हा निर्णय लागू राहील.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 27-May-1

**Item No.** 14 **Resolution No.** 1397

विषय : राष्ट्रीय गृहनिर्माण संस्थेच्या प्रादेशिक गृहनिर्माण विकास केंद्राची प्राधिकरणामध्ये स्थापना.

ठराव :

१. प्रादेशिक केंद्रासाठी आवश्यक कर्मचारी व अधिकारी वर्ग प्राधिकरणाच्या सेवेमधून केंद्राकडे वर्गीकृत करण्यात येईल.
२. या वर्गीकृत कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांची सेवा ही प्राधिकरणाचीच सेवा म्हणून मानण्यात येईल. व त्यांच्या सेवा शर्ती प्राधिकरणाप्रमाणे राहतील.
३. अशा वर्गीकृत कर्मचाऱ्यांच्या व अधिकाऱ्यांच्या वेतन खर्चाची पूर्तता राष्ट्रीय गृहनिर्माण संस्थेकडून मिळणाऱ्या आर्थिक अनुदानातून केली जाईल.
४. केंद्राचे आर्थिक व्यवहार करण्यासाठी केंद्राचे संचालक व पूर्णकालीन अधिकारी यांना आहरण व संवितरण (ड्रॉइंग ॲन्ड डिस्बर्सिंग) करण्याचे पूर्ण अधिकार राहतील.
५. प्राधिकरणातील इतर सम पदावरील अधिकाऱ्यांना असलेल्या वित्तीय व इतर अधिकारानुसार केंद्राच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या अधिकाराचा वापर करता येईल.
६. प्रादेशिक गृहनिर्माण विकास केंद्रासाठी गृहनिर्माण भवनातील दुसऱ्या मजल्यावर केंद्राचे कार्यालय व प्रशिक्षण सभागृह मिळून सुमारे २५०० चौ. फूट जागा उपलब्ध करून यावी. सदर सभागृहाचा वापर प्राधिकरण आपल्या संशोधन विकास व प्रशिक्षण कक्षाकरितादेखील करेल.
७. केंद्राला लागणारे फर्निचर, जागा, वीज व तत्सम सोयी प्राधिकरणातर्फे विनामूल्य पुरविण्यात येतील.
८. राष्ट्रीय गृहनिर्माण संस्थेने मंजूर केलेल्या प्रादेशिक गृहनिर्माण विकास केंद्राचे अंदाज पत्रकातील तरतूदीनुसार विविध बाबींवर केंद्रातर्फे खर्च करण्यात येईल. संचालक, प्रादेशिक गृहनिर्माण विकासकेंद्र यांच्या संमतीने केंद्राचा खर्च भागविला जाईल.
९. केंद्रासाठी उपलब्ध होणारे अनुदान इत्यादीसाठी बँकेत एक स्वतंत्र खाते प्रादेशिक गृहनिर्माण विकास केंद्राच्या नावाने उघडण्यात यावे. अशा केंद्राचे हिशोब वेगळे ठेवण्यात यावेत.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 29-May-1

**Item No.** 15 **Resolution No.** 1397

विषय : गाळे/भूखंडासाठी काढलेल्या सोडतीत पाच किंवा अधिक वेळा अयशस्वी झालेल्या गाळे/भूखंडाचे वाटप करण्याची योजना.

ठराव : निर्णय घेतला की,
गाळे/भूखंडासाठी सोडतीत किमान पाच वेळा अयशस्वी झालेल्या अर्जदारांना गाळे/भूखंडाचे वाटप करण्यासाठी वरील बाब टिप्पणीत जोडल्याप्रमाणे तयार केलेल्या योजनेस मान्यता देण्यात येते. ही योजना प्रथम शासनाकडे पाठवून त्यांची प्रतिक्रिया कळल्यानंतर ती अंमलात आणावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 07-Jun-19

**Item No.** 9 **Resolution No.** 1406

विषय : खोली क्र. ४०३ मध्ये लाकडी विभाजक बदलणे, वातानुकुलित यंत्र बसविणे व रंगकाम इत्यादी

ठराव : निर्णय घेतला की,
प्राधिकरणाची पुनर्रचना होण्याची शक्यता गृहित धरून अध्यक्षांच्या कक्ष रिकामा करण्यासाठी श्री. डिसोझा यांचे कार्यालय तेथून हलवून कक्ष क्र. ४०३ मध्ये प्रतिस्थापित करण्यासाठी लागणाऱ्या रु. २३३१९.०० (रुपये तेवीस हजार तीनशे एकोणीस मात्र) अंदाजपत्रकांना मान्यता देत आहेत. हे काम तातडीने करून घेतले गेले. त्यामुळे उपमुख्य अभियंता (पूर्व) ह्यांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देत आहेत. पुढेमागे ही खोली प्राधिकरणाला उपयोगी पडेल.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 08-Jun-19

**Item No.** 1 **Resolution No.** 1398

विषय : जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्य पातळीवर एकात्मिक गृहनिर्माण व नागरी विकासासाठी कार्यपद्धती व धोरण ठरवून त्या आधारे एक एकत्रिक असा कार्यक्रम राबविण्याबाबत.

ठराव : या कामी प्रस्तावित केल्याप्रमाणे 'ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई' यांनी कळविल्याप्रमाणे रु. २५,०००/- ह्या खर्चास प्राधिकरणाने मंजूरी दिली. हा खर्च बी. यू. डी. पी. शीर्षकाला घालण्यात यावा.

---

**Item No.** 2 **Resolution No.** 1399

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या वसाहतीतील इमारतींची दुरुस्ती.

ठराव : निर्णय घेतला की,
शासन निर्णय क्रमांक - सुसोयी/४४८६/३७९५/ का. ४ दिनांक १५-५-१९८७ मधील आदेशांची अंमलबजावणी दिनांक २८-५-८७ रोजी भरलेल्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत ठरविलेल्या सोबत प्रपत्रामधील बाबी लक्षात घेऊन करण्यात यावी. या आदेशांची अंमलबजावणी करताना काही बाबतीत निर्णय घेणे आवश्यक झाल्यास प्रशासकीय निर्णय घेण्यात यावा. याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत असल्याबद्दल शासनाला कळविण्यात यावे. यासाठी लागणारी रक्कम चालू वर्षात अनुदान म्हणून देण्याबद्दल शासनाला विनंती करावी.

---

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 09-Jun-19

**Item No.** 4 **Resolution No.** 1401

विषय : वांद्रे पुन:प्रापण येथील भूखंड क्रमांक ३ हा स्वयंसिद्धा पी. डब्ल्यू. डी. को. ऑप. हौसिंग सोसायटीला देण्याबाबत.

ठराव : शासनाच्या आदेशानुसार वांद्रे पुन:प्रापण येथील सुमारे ५०० चौ. वार क्षेत्रफळाचा भूखंड क्रमांक ३ हा पी. डब्ल्यू. डी. स्टॉफ को. ऑप. सोसायटी (आता महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम, १९६० अन्वये 'स्वयंसिद्धा पी. डब्ल्यू. डी. स्टाफ. को. ऑप. हाऊसिंग सोसायटी लि.' या नावाने नोंदणीकृत झालेली संस्था) यांना शासनाचे दिनांक १७-९-८६ क्रमांक एडीएल - ३२७८/६८३/ (III) का. १० पत्राद्वारे नमूद केलेल्या अटींची पूर्तता केल्यामुळे ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्यावर देण्यात यावा. भूखंडाचे अधिमूल्य खालीलप्रमाणे आकारण्यात यावे.

१) विकासावरील खर्चासह जमिनीची मूळ किंमत.
२) चॅनलिशन चार्जेस रु. १५० प्रति. चौ. मी.
३) अधिमूल्याच्या किंमतीच्या २.५ टक्के वार्षिक भाडेपट्टा.

प्राधिकरणाच्या इतर शर्ती व अटींचे पालन करण्यात यावे.

---

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 10-Jun-19

**Item No.** 5 **Resolution No.** 1402

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीत जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या सहकारनगर, चेंबूर येथील ग्रामीण/नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण १७८.७९ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 12-Jun-19

**Item No.** 6 **Resolution No.** 1403

विषय : श्रीमती प्रतिमा पानवलकर यांची सेवा जागतिक बँक प्रकल्प विभागाच्या समाज-विकास कक्षाच्या प्रमुखपदी सामावून घेण्याबाबत.

ठराव : निर्णय घेण्यात येतो की, जागतिक बँक प्रकल्प विभागाच्या आस्थापनेवरील समाज विकास कक्ष प्रमुख या पदाचे वेतनमान जागतिक बँक प्रकल्प विभाग कार्यान्वीत असेल तोपर्यंत रु. ६८०-१५०० वरून रु. १५००-१९२५ असे सुधारण्यात यावे.
उपरोक्त सुधारीत वेतनश्रेणी श्रीमती पानवलकर सदर पद धारण करतील तोपर्यंतच राहील त्यानंतर सदर पदाचे वेतनमान रु. ६८०-१५०० असे होईल.
श्रीमती पानवलकर यांच्या समाजविकास कक्ष प्रमुख पदावरील कायम नेमणूकीच्या अटी व शर्ती जागतिक बँक प्रकल्प विभागाने प्रशासक, प्राधिकरण यांच्या अंतिम मान्यतेने तयार कराव्यात या अटी शर्तीच्या आधिन राहून श्रीमती पानवलकर यांच्या कायम नेमणूकीचे आदेश संचालक/जागतिक बँक प्रकल्प यांनी काढावेत.

**Item No.** 7 **Resolution No.** 1404

विषय : मजूर सहकारी संस्थांना देण्यात आलेल्या बांधकामाविषयी सवलती रद्द करणेबाबत.

ठराव : प्राधिकरणाने आपला ठराव क्रमांक ७०३ व परिपत्रक दि. २८-१०-८३ नुसार मजूर सहकारी संस्थांना दिलेल्या सर्व सवलती रद्द करण्यात येत आहेत. परंतु त्या संस्थांना २ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी किंमतीच्या कामासाठी निविदा सादर करीत असताना भरावयाच्या बयाणा रकमेची (अर्नेस्ट मनी) सूट देण्यात यावी.

**Item No.** 8 **Resolution No.** 1405

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीत जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या १) सोमलवाडी, नागपूर २) लातूर ३) अलिबाग ४) चंद्रपूर ५) चक्कीखाना, सांताक्रूझ येथील नागरी गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून २४१.७६ लाख रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **16-Jun-19**

**Item No.** **10** **Resolution No.** **1407**

विषय : रायटर गल्ली, दादर येथे प्लॉट नं. ४४० वरील पुनर्रचित इमारतीत तळमजल्यावरील २१ गाळे पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या कार्यालयासाठी देणे.

ठराव : निर्णय घेतला की,
दादर येथील रायटर गल्ली, प्लॉट नं. ४४० वरील पुनर्रचित इमारतीतील जादा गाळ्यांपैकी तळमजल्यावरील सुमारे ३७८० चौ. फूट क्षेत्रफळ असलेली जागा (२१ गाळे) पंतप्रधान अनुदान प्रकल्पास भाडेतत्वावर कार्यालयीन वापरासाठी देण्यात यावी.

**Item No.** **17** **Resolution No.** **1414**

विषय : श्री. एम. व्ही. ताथवडकर, विधी सल्लागार यांच्या 'रिटेनर' पद्धतीने नेमणूकीसाठी विचार करण्याबाबत.

ठराव : श्री. एम. व्ही. ताथवडकर, विधी सल्लागार/प्राधिकरण यांची पुनर्नेमणूकीची मुदत संपल्यानंतर, त्यांची 'विशेष विधी सल्लागार' म्हणून २ जुलै १९८७ पासून रीटेनर पद्धतीने बाब टिप्पणीमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीवर नेमणूक केली जावी.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **17-Jun-19**

**Item No.** **11** **Resolution No.** **1408**

विषय : संचालक/पीएमजीपी यांना अधिकार प्रदान करण्याबाबत.
इमारत पुनर्रचना व प्रश्शासकीय मंजूरी.

ठराव : संचालक पीएमजीपी व सहमुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना पंतप्रधान अनुदानातून कार्यान्वित करावयाच्या मुंबई बेटांतील जुन्या इमारतीची पुर्नबांधणी व संक्रमण शिबिरांची बांधणी या योजनांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **22-Jun-19**

**Item No.** **13** **Resolution No.** **1410**

विषय : नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातील कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला नंदनवन येथे देण्यात आलेला भूखंड.

ठराव : नंदनवन - नागपूर येथील मंडळाच्या ताब्यातील जागेवर तयार केलेल्या योजनेच्या ले-आऊटमध्ये शिल्लक असलेल्या प्रत्येकी ९.५ मी. बाय १८.३० मी. आकाराच्या १० भूखंडावर नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातील कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमार्फत स्वतंत्र बैठ्या गाळ्यांचे बांधकाम करण्यास परवानगी देण्यात येत आहे.
भूखंडाचे वितरण प्राधिकरणाच्या जमिनीच्या प्रचलित धोरणानुसार व इतर शर्ती व अटींनुसार करण्यात यावे. घरबांधणीच्या बांधकामाचे नकाशे मंडळाकडून व नागपूर महानगरपालिकेकडून मंजूर करून घेण्यात यावेत. बांधकाम तीन वर्षांच्या आत पूर्ण करावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 23-Jun-19

**Item No.** 12 **Resolution No.** 1409

विषय : बी.डी.डी. चाळी या शासनाच्या मालकीच्या इमारतीचे खास दुरुस्तीचे काम.

ठराव : जिल्हाधिकारी, मुंबई यांनी स्थानिक निकडीच्या कामांसाठी प्राधिकरणाला रु. ५८.५० लाख रुपयांचा खास निधी आदेश दिनांक २० मार्च ८७ नुसार उपलब्ध करून दिला. त्यापैकी रुपये ४५.०० लाख रुपये हे प्राधिकरणाच्या वसाहतीतील इमारतीच्या व बी.डी.डी. चाळीच्या खास दुरुस्तीसाठी आहे. बी. डी. डी. चाळी या शासनाच्या मालकीच्या आहेत. परंतु शासनाचा आदेश लक्षात घेऊन बी. डी. डी. चाळीच्या खास दुरुस्तीचे काम डिपॉझिट कॉन्ट्रीब्युशन तत्वावर खास बाब म्हणून १८.०० लाख रुपये पर्यंत (अठरा लाख रु.) खर्च करण्यास परवानगी देण्यात येत आहे. यासंबंधी देखरेखीचे कोणतेही उत्तरदायित्व मंडळाने स्वीकारू नये. काम झाल्याबरोबर पी. डब्ल्यू. डी. कडे हस्तांतर करावे.

**Item No.** 16 **Resolution No.** 1413

विषय : सर्वे क. ३८३ वांद्रे येथे अल्प उत्पन्न गट योजनेखाली ६० गाळ्यांचे बांधकामावर कंत्राटदाराला दिलेली जादा रक्कम लेख्यांतून निर्लेखित करणेसंबंधी.

ठराव : निर्णय घेतला की,
सर्व्हे क. ३८३ वांद्रे येथे अल्प उत्पन्न गट योजनेखाली ६० गाळ्यांचे अंतिम देयकातून वसूल करता न येणारी रक्कम रु. २०,१७४/- (रुपये वीस हजार एकशे चौऱ्याहत्तर मात्र) लेख्यांतून निर्लेखित करण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 24-Jun-19

**Item No.** 14 **Resolution No.** 1411

विषय : गाळे/भूखंड वाटपाच्या कामाचा खर्च मांडवली खर्च म्हणून ठरविणे.

ठराव : निर्णय घेतला की,
गाळे/भूखंडांची किंमत ठरविताना बांधकाम खर्चाच्या १ (एक) टक्का एवढा खर्च गाळे/भूखंडांच्या वाटपाच्या कामावरील खर्च म्हणून समाविष्ट करून किंमत ठरविण्यात यावी व योजनेचा स्वरूपानुसार योग्य हप्त्यात वसूल करण्यात यावी.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **25-Jun-19**

**Item No.** **15** **Resolution No.** **1412**

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजनेखालील मध्यम उत्पन्न गटातील म टाईप २० गाळ्यांचे बांधकामावर कंत्राटदाराला दिलेली जादा रक्कम लेख्यांतून निर्लेखित करण्यासंबंधी.

ठराव : निर्णय घेतला की,
जुहू-विलेपार्ले विकास योजनेखाली मध्यम उत्पन्न गटातील म ५ टाईप २० गाळ्यांचे बांधकामावर मेसर्स जय कन्स्ट्रक्शन या कंपनीला जादा दिलेली रु. ७३९०/- ची रक्कम निर्लेखित करण्यात मंजूरी देण्यात येत आहे. वरील प्रकरणी प्राधिकरण निर्णय क्रमांक १११० दि. २५-१०-८५ च्या निर्णयात झालेली ६३९०/- रु. निर्लेखित करण्याची चूक दुरुस्त करण्यात येत असून ती रु. ६३९०/- च्या ऐवजी रु. ७३९०/- (रु. सात हजार तीनशे नव्वद मात्र) करण्यात येत आहे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **29-Jun-19**

**Item No.** **18** **Resolution No.** **1415**

विषय : गलिच्छवस्ती सुधार योजनेखाली जिल्हा नियोजन व विकास परिषदेतर्फे उपलब्ध करून दिलेला निधी.

ठराव : निर्णय घेतला की,
दादासाहेब गायकवाडनगर, मालवणी, मालाड (प.) जवळ कलेक्टर कंपाऊंडमधील गलिच्छवस्तीत ३०० मि. मी. परीघाची पाण्याची लाईन टाकणे हे काम अंदाजे ८ लाख रुपयाचे असून, त्यांना मुंबई महानगरपालिकेतर्फे करण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **03-Jul-19**

**Item No.** **1** **Resolution No.** **1416**

विषय : जागतिक बँक प्रकल्पाअंतर्गत मुलुंड येथील २० हेक्टर जमिनीवर पुन:प्रापणाचे कामाच्या निविदा.

ठराव : निर्णय घेतला की,
मुलुंड येथील जमिनीचे पुन:प्रापणाचे कामाची रु. १,३७,९७,५९४.७५ (रु. १,३१,५१,१२० या अंदाजित किंमतीच्या ४.९१ टक्के जादा) मे. ज्योती कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा स्वीकारण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 04-Jul-19

**Item No.** 2 **Resolution No.** 1417

विषय : दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ, सोलापूर या संस्थेस जुळे सोलापूर शहरामध्ये फार्मसी कॉलेजसाठी मोकळा भूखंड देणेबाबत.

ठराव : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्या विशेष नियोजन प्रकल्प, सोलापूरच्या अंतर्गत मौजे जुळे सोलापूर येथील वसाहतीतील सुमारे २ एकर क्षेत्रफळाची जमीन, दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ या संस्थेस, फार्मसी कॉलेजसाठी शासनाची शिफारस लक्षात घेऊन प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमती विषयक धोरणास अनुसरून रुपये २,००,२५०/- इतके अधिमूल्य आकारून ३० वर्षांच्या भाडेपट्ट्यावर विहित वार्षिक भाड्याने वितरीत करण्यात यावी.
याबाबतची कार्यवाही पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने सत्वर करावी व उरलेल्या जमिनीबद्दल प्रस्ताव पाठवावा.

**Item No.** 3 **Resolution No.** 1418

विषय : हुडकोने मंजूर केलेली खराडी, पुणे येथील अल्प उत्पन्न गट-१ या योजनेअंतर्गत ५५५ गाळे बांधण्याची योजना (योजना क्र. ४४३९) हुडको अर्थसहाय्यामधून वगळण्याबाबत.

ठराव : विषय टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे हुडकोने दिनांक १२-५-१९८६ रोजी मंजूर केलेली 'खराडी, पुणे येथील अल्प उत्पन्न गट १ योजना अंतर्गत ५५५ गाळे बांधणे' ही योजना उच्च न्यायालय मुंबई, यांची स्थगिती आदेश (स्टे ऑर्डर) असल्यामुळे कार्यान्वित करता येत नाही. म्हणून हुडको अर्थसहाय्यामधून वगळण्यात येत आहे. तसेच या योजनेवर झालेला खर्च उच्च न्यायालयांनी स्थगिती आदेश हटविल्यानंतर (वेकेटेड) हाती घेण्यात यावयाच्या योजनेवरील खर्चात समाविष्ट करण्यात यावा.

**Item No.** 4 **Resolution No.** 1419

विषय : देवगिरी कॉलेजजवळ औरंगाबाद येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात यावयाच्या ८४ गाळे व २४ दुकाने यांच्या कामाची निविदा स्वीकारणेबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
देवगिरी कॉलेजजवळ औरंगाबाद येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात यावयाच्या ८४ गाळे व २४ दुकाने यांच्या कामाची रु. ५०,३२,०४७/- ची (रु. ५१,८५,००५/- या अंदाजित किंमतीच्या २.९५ टक्के कमी) मे. प्रकाश बिल्डर्स यांची निम्नतम निविदा स्वीकारली आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 13-Jul-19

| **Item No.** | **5** | **Resolution No.** | **1420** |
|---|---|---|---|

विषय : सिळकत व्यवस्थापन विषयक विनियमांतील विनियम-२४ मध्ये सुधारणा करण्याबद्दलचा मुंबई मंडळाचा प्रस्ताव.

ठराव : निर्णय घेतला की,
सिळकत व्यवस्थापन विषयक, विनियमांतील विनियम-२४ मध्ये नमूद केलेल्या कारणांव्यतिरिक्त इतर एखाद्या योग्य कारणासाठी गाळ्यांच्या हस्तांतरणांस परवानगी मागितली तर ती विनियम-२४ मधील इतर तरतुदींच्या त्याचप्रमाणे प्राधिकरणाने वेळोवेळी काढलेल्या सूचनांच्या आधीन राहून देण्यात यावी.

| **Item No.** | **6** | **Resolution No.** | **1421** |
|---|---|---|---|

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्प व त्या प्रकल्पांतील अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान.

ठराव : वित्त नियंत्रक/पीएमजीपी यांना बाब टिप्पणीसोबत असलेया परिशिष्टातील (वित्त नियंत्रक/प्राधिकरण) यांचे विविध विषयावरील अधिकार या ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.
पीएमजीपी मधील वित्त नियंत्रक हे त्या प्रकल्पातील मुख्य लेखाधिकारी म्हणून कामे पहावी व मुख्य लेखाधिकारी या पदाचे अंगभूत अधिकारांचा वापर करावा. यासही मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | **7** | **Resolution No.** | **1422** |
|---|---|---|---|

विषय : सर्वोदय नगर, मेघवाडी-जोगेश्वरी येथे पोलीस चौकीसाठी भूखंड वितरणाबाबत.

ठराव : सर्वोदर नगर, मेघवाडी जोगेश्वरी येथील १०४ चौ. मी. (१३ मीटर बाय ८ मीटर) क्षेत्रफळाचा भूखंड ३० वर्षांचे भाडेपट्ट्याने प्राधिकरणाच्या प्रचलित किंमतीनुसार, भूखंडाची आगाऊ संपूर्ण किंमत वसूल करून, पोलीस खात्यात भूखंडाचे वितरण करण्यात यावे.

**Item No. 8** **Resolution No. 1423**

विषय : हुडकोने मंजूर केलेली कसबा, करवीर, कोल्हापूर येथील संमिश्र गृहनिर्माण योजना (योजना क्र. ४२९०) हुडको अर्थसहाय्यामधून वगळण्याबाबत.

ठराव : विषय टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, हुडकोने दिनांक १७-०१-८६ रोजी मंजूर केलेली कसबा, करवीर कोल्हापूर येथील संमिश्र गृहनिर्माण योजना (योजना क्र. ४२९०) ३२ गाळे अल्प उत्पन्न गट, ८४ गाळे मध्यम उत्पन्न गट व १२ गाळे उच्च उत्पन्न गट ही योजना ज्या जमिनीवर करावयाची होती त्या जमिनीबद्दल वाद (डिस्प्युट) निर्माण झाल्यामुळे सदर प्रकरण निकालाकरिता शासनाकडे सोपाविलेले आहे तरी त्यासाठी किती कालावधी लागेल हे निश्चित नसल्यामुळे सदर योजना हुडको सहाय्यामधून वगळल्यास मान्यता देण्यात येते. तसेच या योजनेखाली मंजूर झालेल्या रु. ३४.३५ लक्ष कर्जापैकी हुडकोकडून मिळालेल्या रु. ४.४३ लक्षचा पहिला कर्ज - हप्ता हुडकोस प्रशासकांच्या मंजूरीने दि. ३-६-१९८७ रोजी परत करण्यात आलेला आहे. या योजनेवर झालेला खर्च याच जमिनीवर पुढे वाद मिटल्यानंतर हाती घेण्यात यावयाच्या योजनेवरील खर्चात समाविष्ट करण्यात यावा.

**Item No. 9** **Resolution No. 1424**

विषय : केंद्र शासनाच्या विडी कामगार गृहनिर्माण योजनेच्या अंतर्गत लाभार्थींची पात्रता ठरविण्यासाठी स्थानिक पातळीवर सल्लागार समिती नेमणे.

ठराव : निर्णय घेतला की,

केंद्र शासनाच्या विडी कामगार गृहनिर्माण योजनांच्या अंतर्गत अर्जदारांची विशेष योजनाच्या संदर्भात पात्रता ठरविण्यासाठी स्थानिक सल्लागार समिती नेमण्यात यावी. या समितीची रचना खालीलप्रमाणे असेल.

१) मंडळाचे कार्यकारी अभियंत्यांच्या स्तरावरील अधिकारी ... नियंत्रक
२) केंद्र शासनाचे कामगार कल्याण आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी ... सदस्य
३) राज्य शासनाचे सहाय्यक कामगार आयुक्त ... सदस्य
४) मंडळाचे प्रशासकीय अधिकारी आणि मिळकत व्यवस्थापक ... सदस्य

या समितीने आपल्या कामकाजाची कार्यपद्धती ठरवावी. समितीची कार्यकक्षा अर्जदार बिडी कामगारांच्या विशेष गृहनिर्माण योजनेचा लाभ मिळण्यास पात्र आहे किंवा नाही हे ते ठरविण्यापुरतीच मर्यादित राहील. ही बाब वगळता विशेष योजनेखालील गाळे/भूखंडाचे वाटप प्राधिकरणाच्या नियम/विनियम अनुसरून करण्यात यावे. या योजनेप्रमाणेच सिने कलाकार किंवा अशा विशिष्ट श्रेणीतील लोकांसाठी केंद्र शासनाच्या गृहनिर्माण योजना राबविण्याच्या संदर्भात अशीच स्थानिक सल्लागार समिती नेमण्यात यावी.

**Item No.** **11** **Resolution No.** **1426**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, अधिनियम १९७६, नियम ८६ मध्ये मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना निधी या नावाचा एक स्वतंत्र निधी निर्माण करून त्यांचा जमा-खर्च ठेवण्यासाठी बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
'मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना निधी' वित्त नियंत्रक/प्राधिकरण ह्यांच्या नियंत्रणाखाली निर्माण करण्यास प्रशासक/प्राधिकरण मान्यता देत आहोत.
त्याचबरोबर सन १९८०-८१ पासून अशा निधीमधून जमा-खर्च वगळता उर्वरीत रक्कम त्यावरील व्याजासहीत निधीमध्ये वर्ग करण्यासही मान्यता देण्यात येत आहे.
सदर निधीच्या जमा-खर्चासाठी——————————
——————————बँक वित्त नियंत्रक/प्राधिकरण ह्यांच्या नावे नवीन खाते उघडून त्या निधीमधील अतिरिक्त निधी प्राधिकरणाच्या प्रचलित पद्धतीप्रमाणे महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरण अधिनियम १९७६, नियम ३५ अन्वये गुंतवणूक करण्यासही मान्यता देण्यात येत आहे.

---

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **15-Jul-19**

**Item No.** **10** **Resolution No.** **1425**

विषय : चिकणघर, कल्याण येथील अल्प उत्पन्न गटाचे गाळे प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना देऊ करणे.

ठराव : निर्णय घेतला की, चिकणघर-कल्याण येथील अल्प उत्पन्न गटाचे उरलेले गाळे माडेखरेदी तत्त्वावर मुंबई मंडळात ठेवलेल्या सेवानिवासस्थान प्रतिक्षा सूचीवरील अर्जदारांना देऊ करावेत. तसेच कोकण मंडळात सेवानिवासस्थानासाठी प्रतिक्षा सूची असल्यास त्यांनाही हे गाळे देऊ करण्यात यावेत. त्यासाठी खालीलप्रमाणे सवलती देण्यात याव्यात.

१) उत्पन्न मर्यादेची अट लावण्यात येऊ नये.
२) एका व्यक्तीस कमाल दोन गाळे देण्याचा मुद्दा आहे.
३) सुरुवातीस भरावयाची रक्कम २५ टक्के घेऊन बाकीची मासिक समान हप्त्यांबरोबर वसूल करावी.
४) माडेखरेदी कालावधी १२ वर्षांऐवजी १८ वर्षे करण्यात यावा.

वरीलपैकी (३) आणि (४) येथे निर्देशित केलेल्या सवलती देण्यात कर्मचाऱ्यांना सर्वसाधारणपणे परवडेल असा बदल करावयाचा असल्यास मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांनी प्राधिकरणाची मान्यता घेऊन निर्णय घ्यावा. सेवानिवासस्थान प्रतिक्षा यादीतील लोकांची मागणी पूर्ण करून कल्याण येथे घर नसलेल्या इतर कर्मचाऱ्यांनाही गाळे देऊ करण्यास हरकत नाही.
वर निर्देशित केलेल्या सवलती सर्वसाधारण अर्जदारांनाही देण्यात याव्यात.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **18-Jul-19**

**Item No.** **12** **Resolution No.** **1427**

विषय : मौजे कुर्ला येथील स. नं. १७१ (भाग) व १७२ (भाग) मधील जागेत बांधकामाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ठराव : कोकण निवास को. ऑ. हाऊसिंग सोसायटी कुर्ला, यांजकडून बाब टिप्पणीत सादर केल्याप्रमाणे जमिनीच्या विकासावरील खर्च रुपये ३,२३,३६०/- व अधिक जमिनीचे किंमतीचे फरकाची रक्कम रुपये १,०१,०५०/- असे एकूण रुपये ४,२४,४१०/- (चार लाख चोवीस हजार चारशे दहा) वसूल करण्यात यावे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **28-Jul-19**

**Item No.** **13** **Resolution No.** **1428**

विषय : स. गो. बर्वे मार्ग, कुर्ला (पूर्व) येथील नझराणा बेकरीचा रस्त्यांत येणाऱ्या भू-भागाबद्दल बेकरीच्या मागील बाजूस भूखंड देऊन रस्ता मोकळा करण्याबाबत.

ठराव : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या बाब टिप्पणीत नमूद केलेल्या ठराव क्रमांक - २१२ ला अनुलक्षून नेहरूनगर, कुर्ला येथील स. गो. बर्वे मार्ग रुंदीकरणाच्या मार्गी येणाऱ्या नझराणा बेकरी यांच्या ताब्यातील सुमारे ५९० चौ. फू. आकाराच्या भूखंडाऐवजी तेवढ्या आकाराचा पर्यायी भूखंड त्यांच्या ताब्यात असलेल्या सुमारे ९०० चौ. फू. आकाराच्या भूखंडाला लागून असलेल्या भूखंड खालील अटींवर देण्यात यावा.

१) एकूण १५९० चौ. फूट आकाराच्या भूखंडाचे अधिमूल्य बाजारभावाच्या दृष्टीने आकारण्यात यावे. भाडेपट्ट्याच्या वार्षिक दर भूगंडाच्या अधिमूल्यांच्या अडीच टक्के (२ १/२ टक्के) आकारण्यात यावा.

२) पर्यायी भूखंडाच्या भाडेपट्ट्याचा काळ व पूर्वी देण्यात आलेल्या भूखंडाचा व भाडेपट्ट्याचा काळ एकाच दिवशी संपुष्टात यावा. दहा वर्षाच्या भाडेपट्ट्याच्या काळानंतर भाडेपट्ट्याने नूतनीकरण करण्याचे अधिकार प्राधिकरणाकडे रहातील.

३) सदरहू भूखंडावरील रस्त्यांत येणारे बांधकाम स्वखर्चाचे तोडण्यात यावे व त्याबद्दल नुकसान भरपाई दावा करता येणार नाही. भूखंड मोकळा केल्यानंतर तो मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या ताब्यात त्वरित देण्यात यावा.

४) न्यायालयात दाखल केलेला दावा काढून घेण्यात यावा व त्याबद्दल मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडे कोणत्याही भरपाईची मागणी करण्यात येऊ नये.

५) भूखंड वितरणाच्या नेहमीच्या अटी व शर्तीचे अवलंबन करण्यात यावे.

**Item No.** **14** **Resolution No.** **1429**

विषय : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातील अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला जुळे-सोलापूर-१ मधील भूखंड देण्याबाबत.

ठराव : जुळे सोलापूर सर्व्हे क्रमांक - ३१६ मधील १७ मोकळे भूखंड, स्पेशिएल प्लॅनिंग ऑथॅरिटी फॉर जुळे सोलापूर कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला बाब टिप्पणीत नमूद केलेल्या दोन अटी - १) काही कर्मचाऱ्यांच्या सेवा कालमर्यादेची अट व २) मासिक उत्पन्न मर्यादा शिथिल करून खालील अटींवर वितरण करण्यात यावेत.

२) भूखंडाचे अधिमूल्य भूखंडाची मूळ किंमत व विकासावरील खर्चासह आकारण्यात यावी.

३) ज्या कर्मचाऱ्यांची सेवा तीन ते पाच वर्षे झाली आहे अशा कर्मचाऱ्यांकडून पुढील पाच वर्षे सेवेत राहण्याबाबतचे हमीपत्र (ॲफिडेव्हीट) घेण्यात यावे.

४) प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना देण्यात यावयाच्या इतर सर्व अटींचे पालन करण्यात यावे.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **29-Jul-19** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **15** | **Resolution No.** | **1430** |

विषय : पुणे येथील सर्व्हे नं. १० ब अधिक १४ अ अधिक १६ अ अधिक १७ ब इ. (गोल्फ क्लब) पैकी काही जागा इंडिया स्पॉन्सरशिप कमिटीस देणेबाबत.

ठराव : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्या ताब्यात असलेल्या सर्व्हे नं. १० ब अधिक १४ अ अधिक १५ अ अधिक १७ ब (गोल्फ क्लब) पैकी, सोबतच्या नकाशात लाल शाईने दर्शविलेली ४०० चौ. मी. इतकी जागा प्राधिकरणाच्या किंमत विषयक धोरणाप्रमाणे, किंमत आकारून (व ही किंमत सहाय्यक संचालक, नगररचना/प्राधिकरण यांचेकडून प्रमाणित करून घ्यावी.) व प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वांस अनुसरून ३० वर्षांच्या भाडेपट्ट्यावर विहित वार्षिक भाड्याने वितरीत करण्यात यावी. जागेवरील प्रत्यक्ष वस्तुस्थितीनुसार मंडळाने भूखंडाचा चर्तु:सीमा बदलू शकेल.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **05-Aug-1** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **1** | **Resolution No.** | **1431** |

विषय : तुळजापूर, जि. उस्मानाबाद येथील प्राधिकरणाची जमीन सुमारे ४.५६६ हेक्टर जागा एकात्मिक शहर विकास योजने अंतर्गत सेवा सुविधासह रहिवासी विभाग अंतर्गत आरक्षित सर्व्हे नं. २२० (भाग) व १० (भाग) भागातील जमीन तुळजापूर नगरपालिकेस हस्तांतरण करण्याबाबत.

ठराव : औरंगाबाद मंडळाच्या अखत्यारीत असलेल्या तुळजापूर येथील केंद्र पुरस्कृत एकात्मिक शहर विकास योजनेअंतर्गत आरक्षित असलेली व सोबतच्या नकाशात लाल शाईने दर्शविलेली ४.५६६ हेक्टर जमीन रुपये ५५,०००/- प्रति हेक्टर प्रमाणे अधिमूल्य घेऊन, तुळजापूर नगरपालिकेस हस्तांतरीत करावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 12-Aug-1

**Item No.** 2 **Resolution No.** 1432

विषय : दादासाहेब गायकवाड कन्झ्युमर्स को. ऑप. सोसायटी लिमिटेड यांना पंतनगर घाटकोपर येथील वसाहतीत वितरीत करण्यात आलेल्या भूखंडाबाबत.

ठराव : १) प्राधिकरणाने दादासाहेब गायकवाड कन्झ्युमर्स को. ऑप. सोसायटीला वितरीत केलेल्या भूखंडाबाबतचा भाडेपट्टा दादासाहेब गायकवाड कन्झ्युमर्स को. ऑप. सोसायटीने करून देणे ही पूर्ववर्ती अट असून त्यामधील प्राधिकरणाच्या इतर सर्व अटी व नियम अबाधित राखून, याच संस्थेतील सभासदांनी गृहनिर्माण योजनेसाठी स्थापन केलेल्या 'घाटकोपर निर्धार को. ऑप. हाऊसिंग सोसायटीला भूखंड (पोटभाड्याने) उर्वरित एफ. एस. आय. वापरून सबलिज करण्यासाठी खालील अटींवर परवानगी देण्यासंबंधित मुंबई मंडळाला आदेश देत आहे.

२) पोटभाडेपट्ट्याच्या (सबलिज) परवानगीसाठी 'दादासाहेब गायकवाड कन्झ्युमर्स सोसायटीने' अतिरिक्त अधिमूल्यापोटी रुपये ३०,०००/- मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाला द्यावेत.

३) दादासाहेब गायकवाड कन्झ्युमर्स सोसायटीला ज्या उदिष्टांसाठी भूखंड देण्यात आला आहे ते उदिष्ट कार्यरत ठेवण्यात यावे.

४) निवासी गाळ्यांचे हस्तांतरण संस्थेचे सभासद सोडून इतरांना देऊ नयेत, हस्तांतरणाचे अगोदर प्राधिकरणाचा परवानगी घ्यावी.

५) पोट भाडेपट्ट्याचा काळ कन्झ्युमर्स सोसायटीला देण्यात आलेल्या भूखंडाच्या काळाशी जुळता (को-टर्मिनल) करण्यात यावा.

६) भूखंडाच्या बाबतीत जो भाडेपट्टा प्राधिकरणाशी करण्यात येईल, त्यातील सर्व अटी, नियम यांचे पालन, भाडेकरू व पोट भाडेकरू (सब लेसी) काटेकोरपणे पाळतील.

७) पोटभाड्याचा करारनामा तसेच बँकेकडून किंवा आर्थिक संस्थेकडून कर्ज घेण्यासाठी होऊ घातलेल्या गहाण खताचा मसुदा प्राधिकरणाकडून संमत करून घ्यावा लागेल.

८) दादासाहेब गायकवाड कन्झ्युमर्स सोसायटीने एक महिन्यांच्या आत भाडेपट्टा प्राधिकरणाबरोबर करावा.

९) भाडेपट्टा केल्याशिवाय पोटभाड्यासंबंधी लेखी परवानगी मुंबई मंडळाने देऊ नये.

१०) बांधकामासाठी रीतसर परवाना घ्यावा.

---

**Item No.** 3 **Resolution No.** 1433

विषय : अत्युत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रोत्साहनात्मक बक्षीस देणे.

ठराव : सर्वश्री अनंत काशिराम भोसले, गणपत लक्ष्मण गुरव, चन्द्रशेखर लक्ष्मण, केशव महादेव शिंदे, व जगन्नाथ इंदूलकर या प्राधिकरणातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना त्यांनी कर्तव्यामध्ये दाखविलेली सचोटी, सेवेबाबतची निष्ठा, नम्रपणाच्या त्यांच्या गुणांबद्दल प्रोत्साहन म्हणून त्यांना प्रत्येकी रुपये १००/- (रुपये शंभर) रोख बक्षीस व प्रशस्तीपत्र देण्यात यावे.

---

**Item No.** 4 **Resolution No.** 1434

विषय : प्राधिकरण/विभागीय मंडळे यांतील अधिकाऱ्यांना अधिकार-प्रदान गाळ्यांची/भूखंडाची सोडत काढणे व त्यावेळी चहा नाश्ता भोजन पॅकेट आदी वरील खर्च.

ठराव : निर्णय घेतला की,
उपरोक्त विषयावर खर्च करण्याचे पूर्ण अधिकार हे मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण, संचालक/जागतिक बँक प्रकल्प, संचालक/पंतप्रधान अनुदान प्रकल्प व मुख्याधिकारी/मुंबई मंडळ यांना प्रदान करण्यात येत असून इतर विभागीय मंडळाच्या मुख्याधिकाऱ्यांना अशा कार्यक्रमाचे वेळी दरमाणशी कमाल रु. १२/- (रुपये बारा) व दरदिवशी कमाल रु. १५०/- (रुपये एकशे पन्नास) एवढा खर्च करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.
अशा प्रकारे खर्च संबंधित गृहनिर्माण योजना वा विकसित योजना यावर वर्ग करावा.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 13-Aug-1

**Item No.** 5 **Resolution No.** 1435

विषय : विधी सल्लागार/प्राधिकरण या पदाचे वेतनमान वाढविण्याबाबत.

ठराव : निर्णय घेण्यात येतो की, प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील विधी सल्लागार या पदाचे वेतनमान रु. १५००-१९२५ वरून दि. २०/०७/१९८७ मध्यान्ह पूर्व पासून रु. २२५०-२५०० असे सुधारण्यात यावे.
उपरोक्त सुधारीत वेतनमानानुसार श्री. आर. ए. कुळकर्णी यांचे कंत्राटी वेतन नियमानुसार निश्चित करून त्यायोगे मिळणारे लाभ त्यांना मंजूर करण्यात यावेत.
सदर सुधारीत वेतनमान श्री. कुळकर्णी सदर पद धारण करतील तोपर्यंत राहील त्यानंतर सदर पदाचे वेतनमान रु. १५००-१९२५ असे पूर्ववत होईल.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 14-Aug-1

**Item No.** 6 **Resolution No.** 1436

विषय : अत्युत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रोत्साहनात्मक बक्षीस देणे.

ठराव : श्री. मानसिंग भोसले, शिपाई यांनी दाखविलेली सचोटी, सेवेबाबतची निष्ठा, नम्रपणा या त्यांच्या गुणांबद्दल प्रोत्साहनात्मक म्हणून त्यांना रुपये १००/- (रुपये शंभर) रोख बक्षीस व प्रशस्तीपत्र देण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 19-Aug-1

**Item No.** 7 **Resolution No.** 1437

विषय : सक्षम अधिकारी (३) पदावर कंत्राटी नेमणूक केलेले श्री. व्ही. जी. डोईजोडे, यांना मुदतवाढ देण्याबाबत.

ठराव : श्री. व्ही. जी. डोईजोडे, सक्षम प्राधिकारी (३) यांना दिनांक १९-८-८७ पासून शासनाचा पुढील आदेश येईपर्यंत मुदतवाढ देण्यास प्रशासक/प्राधिकरण यांनी मंजूरी द्यावी. शासनाकडून दुसरी व्यक्ती नेमण्याची पर्यायी व्यवस्था झाल्यानंतर श्री. डोईजोडे यांची सेवा तात्काळ संपुष्टात येईल.

**Item No.** 8 **Resolution No.** 1438

विषय : येरवडा, पुणे येथील उरलेल्या 'फ' प्रकारच्या गाळ्यांचे आंतरराष्ट्रीय बेघर निवारा वर्ष १९८७ निमित्त अंध आणि अपंगांना वाटप करणे.

ठराव : निर्णय घेतला की, येरवडा, पुणे येथे विविध उत्पन्न गटांसाठी बांधलेल्या गाळ्यांपैकी 'फ' प्रकारच्या उरलेल्या २० गाळ्यांचे आंतरराष्ट्रीय बेघर निवारा वर्ष १९८७ च्या निमित्ताने अंध व अपंगांसाठी विशेष योजनेखाली वाटप करण्याच्या पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 20-Aug-1

**Item No.** 8 **Resolution No.** 1439

विषय : पवई येथील आराखड्यांत पेट्रोल पंपासाठी आरक्षित केलेल्या भूखंडाच्या वितरणाबाबत.

ठराव :
१) पवई येथील ह जमिनीच्या आराखड्यात पेट्रोल पंपासाठी आरक्षित करण्यात आलेला सुमारे १२५० चौ. मीटरचा भूखंड 'मेसर्स इंडो बर्मा पेट्रोलियम व कंपनी लिमिटेड' या केंद्र शासनाच्या संस्थांना प्राधिकरणाच्या प्रचलित जमिनीच्या किंमतीच्या धोरणानुसार नेहमीच्या शर्ती व अटीनुसार वितरीत करण्यात यावा.
२) भाडे पट्ट्याच्या कालावधी तीन वर्षांचा ठेवावा.
३) भूखंडाचे संपूर्ण अधिमूल्य कंपनीला कळविलेल्या तारखेपासून एक महिन्याच्या आत भरण्यात यावे.
४) भूखंडाचा विकास तीन महिन्याच्या कालावधीत करण्यात प्रारंभ करावा.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 26-Aug-1

**Item No.** 11 **Resolution No.** 1441

विषय : डॉ. ए. टी. वागळे, यांची 'रिटेनर' पद्धतीने नेमणूक करण्याबाबत.

ठराव : डॉ. श्री. ए. टी. वागळे, यांची रिटेनर म्हणून बाब टिप्पणीमध्ये नमूद केल्याप्रमाणे खालील अटी व शर्तीवर नेमणूक केली जावी.

१) डॉ. श्री. ए. टी. वागळे, यांची नेमणूक 'रिटेनर' म्हणून प्रारंभी एक वर्षाच्या कंत्राटी कालावधीकरिता राहील. नेमणूक उभयपक्षी एक महिन्याच्या सूचना पत्राने संपुष्टात येईल.

२) कॅलेन्डर महिन्याप्रमाणे, नेमणूक कालावधीत 'रिटेनर फी' म्हणून दरमहा रुपये २००/- (रुपये दोनशे फक्त) दिले जातील.

३) गृहनिर्माण भवनातील, प्राधिकरणाच्या नियंत्रणातील, मुंबई मंडळ, जागतिक बँक प्रकल्प, व पंतप्रधान अनुदान प्रकल्प या कार्यालयातून काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी वर्गातील कोणत्याही व्यक्तीसाठी कार्यालयीन वेळेत तातडीने औषधोपचारासाठी, डॉ. वागळे, यांना एक महिन्यात दोन पेक्षा जास्त वेळा भवनात बोलाविले असता दोन नंतरच्या प्रत्येक व्हीजीटला फी, म्हणून रु. ५०/- (रुपये पन्नास फक्त) व औषध, इंजेक्शन यासाठी प्रत्यक्षात होणारा खर्च दिला जाईल, मात्र दोन व्हीजीट पर्यंत फी व औषध इंजेक्शनचा खर्च दिला जाणार नाही. भवनात औषधोपचारासाठी भेट दिल्याचा दाखला आवश्यक त्या तपशिलासह जनसंपर्क अधिकारी/मुंबई मंडळ यांचेकडून घेऊन देयकांच्या संदर्भात सादर करणे आवश्यक आहे.

४) डॉ. ए. टी. वागळे, यांची रिटेनर पद्धतीने केलेली नेमणूक ही कंत्राटी नेमणूक असून प्राधिकरणाच्या सेवा नियमांशी संबंधित नाही. तसेच प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना लागू असणाऱ्या कोणत्याही सोयी सवलतींचा लाभ डॉ. वागळे, यांना घेता येणार नाही.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 28-Aug-1

**Item No.** 10 **Resolution No.** 1440

विषय : जागतिक बँक प्रकल्पांतर्गत हाती घ्यावयाच्या कामांत कंत्राटावर व करार पत्रांवर मुद्रांकन करण्याचे अधिकार प्रदान करणेबाबत.

ठराव : बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे जागतिक बँक प्रकल्प विभागातील उपमुख्य अभियंत्यांना कंत्राट व इतर करारपत्रावर सही करण्याचे व ती पूर्ण करून त्यावर मुद्रांकन करण्याचे अधिकार प्रदान करण्यात यावेत.

**Item No.** 12 **Resolution No.** 1442

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण सक्तीची सेवानिवृत्ती योजना, १९७८.

ठराव : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण सक्तीची सेवानिवृत्ती योजना, १९७८ अनुसार विहित करण्यात आलेल्या नोटिशीचा मसुदा बाब टिप्पणीमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे सुधारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 13 **Resolution No.** 1443

विषय : वसाहतीच्या आराखड्यात निरनिराळ्या उपयोगासाठी राखून ठेवलेल्या भूखंडाचे वाटप करण्याचे अधिकार प्रादेशिक मंडळाचे मुख्य अधिकारी यांना प्रदान करणेबाबत.

ठराव : विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील वसाहतींच्या आराखड्यात अथवा विकास आराखड्यात राखून ठेवण्यात आलेला भूखंडापैकी विशिष्ट विहित उपयोगासाठी व विशिष्ट अशा शासकीय अथवा निमशासकीय संस्थांना द्यावयाच्या भूखंडाचे वितरण, विभागीय मंडळाचे मुख्य अधिकारी यांना प्राधिकरणाने मंजूर केलेल्या अटी व नियमानुसार वितरण करण्याचे अधिकार देण्यास मंजूरी देत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 04-Sep-19

**Item No.** 1 **Resolution No.** 1445

विषय : चारकोप (भाग-३) कांदिवली, मुंबई येथील क्लस्टरमधील प्रत्यक्ष भूखंड अंतर्गत, पाणीपुरवठा, मल:निस्सारण, पदपथक, सांडपाण्याची गटारे, गाभाघरे (कोअर हाऊसेस) यांच्या विकासाच्या निविदा स्वीकारणे बाबत.

ठराव : वरील बाबींवर विचार करून प्रशासक/प्राधिकरण यांनी खालीलप्रमाणे निविदा स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे.

विभाग १ :- या विभागातील निम्नतम कंत्राटदार मे. गणेश कन्स्ट्रक्शन कं. यांची, या विभागासाठीच्या निविदेच्या किंमतीच्या १ टक्के कमी असलेली रु. ३१,३४,४६५.७३ रकमेची निविदा स्वीकारली आहे.

विभाग २ :- या विभागातील दुसरे निम्नतम कंत्राटदार मे. गणेश कन्स्ट्रक्शन कंपनी यांची या विभागासाठीच्या निविदेच्या किंमतीच्या ०.५ टक्के जास्त असलेली रु. ३२,८३,८६८.६६ रकमेची निविदा स्वीकारली आहे.

विभाग ३ :- या विभागात दुसरे निम्नतम असलेले कंत्राटदार मे. विश्वकर्मा एन्टरप्रायझेस ह्यांची, ह्याच विभागासाठीच्या निविदेच्या किंमतीच्या १.५ टक्के जास्त असलेली रु. २९,९५,७११.६० रकमेची निविदा स्वीकारली आहे.

विभाग ४ :- या विभागात निम्नतम असलेले मे. विश्वकर्मा एन्टरप्रायझेस हे कंत्राटदार या विभागासाठीच्या निविदेच्या रकमेनेच काम करणार असून त्यांची रु. २९,७३,३४६/- ची निम्नतम निविदा स्वीकारली आहे.

विभाग ५ :- या विभागात दुसरे निम्नतम असलेले मे. सहानी कन्स्ट्रक्शन कं. यांची या विभागासाठीच्या निविदेच्या किंमतीच्या ४.७ टक्के जास्त असलेली रु. ३१,१३,०९३.२६ रकमेची निविदा स्वीकारली आहे.

विभाग ६ :- या विभागात दुसरे निम्नतम असलेले मे. माय कन्स्ट्रक्शन कं. यांची या विभागातील निविदेच्या किंमतीच्या ३.९५ टक्के जास्त असलेली रुपये ३६,२९,०२६.५१ इतक्या रकमेची निविदा स्वीकारली आहे.

**Item No.** 3 **Resolution No.** 1447

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील माध्यमिक शाळेच्या भूखंड वितरणाबाबत.

ठराव : जुहू विलेपार्ले विकास योजना येथील माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान यासाठी राखून ठेवलेला सुमारे ५३९२ चौ. मी. आकाराचा भूखंड "आर्य विद्या मंदिर" या संस्थेला ३० वर्षांच्या भाडेपट्टा करारानुसार खालील अटींवर वितरित करण्यात यावा.

१) भूखंडाचे विहित संपूर्ण अधिमूल्य एक महिन्याचे आत भरण्यात यावे.
२) इंग्रजी माध्यमाप्रमाणे मराठी माध्यमामधून शिक्षण देण्यात यावे.
३) ज्या प्रयोजनासाठी भूखंड वितरित केला आहे त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर होत आहे याची खात्री करण्यासाठी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातील प्रतिनिधी कार्यकारी मंडळात घेण्यात यावा.
४) वसाहतीतील रहिवाशांच्या मुलांना शाळेमध्ये प्रवेश देण्यात प्राधान्य द्यावेत.
५) वार्षिक भाडेपट्टा अधिमूल्याच्या एक टक्का या दराने आकारण्यात यावा. (भाडेपट्ट्याच्या रकमेचे कॅपिलायझेशन केल्यास वार्षिक नाममात्र रुपये १/-)
६) भाडेपट्ट्याचा काळ प्रथम ३० वर्षांचा करण्यात यावा. प्राधिकरणाच्या इतर प्रचलित अटींचे अवलंबन करण्यात यावे.

---

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 07-Sep-19

**Item No.** 2 **Resolution No.** 1446

विषय : प्राधिकरणाच्या वसाहतीत दुकानांसाठी बांधलेल्या बैठ्या गाळ्यांची विक्री.

ठराव : वसाहतीत दुकानांसाठी बांधलेल्या स्वतंत्र बैठ्या गाळ्यांची विक्री करण्यात यावी. त्यासाठी अधिकृत गाळेधारकांना गाळ्यांचा बांधकाम खर्च, जमिनीची किंमत आणि जमिनीच्या विकासाचा खर्च आणि अकल्पित बाबींपोटी तरतूद करून एकूण येणाऱ्या किंमतीच्या तिप्पट किंमत आकारावी. अनधिकृत गाळेधारकांना ती पाचपट आकारण्यात यावी. याशिवाय अधिकृत आणि अनधिकृत गाळेधारकांना जमिनीच्या शिल्लक चटईक्षेत्र निर्देशकांसाठी चालू बाजारभावाने किंमत आकारण्यात यावी. किंमतीत कोणतीही सूट देऊ नये. गाळ्यांची किंमत आणि शिल्लक चटईक्षेत्र निर्देशकांची किंमत एकरकमी वसूल करावी. तसेच भाड्याची काही थकबाकी असल्यास तीही एकरकमी वसूल करावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 09-Sep-19

**Item No.** 4 **Resolution No.** 1448

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनासाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाचे प्रशासकांची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : हाऊसिंग ॲन्ड अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (हुडको) यांनी विहित केलेली अटींवर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण हुडको अर्थसहाय्यित अमरावती जिल्हा येथील बेघर भूमिहीनांकरिता ग्रामीण गृहनिर्माण योजनासाठी २५.५० लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती ७ व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 5 **Resolution No.** 1449

विषय : श्री. जी. डी. काटकर, सहविधी सल्लागार जागतिक बँक प्रकल्प विभाग/प्राधिकरण यांना मुदतवाढ देण्याबाबत.

ठराव : श्री. ग. दा. काटकर, सहविधी सल्लागार/जागतिक बँक प्रकल्प/प्राधिकरण यांना दिनांक ३.१०.८७ पासून आणखी एक वर्ष मुदतवाढ देण्यास प्रशासक/प्राधिकरण यांनी मंजूरी दिली. मात्र सदर कंत्राटी नेमणूक एक महिन्याचे नोटीशीने संपुष्टात येईल.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 10-Sep-19

**Item No.** 7 **Resolution No.** 1451

विषय : जुहू विलेपार्ले विकास योजना येथील भूखंड क्रमांक ६८ व ६९ ला जोडून असलेला भूखंड क्रमांक ६७ व ७० मधील भूखंडाच्या लहान आकाराच्या मागणीबाबत.

ठराव : "फ्रेन्ड्स् ऑफ मराठवाडा ट्रस्ट" या संस्थेला दिनांक १५.५.१९८७ क्रमांक १३९१ अन्वये जुहू विलेपार्ले विकास योजना येथील देण्यात आलेला भूखंड क्रमांक ६८ व ६९ ला लागून असलेला सुमारे ३६३ चौ. मी. आकाराचा मोकळा भूखंड खालील अटींवर देण्यात यावा.

१) भूखंड क्रमांक ६८ व ६९ त्याचप्रमाणे आता जादा देण्यात येणाऱ्या सुमारे ३६३ चौ. मी. आकाराच्या भूखंडाची मूळ किंमत रु. ५००/- प्रति चौ. मी. या दराने वसूल करण्यात यावी. एकूण अधिमूल्याच्या रकमेच्या १ टक्का वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा.

२) ठराव क्रमांक : १३९१ देण्यात आलेल्या भूखंड क्रमांक ६८ व ६९ च्या अधिमूल्याच्या फरकाची रक्कम (रु. ५००-१२८ बरोबर ३७२) वसूल करण्यात यावी.

३) भाडेपट्ट्याचा काळ ३० वर्षाचा धरण्यात यावा. सर्व भूखंडाचा भाडेपट्ट्याचा काळ एकाच दिवशी संपुष्टात यावा.

४) भूखंड ज्या प्रयोजनासाठी वितरित केला आहे (उदा. सामाजिक/सांस्कृतिक कार्य) त्याच प्रयोजनासाठी भूखंडाचा उपयोग करण्यात यावा.

५) इमारतीच्या बांधकामाचे नकाशे मुंबई मंडळ महानगरपालिकेच्या संबंधी विभागाकडून मंजूर करून घ्यावेत.

६) दिनांक १५.५.१९८७ ठराव क्रमांक - १३९१ मधील अटींचे पालन करण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 11-Sep-19

**Item No.** 6 **Resolution No.** 1450

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१.

गाळ्यांच्या हस्तांतरणास परवानगी देण्याकरिता अधिमूल्य आकारणे.

ठराव : निर्णय घेतला की, गाळ्यांच्या हस्तांतरणास परवानगी देण्याकरिता अधिमूल्य आकारण्याचा प्राधिकरणाचा ठराव क्रमांक ६२९ अनुसार, दिनांक २८.१.१९८३ रोजी घेतलेल्या निर्णयाआधी गाळ्यांच्या हस्तांतरणास परवानगी मागणारे विहित नमुन्यात भरून जे अर्ज आले होते त्या अर्जावर ते दिनांक २८.१.८३ च्या आधी आल्याची रीतसर नोंद झालेली असली तरी अर्जदारांना त्यावेळी प्रचलित असलेल्या दराने फी रु. १०/- आकारून हस्तांतरणास परवानगी देण्यात यावी. त्यांना प्राधिकरणाचा दिनांक २८.१.८३ चा किंवा त्यानंतरच्या निर्णयानुसार अधिमूल्य आकारण्यात येऊ नये. मात्र ज्या अर्जावर दिनांक २८.१.८३ पूर्वी आल्याची नोंद झालेली नसेल, त्या अर्जदारांना प्राधिकरणाने वेळोवेळी ठरविल्याप्रमाणे अधिमूल्य आकारण्यात यावे.

**Item No.** 8 **Resolution No.** 1452

विषय : जागतिक बँक प्रकल्प अंतर्गत मुलुंड येथील १० हेक्टर जमिनीवरील पुनःप्रापणाचे कामाच्या निविदा.

ठराव : २० हेक्टर जागेवरील मुलुंड येथील पुनःप्रापणाच्या कामाची रु. १,३७,९७,५९४.७५ ची (रुपये १,३१,५१,१२० या अंदाजित किंमतीच्या ४.९१ टक्के जादा) मे. ज्योती कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा दि. ३.७.८७ च्या ठराव क्रमांक १४१६ ने स्वीकारलेली होती. परंतु हे काम आता केवळ अंदाजे १० हेक्टर एवढ्या जमिनीवरच करण्याचे ठरल्यामुळे मे. ज्योती कन्स्ट्रक्शन कंपनी यांची मूळ निविदेची किंमत ज्या प्रमाणात बदलून आता रु. ७२,९७,५२५.०० (रु. ६९,५५,९८५.०० या अंदाजित किंमतीच्या ४.९१ टक्के जादा) या किंमतीस निविदा स्वीकारण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 16-Sep-19

**Item No.** 10 **Resolution No.** 1454

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथे निवासी कारणाकरिता देण्यात आलेल्या भूखंडाबाबत.

ठराव : प्रकरण क्रमांक -१ मधील मुद्दा क्रमांक-३ भूखंड धारकाव्यतिरिक्त इतरांसाठी भूखंड विकसित करावयाचा असल्यास त्यासाठी वरीलप्रमाणे बाजारभावाच्या ५० टक्के अधिमूल्य आकारावे. त्याचप्रमाणे भूखंड धारकांशी इतरांच्या नावे पोटभाडेपट्टा करण्याची परवानगी देण्यासाठी निवासी बाजारभावाने येणाऱ्या अधिमूल्याच्या रकमेवर १० टक्के रक्कम आकारण्यात यावी. भूखंडधारकाने इतरांसाठी करावयाचा पोटभाडेपट्ट्याचा मसुदा विधी सल्लागार/प्राधिकरण यांच्याकडून मान्य करून घेण्यात यावा.
वरील पद्धतीनुसार अशा प्रकारच्या प्रकरणाचा निर्णय घेण्यापूर्वी प्राधिकरणाची मान्यता घेण्यात यावी.

---

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 21-Sep-19

**Item No.** 9 **Resolution No.** 1453

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना वाटप करावयाच्या भूखंडाच्या संबंधात पात्रतेच्या अटी.

ठराव : कर्मचाऱ्यांच्या सहकारी संस्थांना भूखंड देण्याच्या योजनेखाली अर्जदारांची पात्रता ठरविण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला :

१) ज्या कर्मचाऱ्यांचे प्राधिकरणाने दिलेले मालकीचे भाडे खरेदीचे गाळे आहेत त्यांची मुले १८ वर्षापेक्षा कमी वयाची असल्यास ती मुले १८ वर्षाची होईपर्यंत पालक नेमण्याच्या अटींवर त्यांचे गाळे मुलांच्या नावे करण्यात यावेत. मात्र ही सवलत मुलगा किंवा मुलगा नसल्यास मुलगी एवढ्या पुरतीच मर्यादित ठेवावी.

२) ज्या कर्मचाऱ्यांचे मालकीचे खाजगी गाळे असतील त्यांच्या बाबतीत मालकीच्या घरासंबंधीची अट शिथिल करून पात्रता ठरविण्यात यावी. मात्र अशा कर्मचाऱ्यांनी, कर्मचाऱ्यांच्या सहकारी संस्थेतील नवीन गाळे त्यांना वाटप होण्याआधी त्यांचे सध्याचे मालकीचे गाळे मुलांच्या नावे हस्तांतरित करून घेण्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले पाहिजे.

३) या कर्मचाऱ्यांना त्यांचे सध्याचे व मालकीचे गाळे प्राधिकरणाच्या एखाद्या आजी किंवा माजी कर्मचाऱ्यांच्या नावे करून द्यावयाचे असतील किंवा एखाद्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या नावे करून द्यावयाचे असतील तर त्यांना तशी परवानगी देण्यास यावी. मात्र ज्यांच्या नावे गाळे करून द्यावयाचे त्यांच्या व त्यांच्या कुटुंबियांना मुंबईत मालकीचा सध्या गाळा असता कामा नये.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **22-Sep-19**

**Item No.** **11** **Resolution No.** **1455**

विषय : हुडकोने मंजूर केलेली परभणी येथील संमिश्र गृहनिर्माण भूखंड विकास/सोयीसह भूखंड योजना (योजना क्रमांक ५१८८ सी) हुडको अर्थसहाय्यामधून सदर योजना वगळण्याबाबत.

ठराव : विषय टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे हुडकोने दिनांक २.७.१९८७ रोजी मंजूर केलेली ''परभणी येथील संमिश्र भूखंड विकास/सोयीसह भूखंड योजना'' हुडको अर्थसहाय्यामधून वगळण्यात येत आहे कारण, सदर योजनेस दिलेली जमीन परभणी नगरपालिकेने त्यांच्या ठराव क. १५५, दि. ४.५.१९८७ नुसार औरंगाबाद मंडळाकडून परत घेऊन नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकरिता घरबांधणी योजना हाती घेण्यात यावी असे ठरविल्यामुळे सदर जमीन नगरपालिकेस परत करावी लागणार आहे. तसेच या योजनेवर झालेला खर्च व योजना मागे घेण्याच्या तारखेपर्यंत होणारा प्रारंभिक खर्च जेव्हा ही योजना इतर जमिनीवर हाती घेण्यात येईल तेव्हा या योजनेवरील खर्चात समाविष्ट करण्यात यावा.

**Item No.** **19** **Resolution No.** **1463**

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे १) एम. आय. डी. सी. जमिनीवर नागपूर २) खोपोली ३) जालना येथील नागरी गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून १४२.१३ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 24-Sep-19

**Item No.** 12 **Resolution No.** 1456

विषय : प्राधिकरणाचे सल्लागार म्हणून नेमलेल्या मे. आपटे कन्सल्टंसी या संस्थेच्या नेमणूकीबाबत.

ठराव : प्राधिकरणाच्या दिनांक १८-७-१९८६ च्या ठराव क्रमांक - १२४६ मधील निर्णयास अनुसरून प्राधिकरणाच्या क्रमांक : एमएच/एपीटी - २१८२/९८८३/प्र.-१, दिनांक १५/६/१९८२ च्या आदेशान्वये प्राधिकरणाचे सल्लागार म्हणून प्रथम दोन वर्षांकरिता नेमणूक केलेल्या मे. आपटे कन्सल्टन्सी या संस्थेच्या नेमणूकीची मुदत १ व सप्टेंबर १९८७ पासून एक वर्षाकरिता पूर्वीच्या ठरावातील सध्याच्या अटी व शर्तीनुसार वाढविण्यात येत आहे.

**Item No.** 13 **Resolution No.** 1457

विषय : १) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण आणि अदलाबदल) विनियम १९८१ मध्ये सुधारणा करणे.
२) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम १९८२ मध्ये सुधारणा करणे.

ठराव : निर्णय घेतला की, बाब टिपणात सुचविल्याप्रमाणे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण आणि अदलाबदल) विनियम, १९८१ आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम १९८२ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येते.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 25-Sep-19

**Item No.** 14 **Resolution No.** 1458

विषय : प्राधिकरणाचे कर्मचारी/अधिकारी वर्गाच्या सहकारी गृहनिर्माण संस्था घरबांधणीकरिता देण्यात आलेल्या भूखंडाबाबत.

ठराव : मुख्य प्रवर्तक, श्री. वि. शं. केकाणे यांनी सिद्धार्थनगर, गोरेगांव येथे पूर्वी वितरित करण्यात आलेला सुमारे १०९४ चौ. मी. आकाराचा भूखंड त्याचप्रमाणे श्री. बी. डी. लोहार यांना सिद्धार्थ नगर, गोरेगांव येथे सुमारे १२२४.६२ चौ. मी. आकाराचा भूखंड कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस देण्यात आलेला भूखंड परत ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्याबाबत विचार करण्यात यावा. भूखंडाचे अधिमूल्य व इतर शर्ती व अटी यांची पूर्तता दोन महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्यात यावी. भूखंडाचे अधिमूल्य कर्मचाऱ्यांच्या इतर सहकारी गृहनिर्माण संस्थांना ज्या दराने आकारले आहे त्याच दराने आकारण्यात यावे. कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना भूखंड देण्याबाबतच्या इतर अटी व शर्तीचे अवलंबन करण्यात यावे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **29-Sep-19**

**Item No.** **15** **Resolution No.** **1459**

विषय : लोकमान्यनगर, दादर येथील गाळ्यांची पुर्नबांधाणी योजना.
अनधिकृत गाळेधारकांकडे गाळ्यांचे हस्तांतरण करण्यासाठी आकारावयाचे अधिमूल्य.

ठराव : निर्णय घेतला की, लोकमान्यनगर, दादर या वसाहतीतील गाळ्यांचे हस्तांतरण, अधिकृत गाळाधारकाचा वारस किंवा त्यांच्या कुटुंबाचे इतर घटक याव्यतिरिक्त तिसऱ्या व्यक्तीकडे करण्यास परवानगी देण्यासाठी ही वसाहत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असे संबोधून प्रत्येकी रुपये ५,०००/- एवढे अधिमूल्य आकारण्यात यावे. अधिकृत गाळाधारकाचा वारस आणि त्यांच्या कुटुंबाचे इतर घटक यांच्या बाबतीत प्राधिकरणाने वेळोवेळी काढलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार अधिमूल्य आकारण्यात यावे.

**Item No.** **16** **Resolution No.** **1460**

विषय : मुंबई, पुणे व ठाणे येथील बैठ्या गाळ्यांच्या विक्री योजनेची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात मार्गदर्शक सूचना.

ठराव : निर्णय घेतला की, मुंबई, पुणे व ठाणे येथील बैठ्या गाळ्यांच्या विक्री योजनेच्या संबंधातील शासन निर्णय, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, क्र. एससीएस २८८५/सीआर/१०२१/८ दिनांक १८-५-१९८७ मधील आदेशांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने वरील बाब टिपणीतील मार्गदर्शक सूचनांस मान्यता देण्यात येते. या मार्गदर्शक सूचना प्रादेशिक मंडळांना कळविण्यात याव्यात तसेच त्या मंजूरीसाठी शासनाकडे पाठविण्यात याव्यात.

**Item No.** **18** **Resolution No.** **1462**

विषय : भारतीय जीवन बीमा निगमची समूह बचत संलग्न बीमा योजना प्राधिकरण कर्मचाऱ्यांना लागू करणे.

ठराव : भारतीय जीवन बीमा निगमने प्रस्तुत केलेली समूह बचत संलग्न बीमा योजना ही प्राधिकरण कर्मचाऱ्यांकरिता त्या योजनेच्या नियमाधीन राहून स्वीकारावी.
या योजनेसाठी कर्मचाऱ्यांचे समूह बीमा संरक्षण हे पुढील प्रमाणे असावेत.

| | | |
|---|---|---|
| गट - अ | वर्ग १ मधील कर्मचारी | रु. ८०,०००/- |
| गट - ब | वर्ग २ मधील कर्मचारी | रु. ५०,०००/- |
| गट - क | वर्ग ३ मधील कर्मचारी | रु. ३०,०००/- |
| गट - ड | वर्ग ४ मधील कर्मचारी | रु. १०,०००/- |

ही योजना शक्यतो १ नोव्हेंबर १९८७ पासून कार्यान्वित व्हावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 30-Sep-19

**Item No.** 17 **Resolution No.** 1461

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचारी सहकारी संस्थेला 'चित्तरंजन नगर' राजावाडी घाटकोपर वसाहतीमधील जागा देण्याबाबत.
श्री. स. रा. भागवत यांची विनंती.

ठराव : श्री. भागवत यांनी प्रवर्तित केलेल्या कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्थेस चित्तरंजन नगर, राजावाडी, घाटकोपर येथील वसाहतीमधील इमारत क्रमांक - २० समोरील सी. टी. सी. नंबर - ९८३ मधील सुमारे ९९२.२५ चौ. मी. आकाराचा भूखंड प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार अधिमूल्य आकारून खालील अटींवर भूखंड वितरण करण्यात यावा.
१) प्राधिकरणाच्या अटी व शर्ती दोन महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्यात याव्यात.

**Item No.** 20 **Resolution No.** 1464

विषय : श्री. बी. जे. धुमाळ यांना पतंगनगर, घाटकोपर येथे दुकान क्रमांक २९/८५० ला लागून १० फूट बाय २४ फूट आकाराच्या वितरीत केलेल्या भूखंडाचा भाडेपट्टा वाढविण्याबाबत.

ठराव : पतंगनगर, घाटकोपर येथील दुकान क्र. २९/८५० जवळील श्री. बी. जे. धुमाळ यांनी कोळसा विक्री व्यवसायासाठी देण्यात आलेला भूखंड अल्प मुदतीने दिलेल्या तारखेपासून ३० वर्षांच्या मुदतीने खालील अटींवर देण्यात यावा.
१) भूखंडाचे अधिमूल्य व भाडेपट्टा प्राधिकरणाच्या प्रचलित जमिनीच्या किंमतीनुसार व्यापारी पद्धतीने बाजार भावाच्या दुप्पट दराने आकारण्यात यावे.
२) बांधकामाचे नकाशे मुंबई मंडळ व मुंबई महानगरपालिका यांचेकडून मंजूर करण्यात यावे.

**Item No.** 20 **Resolution No.** 1464

विषय : श्री. बी. जे. धुमाळ यांना पतंगनगर, घाटकोपर येथे दुकान क्रमांक २९/८५० ला लागून १० फूट बाय २४ फूट आकाराच्या वितरीत केलेल्या भूखंडाचा भाडेपट्टा वाढविण्याबाबत.

ठराव : पतंगनगर, घाटकोपर येथील दुकान क्र. २९/८५० जवळील श्री. बी. जे. धुमाळ यांनी कोळसा विक्री व्यवसायासाठी देण्यात आलेला भूखंड अल्प मुदतीने दिलेल्या तारखेपासून ३० वर्षांच्या मुदतीने खालील अटींवर देण्यात यावा.
१) भूखंडाचे अधिमूल्य व भाडेपट्टा प्राधिकरणाच्या प्रचलित जमिनीच्या किंमतीनुसार व्यापारी पद्धतीने बाजार भावाच्या दुप्पट दराने आकारण्यात यावे.
२) बांधकामाचे नकाशे मुंबई मंडळ व मुंबई महानगरपालिका यांचेकडून मंजूर करण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 01-Oct-19

**Item No.** 1 **Resolution No.** 1465

विषय : १) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळेविक्री, गाळ्यांचे हस्तांतरण आणि अदलाबदल) विनियम, १९८१ मध्ये सुधारणा करणे.

ठराव : निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळेविक्री, गाळ्यांचे हस्तांतरण आणि अदलाबदल) विनियम, १९८१ आणि, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम, १९८२ मध्ये सुधारणा करण्याची मंजूर केलेल्या ठराव क्रमांक - १४५७, दिनांक २४-९-१९८७, रद्द करण्यात येत आहे.

**Item No.** 2 **Resolution No.** 1466

विषय : १) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळेविक्री, गाळ्यांचे हस्तांतरण, आणि अदलाबदल) विनियम, १९८१ मध्ये सुधारणा करणे.
२) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम, १९८२ मध्ये सुधारणा करणे.

ठराव : निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळेविक्री, गाळ्यांचे हस्तांतरण, आणि अदलाबदल) विनियम, १९८१ आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम, १९८२ मध्ये सोबत जोडलेल्या अधिसूचनेच्या मसुद्याप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 3 **Resolution No.** 1467

विषय : कुर्ला, काजरोळकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, या संस्थेच्या इमारतीच्या मालकीचे हस्तांतरण.

ठराव : निर्णय घेतला की, कुर्ला काजरोळकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, मुंबई, यांना नेहरूनगर कुर्ला येथे अल्प उत्पन्न गटाच्या इमारत क्र. १५४ आणि १५५ चे वाटप केले आहे, त्या इमारतींची किंमत भरण्यास लागलेल्या विलंबाच्या कालावधीचे, वाटपाच्या तारखेपासूनचे किंमतीच्या रकमेवरील व्याज भरण्यासाठी, महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण वित्त संस्था मर्यादित, यांच्याकडून सहकारी संस्थेने घेतलेल्या कर्जासाठी करावयाच्या गहाणखतावर दुसरा हक्क (सेकंड चार्ज) प्राधिकरणास देण्याचे वित्त संस्थेने मान्य केले असल्याने, सहकारी संस्थेकडून या व्याजपोटी येणे असलेली रक्कम लक्षात न घेता, सहकारी संस्थेकडून प्राधिकरणास काहीही रक्कम देणे नाही याबद्दलचे प्रमाणपत्र (नो ड्यूज सर्टिफिकेट) सहकारी संस्थेस देण्यास मान्यता देण्यात येते.

| Item No. | 4 | Resolution No. | 1468 |
|---|---|---|---|

विषय : 'होली एंजल्स ट्रस्ट' या शैक्षणिक संस्थेला नर्सरी स्कूलसाठी ओशिवरा येथे वितरण केलेल्या मूखंडाबाबत.

ठराव : अन्वये निर्णय घेतला.

अ) ओशिवरा येथील 'होली इंजल्स ट्रस्ट' या संस्थेला नर्सरी स्कूलकरिता देण्यात आलेला सुमारे १२०० चौ. मी. आकाराच्या मूखंडाला खेळाचे मैदान म्हणून लागून असलेल्या सुमारे ४७२५.०० चौ. आकाराचा मूखंड खालील अटींवर पाच वर्षांच्या भाडेपट्टयाने देण्यात येत आहे.

ब) मुंबई महानगरपालिका किंवा भाडेकरू संघटनांनी सदरहू मूखंडाची मागणी केल्यास मुंबई मंडळाच्या आदेशानुसार भाडेपट्टा मुदतीपूर्वी संपुष्टात आणण्यात यावा.

क) भाडेपट्टयाच्या कालावधीत मोकळ्या मैदानाच्या आजूबाजूला इमारतीतील सर्व रहिवाश्यांना व इतर शाळेतील विद्यार्थ्यांना मोकळ्या मैदानाचा उपयोग करून देण्यात यावा.

ड) खेळाच्या मैदानासाठी वार्षिक नाममात्र रुपये १००/- भाडेपट्टा आकारण्यात यावा.

इ) ट्रस्टने मूखंडाच्या अटींचा किंवा वरील अटींचा भंग केल्यास त्यांना देण्यात आलेल्या खेळाच्या मैदानाच्या मूखंडाचा निर्णय रद्द करण्यात यावा व प्राधिकरण ठरवील तो दंड भरण्यात यावा.

फ) मूखंडावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम अथवा अतिक्रमण न होऊ देण्याची जबाबदारी ट्रस्टची राहील.

| Item No. | 5 | Resolution No. | 1469 |
|---|---|---|---|

विषय : विविध उत्पन्न गटासाठी घरबांधणीचा कार्यक्रम राबविण्याच्या संदर्भात लाभार्थी निश्चित करण्याकरिता सुधारित उत्पन्न मर्यादांना स्वीकृती.

ठराव : केंद्र शासनाच्या नगरविकास मंत्रालयाच्या दिनांक २३-१२-८५ च्या एन - २१०११/४/८६ - एच. १ (व्हीओएल ३) क्रमांकाच्या पत्राद्वारे कळविलेल्या विविध उत्पन्न गटाच्या उत्पन्न मर्यादा स्वीकारण्यात येत आहेत, आणि या उत्पन्न मर्यादा अंमलात आणण्याच्या प्रादेशिक मंडळांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No. 6 Resolution No. 1470**

विषय : श्रीमती सुलभा राऊत यांनी त्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला भूखंड देण्याबाबत मुंबई मंडळाकडे केलेली विनंती.

ठराव : सिद्धार्थ नगर, गोरेगाव येथील इमारत क्रमांक - ४ जवळील सुमारे ८२१ चौ. मी. आकाराचा मोकळा भूखंड श्रीमती सुलभा राऊत यांनी प्रस्तावित केलेल्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला खालील अटींवर देण्यात यावा.

अ) भूखंडाचे अधिमूल्य प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना ज्या दराने लावण्यात येते त्याच दराने आकारावे.

ब) भाडेपट्ट्याचा काळ ३० वर्षांचा धरण्यात यावा.

क) सभासदांनी पात्रता प्राधिकरणाने कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी घेतलेल्या निर्णयानुसार ठरविण्यात यावी.

ड) प्राधिकरणाच्या इतर अटी व शर्तीचे अवलंबन करण्यात यावे.

इ) भूखंडाचे अधिमूल्य दोन महिन्याच्या कालावधीत पूर्ण वसूल करण्यात यावे.

**Item No. 7 Resolution No. 1471**

विषय : सी. एस. टी. रोड, कुर्ला, शॉप क्र. बी - ४ जवळील जागा भाडेपट्ट्याने देण्याबाबत. श्री. एस. एस. शेट्टी यांची विनंती.

ठराव : सी. एस. टी. रोड, कुर्ला येथे श्री. शेट्टी यांना देण्यात आलेल्या भूखंड क्र. ९ व ४८ जवळील सुमारे १३६ चौ. फूट आकाराचा भूखंड क्र. ९ व ४८ जवळील सुमारे १३६ चौ. फूट आकाराचा भूखंड क्र. ४९ त्यांचा हॉटेल व्यवसायासाठी खालील अटींवर देण्यात यावा.

१) भूखंडाचे अधिमूल्य प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार बाजारभावाच्या किंमतीच्या दुप्पट आकारण्यात यावे.

२) भूखंड तीस वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्यात यावा.

३) बांधकामाचे नकाशे मुंबई मंडळ व महानगरपालिका यांचेकडून मंजूर करून घ्यावेत.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 14-Oct-19

**Item No.** 8 **Resolution No.** 1472

विषय : एकसर व्हिलेज, बोरिवली (पश्चिम) येथील उच्च उत्पन्न गट योजनेखाली बांधावयाच्या ८० गाळ्यांच्या निविदा मंजूर करणेविषयी.

ठराव : बाब टिप्पणीत नमूद केलेले स्पष्टीकरण व सद्यस्थिती लक्षात घेऊन प्रशासक/प्राधिकरण यांनी विचारपूर्वक खालीलप्रमाणे निर्णय घेतला की, एकसर व्हिलेज, बोरिवली (पश्चिम) येथील उच्च उत्पन्न गट योजनांसाठी बांधावयाच्या ८० गाळ्यांच्या कमी दराने भरलेली रु. ६९,४४,८२४.९४ ची (रु. ७२,७२,०५८/- या अंदाजित किंमतीच्या ४.५ टक्के कमी दराने) मे. राजा फर्निचर मार्ट यांची न्यूनतम निविदा स्वीकारावी.

**Item No.** 11 **Resolution No.** 1475

विषय : एन - ६, भाग - २ च्या उर्वरित जागेवर सिडको, नवीन औरंगाबाद येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत ८२ गाळे बांधण्याची योजना.
निविदेंचा स्वीकार.

ठराव : वरील बाबींचा विचार करून प्रशासक/प्राधिकरण यांनी असा निर्णय घेतला की, एन - ६, भाग - २ च्या उर्वरित जागेवर, सिडको, नवीन औरंगाबाद येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत ८२ गाळे बांधण्याच्या कामाची रु. ५९,१७,२३४/- इतक्या रकमेची (रु. ५९,८३,०४८/- या निविदेतील अंदाजित किंमतीच्या १.१ टक्के कमी) मे. के. एस. गुरू आणि कं. औरंगाबाद यांची निम्नतम निविदा स्वीकारण्यात यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 16-Oct-19

**Item No.** 12 **Resolution No.** 1476

विषय : १) कन्नमवार नगर - २, विक्रोळी येथे श्रीमती भागीरथीबाई राठोड यांना पिठाच्या गिरणीसाठी वितरीत केलेल्या भूखंडाबाबत.
२) भूखंडाला लागून असलेली मोकळी जागा देण्याबाबत.
३) पिठाच्या गिरणीबाबत अन्य व्यवसाय चालविण्यास परवानगी मिळण्याबाबत.

ठराव : श्रीमती भागीरथीबाई राठोड यांना कन्नमवार नगर - २, विक्रोळी येथे पिठाच्या गिरणीसाठी देण्यात आलेल्या ३५ बाय ४० फूट आकाराच्या भूखंडाचा भाडेपट्ट्याचा करारनामा प्रथम अल्प मुदतीने देण्यात आलेल्या करारनाम्याच्या दिवसापासून ३० वर्षाच्या दीर्घ मुदतीने खालील अटींवर वाढवून देण्यात यावा.
१) श्रीमती राठोड यांच्या भूखंडाला लागून असलेला सुमारे २२०५.३१ चौ. फू. आकाराचा अतिरिक्त भूखंड त्यांना मसाला, पापड, लोणची इत्यादी जीवनोपयोगी वस्तूंची विक्री व मुलांच्या दवाखान्यासाठी ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने वितरीत करण्यात यावा.
२) पूर्वी देण्यात आलेल्या भूखंडाच्या (३५ बाय ४० फूट) करारनाम्याची मुदत व आता देण्यात यावयाच्या भूखंडाच्या (२२०५.३१ फूट) करारनाम्याची समाप्ती एकाच दिवशी (को-टर्मिनल) धरण्यात यावी.
३) भूखंडाचे अधिमूल्य व भाडेपट्टा प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतीच्या प्रचलित धोरणानुसार आकारण्यात यावा.
४) भूखंड व त्यावरील बांधकाम पोटभाड्याने (सबलिज) देण्यात येऊ नये.
५) बांधकामाचे नकाशे मुंबई गृहनिर्माण मंडळ व मुंबई महानगरपालिका यांचेकडून मंजूर करून घेण्यात यावे.

**Item No.** 13 **Resolution No.** 1477

विषय : जुहू विलेपार्ले विकास योजना येथील प्लॉट क्र. ५५ जवळील भूखंडाबाबत.

ठराव : १) जुहू विलेपार्ले विकास योजना येथील भूखंड क्रमांक ५५ व नियोजित २७.५२ मीटर विकास आराखड्यातील रस्त्यामधील सुमारे २३७.५२ चौ. मीटर आकाराचा भूखंडाचा पट्टा भूखंड क्रमांक ५५ मध्ये सामील करण्यात यावा.
२) भूखंडाचे अधिमूल्य निवासी बाजारभावाच्या रुपये १५००/- प्रति चौ. मीटर दराने आकारण्यात यावे.
३) पूर्वी देण्यात आलेल्या भूखंड क्रमांक ५५ च्या भाडेपट्ट्याच्या काळाबरोबरच आता देण्यात येणाऱ्या भूखंडाच्या भाडेपट्ट्याच्या संपुष्टात आणावा.
४) वार्षिक भाडेपट्ट्याचा दर व इतर शर्ती व अटी भूखंड क्रमांक ५५ प्रमाणेच धरण्यात याव्यात.
५) बांधकामाचे नकाशे मुंबई मंडळ व महानगरपालिका यांचेकडून मंजूर करून घेण्यात यावेत.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **26-Oct-19**

**Item No.** **18** **Resolution No.** **1482**

विषय : मुंबई मंडळाच्या विविध वसाहतीमधील इमारतीच्या गच्च्या, संडास, न्हाणी वगैरेंना जलरोधक उपाय योजना करण्याच्या कामासाठी असलेल्या कंत्राटदाराच्या यादीमध्ये फेरफार करणेबाबत.

ठराव : बाब टिप्पणीत नमूद केलेले स्पष्टीकरण व सद्यस्थिती लक्षात घेऊन प्रशासक/प्राधिकरण यांनी विचारपूर्वक खालील प्रमाणे निर्णय घेतला की, मुंबई मंडळाच्या विविध वसाहतीमधील इमारतीच्या गच्च्या, संडास, न्हाणी वगैरेंना जलरोधक उपाय योजना करण्याच्या कामासाठी असलेल्या कंत्राटदारांच्या यादीमध्ये फेरफार करण्यात यावा.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **29-Oct-19**

**Item No.** **14** **Resolution No.** **1478**

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्प, विभागातील कंत्राटी पद्धतीवर नेमणूका करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थान वितरीत करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, मुंबई मंडळाच्या अधिकार क्षेत्रातील उपलब्ध रिकाम्या गाळ्यांपैकी चार गाळे संचालक, पंतप्रधान अनुदान प्रकल्प यांच्याकडे भाडेपद्धतीवर पंतप्रधान अनुदान प्रकल्पावरील कर्मचाऱ्यांना तात्पुरती जागा देण्याकरिता सुपूर्द करण्यात यावे. या गाळ्यात जागा देण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही त्यांनी आपल्या अधिकारात करावी. मात्र प्रत्येक गाळ्याच्या बाबतीत कर्मचाऱ्यांना आकारण्यात येणारे भाडे त्या गाळ्यांच्या आर्थिक भाड्यापेक्षा जास्त असणार नाही या दृष्टीने त्यातील कर्मचाऱ्यांना भाडे आकारण्यात यावे. प्रत्येक गाळ्यांचे आर्थिक भाडे प्रकल्पाच्या हिशोबातून मुंबई मंडळास भरण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 30-Oct-19

**Item No.** 15 **Resolution No.** 1479

विषय : गृहनिर्माण भवन जवळील औरंगाबाद येथे मध्यम उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात यावयाच्या १९२ गाळे त्यांच्या कामाचा निविदा स्वीकारणेबाबत.

ठराव : वरील बाबींचा विचार करून प्रशासक/प्राधिकरण यांनी असा निर्णय घेतला की, गृहनिर्माण भवन जवळील औरंगाबाद येथे मध्यम उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात यावयाच्या १९२ गाळे यांच्या कामाची रु. ७४,५६,९७२ इतक्या रकमेची (निविदेच्या अंदाजित किंमती एवढ्याच रकमेची) मे. राजेंद्र कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निम्नतम निविदा स्वीकारण्यात यावी.

**Item No.** 16 **Resolution No.** 1480

विषय : सर्व्हे नं. ५४, गारखेडा, औरंगाबाद येथे अल्प उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात यावयाच्या ४४४ गाळे यांच्या कामाची निविदा स्वीकारणेबाबत.

ठराव : वरील बाबींचा विचार करून प्रशासक/प्राधिकरण यांनी असा निर्णय घेतला की, सर्व्हे नं. ५४, गारखेडा, औरंगाबाद येथे अल्प उत्पन्न योजनेअंतर्गत बांधण्यात यावयाच्या ४४४ गाळे यांच्या कामाची रु. ५०,३८,०६८/- या रकमेची (निविदेच्या अंदाजित दरानुसार किंमती एवढ्याच रकमेची) मे. राजेंद्र कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निम्नतम निविदा स्वीकारण्यात यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 02-Nov-1

**Item No.** 1 **Resolution No.** 1483

विषय : १) सी. एस. नं. २५१ (अंशत:) २५२, २५३, ताडदेव, डिव्हीजन, डी वॉर्डमधील जरीवाल चाळ नावाने संबोधण्यात येणाऱ्या इमारत क्र. १ व २ या नागरी नूतनीकरण योजनेखालील कामाची निविदा स्वीकार करणे.
२) सर्व्हे नं. ३८६ (अंशत:) मुलुंड येथील विकासाच्या कामाची निविदा स्वीकार करणे.

ठराव : वरील विषयाच्या सूचीवर विचार करून प्रशासक/प्राधिकरण यांनी असा निर्णय घेतला की, सी. एस. नं. २५१ (अंशत:), २५२, २५३, ताडदेव डिव्हीजन डी वॉर्ड येथील जरीवाला चाळ नावाने संबोधण्यात येणाऱ्या इमारत क्र. १ व २ या नागरी नूतनीकरण योजनेखालील कामाची वाटाघाटीनंतर कबूल केल्या मे. जीवन कन्स्ट्रक्शन यांची निविदेच्या अंदाजित किंमतीच्या १०.५ टक्के जास्त असलेली (निविदेची अंदाजित किंमत रु. ८१,०२,४५९/-) निम्नतम निविदा स्वीकारण्यात यावी.
तसेच सर्व्हे नं. ३८५ (अंशत:), मुलुंड येथील विकासाच्या कामाची मे. युनियन कन्स्ट्रक्शन कंपनी यांची रु. ६७,६२,५९०/- या किंमतीची आयटेम दर पद्धतीची निविदा (निविदेच्या रु. ६७,९२,२७४ या अंदाजित किंमतीच्या साधारण ०.४४ टक्के कमी) स्वीकारण्यात यावी.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **04-Nov-1**

**Item No.** **2** **Resolution No.** **1484**

विषय : कामटी येथे विडी कामगारांकरिता गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत.

ठराव : कामटी येथे विडी कामगारांकरिता गृहनिर्माण योजना कार्यान्वित करणे आवश्यक आहे असे विचारात घेऊन कामटी येथे स. नं. ३३ - अ, ३३ - ब, २४ - अ, ३४ - अ, ३५ - अ, ९६/१ आणि ९६/२ यामधील सुमारे ११ हेक्टर क्षेत्र वापरण्यात यावे, यासाठी याबाबतचा योग्य तो प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात व तसेच याबाबत जरूर ती सर्व कार्यवाही करण्यास प्राधिकरण संमती देत आहे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **13-Nov-1**

**Item No.** **3** **Resolution No.** **1485**

विषय : विविध प्रकारची बांधकामे यांना प्रश्शासकीय मंजूरी देणे निविदा स्वीकृती आदि विषयावरील अधिकार प्रदान.

ठराव : या बाब टिप्पणी सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे विविध प्रकारच्या बांधकाम/दुरुस्ती योजना आदिंना प्रशासकीय मंजूरी देणे, तांत्रिक मंजूरी देणे, अशा कामाचा निवीदा स्वीकारणे यासारख्या विषयावरील अधिकारी, प्राधिकरण, विभागीय मंडळ, जागतिक बँक प्रकल्प व पंतप्रधान अनुदान प्रकल्प, यातील विविदा स्तरावरील अधिकाऱ्यांना या निर्णयान्वये प्रदान करण्यात येत आहेत.
या विषयावरील यापूर्वी पत्र/आदेश/परिपत्रके वा प्राधिकरण निर्णय याअन्वये प्रदान करण्यात आलेले अधिकार या निर्णयद्वारा निष्प्रमावित करण्यात यावेत.

**Item No.** **5** **Resolution No.** **1487**

विषय : श्रीमती मंदाकिनी आर. मसूरकर यांना पिठाच्या गिरणीसाठी मालवणी मालाड येथे अल्प मुदतीने वितरीत केलेल्या भूखंडाचा भाडेपट्टा दीर्घ मुदतीवर वाढवून देण्याबाबत.

ठराव : श्रीमती मंदाकिनी आर. मसूरकर यांना पिठाच्या गिरणीसाठी मालवणी, मालाड येथे देण्यात आलेल्या भूखंडाचा भाडेपट्टा काळ प्रथम देण्यात आलेल्या भूखंडाच्या दिनांकापासून पुढे ३० वर्षांनी खालील अटींवर वाढविण्यात यावा.
१) भूखंडाचे अधिमूल्य व भाडेपट्ट्याचा दर प्राधिकरणाच्या जमिनीच्या प्रचलित धोरणानुसार, व्यापारी पद्धतीने (प्रचलित बाजारभावाच्या दुप्पट) आकारण्यात यावा.
२) भूखंड पोटभाड्याने देण्यात येऊ नये.
३) बांधकामाचे नकाशे मुंबई मंडळ व मुंबई महानगरपालिकेकडून मंजूर करून घेण्यात यावेत.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **16-Nov-1**

**Item No.** **4** **Resolution No.** **1486**

विषय : इमारत क्र. अे - २२५ (२९) स्ट्रीट क्र. ३, सोबानी रोड, (टेम्हीना लॉज) या इमारतीला उपकर प्रदानातून सूट मिळणेबाबत.

ठराव : उपरोक्त बाब टिप्पणीत दिलेल्या विवेचनावरून असे दिसते की, अ विभाग क्र. - २२५ (२९) रस्ता क्र. ३, सोबानी रोड, ही इमारत पूर्वी टेम्हीना लॉज म्हणून ओळखली जात असे. ऑगस्टस डेझी को. ऑ. हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, ह्या नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थेने ती २४-१०-७२ रोजी खरेदी केल्याचे दिसते. जुनी इमारत १-४-१९७३ पासून पाडून टाकण्यात आली त्यामुळे त्या दिवसापासून करांच्या आकारणीसाठी, तीचे बांधकामाखालील जमीन असे तिचे वर्गीकरण झालेले आहे. तद्नंतर त्या जागेवर नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. जुन्या इमारतीला मुंबई मंडळामार्फत संरचनात्मक दुरुस्त्या झालेल्या नाहीत व कोणत्याही भाडेकरूला संक्रमण शिबिरात जागा देण्यात आलेली नाही. प्रशासकांनी ह्या सर्व बाबींचा विचार करून निर्णय घेतला की, ही इमारत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण अधिनियम १९७५ च्या कलम ८३ (१) (म) (न) नुसार उपकर प्रदानातून सूट मिळण्यास पात्र ठरते. त्यामुळे १-४-१९७३ पासून ह्या इमारतीवर उपकराची आकारणी न करण्यास बाबत 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यात मंजूरी दिली.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **23-Nov-1**

**Item No.** **6** **Resolution No.** **1488**

विषय : गोराईरोड, बोरिवली (प) विभाग - १ येथील जमिनीवर सर्वसाधारण सोयी पुरविणे - अंतर्गत रस्ते व गटारे बांधण्याच्या कामाच्या निविदांबाबत.

ठराव : वरील बाबींचा विचार करून, प्रशासक/प्राधिकरण यांनीनिर्णय घेतला की, गोराईरोड, बोरिवली (प) विभाग - १ येथील जमिनीवर सर्वसाधारण सोयी पुरविणे - अंतर्गत रस्ते व गटारे बांधण्याच्या कामाची रु. ६०,८६,८७५.५२ ची (६७,८६,५७१/- रु. च्या किंमतीच्या १०.३१ टक्के कमी) मे. भारत कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा स्वीकारण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 27-Nov-1

**Item No.** 7 **Resolution No.** 1489

विषय : औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्या अखत्यारातील येवला वसाहतीमधील सुविधांसाठी आरक्षित केलेल्या भूखंडाच्या वाटपाबाबत.

ठराव : १) औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्या अखत्यारातील येवला येथील वसाहतीमधील सुविधांसाठी आरक्षित केलेल्या १४ भूखंडापैकी दोन भूखंडांचे वाटप श्री. खिल्लारे बंधू यांना 'किराणा मालाचे दुकान' व 'पिठाच्या गिरणीकरिता' ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने करण्यात यावे.
श्री. खिल्लारे बंधू यांना द्यावयाच्या भूखंडाचे अधिमूल्य ठरविण्यात आलेल्या किंमतीनुसार (अपसेट प्राईज) वसूल करण्यात यावे. भाडेपट्ट्याचा वार्षिक दर अधिमूल्याच्या रक्कमेच्या १ टक्का आकारण्यात यावा.
२) उपरोक्त वसाहतीमधील भूखंडापैकी भूखंड क्रमांक - ५ यासाठी सादर करण्यात आलेली जास्त रक्कमेची निविदा रु. ३२५/- प्रति चौ. मी. व भूखंड क्र. - ११ साठी सादर करण्यात आलेली निविदा रु. २००/- प्रति चौ. मी. या निविदांचा स्वीकार करून त्यांचे वाटप जास्त निविदा सादर करणाऱ्या अर्जदारास ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने करण्यात यावे. निविदामध्ये सादर केलेल्या दरानुसार येणाऱ्या भूखंडाच्या अधिमूल्याच्या रकमेच्या १ टक्का वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा.
३) शिल्लक राहिलेल्या ९ भूखंडाकरिता परत जाहिरातीद्वारे वाटप करण्यात यावे. भूखंडाच्या वाटपाची जाहिरात आकर्षकरित्या करण्याकरिता जागतिक बँक प्रकल्पाचे भूखंडाच्या वाटपासाठी जाहिरात करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचे अवलंबन करण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 01-Dec-19

**Item No.** 1 **Resolution No.** 1490

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाच्या प्रशासकांची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : हाऊसिंग एन्ड अर्बन डेव्हलॉपमेंट कॉर्पोरेशन (हुडको) यांनी विहित केलेल्या अटींवर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण हुडको अर्थसहाय्यित धुळे/लातूर व रायगड जिल्हा येथील बेघर भूमीहीनांकरिता ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी एकूण ५८.४१ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **02-Dec-19**

**Item No.** **2** **Resolution No.** **1491**

विषय : इचलकरंजी, कोल्हापूर येथील वसाहतीत भाडेकरूंच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कार्यालयाच्या इमारतीसाठी देण्यात आलेल्या भूखंडाबाबत.

ठराव : इचलकरंजी (कोल्हापूर) येथील वसाहतीमधील अत्यल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजना (५० गाळ्यांची) गाळाधारकांची 'महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ भाडेकरू सहकारी गृह संस्था' अत्यल्प गट यांना ठराव क्र. - १२०६ अन्वये देण्यात आलेल्या सुमारे ७३२० चौ. फूट भूखंडाचे वाटप रद्द करण्यात येत आहे. त्याऐवजी त्याच जागेमध्ये सुमारे ६६६० चौ. फूट (६१८.९५ चौ. मी.) आकाराचा भूखंड देण्यात यावा.
भूखंडाचे अधिमूल्य, शर्ती व अटींची अवलंबन पूर्वीप्रमाणेच खालीलप्रमाणे करण्यात यावे.
भूखंड वाटपाच्या शर्ती व अटींचे अवलंबन पूर्वीप्रमाणेच खालीलप्रमाणे करण्यात यावे.

१) भूखंड वाटपाच्या नेहमीच्या अटी व शर्तींना आधीन राहून फक्त यांच्या कार्यालयीन इमारतीसाठी देण्यात यावा. इतर कारणासाठी भूखंडाचा वापर होऊ न देण्याची काळजी घ्यावी.
२) गाळ्यांच्या किंमतीतच भूखंडाची किंमत वसूल झाल्याचे लक्षात घेऊन संबंधित उत्पन्न गटांना फक्त लागू असलेले वार्षिक भुईभाडे आकारावे.
३) भाडेपट्ट्याचा काळ ३० वर्षे ठेवण्यात यावा.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **04-Dec-19**

**Item No.** **3** **Resolution No.** **1492**

विषय : श्री. एम. बी. निर्गुडकर, कार्यकारी अभियंता, पी. एम. जी. पी. विभाग यांना सेवानिवृत्तीनंतर पंतप्रधान अनुदान प्रकल्प विभागात कंत्राटी नेमणूक देण्याबाबत.

ठराव : प्राधिकरणाच्या पंतप्रधान अनुदान प्रकल्प, विभागाला श्री. एम. बी. निर्गुडकर, कार्यकारी अभियंता यांना 'विशेष बाब' म्हणून दिनांक १-९-१९८७ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी अथवा तत्पूर्वी अन्य पर्यायी व्यवस्था झाल्यास तोपर्यंत कालावधीसाठी, कंत्राटी नेमणूकीच्या सर्वसाधारण अटी व शर्तीवर कंत्राटी नेमणूक देण्यास प्रशासक/प्राधिकरण यांनी मंजूरी दिली. श्री. निर्गुडकर, यांचे कंत्राटी वेतन वित्त नियंत्रक/पी. एम. जी. पी. यांचे सहमतीने निश्चित करण्यात यावे.

**Item No.** **4** **Resolution No.** **1493**

विषय : 'एअरफोर्स नेव्हल हाऊसिंग बोर्ड' यांना पवई येथे निवासी कारणाकरिता जागा देण्याबाबत.

ठराव : पवई येथील बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे सुमारे ३६,१४७.३५ चौ. मी. आकाराचे एकूण २४ भूखंड 'एअरफोर्स नेव्हल हाऊसिंग बोर्ड' यांना पवई येथे निवासी कारणाकरिता प्रस्तावित करण्यात यावेत.

१) भूखंडाच्या अधिमूल्याच्या ५० टक्के रक्कम प्रथम वसूल करण्यात यावी व शिल्लक ५० टक्के रक्कम जमिनीचा ताबा घेण्यापूर्वी वसूल करण्यात यावी.

२) एकूण भूखंडापैकी मध्यम उत्पन्न गटातील ९ भूखंडावर जवान (नॉन ऑफिसर) अशा मध्यम उत्पन्न गटातील कर्मचाऱ्यांच्या निवासाची सोय करण्यात यावी.

३) शासनाच्या आदेशानुसार, एअरफोर्स नेव्हल हाऊसिंग बोर्ड, मधील अधिकारी, जवान यांच्या महाराष्ट्रातील १५ वर्षे वास्तव्याची अट शिथिल करण्यात यावी.

४) भाडेपट्टयाच्या काळ प्रथम ३० वर्षाचा धरण्यात यावा व जमिनीच्या किंमतीच्या एक टक्का अधिमूल्य आकारण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 12-Dec-19

**Item No.** 5 **Resolution No.** 1494

विषय : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्या अखत्यारीतील संत तुकाराम नगर येथील पिठाच्या गिरणीसाठी आरक्षित करण्यात आलेल्या भूखंडाच्या वाटपाबाबत.

ठराव : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्या अखत्यारीतील संत तुकाराम नगर वसाहतीत आरक्षित करण्यात आलेल्या भूखंडाचे वितरण प्राधिकरणाच्या प्रचलित नियमानुसार निविदाद्वारे करण्यात येत आहे. खालील भूखंडाकरिता जास्त किंमतीची निविदा स्वीकारण्यात येत आहे.

भूखंड क्रमांक - १

१) निविदेमध्ये नमूद केलेली रक्कम रुपये : ७१,१५२.२०

भूखंड क्रमांक - २

२) निविदेमध्ये नमूद केलेली रक्कम रुपये : १,१०,१०१.००

भूखंड क्रमांक - ३

३) निविदेमध्ये नमूद केली रक्कम रुपये : ७१,०००.००

भूखंडाचे वितरण प्राधिकरणाच्या प्रचलित शर्ती व अटींनुसार करण्यात यावे.

१) निविदांमध्ये सादर करण्यात आलेल्या भूखंडाच्या किंमतीच्या एक टक्का वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा.
२) भाडेपट्ट्याचा काळ प्रथम ३० वर्षांचा धरण्यात यावा.
३) बांधकामाचे नकाशे पुणे मंडळ व पिंपरी महानगरपालिका यांचेकडून बांधकाम सुरू करण्यापूर्वी मंजूर करून घ्यावेत.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 14-Dec-19

**Item No.** 6 A **Resolution No.** 1495

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पातील अधिकाऱ्यांना प्राधिकरण कायद्याच्या आठव्या प्रकरणातील तरतूदीप्रमाणे अधिकार प्रदान करणे.

ठराव : पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतील नागरी नवीनीकरण योजना अधिक वेगाने व परिणामकारकरित्या कार्यान्वित होण्याच्या हेतूने प्राधिकरण व मुंबई मंडळाची पुनर्रचना होईपर्यंत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण अधिनियमाच्या आठव्या प्रकरणांतील टिप्पणीसोबत जोडलेल्या परिशिष्टांत नमूद केलेल्या काही कलमातील तरतूदीप्रमाणे प्रदान करावयाचे अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात यावेत.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 20-Dec-19

**Item No.** 10 **Resolution No.** 1499

विषय : कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्या अखत्यारीतील माजिवडे-ठाणे येथे पंप व पंपगृह बांधण्यासाठी परवानगीबाबत.

ठराव : कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अखत्यारीतील माजिवडे - ठाणे येथील संमिश्र भूखंड विकसित योजनेमधील सर्वे क्रमांक २०१ मधील आरक्षित करण्यात आलेल्या भूखंडाचे वितरण प्राधिकरणाच्या प्रचलित नियमांप्रमाणे करण्यात येत आहे.

१) भूखंडाचे वितरण प्राधिकरणाच्या प्रचलित जमिनीच्या किंमतीच्या धोरणानुसार करण्यात यावे.
२) भूखंडाच्या किंमतीच्या एक टक्का वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा.
३) भाडेपट्ट्याचा काळ प्रथम ३० वर्षांचा धरण्यात यावा.
४) बांधकामाचे नकाशे कोकण मंडळ व ठाणे महानगरपालिका यांचेकडून बांधकाम सुरू करण्यापूर्वी मंजूर करून घ्यावेत.
५) भूखंड वितरणाबाबतच्या इतर शर्ती व अटींचे अवलंबन करण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 22-Dec-19

**Item No.** 7 **Resolution No.** 1496

विषय : संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे येथील उच्च उत्पन्न गटाच्या १८० गाळ्यांच्या योजनेच्या अंतर्गत आर. ए. एज्युकेशन सोसायटी या संस्थेस गाळ्यांचे वाटप.

ठराव : निर्णय घेतला की, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे येथील उच्च उत्पन्न गटासाठी आखलेल्या १८० गाळ्यांच्या योजनेअंतर्गत बांधण्यात येत असलेल्या ६० गाळ्यांपैकी, या योजनेतील गाळ्यांसाठी आलेल्या ४८ अर्जांमधून पात्र ठरलेल्या अर्जांवर गाळ्यांचे वाटप केल्यानंतर उरलेले गाळे आर. ए. एज्युकेशन सोसायटी या संस्थेस गाळ्यांची संपूर्ण किंमत आगाऊ भरण्याच्या अटींवर वाटप करण्यास मान्यता देण्यात येत आहे. संस्थेने मागणी केलेल्या बाकीच्या गाळ्यांचे बांधकाम करून ते संस्थेस वाटप करण्यात यावे. त्यासाठी संस्थेने गाळ्यांची ५० टक्के किंमत बांधकाम सुरू करण्यापूर्वी भरली पाहिजे व बाकीच्या ५० टक्केपैकी २५ टक्के स्लॅबचे काम पूर्ण झाल्यावर व उरलेली संपूर्ण रक्कम गाळ्यांचा ताबा देण्यापूर्वी भरली पाहिजे. या अटींवर संस्थेस गाळ्यांचे वाटप करण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 28-Dec-19

**Item No.** 8 **Resolution No.** 1497

विषय : अत्यावश्यक सेवेतील पहारेकरी/पंपमन व पंपावर कामास असणारे वायरमन/मजूर यांना त्यांच्या वर्षअखेर शिल्लक रहाणाऱ्या किरकोळ रजेबद्दल रोख रक्कम देणे.

ठराव : अत्यावश्यक सेवेतील पहारेकरी (वॉचमन/चौकीदार) पंपमन व पंपावर कामास असणारे वायरमन, पंप मजूर/पंप असिस्टंट यांना १९८६ त्यांच्या येणाऱ्या वर्षाच्या अखेरीस शिल्लक रहाणाऱ्या किरकोळ रजा व वैकल्पिक रजा याकरिता त्या/त्या वर्षातील अखेरच्या महिन्यात मिळालेल्या वेतनाच्या एक पट दराने अनुग्रहपूर्वक अधिदान देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.
अनुग्रहपूर्वक अधिदानासाठी वेतन याचा अर्थ मूळ वेतन अधिक म. भत्ता अधिक सर्व अंतरिम वाढी असा धरावा. व १/३० या दराने प्रतिदिनी अधिदान देण्यात यावे. १९८६ वर्षातील शिल्लक रजेसाठी अनुग्रहपूर्वक अधिदान डिसेंबर १९८७ मध्ये देण्यात यावे व यापुढे प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्यात पूर्वीच्या वर्षातील शिल्लक रजेबद्दल अधिदान देण्यात यावे. मात्र सदर सवलत प्राधिकरणाच्या गाळे (विक्री) धोरणानुसार त्या/त्या वसाहतीचे हस्तांतरण सहकारी गृहनिर्माण संस्थांकडे सुपूर्त करण्यात आल्यानंतर व त्या/त्या वसाहतीच्या देखभालीचे काम सहकारी संस्थांकडे सोपविण्यात आल्यानंतर सदरची सवलत आपोआप रद्द होईल.

**Item No.** 10 **Resolution No.** 1498

विषय :

ठराव : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (सेवा वर्गीकरण व संवर्ग) विनियम, १९८७ च्या विनियमाच्या कलम १ (२) अनुसार सदरहू विनियम दिनांक १ जानेवारी १९८८ पासून अंमलात आणण्यासाठी या ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 30-Dec-19

**Item No.** 11 **Resolution No.** 1500

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला निवासी कारणाकरिता देण्यात आलेल्या भूखंडाबाबत.
श्रीमती सुलभा राऊत, मुख्य प्रवर्तक, प्रस्थापित सहकारी गृहनिर्माण संस्था.

ठराव :
१) श्रीमती सुलभा राऊत, यांच्या प्रस्थापित सहकारी गृहनिर्माण संस्थेला दिनांक १-१०-१९८७ च्या ठराव क्रमांक - १४७० अन्वये सिद्धार्थनगर, गोरेगाव येथील इमारत क्रमांक - १४ जवळील देण्यात आलेला सुमारे ८२१ चौ. मी. आकाराच्या भूखंडाचे वितरण रद्द करण्यात यावे.
२) सिद्धार्थनगर, गोरेगाव येथील भूखंडाऐवजी श्रीमती सुलभा राऊत, यांना कालिनानगर, सांताक्रुझ येथील उपलब्ध असलेला सुमारे ७९२ चौ. मी. आकाराचा भूखंड त्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस देण्यात यावा.
३) भूखंडाचे अधिमूल्य व भाडेपट्ट्याचा दर प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना ज्या दराने आकारण्यात येतो त्याच दराने आकारण्यात यावा.
४) भाडेपट्ट्याचा काळ ३० वर्षांचा धरण्यात यावा.
५) सभासदांची पात्रता प्राधिकरणाने कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी घेतलेल्या निर्णयानुसार ठरविण्यात यावी.
६) भूखंडाचे अधिमूल्य, दोन महिन्याच्या कालावधीत पूर्ण वसूल करण्यात यावे.
७) प्राधिकरणाच्या इतर अटी व शर्तींचे अवलंबन करण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 01-Jan-19

**Item No.** 1 **Resolution No.** 1501

विषय : मासिक भाड्याची/हप्त्याची थकबाकी वसूल करतेवेळी पोलिसांची मदत घेताना त्यांचेसाठी तसेच वसूली करणारे प्राधिकरण कर्मचारी यांचेसाठी चहापान जेवणादि खर्च व तसा खर्च करण्याचे अधिकार प्रदान करणेबाबत.

ठराव : मासिक भाडे/हप्ते यांची थकबाकी वसूल करणे, जप्ती करणे, निष्कासन कारवाई यासारखे कार्यक्रम सामुहिक प्रमाणावर आयोजित केल्यावर अशा कारवाई चहापान भोजन आदिसाठी मध्ये खंडित न करता दिवसभर चालू ठेवून कमाल वसूली वा परिणाम मिळावेत यासाठी प्राधिकरणातील विविध स्तरावरील अधिकाऱ्यांना परिशिष्टांत दर्शविल्याप्रमाणे अधिकार प्रदान करण्यास या ठरावान्वये प्रशासक/प्राधिकरण मान्यता देत आहे.
अशा प्रकारचा खर्च सिळकत व्यवस्थापन खर्च या खाती टाकावा.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **12-Jan-19** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **2** | **Resolution No.** | **1502** |

विषय : औद्योगिक कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांची विक्रीबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, औद्योगिक कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांची बाकी किंमत किंवा पूर्ण किंमत तसेच पूर्ण थकबाकी एकरकमी भरून किंमतीतील अतिरिक्त १० टक्के सूटीचा एकूण ३० टक्के लाभ ज्या इमारतीतील गाळेधारकांना उपलब्ध आहे त्यांना तो लाभ देण्यासाठी दिनांक ३१-३-८८ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी. तसेच गाळ्यांची बाकी किंमत किंवा पूर्ण किंमत आणि पूर्ण थकबाकी एकरकमी भरल्यास त्या रकमेवर सूट (डिस्काऊंट) देण्यासाठीही दिनांक ३१-३-८८ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **13-Jan-19**

**Item No.** **3** **Resolution No.** **1503**

विषय : कन्नमवारनगर, विक्रोळी येथील लाकडी बुथ, क्रमांक - ७ ऐवजी पर्यायी जागा देण्याबाबत.
श्री. चव्हाण यांची विनंती.

ठराव : श्री. सुभाष चव्हाण यांनी कन्नमवारनगर, विक्रोळी या वसाहतीतील चर्मोद्योगासाठी देण्यात आलेल्या भूखंडाऐवजी आनंदनगर, सांताक्रुझ वसाहतीत नकाशात दाखविल्याप्रमाणे १० फूट गुणीले १० फूट आकाराच्या पर्यायी भूखंड चर्मोद्योगासाठी खालील अटींवर देण्यात यावा.
१) आनंदनगर, सांताक्रुझ येथील पर्यायी भूखंडाचा ताबा श्री. चव्हाण, यांना देण्यापूर्वी त्यांना पूर्वी कन्नमवारनगर, विक्रोळी येथे देण्यात आलेल्या भूखंडाचा ताबा परत घेण्यात यावा.
२) कन्नमवारनगर, विक्रोळी येथील भूखंडाच्या भाडेपट्ट्याची संपूर्ण वसूली करण्यात यावी.
३) भूखंडाचे अधिमूल्य व भाडेपट्टा प्राधिकरणाच्या प्रचलित जमिनीच्या किंमतीच्या धोरणानुसार आकारण्यात यावे.
४) भूखंड ३० वर्षांच्या भाडेपट्ट्यावर देण्यात यावा. त्यानंतर भाडेपट्टयाचे नूतनीकरण करण्याचे अधिकार प्राधिकरणाकडे रहातील.

**Item No.** **8** **Resolution No.** **1508**

विषय : नांदेड येथे विडी कामगारांसाठी योजना राबविण्याबाबत.

ठराव : नांदेड (म्हाळसा) येथे प्राप्त झालेल्या २.५२ हेक्टर शासकीय जमिनीवर २१० अधिक ६० इतक्या गाळ्यांची गृहनिर्माण योजना विडी कामगारांसाठी हाती घेण्यात यावी. या योजनेसाठी अभिप्रेत असलेले केंद्र शासनाचे अनुदान मिळविण्याची योग्य ती कार्यवाही प्रशासक/प्राधिकरण यांनी गृहनिर्माण व कामगार विभागाच्या सहकार्याने करावी. या योजनेमधील लाभधारक ठरविताना प्राधिकरणाच्या धोरणानुसार महाराष्ट्रातील १५ वर्षांचे वास्तव्य योग्य असा उत्पन्न गट तसेच सदर उद्योगांत सदर लाभधारक केंद्रशासनाच्या कल्याण राज्यशासनाच्या कामगार विभागकडून छाननी इत्यादी बाबी तपासण्यात याव्यात. केंद्रशासनाने अनुदान न मिळाल्यास ही योजना हुडको या वित्तीय संस्थेच्या सर्वसाधारण योजनेप्रमाणे राबविण्यात यावी आणि त्यानुसार गाळ्यांची किंमत प्राधिकरणाकडे भरण्यास बांधील रहातील.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 14-Jan-19

**Item No.** 4 **Resolution No.** 1504

विषय :

ठराव : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण कर्मचारी (जेष्ठता निर्धारण) विनियम, १९८७, मधील कलम १ (२) अनुसार सदरहू विनियम अंमलात आणण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण १५ जानेवारी १९८८ ही तारीख या ठरावान्वये निर्धारीत करीत आहे.

**Item No.** 5 **Resolution No.** 1505

विषय : हुडकोशी कर्जाचे करारपत्र व गहाणखते करण्यासाठी जागतिक बँक प्रकल्प कक्षातील कार्यकारी अभियंता यांना अधिकृती देणे.

ठराव : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत जागतिक बँक प्रकल्पातील कार्यकारी अभियंता (प्रकल्प नियोजन व संकल्प)/जा बँप्र. यांना या ठरावान्वये हुडकोशी करावयाच्या कर्जाच्या करारपत्रावर आणि गहाणखतावर प्राधिकरणातर्फे सह्या करण्याचे तसेच, या दस्तऐवजावर प्राधिकरणाची मोहर लावण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

**Item No.** 6 **Resolution No.** 1506

विषय : जागतिक बँक प्रकल्पांतर्गत कांदिवली (पश्चिम) येथील सर्व्हे नं. १५७ मधील पुन:प्रापण केलेल्या जमिनीवर गाभाघरे, तसेच रस्ते, पाणीपुरवठा व सांडपाण्याची कामे करण्याकरिता मागविलेल्या निविदा.

ठराव : वरील बाबींचा विचार करून प्रशासक/प्राधिकरण यांनी असा निर्णय घेतला की, सर्व्हे नं. १५७ कांदिवली (पश्चिम) येथील गाभाघरे, तसेच रस्ते, पाणीपुरवठा व इतर सुविधांच्या कामांची रुपये ७७,२७,६०० ची (रुपये ८१,८६,०१७.५० या अंदाजित किंमतीच्या ५.५० टक्के कमी) मे. सह्याद्री कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा स्वीकारण्यात येत आहे.

**Item No.** 7 **Resolution No.** 1507

विषय : जागतिक बँक प्रकल्पांतर्गत माजीवाडे, ठाणे येथील जमिनीवर सर्वसाधारण सोयी पुरविणे —
सदनिका समूहातील अंतर्गत कामे - पाणीपुरवठा, मलनि:स्सारण, रस्ते, गटारे व सदनिका बांधणे.

ठराव : वरील बाबींचा विचार करून प्रशासक/प्राधिकरण यांनी असा निर्णय घेतला की, सर्व्हे नं. १५७ कांदिवली (पश्चिम) येथील गाभाघरे, तसेच रस्ते, पाणीपुरवठा व इतर सुविधांच्या कामांची रुपये ७७,२७,६०० ची (रुपये ८१,८६,०१७.५० या अंदाजित किंमतीच्या ५.५० टक्के कमी) मे. सह्याद्री कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा स्वीकारण्यात येत आहे.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **03-Feb-19** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **3** | **Resolution No.** | **1511** |

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ'मध्ये दर्शविल्याप्रमाणे गारखेडा औरंगाबाद येथील नागरी गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून ७४.०१ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **08-Feb-19** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **4** | **Resolution No.** | **1512** |

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या वितरीत केलेल्या भूखंडाचे भुईभाड्याविषयी धोरण.

ठराव : टिप्पणीमधील बाब क्र. १, २, ३, ४ (२) व ६ मध्ये नमूद केलेल्या भूखंडाच्या वापरासाठी अधिमूल्याची किंमत ही बाजारभावाप्रमाणे येणाऱ्या किंमतीच्या दराने वसूल करून वितरण केले जाते अशा भूखंड लाभार्थीकडून दिनांक १-१-८८ पासून अधिमूल्याच्या १ टक्का वार्षिक भुईभाडे वसूल करण्यास व ज्या भूखंड लाभार्थीकडून २ १/२ टक्के दराने वार्षिक भुईभाडे वसूल केले आहे अशा प्रकरणी १ टक्क्यापेक्षा अधिक भरलेली रक्कम पुढील वर्षासाठी धरण्यात यावी.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **09-Feb-19**

**Item No.** **1** **Resolution No.** **1509**

विषय : गौशिया कंपाउंड वांद्रे (पूर्व) येथील झोपडपट्टीतील काही शिल्लक राहिलेल्या ३५ झोपड्यांचे नूतनीकरण करण्याबाबत.

ठराव : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने दिनांक ६-१०-१९८२ च्या ठराव क्रमांक - ५७२ अन्वये गौशिया कंपाउंड येथील ३५ झोपड्यांचे नूतनीकरण करण्यासाठी यांनी पर्यायी भूखंड देण्याच्या निर्णयाची कार्यवाही खालील अटींनुसार करण्यात यावी. सदरहू भूखंड शिल्लक राहिलेल्या ३५ झोपडीधारकांच्या निर्मलनगर गौशिया को. ऑप. हाऊसिंग सोसायटी लिमिटेड या संस्थेला पुनर्वसनासाठी देण्यात यावेत.

१) नकाशात दर्शविल्याप्रमाणे ३५ भूखंडाचा तपशिल.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) भूखंड क्रमांक - १ ते १३ | प्रत्येकी १२ बाय १५ | | बरोबर ४४५.७७ |
| ब) भूखंड क्रमांक - १४ ते १५ | -"- | | बरोबर १६२.४४ |
| क) भूखंड क्रमांक - १६ ते २५ | -"- | | बरोबर ४२०.०० |
| ड) भूखंड क्रमांक - २६ ते ३५ | -"- | | बरोबर ३५०.२१ |
| | ३५ भूखंडाचे एकूण क्षेत्रफळ : | | १४१८.२१ चौ. यार्डस |
| | | | बरोबर ११८५.६२ चौ. मीटर |

२) निर्मलनगर, वांद्रे (पूर्व) येथील विकास आराखड्यातील ५० फूट रुंद रस्त्याचे आरक्षण रद्द करण्यात आलेल्या मोकळ्या जागेवर ३५ झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन वरीलप्रमाणे करण्यात यावे.

३) गणपती (    ) झालेल्या ३५ व्यक्तींच्या 'निर्मलनगर, गौशिया को. ऑप. हाऊसिंग सोसायटी लिमिटेड' या संस्थेला भूखंडाचे वितरण करण्यात यावे.

४) भूखंडाचे अधिमूल्य जमिनीची मूळ किंमत व जमिनीच्या विकासावरील खर्चासह आकारण्यात यावी.

५) भाडेपट्टा ३० वर्षांच्या करारनाम्यावर करण्यात यावा.

६) अधिमूल्याच्या रकमेच्या एक टक्का वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा.

७) भूखंडाच्या वितरणाबाबत प्राधिकरणाच्या इतर शर्ती व अटींचे बंधन असावे.

**Item No.** 1 **Resolution No.** 1509

विषय : गौशिया कंपाउंड वांद्रे (पूर्व) येथील झोपडपट्टीतील काही शिल्लक राहिलेल्या ३५ झोपड्यांचे नूतनीकरण करण्याबाबत.

ठराव : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने दिनांक ६-१०-१९८२ च्या ठराव क्रमांक - ५७२ अन्वये गौशिया कंपाउंड येथील ३५ झोपड्यांचे नूतनीकरण करण्यासाठी यांनी पर्यायी भूखंड देण्याच्या निर्णयाची कार्यवाही खालील अटींनुसार करण्यात यावी. सदरहू भूखंड शिल्लक राहिलेल्या ३५ झोपडीधारकांच्या निर्मलनगर गौशिया को. ऑप. हाऊसिंग सोसायटी लिमिटेड या संस्थेला पुनर्वसनासाठी देण्यात यावेत.

१) नकाशात दर्शविल्याप्रमाणे ३५ भूखंडाचा तपशिल.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) भूखंड क्रमांक - १ ते १३ | प्रत्येकी १२ बाय १५ | | बरोबर ४४५.७७ |
| ब) भूखंड क्रमांक - १४ ते १५ | -''- | | बरोबर १६२.४४ |
| क) भूखंड क्रमांक - १६ ते २५ | -''- | | बरोबर ४२०.०० |
| ड) भूखंड क्रमांक - २६ ते ३५ | -''- | | बरोबर ३५०.२१ |
| | ३५ भूखंडाचे एकूण क्षेत्रफळ : | | १४१८.२१ चौ. यार्डस |
| | | | बरोबर ११८५.६२ चौ. मीटर |

२) निर्मलनगर, वांद्रे (पूर्व) येथील विकास आराखड्यातील ५० फूट रुंद रस्त्याचे आरक्षण रद्द करण्यात आलेल्या मोकळ्या जागेवर ३५ झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन वरीलप्रमाणे करण्यात यावे.

३) गणपती (    ) झालेल्या ३५ व्यक्तींच्या 'निर्मलनगर, गौशिया को. ऑप. हाऊसिंग सोसायटी लिमिटेड' या संस्थेला भूखंडाचे वितरण करण्यात यावे.

४) भूखंडाचे अधिमूल्य जमिनीची मूळ किंमत व जमिनीच्या विकासावरील खर्चासह आकारण्यात यावी.

५) भाडेपट्टा ३० वर्षांच्या करारनाम्यावर करण्यात यावा.

६) अधिमूल्याच्या रकमेच्या एक टक्का वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा.

७) भूखंडाच्या वितरणाबाबत प्राधिकरणाच्या इतर शर्ती व अटींचे बंधन असावे.

---

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 10-Feb-19

**Item No.** 2 **Resolution No.** 1510

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना भूखंड देण्याबाबत.
आनंदविहार सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित).
श्री. ए. के. बीद मुख्य प्रवर्तक.

ठराव : श्री. ए. के. बीद, मुख्य प्रवर्तक नियोजित प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था यांना त्यांच्या ४० सभासदांसाठी ओशिवरा येथे देण्यात आलेल्या भूखंड क्रमांक ३६ ऐवजी त्याच वसाहतीमधील सुमारे १४४४ चौ. मी. आकाराचा भूखंड क्रमांक ४५ देण्यात यावा.

२) आधीच्या शर्ती व अटींचे अवलंबन करण्यात यावे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **22-Feb-19**

**Item No.** **6** **Resolution No.** **1514**

विषय : कार्यालयाबाहेरून झेरॉक्स प्रती काढून आणणे किंवा टंकलिखित/चक्रमुद्रीत प्रती काढून आणणे वर खर्च करण्याबाबतचे अधिकार प्रदान करणेबाबत.

ठराव : प्राधिकरणाच्या दिनांक १९-८-८६ च्या ठराव क्र. १२५९ तसेच दिनांक ८-९-८६ च्या आदेश क्र. एमएच/आरईजी - ११८६/१७७८७/प्र. १ अन्वये निर्गमित केलेल्या आदेशासोबत, असलेल्या 'भांडार' लेखनसाहित्य खरेदी, आणि संकीर्ण' या शिर्षकाखाली येणाऱ्या विषयाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक १४ वरील' कार्यालयाबाहेरून झेरॉक्स प्रती काढून आणणे किंवा टंकलिखित/चक्रमुद्रीत प्रती काढून आणणे' या विषयावर मुंबई मंडळाव्यतिरिक्त इतर सर्व मंडळाचे मुख्य अधिकारी यांना खर्च करण्यासाठी प्रदान केलेली खर्च मर्यादा त्या अधिकाऱ्यांचा दर्जा यावर अवलंबून न ठेवता रुपये ६,०००/- प्रतिवर्ष अशी वाढविण्यात यावी तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी/व सचिव/प्राधिकरण यांना प्रतिवर्ष रुपये १,०००/- पर्यंत खर्च करण्याचे अधिकार प्रदान करण्यात यावेत अणि याप्रमाणे या विषयावरील अधिकार प्रदान सुधारण्यात यावे.

**Item No.** **8** **Resolution No.** **1516**

विषय : सर्व्हे क्र. ८० (भाग) मंडाले, येथील जमिनीवर पुनःप्रापणाच्या कामाच्या निविदाबाबत भाग - १ ब

ठराव : वरील सर्व बाबींचा विचार करून प्रशासक/प्राधिकरण यांनी असा निर्णय घेतला की, सर्व्हे क्र. ८० (भाग) मंडाले, येथील जमिनीवर पुनःप्रापणाच्या कामाच्या निविदाबाबत भाग - १ ब ची रु. ९४,८१,५९०/- सुधारीत रकमेची (९४,४०,०००/- रु. निविदा किंमतीच्या ०.४४ टक्के दराने अधिक) मे. ॲरकॉन इंजिनिअर्स यांची निविदा स्वीकारण्यात येत आहे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **23-Feb-19**

**Item No.** **7** **Resolution No.** **1515**

विषय : सर्व्हे क्र. ८० (भाग) मंडाले, येथील जमिनीवर पुन:प्रापणाच्या कामाच्या निविदाबाबत भाग - १ अ

ठराव : वरील सर्व बाबींचा विचार करून प्रशासक/प्राधिकरण यांनी असा निर्णय घेतला की, सर्व्हे क्र. ८० (भाग) मंडाले, येथील जमिनीवर पुन:प्रापणाच्या कामाची भाग - १ अ ची रुपये ९०,९४,६१९/- ची (९५,२८,२५०/- निविदा किंमतीच्या ४.५५ टक्के दराने कमी) श्री. बी. बी. पुजारा यांची निविदा स्वीकारण्यात येत आहे.

**Item No.** **9** **Resolution No.** **1517**

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाच्या प्रशासकांची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : हाऊसिंग एन्ड अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (हुडको) यांची विहित केलेल्या अटींवर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण हुडको अर्थसहाय्यित भंडारा व यवतमाळ जिल्हा येथील बेघर भूमिहीनांकरिता ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी एकूण ४०.३५ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **24-Feb-19**

**Item No.** **10** **Resolution No.** **1518**

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाच्या प्रशासकांची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : हाऊसिंग ॲण्ड अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (हुडको) यांनी विहित केलेल्या अटींवर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण हुडको अर्थसहाय्यित सोलापूर/यवतमाळ/अहमदनगर/अकोला/नांदेड/बुलढाणा/जालना/नाशिक/अमरावती/परभणी/औरंगाबाद व कोल्हापूर जिल्हा येथील बेघर भूमीहीनांकरिता ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी एकूण २९९.८८ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 29-Feb-19

**Item No.** 5 **Resolution No.** 1513

विषय : स्टाफिंग पॅटर्न
प्राधिकरण व विभागीय मंडळाकरिता कर्मचारी वर्ग अनुसूची १९८८-८९

ठराव : निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीसोबत जोडण्यात आलेल्या सन १९८८-८९ या वित्तीय वर्षाकरिता प्रस्तावित करण्यात आलेल्या कर्मचारी वर्ग अनुसूचीला या ठरावाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 11 **Resolution No.** 1519

विषय : गांधीनगर, वांद्रे (पूर्व) येथील संकल्पित योजनेऐवजी (४८ गाळे अधिक २० दुकाने) पोईसर, कांदिवली (पूर्व) येथील भूखंड क्रमांक ९ व १२ व ५२ उच्च उत्पन्न गट गाळे अधिक २८ दुकानांच्या योजनेच्या निविदा मंजूर करण्याबाबत.

ठराव : बाब टिप्पणीत नमूद केलेले स्पष्टीकरण व सद्यस्थिती लक्षात घेऊन
प्रशासक/प्राधिकरण यांनी विचारपूर्वक खालीलप्रमाणे निर्णय घेतला की -

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 02-Mar-19

**Item No.** 1 **Resolution No.** 1520

विषय : जागतिक बँक प्रकल्पाअंतर्गत चारकोप येथील सहकारी गृहनिर्माण संस्थांना गृहबांधणीसाठी हुडकोकडून कर्ज मिळविण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : विषय टिप्पणीत जोडलेल्या तक्ता - अ मध्ये दर्शविलेल्या विविध गृहनिर्माण संस्थांच्यासाठी हुडकोकडून १४६.६९ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 03-Mar-19

**Item No.** 2 **Resolution No.** 1521

विषय : १) प्राधिकरणाचे सन १९८७-८८ चे सुधारीत अंदाजपत्रक.
२) प्राधिकरणाचे १९८८-८९ या वर्षाचे जमा आणि खर्चाचे अंदाजपत्रक.

ठराव : प्राधिकरणाच्या १९८७-८८ च्या सुधारीत अंदाजपत्राक व १९८८-८९ चे अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकावर विचार करून वरीलप्रमाणे १९८७-८८ च्या सुधारित व १९८८-८९ च्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 08-Mar-19

**Item No.** 3 **Resolution No.** 1522

विषय : हुडकोने मंजूर केलेली लोणावळा, पुणे येथील उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजना (योजना क्र. २१२२ सी) हुडको अर्थसहाय्यामधून वगळण्याबाबत.

ठराव : विषय टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे हुडकोने दिनांक १७-६-८२ रोजी मंजूर केलेली लोणावळा, पुणे येथील उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजना (योजना क्र. २१२२ सी) खालील कारणांमुळे कार्यान्वित करता येत नाही. म्हणून हुडको अर्थसहाय्यामधून वगळण्यास मान्यता देण्यात येते.

१. या योजनेचे काम ज्या जमिनीवर (सर्व्हे नं. २८) करावयाचे होते त्या जमिनीस कायदेशीर प्रवेश मार्ग उपलब्ध नसल्यामुळे व ही जमीन इंद्रायणी नदीच्या पलिकडे असल्यामुळे त्यास प्रवेशमार्ग देण्यासाठी विकास योजनेत रस्ता प्रस्तावित करावा लागेल. तसेच इंद्रायणी नदीवर पूल बांधावा लागेल. परंतु या बाबतीत लोणावळा नगरपालिकेने दाखविलेली उदासिनता तसेच नगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता सदर रस्ता किंवा पूल नजिकच्या काळात होईल असे वाटत नाही.

हुडकोला दस्तऐवज आकारापोटी झालेला खर्च ११६ गृहनिर्माण या लेख शिर्षाखाली खर्ची घालण्यात यावा व ही रक्कम सदर जमिनीची विक्री वसूल करण्यात यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 22-Mar-19

**Item No.** 7 **Resolution No.** 1526

विषय : राजेंद्रनगर बोरिवली (पूर्व) येथील मोकळी जागा 'गोल्डन क्रिडा मंडळ' यांना खेळाचे मैदान म्हणून देण्याबाबत.

ठराव : राजेंद्रनगर, सी. सी. आय. कॉलनी, बोरिवली, येथील बैठ्या चाळी पाडल्यानंतर मोकळी होणारी व १५ टक्के मोकळ्या जागेच्या आरक्षणाखाली येणारी सुमारे १७६३ चौ. यार्डस आकाराची जागा रहिवाश्यांच्या 'गोल्डन क्रीडा मंडळ' या संस्थेला खेळाचे मैदान म्हणून खालील अटींवर देण्यात यावी.

१) मोकळ्या मैदानाच्या भूखंडाचे अधिमूल्य जमिनीची मूळ किंमत व विकासावरील खर्च लक्षात घेऊन आकारण्यात यावी.
२) अधिमूल्याच्या रकमेच्या एक टक्का वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा. भाडेपट्टयाचा काळ ३० वर्षे धरण्यात यावा.
३) मैदानाचा उपयोग सर्व नागरिकांसाठी मुक्त असावा.
४) मैदानात कोणतेही (कच्चे व पक्के) बांधकाम करण्यात येऊ नये.
५) 'गोल्डन क्रीडा मंडळ' ही संस्था धर्मादाय आयुक्तांकडून पंजिबद्ध करण्यात यावी.
६) प्राधिकरणाच्या इतर शर्ती व अटींचे बंधन घालण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 23-Mar-19

**Item No.** 4 **Resolution No.** 1523

विषय : अधिकार प्रदान – प्राधिकरण कार्यालयीन कार्यकारी अभियंतांना प्रवास देयके आदिवर प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकार प्रदान करणे.

ठराव : प्राधिकरण कार्यालयातील तांत्रिक विभागात, असणाऱ्या कार्यकारी अभियंत्यांपैकी, प्रकल्प समन्वय कक्षाचा कार्यभार सांभाळणारे यांना किंवा ज्यांना आस्थापना प्रभारी म्हणून कार्यभार सांभाळण्याचे आदेश दिले जातील अशा एका कार्यकारी अभियंत्यास तांत्रिक विभागातील वर्ग २, ३ व ४ मध्ये असणाऱ्या कर्मचारी/अधिकारी यांच्या प्रवास देयकांवर प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकार प्रदान करण्यात यावेत, आणि त्याप्रमाणे अधिकार प्रदानासंबंधीच्या परिशिष्टांत सुधारणा करण्यात यावी.

**Item No.** 5 **Resolution No.** 1524

विषय : प्राधिकरणाने विकसित केलेल्या व्यापारी संकुलातील गाळ्यांची वाटप करताना घ्यावयाची इसाऱ्याची रक्कम.

ठराव : निर्णय घेतला की, व्यापारी संकुलातील किंवा व्यापारी उपयोगासाठी वाटप करावयाच्या अन्य गाळ्यांसाठी निविदा मागविताना इसाऱ्याची रक्कम व्यापारी गाळ्यांच्या ऑफसेट किंमतीच्या १ टक्का या प्रमाणात निविदांसोबत घेण्यात यावी. मात्र ती कमीत कमी रुपये पाचशे व जास्तीत जास्त रुपये दहा हजार असावी.

**Item No.** 6 **Resolution No.** 1525

विषय : संकलन केंद्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण क्रमांक - २ सोलापूर येथे भूखंड देण्याबाबत.

ठराव : 'विडी-पत्ता संकलन केंद्र' यासाठी विशेष नियोजन प्राधिकरण क्र. २ सोलापूर येथे मूखंड येथे भूखंड ६४३८ चौ. मी. वितरण करण्यात यावा.

१) भूखंडाचे अधिमूल्य जमिनीच्या मूळ किंमतीच्या दुप्पट (रुपये १५५.००) आकारण्यात यावे.

२) भूखंड ३० वर्षाच्या भाडेपट्ट्यावर देण्यात यावा. भूखंडाच्या अधिमूल्याच्या रक्कमेच्या १ टक्का वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा.

३) भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करताना प्राधिकरणाच्या तत्कालीन धोरणानुसार भाड्याच्या आकारामध्ये सुधारणा करण्यात यावी.

४) वाटपाच्या शर्तीमध्ये प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना सदर भूखंडावरील इमारत व भूखंडामधील चालू असलेल्या कार्यवाहीनुसार तपासणी करण्याचे अधिकार असावेत.

५) सध्याचा भूखंडाचा आकार लक्षात घेतला या भूखंडाच्या अन्य बाजूलगतची जमीन ताब्यात आल्यानंतर सदर भूखंडाचे क्षेत्र, आकार, भूखंडाची संख्या वाढविण्याचा प्रस्ताव समाजकेंद्राच्या आरक्षणाचे क्षेत्र कमी करून वाढविले जाऊ नये.

६) बांधकामाविषयक परवानगी देताना रस्त्यापासून सोडावयाची खुली जागा सर्व भूखंडामध्ये सारखी ठेवण्यात यावी की, ज्यायोगे सर्व इमारत रस्त्यापासून सारख्या अंतरावर बांधल्या जातील.

७) श्रमिक महिला नागरी सहकारी पतपेढी व राष्ट्रीय विडी संघ यांना शक्यतो स्वतंत्र भूखंड देण्यात यावेत. बांधकाम नियमाच्या दृष्टीने या दोन्ही भूखंडामधील एक भिंत सामाईक पद्धतीने बांधण्यात यावी की ज्यायोगे कमी भूखंडाच्या क्षेत्रामध्ये त्यांना स्वतंत्र इमारत बांधता येऊ शकेल. '

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 29-Mar-19

**Item No.** 8 **Resolution No.** 1527

विषय : श्रीयुत पी. के. रामचंद्रन अर्थतज्ञ/जा. बॅ. प्रकल्प यांची कंत्राटी नेमणूक एक वर्षाकरता वाढविण्याबाबत.

ठराव : जागतिक बॅंक प्रकल्पातील संगणककक्षाकडील कार्यक्रम व वाढत्या कामाची व्याप्ती पहाता श्री. पी. के. रामचंद्रन अर्थतज्ञ यांच्याकडील असलेल्या अनुभव लक्षात घेता तसेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली कक्षाने उत्तमप्रकारे बरीच कामे हाताळलेली असल्यामुळे श्री. पी. के. रामचंद्रन यांच्या सेवेची जागतिक बॅंके प्रकल्पाला अद्यापही निकड आहे. करिता श्री. पी. के. राचचंद्रन अर्थतज्ञ/जा. बॅं. प्र./यांना कंत्राटी पद्धतीनुसार शर्ती-अटींवर दिनांक ३-४-८८ पासून आणखी एक वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 04-Apr-19

**Item No.** 1 **Resolution No.** 1528

विषय : श्री. एस. एस. गटणे, लघुवाद न्यायलयाचे सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश यांना कंत्राटीनेमणूक देण्याबाबत.

ठराव : श्री. एस. एन. गटणे, यांना कंत्राटी नेमणूक देण्याबाबत प्राधिकरणापुढे टेवलेल्या प्रस्तावास प्रशासक/प्राधिकरण यांनी खालीलप्रमाणे मंजूरी दिली.
२. श्री. एस. एन. गटणे, लघुवाद न्यायालयाचे सेवानिवृत्ती मुख्य न्यायाधीश यांना सक्षम प्राधिकरी (३) पदावर नेमणूकीचे दिनांकापासून प्रारंभी एक वर्षाच्या कालावधीसाटी अथवा अन्य पर्यायी व्यवस्था होईपर्यंत कंत्राटी नेमणूक देण्यात येत आहे.
३. कंत्राटी नेमणूकीच्या अटी व शर्ती नियमानुसार अनुज्ञेय रहातील.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 06-Apr-19

**Item No.** 2 **Resolution No.** 1529

विषय : रजनी महल या पुनर्रचित इमारतीतील श्री. कल्याणीवाला व श्री. गोशर यांची गशाळा आपापसात बदली करण्याबाबत विनंती.

ठराव : निर्णय घेतला की, पुनर्रचित इमारतीतील भाडेकरूंनी त्यांचे गाळे आपसात अदलाबदल करून मागितल्यास त्यासाटी दिलेली कारणे लक्षात घेऊन परवानगी देण्याचा निर्णय घेण्याचे अधिकारी मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांना देण्यात येत आहेत. अशी परवानगी देताना त्यांनी गाळ्यांचे भाडे सेवा आकार आणि अन्य काही देणे यांची कोणतीही थकबाकी नाही, तसेच गाळ्यांचा दुरुपयोग झालेला नाही याची खात्री करून घेऊन अदलाबदलास परवानगी देण्यात यावी. त्यासाटी प्रत्येक भाडेकरूस रुपये १००/- प्रशासकीय खर्चापोटी आकारण्यात यावेत.

**Item No.** 3 **Resolution No.** 1530

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाटी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाटी हुडकोकडून एकूण रुपये ५५७.३० लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 13-Apr-19

**Item No.** 4 **Resolution No.** 1531

विषय : गलिच्छवस्ती निर्मूलन योजनेसाटी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांची विक्री.

ठराव : निर्णय घेतला की, गलिच्छवस्ती निर्मूलन योजनेखालील मुंबईतील बहुमजली इमारती आणि मालेगाव आणि सोलापूर येथील बैठ्या इमारती यातील गाळ्यांची विक्री करण्याच्या संबंधात शासनाने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सोबत जोडलेल्या टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे मार्गदर्शक सूचना काढण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 19-Apr-19

**Item No.** 5 **Resolution No.** 1532

विषय : पंतनगर, घाटकोपर येथील अल्प उत्पन्न गट योजनेखाली बांधावयाच्या २६० गाळ्यांपैकी १४० गाळ्यांचा (गट - १) आणि १२० गाळ्यांचा (गट - २) निविदा मंजूर करण्याबाबत.

ठराव : बाब टिप्पणीत नमूद केलेले स्पष्टीकरण व सद्यस्थिती लक्षात घेऊन प्रशासक/प्राधिकरण यांनी विचारपूर्वक खालीलप्रमाणे निर्णय घेतला की, पंतनगर, घाटकोपर येथील अल्प उत्पन्न गट योजनेखाली बांधावयाच्या २६० गाळ्यांपैकी १४० गाळ्यांच्या गट - १ मधील व १२० गाळ्यांच्या गट - २ मधील कमी दराने भरलेल्या अनुक्रमे ५४,८५,८७४.६० व रु. ४७,०२,१७८.७० किंमतीच्या अनुक्रमे रु. ५८,४२,२५२/- व रु. ५०,०७,६४५/- या अंदाजित किंमतीच्या ६.१ टक्के कमी दराने मेसर्स विराल बिल्डर्स यांच्या निविदा स्वीकारण्यात याव्या.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 29-Apr-19

**Item No.** 6 **Resolution No.** 1533

विषय : प्राधिकरणाच्या व विभागीय मंडळाच्या गाड्यांचा वापर.

ठराव : निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या ज्या अधिकाऱ्यांकडे त्यांचे नियमित दिमतीसाठी वाहने सोपविण्यात आलेली आहेत व ते जर अशासकीय कामासाठी त्यांचा वापर करू इच्छित असतील तर ते दरमहा रुपये १५०/- भरून वाहन अशासकीय कामासाठी जास्तीत जास्त ५०० कि.मी. एका महिन्यात वापरू शकतील. मात्र महिन्यातून ५०० किलोमीटर पेक्षा जादा वापर केल्यास प्रतिकिलोमीटर ०.४५ पैसे या दराने आकारणी करून वसूली करण्यात यावी. तथापि प्राधिकरणाच्या व विभागीय मंडळाच्या अधिकाऱ्यांनी व्ही.आय.पीज वा वरिष्ठ अधिकारी यांना आणणे किंवा भेटणेसाठी त्यांचे निवासस्थानातून अथवा कार्यालयापासून विमानतळ, रेल्वे स्टेशन, एस.टी.स्टँड, वगैरेसाठी केलेला प्रवास व कार्यालयीन प्रवासाच्या उद्देशाने विमानतळावर जाणे किंवा घेण्यासाठी केलेला प्रवास हा कार्यालयीन प्रवास म्हणून समजण्यात यावा.
२. तसेच प्राधिकरणाच्या/विभागीय मंडळाच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सार्वजनिक, धार्मिक, तसेच अन्य अकल्पिक कामासाठी उपलब्धतेनुसार शक्य झाल्यास प्राधिकरणाचे वाहनांपैकी जीप, मेटाडोर, अथवा मिनीबस पाहिजे असेल तर सक्षम प्राधिकाऱ्यांची परवानगी घेऊन पेट्रोलवर चालणाऱ्या वाहनांसाठी ०.७० पैसे प्रमाणे रुपये १/- प्रमाणे आकारून वसूल करण्यात यावेत. तसेच वाहनांच्या खोळंब्यासाठीच्या आकाराचा दर ताशी रु. २/- व जास्तीत जास्त रुपये २०/- प्रति दिवशी असावा. मात्र खोळंब्याचा काळ मोजताना पहिल्या तीन तासाचा वापर वगळण्यात यावा.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 02-May-1

**Item No.** 1 **Resolution No.** 1534

विषय : श्री. ल. रं. घाडगे, सचिव/प्राधिकरण यांना सेवानिवृत्तीनंतर कंत्राटी नेमणूक देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, श्री. ल. रं. घाडगे, माजी सचिव/प्राधिकरण यांचे अनुभवाचा आणि शैक्षणिक पात्रता विचारात घेऊन त्यांना दिनांक २.५.१९८८ पासून ''चौकशी अधिकारी''/प्राधिकरण या पदावर प्रारंभी तीन महिन्यांचे कालावधीसाठी अथवा अन्य पर्यायी व्यवस्था होईपर्यंत यापैकी जो आधी संपेल तोपर्यंतच्या कालावधीसाठी ''अपवादात्मक बाब'' म्हणून सेवानिवृत्त होताना जे एकूण वेतन असेल त्या वेतनातून सेवानिवृत्ती वेतन वजा जाता, जे वेतन राहील त्या वेतनावर कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्यात येत आहे.
श्री. ल. रं. घाडगे, यांनी चौकशी अधिकारी/प्राधिकरण या पदाबरोबर सचिव/प्राधिकरण या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेश मिळेपर्यंत सांभाळावयाचा आहे.

---

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 06-May-1

**Item No.** 2 **Resolution No.** 1535

विषय : मोतीलाल नगर येथील कार्यालयीन इमारत क्रमांक - १ (आताची इमारत क्रमांक - ६) व इमारतीला लागून असलेला मोकळा भूखंड देण्याबाबत.

ठराव : १) मोतीलाल नगर टेनंट असोसिएशनच्या एम. एन. इंग्लिश स्कूल या संस्थेला मोतीलाल नगर येथील कार्यालयीन इमारत क्रमांक - १ (आताची क्रमांक - ६) सह इमारतीला लागून असलेला सुमारे १२५-८४ चौ. मी. आकाराचा भूखंड शाळेच्या विकासासाठी इमारतीच्या भाडेपट्ट्याच्या काळाएवढ्याच भाडेपट्ट्याच्या काळाने देण्यात यावा.
२) भूखंडाचे अधिमूल्य व भाडेपट्टा माध्यमिक शाळेसाठी द्यावयाच्या प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतीच्या धोरणानुसार आकारण्यात यावे.
३) कार्यालयीन इमारत क्रमांक - ६ ची विक्री प्राधिकरणाच्या धोरणानुसार आकारण्यात यावी.
४) माध्यमिक शाळेसाठी द्यावयाच्या नेहमीच्या शर्ती व अटींचे पालन करण्यात यावे.

---

**Item No.** 4 **Resolution No.** 1537

विषय : प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेमधून जाण्यायेण्यासाठी प्रवेशाधिकार देण्याबाबत.

ठराव : महाराष्ट्र गृहनिर्माण व प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेमधून द्यावयाचा प्रवेशाधिकार अथवा प्रवेश देण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाला दिनांक २७.३.१९८७ च्या ठराव क्र. १३५६ अन्वये प्राधिकरणाच्या दराचा फेरविचार करण्यात आला. त्याअन्वये या ठरावासोबत जोडण्यात आलेल्या प्रवेशाधिकार आकारावयाच्या पर्यायांच्या दरांना मान्यता देण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 10-May-1

**Item No.** 3 **Resolution No.** 1536

विषय : औद्योगिक कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांची विक्री योजना.

ठराव : निर्णय घेतला की,
१) औद्योगिक कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांची उर्वरित किंमत किंवा पूर्ण किंमत तसेच पूर्ण थकबाकी एकरकमी भरून किंमतीतील अतिरिक्त १० टक्के सूटीचा (एकूण ३० टक्के) लाभ ज्या इमारतीतील गाळेधारकांना उपलब्ध आहे त्यांना तो लाभ देण्यासाठी दि. ३०-९-१९८८ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी. तसेच गाळ्यांची उर्वरित किंमत किंवा पूर्ण किंमत आणि पूर्ण थकबाकी एकरकमी भरल्यास त्या रकमेवर ५ टक्के वटाव (डिस्काऊंट) देण्यासाठीही दि. ३१.३.१९८८ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी.
२) शासनाने दिलेल्या याबाबतच्या मुदत वाढीनंतर प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या मुदतवाढीस शासनाकडून कार्योत्तर मंजूरी मिळवावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 12-May-1

**Item No.** 5 **Resolution No.** 1538

विषय : वर्तकनगर, ठाणे येथे बांधण्यात यावयाच्या मध्यम उत्पन्न गटांतर्गत १०० गाळ्यांच्या कामासाठीची निविदा स्वीकारणेबाबत.

ठराव : वर्तकनगर, ठाणे येथे मध्यम उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात यावयाच्या १०० गाळ्यांच्या निविदांबाबत बाब क्रमांक दिनांक मधील बाब विचारात घेऊन सदरील काम रु. ५५,६६,८७५/- या अंदाजित किंमतीच्या १.२६ टक्के कमी दराने म्हणजे रु. ५४,९६,७३२.४० या रकमेची मे. राधाकृष्णन केवलरामन आणि कंपनी यांची निविदा स्वीकृत करण्याचा निर्णय प्रशासक/प्राधिकरण यांनी घेतला.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 13-May-1

**Item No.** 7 A **Resolution No.** 1540

विषय : जागतिक बँक प्रकल्पांतर्गत चारकोप येथील संकुलित सहकारी गृहनिर्माण संस्थांना हुडकोकडून कर्जे मिळविण्याकरिता प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : जागतिक बँक प्रकल्पांतर्गत चारकोप येथील संकुलित सहकारी गृहनिर्माण संस्थांना हुडकोकडून कर्जे मिळविण्याकरिता प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 14-May-1

**Item No.** 6 **Resolution No.** 1539

विषय : वांद्रे पुन:प्रापण योजनेअंतर्गत कोड क्र. ०५१ (उच्च उत्पन्न गट) मधील दोन गाळ्यांऐवजी कोड क्र. ०७१ (उच्च उत्पन्न गट) मधील दोन गाळे बदली म्हणून हुडको संस्थेस देण्याबाबत.

ठराव : अध्यक्षांनी निर्णय घेतला की, हुडको या वित्त संस्थेस यापूर्वीच देण्यात आलेल्या वांद्रे पुन:प्रापण योजनेअंतर्गत कोड क्र. ०५१ मधील सुविधा आरक्षणातील दोन गाळ्यांऐवजी (५७०) चौ. फू. जोते क्षेत्र त्याच परिसरातील कोड क्र. ०७१ मधील सुविधा आरक्षणातीलच मोठ्या आकाराचे दोन गाळे (८०० चौ. फू. जोते क्षेत्र) बदली म्हणून वितरित करण्यात यावेत. तथापि सध्याच्या गाळ्यांचे आर्थिक भाडे व इतर सर्व आर्थिक भार त्याचवेळी पूर्णपणे वसूल करण्यात यावेत.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 20-May-1

**Item No.** 7 **Resolution No.** 1540

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी आणि राष्ट्रीय नेत्यांच्या निधनानिमित्त किंवा निवडणूकीसाठी जाहिर होणाऱ्या सार्वजनिक सुट्ट्या.

ठराव : प्राधिकरणातील अत्यावश्यक सेवा या गटात समाविष्ट होऊ शकणारे पहारेकरी किंवा सुरक्षा कर्मचारी, पाणी/सांडपाणी पंपावरील पंपमन, वायरमन, पंपमजूर आदी कर्मचारी यांना राष्ट्रीय नेत्यांच्या निधनानिमित्त किंवा निवडणूकीसाठी महाराष्ट्र शासन ज्यावेळी सार्वजनिक सुट्टी जाहिर करील त्या सुट्ट्या अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना देण्यात याव्यात अथवा त्याऐवजी त्यांच्या नेहमीच्या वेतनाचे दुप्पट दराने अतिकालीक भत्ता देण्यात यावा.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **06-Jun-19**

**Item No.** **1** **Resolution No.** **1541**

विषय : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातील कर्मचाऱ्यांच्या नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेला पोकळे मूखंड देण्याबाबत.

ठराव : मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे महर्षिनगर पुणे येथील दोन मूखंड अनुक्रमे (१) ९२ फूट बाय ११६ फूट व (२) ९२ फूट बाय ७१ फूट आकाराचे मूखंड पुणे मंडळातील कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने प्राधिकरणाच्या प्रचलित जमिनीच्या अधिमूल्यानुसार व समासद पात्रतेच्या अटींना अधीन राहून मूखंडाचे वाटप करण्यात यावे.
२) मूखंडाच्या अधिमूल्याची रक्कम तीन महिन्यांच्या आत संपूर्ण भरण्यात यावी व इमारतीचे बांधकाम सहा महिन्यांत सुरू करण्यात यावे.
३) बांधकामाचे नकाशे पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ व पुणे महानगरपालिका यांचेकडून मंजूर करून घेण्यात यावेत.

**Item No.** **2** **Resolution No.** **1542**

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना वाटप करावयाच्या मूखंडाच्या संबंधात पात्रतेच्या अटी.

ठराव : प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक - १५४३ मध्ये सुधारणा करून कर्मचाऱ्यांच्या सहकारी संस्थांना घर बांधणीसाठी मूखंड देण्याच्या योजनेखाली समासदांची पात्रता ठरविण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला.

१) ज्या कर्मचाऱ्यांचे प्राधिकरणाने दिलेले स्वतःच्या किंवा पत्नीच्या नावे मालकीचे गाळे असतील त्यांनी ते प्राधिकरणास परत करण्याच्या अटीवर त्यांना सहकारी संस्थेत जागा मिळण्यासाठी पात्र ठरविण्यात यावे. त्यांनी भरलेली गाळ्यांची किंमत त्यांना परत करावी मात्र प्राधिकरणाने गाळ्याच्या संबंधात जी देणी (आऊटगोइंग्ज) भरली असतील ती रक्कम परत करू नये. अशा गाळ्यांचे वाटप ज्याला करण्यात येईल त्याला त्या गाळ्याची पुन्हा संपूर्ण किंमत आकारावी.
२) ज्या कर्मचाऱ्यांचे स्वतःच्या किंवा पत्नीच्या नावे मालकीचे खाजगी गाळे असतील त्यांनी ते स्वतःचा मुलगा किंवा मुलगी (१८ वर्षांवरील) यांच्या नावे करून घेतले पाहिजेत.
३) सध्या ज्या अर्जाची पात्रता ठरविण्यात आली आहे परंतु जागांचे वाटप झालेले नाही त्यासह सर्व अर्जांची पुन्हा तपासणी करून उपरोल्लिखित अटींच्या संदर्भात त्यांची पात्रता तपासून त्यांच्या अर्जावर निर्णय घेण्यात यावेत. त्यानुसार ते पात्र ठरले तरच त्यांचे अर्ज मंजूर करण्यात यावेत. आधी पात्र ठरलेले जे समासद वरीलप्रमाणे अटी पूर्ण करणार नाहीत त्यांचे अर्ज रद्द करण्यात यावेत.

**Item No.** 2 **Resolution No.** 1542

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना वाटप करावयाच्या भूखंडाच्या संबंधात पात्रतेच्या अटी.

ठराव : प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक - १५४३ मध्ये सुधारणा करून कर्मचाऱ्यांच्या सहकारी संस्थांना घर बांधणीसाठी भूखंड देण्याच्या योजनेखाली सभासदांची पात्रता ठरविण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला.

१) ज्या कर्मचाऱ्यांचे प्राधिकरणाने दिलेले स्वतःच्या किंवा पत्नीच्या नावे मालकीचे गाळे असतील त्यांनी ते प्राधिकरणास परत करण्याच्या अटीवर त्यांना सहकारी संस्थेत जागा मिळण्यासाठी पात्र ठरविण्यात यावे. त्यांनी भरलेली गाळ्यांची किंमत त्यांना परत करावी मात्र प्राधिकरणाने गाळ्याच्या संबंधात जी देणी (आऊटगोइंग्ज) भरली असतील ती रक्कम परत करू नये. अशा गाळ्यांचे वाटप ज्याला करण्यात येईल त्याला त्या गाळ्याची पुन्हा संपूर्ण किंमत आकारावी.

२) ज्या कर्मचाऱ्यांचे स्वतःच्या किंवा पत्नीच्या नावे मालकीचे खाजगी गाळे असतील त्यांनी ते स्वतःचा मुलगा किंवा मुलगी (१८ वर्षांवरील) यांच्या नावे करून घेतले पाहिजेत.

३) सध्या ज्या अर्जाची पात्रता ठरविण्यात आली आहे परंतु जागांचे वाटप झालेले नाही त्यासह सर्व अर्जांची पुन्हा तपासणी करून उपरोल्लिखित अटींच्या संदर्भात त्यांची पात्रता तपासून त्यांच्या अर्जावर निर्णय घेण्यात यावेत. त्यानुसार ते पात्र ठरले तरच त्यांचे अर्ज मंजूर करण्यात यावेत. आधी पात्र ठरलेले जे सभासद वरीलप्रमाणे अटी पूर्ण करणार नाहीत त्यांचे अर्ज रद्द करण्यात यावेत.

**Item No.** 6 **Resolution No.** 1546

विषय : पंपमन/वायरमन यांना गणवेश देण्यासंबंधी विचार करणे.

ठराव : प्राधिकरणातील नियत आस्थापनेवर असणाऱ्या पूर्णवेळ वेतनी पंपमन व वायरमनना प्रत्येक तीन वर्षांकरिता टेरिकॉटच्या एक विजार व एक बुशशर्ट अशा तीन जोड्या गणवेश देण्यात यावेत. गणवेश देण्यासाठी मुंबई मंडळातील बेलिफ पदावरील कर्मचाऱ्यांचे बाबतीत अनुसरली जाणारी पद्धती स्वीकारली जावी.
या गणवेशासाठी लागणारे टेरिकॉट कापड मुंबई मंडळाने खरेदी करावे व इतर मंडळांनी आपली मागणी मुंबई मंडळाकडे करावी.
गणवेश शिवणावळीचा खर्च प्रत्येक जोडीला रुपये ५३.५० किंवा प्रत्यक्ष खर्च यापैकी जो कमी असेल तो परत फेडीच्या स्वरूपात संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यात यावा.

---

**Item No.** 7 **Resolution No.** 1547

विषय : प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांना प्राधिकरणाच्या सेवेत सामावून न घेण्याबाबत.

ठराव : प्राधिकरणाच्या कार्यालयाकडे प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना प्राधिकरणाच्या सेवेत सामावून घेण्याचा प्रयत्न केला जाणार नाही असे धोरण प्राधिकरणाचे राहील. परंतु एखाद्या विशिष्ट प्रकरणी जर अशी कारवाई करावयाचा प्रसंग आला तर एखाद्या विशिष्ट पदासाठी वि[illegible]शैक्षणिक पात्रतेचा कर्मचारी हवा असेल तर अशी कार्यवाही करण्यात येईल, [illegible] म्हणून जाहिरातीद्वारे उमेदवार मागवून निवडीने ने[illegible]

---

**Item No.** 8 **Resolution No.** [illegible]

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकर[illegible] र्वाह निधी नियम १९८५
श्री. अेन. जी. राऊत, सहाय्यक मिळकत[illegible] Mu[illegible] रु. २०,०००/- मंजूर करून परतफेड ६० हप्त्यांत करण[illegible]

ठराव : निर्णय घेतला की, श्री. अेन. जी. राऊत[illegible] स्थापक यांच्या भविष्य निर्वाह निधी लेखा क्रमांक १६१७ मधून[illegible] यासाठी रुपये २०,०००/- अग्रिम मंजूर करून त्याची[illegible] लेल्या अग्रिमाच्या शिल्लक रकमेसह, ६० हप्त्यांत करण[illegible] मी.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **27-Jun-19**

**Item No.** **9** **Resolution No.** **1549**

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाच्या प्रशासकांची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : हाऊसिंग एन्ड अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (हुडको) यांनी विहित केलेल्या अटीवर हुडकोकडून अर्थसहाय्यित चंद्रपूर / रायगड / नागपूर / बीड / जळगाव / गडचिरोली / भंडारा / पुणे / उस्मानाबाद / वर्धा व लातूर जिल्हा येथील बेघर भूमिहीनांकरिता ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी एकूण १६०.५९ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **01-Jul-19**

**Item No.** **1** **Resolution No.** **1550**

विषय : इमारत क्र. ३९, डी. ई. एफ. ''रंगारी चाळ'' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग ''ई'' विभाग, मुंबई या इमारतींची संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या निविदा स्वीकारणेबाबत

ठराव : इमारत क्र. ३९, डी. ई. एफ. ''रंगारी चाळ'' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग ''ई'' विभाग, मुंबई या इमारतींची संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या निविदाबाबत बाब क्रमांक १ दिनांक मधील बाबी विचारात घेऊन सदरील काम रु. ६३,६८,३३८/- या अंदाजित किंमतीच्या ९ टक्के अधिक दराने म्हणजेच रु. ६९,४१,४४८/- या रकमेस देण्यास व मे. बिरल बिल्डर्स यांची वरील रकमेची निम्नतम निविदा स्वीकारण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी घेतला.

**Item No.** **7** **Resolution No.** **1556**

विषय : जागतिक बँक प्रकल्प अंतर्गत मुलुंड येथील १० हेक्टर जमिनीवरील पुन:प्रापणाचे कामाच्या निविदा.

ठराव : मुलुंड येथील १० हेक्टर जागेवरील पुन:प्रापणाच्या कामाची मे. ज्योती कन्स्ट्रक्शन कंपनी यांची ७२,९५,५२५/- रुपये किंमतीची निविदा प्राधिकरणाच्या ठराव क्र. १४५२ दिनांक ११.९.८७ अन्वये स्वीकारण्यात आली होती. परंतु सदर निविदेची किंमत ७२,९७,०९२/- रुपये असल्याचे आढळून आल्यामुळे सदर निविदा आता सुधारित किंमतीस म्हणजेच रुपये ७२,९७,०९२/- रकमेस स्वीकारण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 12-Jul-19

**Item No.** 2 **Resolution No.** 1551

विषय : क्रिकेटवीर श्री. सुनील गावसकर यांना इन्डोर क्रिकेट प्रशिक्षण केंद्र उघडण्यासाठी वांद्रे-कुर्ला संकुलनात भूखंड देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, शासन निर्णय क्र. गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग क्र. एडीएल-११८३/(१३४४)/का. १० दि. १०.६.१९८८ अनुसरून वांद्रे पुन:प्रापण योजनेतमील कन्व्हेंशन कॉम्प्लेक्ससाठी राखून ठेवलेल्या भूखंडापैकी २००० चौ. मी. एवढा भाग शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागास परत करण्यात यावा. यासाठी शासनाच्या समाजकल्याण सांस्कृतिक कार्ये, क्रीडा व पर्यटन विभागाकडून रु. १०.५० लाख एवढी रक्कम जमिनीच्या विकास खर्च आणि चॅनालायझेशन आकार यापोटी वसूल करण्यात यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 13-Jul-19

**Item No.** 3 **Resolution No.** 1552

विषय : श्रीमती प्रिसिला ए. फर्नांडिस यांना सुंदरनगर, कालिना येथे मोकळी जागा भाडेपट्ट्याने देणे.

ठराव : श्रीमती प्रिसिला ए. फर्नांडिस यांची, कालिना येथील सुंदरनगर वसाहतीतील, त्यांच्या ''इडीसिला'' या इमारती लगतच्या ३८५.६२ चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड मिळण्याची विनंती मान्य करावी. त्याप्रमाणे हा भूखंड त्यांना ३० वर्षांच्या भाडेपट्ट्यावर प्राधिकरणाच्या नेहमीच्या अटी व शर्तीवर व प्राधिकरणाच्या किंमत विषयक धोरणास अनुसरून अधिमूल्य आकारून देण्यात यावा.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 14-Jul-19

**Item No.** 4 **Resolution No.** 1553

विषय : माडेवसूलीकास संवगती नेमलेल्या कर्मचाऱ्यांना विशेष भत्ता रुपये २०/- मंजूर करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, सेवाजेष्ठतेच्या प्रश्नावर उच्च न्यायालयाने जानेवारी १९८६ मध्ये दिलेल्या निकालापूर्वी असलेल्या वरिष्ठ लिपिक संवर्गातील ज्या कर्मचाऱ्यांची माडेवसूलीचे काम करण्यासाठी नेमणूक करण्यात येईल व जोपर्यंत ते माडेवसूलीचे काम करतील तोपर्यंत त्यांना विशेष भत्ता दरमहा रुपये २०/- (विशेष वेतन नव्हे) या दराने देण्यात यावा. उपरोल्लेखित निकालापूर्वीच्या माडेवसूलीकार संवर्गातील कर्मचाऱ्यांना माडे वसूलीचे काम करण्यासाठी नेमल्यास त्यांना मात्र हा विशेष भत्ता देय राहणार नाही.

**Item No.** 5 **Resolution No.** 1554

विषय : श्री. ना. ल. कासले, सेवानिवृत्त जिल्हा निरीक्षक भूमि-अभिलेख जागतिक बँक प्रकल्प यांना मुदतवाढ देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, श्री. ना. ल. कासले, सेवानिवृत्त जिल्हा निरीक्षक भूमिअभिलेख, यांच्या कंत्राटी पद्धतीवरील पुनर्नेमणूकीस दि. १.८.८८ पासून आणखी १ वर्षाची मुदतवाढ त्याच अटी व शर्तीवर देण्यात यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 19-Jul-19

**Item No.** 6 **Resolution No.** 1555

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ उपहारगृहातील खाद्यपदार्थांचे दरात सुधारणा करणे व मासिक भाडेपट्टा कमी करणेबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,

१. गृहनिर्माण भवनातील उपहारगृहाचे मासिक भाडे रु. ४२,०००/- कमी करून दिनांक १.१.१९८८ पासून रु. ३५,८००/ इतके करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. विद्युत महामंडळाच्या उपहारगृहातील पदार्थांचे दर या कार्यालयाच्या उपहारगृहात पुरविण्यात येणाऱ्या पदार्थांना ता. १/८/८८ पासून लागू करावेत. विद्युत महामंडळाच्या उपहारगृहात जे पदार्थ अंतर्भूत केलेले नाहीत, परंतु जे पदार्थ या उपहारगृहाच्या मंजूर यादीमध्ये आहेत अशा पदार्थांच्या बाबतीत सध्याच्या दरामध्ये १५ टक्के वाढ करण्यात यावी.

३. प्राधिकरणाच्या उपहारगृहाचा ठेका हा तीन वर्षांच्या कालावधीसाठी नेहमीच्या अटी व शर्तीनुसार असावा.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 05-Aug-1

**Item No.** 4 **Resolution No.** 1563

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतील अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान.

ठराव : "प्रशासन व लेखा" आणि भांडार "लेखन साहित्य खरेदी व संकीर्ण" या शीर्षकाखाली येणाऱ्या विविध विषयांवर दि. ८.९.८६ च्या प्राधिकरण आदेशान्वये, विविध स्तरांवरील अधिकाऱ्यांना जे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत त्यापैकी परिशिष्ट "ए" मधील अनुक्रमांक १४, ३८ (बी), ३८ (सी), ४१, ४२, ४३, ४४, ४७, ५८ व परिशिष्ट बी मधील अनुक्रमांक ४, ६, ८, ९, १०, १२, १४, १९ ते २३, २७ ते ३१ वरील विषयांवर प्राधिकरण वा मंडळ यांचा नामनिर्देशन करता जे अधिकार मुख्य अभियंता, उपमुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता यांना प्रदान केलेले आहेत ते अधिकार पंतप्रधान अनुदान प्रकल्पातील तशी पदे धारण करणाऱ्यांना प्रदान केले जावेत.

त्याचप्रमाणे परिशिष्ट "ए" मधील अनुक्रमांक ४१ व परिशिष्ट "बी" मधील अनुक्रमांक ३ व ७ वरील विषयांवर मुख्य अभियंता/प्राधिकरण व मुख्य अभियंता, मुंबई मंडळ यांना प्रदान करण्यरात आलेले अधिकार पंतप्रधान अनुदान प्रकल्पातील मुख्य अभियंतांना प्रदान करण्यात यावेत.

**Item No.** 5 **Resolution No.** 1564

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, अंशदायी भविष्य निर्वाह निधी नियम १९८५.

श्री. सु. ग. सांगळे, उच्चश्रेणी लघुलेखक यांना अग्रिम रु. १२,०००/- मंजूर करून परतफेड ६० हप्त्यांत करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, श्री. सु. ग. सांगळे, उच्चश्रेणी लघुलेखक यांच्या भविष्य निर्वाह निधी लेखा क्रमांक ५१९८ मधून जुहू प्राजक्त सहकारी गृहनिर्माण संस्थेत निवासी जागेची किंमत भरण्यासाठी रु. १२,०००/- अग्रिम मंजूर करून त्याची परतफेड ६० हप्त्यांत करण्यास खास बाब म्हणून मंजूरी देण्यात येते.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 12-Aug-1

**Item No.** 6 **Resolution No.** 1565

विषय : गोल्डन क्रीडा मंडळ यांना राजेंद्रनगर, बोरीवली (पूर्व) येथील वसाहतीमधील मोकळी जागा खेळाचे मैदान म्हणून दिलेल्या भूखंडाबाबत.

ठराव : गोल्डन क्रीडा मंडळ यांना राजेंद्रनगर, बोरीवली (पूर्व) येथील वसाहतीत सुमारे १७६३ चौ. वार आकाराचा भूखंड खेळाचे मैदान म्हणून देण्याचा जो निर्णय दिनांक २२.३.१९८८ क्रमांक - १५२६ अन्वये घेतला होता, तो आता या ठरावाद्वारे रद्द करण्यात येत आहे.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **16-Aug-1** |
|---|---|---|---|

**Item No.** 7 **Resolution No.** 1566

विषय : मे. पान इलेक्ट्रीकल यांना मुंबई मंडळाच्या नोंदणीकृत ठेकेदारांच्या यादीत वर्ग अ (विद्युत) मध्ये नोंदणी करण्याबाबत.

ठराव : बाब टिप्पणी क्र. ७ दिनांक मधील बाबींचा विचार करून प्रशासक/प्राधिकरण यांनी मे. पान इलेक्ट्रीकल्स यांना मुंबई मंडळाच्या नोंदणीकृत ठेकेदारांच्या यादीत वर्ग "अ" (विद्युत) मध्ये (कितीही रकमेच्या निविदा भरण्याबाबत) नोंदणी करण्याबाबतचा प्रस्ताव या ठरावाद्वारे मान्यता दिली.

**Item No.** 8 **Resolution No.** 1567

विषय : मे. ए. वाय. माटी ॲन्ड सन्स यांचे मुंबई मंडळाच्या नोंदणीकृत ठेकेदारांच्या यादीत वर्ग २ मध्ये उन्नतीकरण करण्याबाबत.

ठराव : बाब टिप्पणी क्रमांक ८ दिनांक मधील बाबींचा विचार करून प्रशासक/प्राधिकरण यांनी मे. ए. वाय. माटी ॲन्ड सन्स यांचे मुंबई मंडळाच्या नोंदणीकृत ठेकेदारांच्या यादीत वर्ग - २ मध्ये उन्नतीकरण मान्य करण्याचा निर्णय घेतला.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **19-Aug-1** |
|---|---|---|---|

**Item No.** 9 **Resolution No.** 1568

विषय : मू. क्र. ९३, पार्वती, लक्ष्मीनगर, पुणे येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात यावयाचे ९६ गाळे, निविदेचा स्वीकार करणेबाबत.

ठराव : बाब टिप्पणी क्र. ९ दि. मधील बाबींचा विचार करून प्रशासक/प्राधिकरण यांनी निर्णय घेतला की मू. क्र. ९३, पार्वती, लक्ष्मीनगर, पुणे येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात यावयाच्या ९६ गाळ्यांच्या कामाची रु. ६८,७४,२४४/- किंमतीची (रु. ६२,५०,४४९/-) या निविदेच्या अंदाजित किंमतीच्या ९.९८ टक्के अधिक श्री. ए. सी. गांधी, पुणे या कंत्राटदाराची निम्नतम निविदा स्वीकारण्यात यावी.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **22-Aug-1**

**Item No.** **10** **Resolution No.** **1569**

विषय : कनिष्ठ अभियंत्यांना सुधारित वेतनश्रेणी व अधिकारी वर्ग - २ चा दर्जा देणे.

ठराव : निर्णय घेतला की,
संबंधित कनिष्ठ अभियंत्याचे तीन वर्षांपैकी एक किंवा दोन वर्षांचे गोपनीय अभिलेख प्रादेशिक मंडळाकडून प्राप्त होणे अशक्य असेल तर उपलब्ध गोपनीय अभिलेख तपासण्यात यावेत आणि ज्या वर्षांचे गोपनीय अभिलेख उपलब्ध नसतील अशा प्रकरणी सध्याच्या नियंत्रण अधिकाऱ्यांकडून कामाबाबत अहवाल मागवून घ्यावा. तसेच ज्या कनिष्ठ अभियंत्याचे आवश्यक त्या तीन वर्षांचे गोपनीय अभिलेख प्राप्त होत नसतील अशा प्रकरणीही जे कनिष्ठ अभियंते ज्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली सध्या काम करीत असतील त्यांच्याकडून कामाबाबतचे अहवाल घेऊन त्याप्रमाणे पात्र असलेल्या कनिष्ठ अभियंत्यांना सुधारित वेतनश्रेणी व अधिकारी वर्ग - २ चा दर्जा देण्यात यावा.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **23-Aug-1**

**Item No.** **11** **Resolution No.** **1570**

विषय : राजेंद्रनगर, बोरीवली (पूर्व) येथील मोकळी जागा ''गोल्डन क्रीडा मंडळ'' यांना खेळाचे मैदान म्हणून देण्याबाबत.

ठराव : राजेंद्रनगर, सी. सी. आय. कॉलनी, बोरीवली येथील सैनिकी बॅरेक्स पाडल्यामुळे रिकामी झालेली जमीन (भूखंड) क्षेत्र अंदाजे १७६३ चौ. वार इतकी जागा रहिवाशांच्या गोल्डन क्रीडा मंडळ या संस्थेला फक्त खेळाचे मैदान म्हणून खालील अटींवर देण्यात यावे.

१) मोकळ्या मैदानाचा उपयोग खेळाचे मैदान म्हणूनच वापर करण्यास वसाहतीतील सर्व रहिवाशांना खुले राहील.

२) सदर मैदान हे गोल्डन क्रीडा मंडळ या संस्थेस ११ महिन्यांच्या मुदतीसाठी व्यवस्थापन या तत्त्वावर देण्यात येऊन त्यांच्या उपयोगापोटी क्रीडा मंडळाने प्राधिकरणास ११ महिन्यांच्या आकारापोटी नाममात्र १/- रुपया एवढे भाडे द्यावे.

३) या मैदानावर सदर क्रीडा मंडळाला कोणतेही कच्चे अगर पक्के बांधकाम करता येणार नाही.

४) ज्या वेळेला सदर क्रीडा मैदानाचा (भूखंडाचा) प्राधिकरणाला विकासाच्या कामासाठी आवश्यकता भासेल त्या वेळेला हे मैदान (भूखंड) सदर क्रीडा मंडळ ११ महिन्यांच्या कालावधी संपण्याच्या आधीदेखील तीन प्रकार परत करण्यास बांधील राहील.

५) प्राधिकरणाच्या इतर शर्ती व अटी क्रीडा मंडळास बंधनकारक राहतील.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **30-Aug-1** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **12** | **Resolution No.** | **1571** |

विषय : कन्नमवार नगर, विक्रोळी वसाहतीमधील इ. क्र. १९८ व १९९ जवळील "वेल्फेअर सेंटर"साठी आरक्षित करण्यात आलेल्या भूखंडाची "अभय शिक्षण मंडळ" या संस्थेने सामाजिक/सांस्कृतिक कार्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक गृहासाठी केलेली मागणी.

ठराव :

१) कन्नमवार नगर, विक्रोळी येथील वसाहतीतील इमारत क्रमांक १९८ व १९९ जवळ "ड्राफ्ट रिव्हाईज डेव्हलपमेंट प्लॅन" मध्ये "वेल्फेअर सेंटर" साठी आरक्षित करण्यात आलेल्या सुमारे २५०० चौ. मी. भूखंडापैकी सुमारे १००० चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड "अभय शिक्षण मंडळ" या संस्थेला "डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक भवन, वाचनालय व सामाजिक/सांस्कृतिक कार्यासाठी (वेल्फेअर ॲक्टीव्हिटीज)" ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने खालील शर्ती व अटींवर देण्यात यावा. भूखंडाचे वितरण महाराष्ट्र हौसिंग ॲन्ड डेव्हलपमेंट (लॅन्ड डिस्पोझल) रेग्युलेशन, १९८२ च्या विनियम ३ (II) व विनियम ५ अन्वये करण्यात यावे.

२) सदरहू जागेत सध्या अस्तित्वात असलेले डॉ. बाबासाहेब वाचनालय हटविण्याची किंवा सदरहू वाचनालय आपल्या संस्थेत विलीन करण्याची जबाबदारी "अभय शिक्षण मंडळाची" राहील.

३) प्राधिकरणाच्या जमिनीच्या प्रचलित किंमतीच्या धोरणानुसार "वेल्फेअर सेंटर"साठी द्यावयाच्या भूखंडाचे अधिमूल्य व वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा.

४) वाचनालय, सामाजिक/सांस्कृतिक (वेल्फेअर ॲक्टीव्हिटीज) फायदे वसाहतीमधील सर्व रहिवाशांना उपलब्ध करण्यात यावेत.

५) इमारतीच्या बांधकामाचे नकाशे मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या संबंधित विभागाकडून मंजूर करून घेण्यात यावेत.

६) वेल्फेअर सेंटरच्या आरक्षित भूखंडापैकी शिल्लक राहणाऱ्या सुमारे १५०० चौ. मी. आकाराच्या भूखंडावर कोणतेही अतिक्रमण होऊ देऊ नये याची दक्षता घेण्यात यावी.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **21-Sep-19** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **1** | **Resolution No.** | **1572** |

विषय : मे. माय कन्स्ट्रक्शन यांचे मुंबई मंडळाच्या नोंदणीकृत ठेकेदारांच्या यादीत वर्ग - २ मध्ये उन्नतीकरण करणेबाबत.

ठराव : बाब टिप्पणी क्रमांक १ दिनांक मधील बाबींचा विचार करून प्रशासक/प्राधिकरण यांनी मे. माय कन्स्ट्रक्शन यांचे मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या नोंदणीकृत ठेकेदारांच्या यादीत वर्ग-२ मध्ये उन्नतीकरण मान्य करण्याचा निर्णय घेतला.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 30-Sep-19

**Item No.** 2 **Resolution No.** 1573

विषय : डॉ. ए. टी. वागळे, यांची रिटेनर पद्धतीने केलेल्या नेमणूकीची मुदतवाढ करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, श्री. ए. टी. वागळे, यांच्या रिटेनर पद्धतीने केलेल्या नेमणूकीस दिनांक १ ऑक्टोबर १९८८ पासून एक वर्षाची मुदतवाढ देण्यात यावी. सुरुवातीस त्यांची नेमणूक ज्या अटी व शर्तीवर करण्यात आली होती त्याच अटी व शर्तीवर त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 05-Oct-19

**Item No.** 2 **Resolution No.** 1575

विषय : मुंबई बेटातील उपकरपात्र इमारतीची दुरुस्ती व पुनर्रचना.

१) जुन्या इमारतीतील जागा रिकामी करून देण्याची नोटीस काढणे.
२) नोटीस एकाच्या नावावरून दुसऱ्याच्या नावावर करणे व
३) पुनर्रचित इमारतीतील जागा एकाच्या नावावरून दुसऱ्याच्या नावे करणे यासाठी अनुसरावयाची पद्धती.

ठराव : निर्णय घेतला की, मुंबई बेटातील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्ती व पुनर्रचना कार्यक्रमांच्या अंतर्गत गाळ्यांचे वाटप करण्यासंबंधीची कार्यपद्धती प्राधिकरणाच्या ठराव क्र. १२२७ अनुसार ठरविण्यात आली होती. त्यात सुधारणा करून, गाळ्यांच्या हस्तांतरणाच्या प्रकरणी निर्णय घेण्यासाठी नेमण्यात आलेली समिती बरखास्त करण्यात येत आहे. यापुढे भाडेकरू मृत्यू पावल्यास, त्यांचा वारस किंवा तो मुंबई कायमची सोडून गेल्यास किंवा अन्य परिस्थितीत भाडेकरूंची पत्नी, मुलगा, अविवाहीत मुलगी यांच्या नावे गाळा करावयाचा असल्यास त्याप्रकरणी उपमुख्य अधिकारी (दु. व पु.) यांनी निर्णय घ्यावा व अन्य सर्व प्रकारणी मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी निर्णय घ्यावा, अशा सूचना मुंबई मंडळास देण्यात आल्या आहेत. या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 3 **Resolution No.** 1576

विषय : प्राधिकरणाच्या वसाहतीतील मोकळ्या जागा तात्पुरत्या कारणासाठी भुईभाड्याने देण्यासाठी विभागीय मंडळांना देण्यात आलेली ११ दिवसांची मुदत वाढविण्याबाबत.

ठराव : प्राधिकरणाच्या वसाहतीतील मोकळ्या जागा/मैदाने, धार्मिक उत्सव, औद्योगिक प्रदर्शने, क्रीडा स्पर्धा, सर्कस इत्यादी तात्पुरत्या प्रयोजनासाठी भुईभाड्याने देण्यासाठी विभागीय मंडळांच्या मुख्य अधिकाऱ्यांना प्राधिकरणाच्या दिनांक १०.४.१९८४ क्रमांक-एमएच/एलडीआर-१०८३/९१३३ च्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या शक्तींचा पुनर्विचार करून असा निर्णय घेण्यात येत आहे की, वसाहतीतील मोकळे भूखंड उपरोक्त तात्पुरत्या कारणासाठी ६० दिवसांपर्यंत भुईभाड्याने देण्याच्या शक्ती विभागीय मंडळाचे मुख्य अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 10-Oct-19

**Item No.** 4 **Resolution No.** 1577

विषय : जागतिक बँक प्रकल्प अंतर्गत चारकोप येथील संकुलित सहकारी गृहनिर्माण संस्थांना हुडकोकडून कर्ज मिळविण्याकरिता प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : विषय टिप्पणीत जोडलेल्या तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या निविदा गृहनिर्माण संस्थांच्यासाठी हुडकोकडून २२.२२ लक्ष रु. कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 17-Oct-19

**Item No.** 5 **Resolution No.** 1578

विषय : पंतनगर, घाटकोपर येथील उच्च उत्पन्न गट योजनेखाली बांधावयाच्या ५६ गाळ्यांच्या निविदा मंजूर करण्याविषयी.

ठराव : बाब टिप्पणीत नमूद केलेले स्पष्टीकरण व सद्यस्थिती लक्षात घेऊन प्रशासक/प्राधिकरण यांनी निर्णय घेतला की, पंतनगर, घाटकोपर येथील उच्च उत्पन्न गट योजनेखाली बांधावयाच्या ५६ गाळ्यांच्या कामासाठी वाटाघाटीने कमी झालेली रक्कम रु. ६०,०३,८६७.८२ ची (कामाच्या अंदाजित रक्कम रु. ५५,२०,७९८/- च्या ८.७५ टक्के जास्त) मे. विरल बिल्डर्स यांची न्यूनतम निविदा स्वीकारावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 19-Oct-19

**Item No.** 6 **Resolution No.** 1579

विषय : पवई येथील वसाहतीत बस टर्मिनलसाठी राखून ठेवण्यात आलेला भूखंड बृहन्मुंबई इलेक्ट्रीक सप्लाय ॲन्ड ट्रान्सपोर्ट अंडरटेकींगला देण्याबाबत.

ठराव : पवई येथील आराखड्यात बस टर्मिनलसाठी आरक्षित केलेल्या सुमारे ३९९० चौ. मी. आकाराच्या भूखंडाचा ताबा बृहन्मुंबई इलेक्ट्रीक सप्लाय ॲन्ड ट्रान्सपोर्ट अंडरटेकींग यांचेकडे भूखंडाचा विकास करण्यासाठी खालील अटींवर देण्यात यावा.

१) भूखंडाचे अधिमूल्य प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतीविषयक धोरणानुसार आकारण्यात यावे.
२) भूखंड ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने अधिमूल्याच्या रकमेच्या १ टक्के वार्षिक भाड्याने देण्यात यावा.
३) भूखंडाचा विकास भूखंड ज्या प्रयोजनासाठी आरक्षित करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी करण्यात यावा.
४) भूखंड वितरणाच्या प्राधिकरणाच्या इतर शर्ती व अटींचे पालन करण्यात यावे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **26-Oct-19**

**Item No.** 7 **Resolution No.** 1580

विषय : सिद्धार्थनगर, गोरेगाव, विभाग - १, येथील "सिद्धार्थनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेला" जमीन देण्याबाबत.

ठराव : सिद्धार्थनगर, गोरेगाव येथील अल्प उत्पन्न गटातील पत्र्याच्या बैठ्या चाळीतील ६७२ गाळेधारकांच्या गृहनिर्माण संस्थेस सदरहू पत्र्यांच्या गाळ्यांसाठी असलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या मालकीच्या ४० एकर जमिनीपैकी निव्वळ १० एकर म्हणजेच ढोबळ १३.१८ एकर एवढी जमीन खालील अटींवर देण्यात यावी. (शासनाच्या निर्णय तसेच शासनाने केलेल्या स्पष्टीकरणानुसार ६७२ गाळेधारकांच्या सहकारी संस्थेला १० एकर निव्वळ जमीन द्यावयाची आहे. सर्वसाधारण बांधकामाच्या आराखड्यात अंदाजे १५ टक्के जागा करमणुकीची मोकळी जागा व १० टक्के जागा रस्त्यासाठी लागते. आराखड्याची क्षमता ७५ टक्के गृहित धरल्यास १० एकर निव्वळ जमिनीसाठी अंदाजे १३.३३ एकर ढोबळ (ग्रॉस) जमिनीची आवश्यकता आहे. मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी सदर केलेल्या प्रत्यक्ष आराखड्यानुसार (सोबत नकाशा जोडला आहे) १० एकर निव्वळ जमिनीचा अंदाजे १३.१८ (समोवतालचे रस्ते वगळून) एवढ्या जमिनीचा उपयोग ६७२ गाळेधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी होईल.)

१) रहिवाशांच्या गृहनिर्माण संस्थेस द्यावयाच्या एकूण १० एकर जमिनीपैकी निव्वळ ८ एकर (ढोबळ १०.५५ एकर) एवढी जमीन विनामूल्य देण्यात यावी.

२) उर्वरित दोन एकर (ढोबळ २.६३ एकर) जमीन सध्याच्या बाजारभावाने देण्यात यावी. ही किंमत नगररचना खात्यामार्फत निश्चित करण्यात यावी.

३) वर नमूद करण्यात आलेल्या दोन एकर जादा जमिनीवर विकास नियम आराखड्यानुसार जेवढे चटईक्षेत्र विकास नियंत्रण व बांधकाम नियमानुसार कार्यालये (ऑफिसेस) प्रस्थापित करण्यास उपलब्ध आहे तेवढे याच वापरासाठी बांधण्यात यावे. कार्यालयीन वापरासाठी बांधण्यात आलेल्या क्षेत्रफळाची जागा शासनास हवी असल्यास, ती शासनास वाजवी भाड्याने प्राधान्योने देण्याचे बंधन संस्थेवर राहील. विकास नियंत्रण नियमानुसार कार्यालयीन इमारतीसाठी कमाल चटईक्षेत्राचा वापर केल्यानंतरही जे चटईक्षेत्र शिल्लक राहील त्या चटईक्षेत्राचा वापर सहकारी संस्था निवासी गाळ्यांच्या बांधकामासाठी करू शकेल.

४) सहकारी गृहनिर्माण संस्थेला ज्या अर्थी ढोबळ मानाने १३.१८ एकर जमीन देण्यात येणार आहे. आणि त्यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्थेला निव्वळ १० एकर जमीन मिळेल, त्यापूर्वी संस्थेने मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमानुसार १५ टक्के मोकळी जागा, दळणवळणासाठी आवश्यक रस्ते किंवा अंतर्गत रस्त्यांकडे जाण्यायेण्याचे मार्ग इत्यादी आवश्यक त्या बाबींची पूर्तता सहकारी गृहनिर्माण संस्थेने करावयाची आहे.

५) ६७२ रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी किती चटईक्षेत्राचा वापर करावा हे सहकारी संस्था आपल्या मर्जीनुसार ठरवू शकेल. प्राधिकरणाच्या सर्व ६७२ गाळेधारकांना सहकारी संस्थेच्या कार्यपद्धतीनुसार योजनेस सामावून घेतल्यानंतर आणि वरील अट (३) प्रमाणे कार्यालयीन इमारती

उपलब्ध केल्यानंतर निव्वळ १० एकर जमिनीपैकी शिल्लक जमिनीचा/चटईक्षेत्राचा विनियोग इतर व्यक्तींना तसेच बांधकाम ठेकेदारास योग्य त्या अटी व शर्तीवर पोट भाडेपट्ट्याने सहकारी संस्था आपल्या पातळीवर करू शकेल. सदर सहकारी गृहनिर्माण संस्थेला १० एकर निव्वळ जमिनीचाच चटईक्षेत्र वापरण्याचा अधिकार असेल. जमीन वितरणानंतर निव्वळ जमिनीव्यतिरिक्त जर इतर जमिनीचा जसे की रस्ते अथवा बगीचे या जागेसाठी चटईक्षेत्र विकास नियंत्रण नियमानुसार उपलब्ध झाल्यास अशा चटईक्षेत्राचा वापर सहकारी संस्था प्राधिकरणाच्या पूर्वसंमतीशिवाय करू शकणार नाही. प्राधिकरण अशी संमती देताना ज्या अटी व शर्ती घालून देईल त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेवर बंधनकारक असतील.

६) बांधकामाच्या काळात सध्याचे गाळेधारकांच्या पर्यायी जागेची व्यवस्था संस्थेलाच करावी लागेल.

७) ६७२ गाळे तोडण्याचा खर्च सर्वस्वी संस्थेलाच करावा लागेल व मंडळाला जी जागा उपलब्ध होईल त्या जागेवरील गाळे तोडण्यासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मंडळाकडून होणार नाही.

८) संस्थेला टप्प्याटप्प्याने निव्वळ १० एकर भूखंड म्हाडाच्या सोयीनुसार दिला जाईल. ज्या प्रमाणात जमीन रिकामी करून देण्यात येईल त्या प्रमाणात १० एकर जमिनीपैकी जमीन देण्यात येईल. मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांना या संपूर्ण ४२ एकर जमिनीचा आराखडा तयार केला आहे. त्यामध्ये असे दिसून येते की, हा संपूर्ण आराखडा (सहकारी संस्थेला द्यावयाच्या जमिनीसह) हा संयुक्त आराखडा आहे. परंतु शासनाच्या आदेशाप्रमाणे सहकारी संस्थेला जमीनही टप्प्याटप्प्याने द्यावयाची आहे. तसेच शासनाने असेही आदेश दिले आहेत की, सहकारी संस्थेला त्यांचे सर्व नकाशे प्राधिकरणामार्फतच मुंबई महानगरपालिकेला मंजूरीसाठी सादर करावयाचे आहेत. या संपूर्ण ४२ एकर जमिनीचा एक संयुक्त आराखडा असणे आवश्यक आहे. सहकारी संस्थेला टप्प्याटप्प्याने जमीन दिल्यास सहकारी संस्थेचे आराखडेदेखील त्याच टप्प्याटप्प्याने तयार करावे लागतील. परंतु तसे करणे या योजनेचे गुंतागुंतीचे स्वरूप तसेच वस्तुस्थिती लक्षात घेता शक्य होणार नाही. म्हणून मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांनी काही टप्प्यांसाठी प्रत्यक्ष जमिनीचा ताबा न देता टप्प्याटप्प्यांच्या बांधकामासाठी मुंबई मंडळाकडून "ना हरकत प्रमाणपत्रे" देण्याची शिफारस केलेली आहे व ही शिफारस व्यावहारिकदृष्ट्या मान्य करता येण्यासारखी आहे. म्हणजेच सहकारी संस्थेला टप्प्याटप्प्याने जमिनीचा ताबा देणे आणि/किंवा काही विशिष्ट इमारतींसाठी मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांचेकडून "ना हरकत प्रमाणपत्र" देणे ही बाब या संपूर्ण योजनेचे आराखडे नक्की करून मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांनी त्यावर गरजेप्रमाणे कार्यवाही करावी व ही संपूर्ण योजना कार्यान्वित करावी असे सुचविण्यात येत [illegible] १३.१८ एकर ढोबळ (ग्रॉस) जमिनीचा ताबा योजनेच्या सुरुवातीस नेहमीच्या पद्धतीप्रमाणे सहकारी संस्थेला देण्यात येऊ नये व ही योजना शासनाचे आदेश लक्षात ठेवून टप्प्याटप्प्याने वरीलप्रमाणे कार्यान्वित

करावी. याप्रमाणे योजनेचे आराखडे नक्की करून याबाबतची संपूर्ण कार्यवाही मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांचेवर सोपविण्यात येत आहे.

९) टप्प्याटप्प्याने गाळे तोडल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या जागेचा ताबा संस्थेला दिल्यानंतर संस्थेच्या सर्व ६७२ सभासदांना (मंडळाच्या भाडेकरूंना) नवीन इमारतीमध्ये सामावून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

१०) संस्थेला जी १० एकर निव्वळ जागा टप्प्याटप्प्याने मंडळाकडून घेण्यात येईल त्या जागेवर संस्थेतर्फे होणाऱ्या इमारतींच्या बांधकामाचे नकाशे मुंबई महानगरपालिकेकडून मान्य करून घेण्यासाठी मुंबई मंडळामार्फतच सादर करावे लागतील.

११) जमिनीचा ताबा देण्याअगोदर ६७२ गाळेधारकांकडून मंडळाला देय असलेली भाड्याची संपूर्ण थकबाकी संस्थेला मंडळाकडे क्रमशः एकरकमी अदा करावी लागेल.

१२) अशा रीतीने संस्थेस जमीन दिल्यानंतर सध्याच्या भाडेकरूंना उपलब्ध होणाऱ्या सदनिका विक्री/हस्तांतरित करण्यास परवानगी असणार नाही.

१३) संस्थेकडून प्राधिकरणाच्या वरील कोणत्याही अटींचा भंग केल्यास संस्थेने प्राधिकरणाने दिलेल्या जमिनीवरील केलेले बांधकाम अथवा संस्थेला देण्यात आलेली जमीन परत घेण्याचा अधिकार प्राधिकरणाकडे असेल. त्याचप्रमाणे अशा प्रकारे करण्यात येणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीमुळे संस्थेला जमिनीसाठी अथवा जमिनीवरील केलेल्या बांधकामासाठी कोणत्याही प्रकारचा मोबदला/नुकसान भरपाई मागण्याचा अधिकार असणार नाही. तशा प्रकारचे कायद्यानुसार हमीपत्र संस्थेकडून प्रथम घेण्यात यावे.

१४) उपरोक्त अटींशिवाय प्राधिकरणाच्या जमीन देण्याच्या नेहमीच्या इतर सर्वसाधारण अटी बंधनकारक संस्थेवर राहतील.

सिद्धार्थनगर, गोरेगाव वसाहतीतील रहिवाशांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस वरीलप्रमाणे जागा दिल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या शिल्लक जमिनीवर मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने आपल्या मंडळाच्या गृहनिर्माण योजना राबविण्याची कार्यवाही सुरू करावी. योजनेच्या कार्यवाहीची अंमलबजावणी त्वरेने करण्यात यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 29-Oct-19

**Item No.** 8 **Resolution No.** 1581

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळण्याबाबत.

ठराव : विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण रुपये ३३४.९९ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 9 **Resolution No.** 1582

विषय : हुडको अर्थसहाय्याने ग्रामीण भागात भूमिहीन व बेघर कामगारांसाठी घरकुले बांधण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या १९८८-८९ मधील योजनेस शासनाचे वतीने प्राधिकरणाने हुडकोकडून अर्थसहाय्य मिळवून देण्यास मान्यता देणेबाबत.

ठराव : ग्रामीण भागातील बेघर भूमिहीनांसाठी घरकुले बांधण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या १९८८-८९ मधील योजनांस प्राधिकरणाकडून महाराष्ट्र शासनास हुडकोकडून अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीस अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 10 **Resolution No.** 1583

विषय : इमारत दुरुस्ती व पुनर्रचना कार्यक्रमासाठी "ब्रीज फायनान्स" म्हणून उपलब्ध करण्यात येणारा निधी व त्यासाठी व्याज आकारणी.

ठराव : सोबतच्या बाब टिप्पणीमध्ये नमूद केलेली परिस्थिती विचारात घेता आणि कार्यक्रमांची निकड लक्षात घेता, आवश्यकतेनुसार इमारत दुरुस्ती व पुनर्रचना कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार "ब्रीज फायनान्स" म्हणून रक्कम उपलब्ध करून देण्यात यावी. मात्र, चालू वर्षात अशा प्रकारे देण्यात आलेल्या "ब्रीज फायनान्स" रकमेवर दरसाल दरशेकडा रु. १० प्रमाणे व्याज आकारणी करून ती सदर निधीमधून वसूल करण्यास या निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 12 **Resolution No.** 1585

विषय : अमृतधाम, नाशिक येथे सर्व्हे नं. २६७ वर बिडी कामगार, अपंग व घर कामगारांसाठी अल्प उत्पन्न गट - १ चे ५४७ गाळे बांधणे.

ठराव : अमृतधाम, नाशिक येथे सर्व्हे क्रमांक : २६७ या जमिनीवर अल्प उत्पन्न गट क्र. १ अंतर्गत बांधण्यात यावयाच्या ५४७ गाळ्यांच्या बांधकामासाठी झालेल्या निविदांमधून मे. विद्युत कन्स्ट्रक्शन कंपनी, नाशिक यांची रु. ६०,४३,५१७ या निविदेच्या अंदाजित किंमतीच्या १.७४ टक्के कमी दराची व त्यात पुढे रु. ६४,०००/- इतक्या रकमेची सूट दिल्याची रु. ६६,६०,४४०/- इतक्या रकमेची निम्नतम निविदा स्वीकारण्यात यावी.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **31-Oct-19** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **11** | **Resolution No.** | **1584** |

विषय : प्राधिकरणाच्या व विभागीय मंडळाच्या गाड्यांचा वापर.

ठराव : विभागीय मंडळांच्या मुख्य अधिकाऱ्यांना तसेच संचालक, जागतिक बँक प्रकल्प/प्राधिकरण व संचालक, पंतप्रधान अनुदान प्रकल्प प्राधिकरण यांना कार्यालयीन टपाल घेऊन जाण्यासाठी व परत आणण्यासाठी कार्यालयापासून निवासस्थानापर्यंत कार्यालयाची गाडी घेऊन जाण्यास व परत येण्यास परवानगी देण्यात यावी. तसेच कामाचे/वेळेचे महत्त्व लक्षात घेऊन संचालकांना/मुख्य अधिकाऱ्यांना निवासाच्या ठिकाणी प्राधिकरणाची गाडी ठेवण्यास परवानगी देण्यात यावी.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **01-Nov-1** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **1** | **Resolution No.** | **1586** |

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पातील अधिकाऱ्यांना प्राधिकरण कायद्याच्या आठव्या प्रकरणातील तरतुदींप्रमाणे अधिकारप्रदान करणे.

ठराव : निर्णय घेतला की, मुंबई बेटातील उपकरपात्र इमारतींच्या पुनर्बांधणी कार्यक्रमाच्या अंतर्गत पंतप्रधान अनुदान प्रकल्पाची कामे करण्याच्या संबंधात, प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक - १४९५ (अ) अनुसार पंतप्रधान अनुदान प्रकल्पावरील अधिकाऱ्यांना केलेल्या अधिकारप्रदानाचा कालावधी हा प्रकल्प पूर्ण होईपर्यंत वाढविण्यास मान्यता देण्यात येते.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 02-Nov-1

**Item No.** 2 **Resolution No.** 1587

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सन १९८७-८८ वित्तीय वर्षासाठी तदर्थ बोनस देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, सन १९८७-८८ या वित्तीय वर्षासाठी राज्य शासकीय कर्मचारी आणि इतर यांना सतरा दिवसांच्या वित्तलब्धी एवढा शासनाने मंजूर केलेला तदर्थ बोनस प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या आदेशातील अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यास मान्यता देण्यात येत आहे. या कार्यवाहीस शासनाची कार्योत्तर मंजूरी घेण्यात यावी.

**Item No.** 3 **Resolution No.** 1588

विषय : संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे या वसाहतीत बांधण्यात यावयाच्या उच्च उत्पन्न गटातील १२० गाळ्यांसाठी निविदा स्वीकारणे.

ठराव : बाब टिप्पणी क्र. ३ मधील बाबींचा विचार करून संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे येथे बांधण्यात यावयाच्या उच्च उत्पन्न गटातील दोन ग्रुप मधील एकूण १२० गाळ्यांसाठी मे. बी. डी. देखणे यांच्या निम्नतम दराच्या निविदा खालील तपशीलानुसार स्वीकारण्याचा निर्णय प्रशासक/प्राधिकरण यांनी घेतला.

| ग्रुप क्र. | निविदेतील कामाची अंदाजित किंमत रु. | मे. बी. डी. देखणे यांची वाटाघाटीनंतर ठरलेली अंतिम टक्केवारी | यावयाच्या कामाची टक्केवारी धरून एकूण किंमत रु. |
|---|---|---|---|
| २. | ३४,६७,२३५ | ११.८ टक्के अधिक | ३८,७६,३६८ |
| ३. | ३४,६७,२३५ | ११.८ टक्के अधिक | ३८,७६,३६८ |

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 05-Nov-1

**Item No.** 4 **Resolution No.** 1589

विषय : श्री. के. स्वामीनाथन्, उपसंचालक जागतिक बँक प्रकल्प यांना मुदतवाढ देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, श्री. के. स्वामीनाथन्, उपसंचालक, जागतिक बँक प्रकल्प यांच्या नेमणूकीस दि. १.१२.८८ (म.पू.) पासून एक वर्षाची मुदतवाढ पूर्वीच्याच अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

**Item No.** 5 **Resolution No.** 1590

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या कार्यासाठी गृहनिर्माण भवनाच्या अथवा पाचव्या मजल्यावरील रिकामी होणारी जागा देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या कार्यालयीन उपयोगासाठी गृहनिर्माण भवनाच्या पाचव्या मजल्यावर जागा रिकामी झाल्यानंतर १३२७४ चौ. फू. क्षेत्रफळाची जागा संचालक, पंतप्रधान अनुदान प्रकल्प यांना भाडेतत्त्वावर वाटप करण्यास मान्यता देण्यात येते.

**Meeting No.** 63 **Meeting Date** 07-Nov-1

**Item No.** 1 **Resolution No.** 1591

विषय : गोरेगाव नवज्योती सहकारी गृहनिर्माण संस्था, उन्नतनगर, गोरेगाव (इ. क्र. १ ते १५) यांची १५ टक्के आरक्षित असलेल्या मोकळ्या जागेची मागणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गोरेगाव नवज्योती सहकारी गृहनिर्माण संस्थेत गोरेगाव येथील उन्नतनगर वसाहतीतील (इमारत क्र. १ ते १५) १५ टक्के आरक्षित असलेली सुमारे ९०० चौ. वार. (८३.६१ चौ. मी.) जमीन वसाहतीतील संस्थांचा महासंघ स्थापन होईपर्यंत प्रतिवर्षी रुपये १००/- भाडेपट्टा आकारून नेहमीच्या अटी व शर्तीवर देण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 2 **Resolution No.** 1592

विषय : एस. जी. बर्वे मार्ग, कुर्ला, दुकान नं. १/१३ ला लागून असलेल्या अतिरिक्त भूखंडाची श्री. सिखदर यांची मागणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, कुर्ला येथील एस. जी. बर्वे मार्गावरील दुकान क्र. १/१३ ला लागून असलेल्या सुमारे ८ बाय ५ फूट आकाराचा अतिरिक्त भूखंड श्री. सिखदर यांना केवळ व्यापारी उपयोगासाठी नेहमीच्या अटी व शर्तीवर भाडेपट्ट्याने देण्यास मंजूरी देण्यात येते. मात्र अतिरिक्त भूखंडाचा भाडेपट्टा कालावधी आधी दिलेल्या भूखंडाच्या कालावधीबरोबर संपुष्टात यावा. या अतिरिक्त भूखंडासाठी व्यापारी उपयोगाकरिता आकारण्यात येणारे अधिमूल्य वापरावे.
या दुकानास लागून असलेल्या दुकान क्र. १/१४ व १/१५ च्या दुकानदारांनी त्यांनी पूर्वी देण्यात आलेल्या दुकानास लागून असलेल्या भूखंडाची मागणी केल्यास तिचा विचार करून मुंबई मंडळाने निर्णय घ्यावा.

**Item No.** 2 **Resolution No.** 1592

विषय : एस. जी. बर्वे मार्ग, कुर्ला, दुकान नं. १/१३ ला लागून असलेल्या अतिरिक्त भूखंडाची श्री. सिखदर यांची मागणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, कुर्ला येथील एस. जी. बर्वे मार्गावरील दुकान क्र. १/१३ ला लागून असलेल्या सुमारे ८ बाय ५ फूट आकाराचा अतिरिक्त भूखंड श्री. सिखदर यांना केवळ व्यापारी उपयोगासाठी नेहमीच्या अटी व शर्तीवर भाडेपट्ट्याने देण्यास मंजूरी देण्यात येते. मात्र अतिरिक्त भूखंडाचा भाडेपट्टा कालावधी आधी दिलेल्या भूखंडाच्या कालावधीबरोबर संपुष्टात यावा. या अतिरिक्त भूखंडासाठी व्यापारी उपयोगाकरिता आकारण्यात येणारे अधिमूल्य वापरावे.
या दुकानास लागून असलेल्या दुकान क्र. १/१४ व १/१५ च्या दुकानदारांनी त्यांनी पूर्वी देण्यात आलेल्या दुकानास लागून असलेल्या भूखंडाची मागणी केल्यास तिचा विचार करून मुंबई मंडळाने निर्णय घ्यावा.

**Item No.** 3 **Resolution No.** 1593

विषय : पवई येथील भूखंड "नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर ट्रेनिंग इन इंडस्ट्रियल इंजिनियरींग" (निटी) मधील कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, "नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर ट्रेनिंग इन इंडस्ट्रियल इंजिनियरींग" (निटी) या संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस पवई येथील एकूण २९५४ चौ. मी. क्षेत्रफळाचे एच-११ व एच-१२ क्रमांकाचे दोन भूखंड ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने नेहमीच्या अटी व शर्तीवर घरबांधणीसाठी देण्यात यावेत. त्यासाठी संस्थेस जमिनीच्या प्रत्यक्ष किंमतीएवढे अधिमूल्य आकारण्यात यावे. मात्र भूखंडाच्या वाटपाच्या अटींनुसार संस्थेचे सभासद निवासी जागा मिळण्यास पात्र असले पाहिजेत.

**Item No.** 3 **Resolution No.** 1593

विषय : पवई येथील भूखंड "नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर ट्रेनिंग इन इंडस्ट्रियल इंजिनियरींग" (निटी) मधील कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, "नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर ट्रेनिंग इन इंडस्ट्रियल इंजिनियरींग" (निटी) या संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस पवई येथील एकूण २९५४ चौ. मी. क्षेत्रफळाचे एच-११ व एच-१२ क्रमांकाचे दोन भूखंड ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने नेहमीच्या अटी व शर्तीवर घरबांधणीसाठी देण्यात यावेत. त्यासाठी संस्थेस जमिनीच्या प्रत्यक्ष किंमतीएवढे अधिमूल्य आकारण्यात यावे. मात्र भूखंडाच्या वाटपाच्या अटींनुसार संस्थेचे सभासद निवासी जागा मिळण्यास पात्र असले पाहिजेत.

**Item No.** 4 **Resolution No.**

विषय : कुर्ला येथील नेहरूनगर वसाहतीतील इ. क्र. ४१ व ४३ मधील हिंदुस्थान ॲरोनेटिक्स लिमिटेड यांना दिलेल्या गाळ्यांपैकी १० गाळ्यांचे भाडेपट्टे नियमित करणे.

ठराव :

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणातर्फे मुंबई महानगर प्रदेशात हाती घ्यावयाच्या मोठ्या प्रमाणातील घरबांधणी (मास हाऊसिंग) योजनेबाबत.

ठराव :

**Item No.** 6 **Resolution No.** 1594

विषय : भारतनगर, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स (पूर्व) येथे संक्रमण शिबिराचे काम.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, भारतनगर येथे पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या अंतर्गत संक्रमण शिबिराचे काम करण्यासाठी मेसर्स अजंटा बिल्डर्स यांची रुपये ७२,९५,६००/- रकमेची निविदा स्वीकारण्यास मंजूरी देण्यात यावी.

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी जागतिक बँक प्रकल्पासाठी देऊ केलेली डोंबिवली येथील जमीन.

ठराव :

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी जागतिक बँक प्रकल्पासाठी देऊ केलेली डोंबिवली येथील जमीन.

ठराव :

**Meeting No.** 64 **Meeting Date** 16-Nov-1

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ७/११/१९८८ रोजी झालेल्या ६३ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 1595

विषय : कुर्ला येथील नेहरूनगर वसाहतीतील ३ व ४१ आणि ४३ मधील हिंदुस्थान ॲरोनेटिक्स लिमिटेड यांना दिलेल्या गाळ्यांपैकी १० गाळ्यांचे भाडेपट्टे नियमित करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, कुर्ला येथील नेहरूनगर वसाहतीतील इ. क्र. ४१ व ४३ मधील हिंदुस्थान ॲरोनेटिक्स लिमिटेड यांना दिलेल्या गाळ्यांपैकी उरलेल्या १० गाळ्यांचे भाडेपट्टे त्यात रहाणाऱ्या संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या नावे खालील अटींवर नियमित करण्यात यावेत.

१) गाळे एकरकमी किंमत भरून विकत घेतले पाहिजेत. त्यासाठी आवश्यक झाल्यास त्यांना त्याच वसाहतीतील विक्री तत्त्वावरील त्याच प्रकारच्या इमारतीत हलवावे लागेल. त्याप्रमाणे त्यांना देऊ करण्यात येणारे गाळे त्यांनी स्वीकारले पाहिजेत.

२) गाळ्यांच्या किंमतीव्यतिरिक्त प्रत्येकी रुपये १०,०००/- याप्रमाणे अधिमूल्य भरले पाहिजे.

३) गाळ्यांच्या बाबतीत अन्य काही थकबाकी असल्यास तीही एकरकमी भरली पाहिजे.

हा निर्णय अपवाद म्हणून समजण्यात यावा व तो गाळ्यांचे भाडेपट्टे नियमित करण्यासाठी उदाहरण म्हणून उद्धृत करू नये.

**Item No.** 3 **Resolution No.** 1596

विषय : प्राधिकरणातर्फे मुंबई महानगर प्रदेशात हाती घ्यावयाच्या मोठ्या प्रमाणातील घरबांधणी (मास हौसिंग प्रोग्राम) योजनेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत स्पष्ट केल्याप्रमाणे मुंबई महानगरपालिका हद्दीत ८,६०० गाळे बांधण्याच्या कार्यक्रमास व तत्संबंधी समितीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. या कामाच्या हाताळणीसाठी नेमण्यात येणाऱ्या समितीवर मुंबई मंडळाचे एक सदस्य, श्री. व्ही. डी. देसाई यांचा अंतर्भाव करण्यात यावा. तसेच या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी, शून्याधारित अर्थसंकल्पामुळे रोखून ठेवलेल्या पदांपैकी उपमुख्य अभियंता हे पद मुंबई मंडळाच्या आस्थापनेवर ताबडतोब निर्माण करून ते भरण्यासाठी कार्यवाही करावी की, जेणेकरून हा कार्यक्रम विनाविलंब व ठराविक वेळेमध्ये पुरा करता येईल. या कार्यवाहीस नंतर शासनाची कार्योत्तर मंजूरी घेण्यात यावी.

**Item No.** **4** **Resolution No.** **1597**

विषय : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी त्यांची डोंबिवली येथील महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाला जागतिक बँक प्रकल्पासाठी देऊ केलेली जमीन.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने प्राधिकरणात देऊ केलेल्या डोंबिवली येथील जमिनीवरील जी अतिक्रमणे झालेली आहेत ती काढून टाकून मोकळी जमीन उपलब्ध करून दिल्यास अशी मोकळी जमीन औद्योगिक महामंडळाकडून विकत घेण्याचा विचार करता येईल असे शासनास कळवावे.
विषयसूचीवरील बाबी संपल्यानंतर माननीय अध्यक्षांनी सांगितले की, भारताबाहेरील भारतीयांकडून (एन. आर. आय.) गृहनिर्माणासाठी विचारणा झाली आहे. यादृष्टीने काही कार्यवाही केल्यास बऱ्याच मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होऊ शकेल. अध्यक्ष पुढे म्हणाले की, कोकण भवनाच्या मागे, उलवा पुलाच्या आजूबाजूस अंदाजे ५,००० एकर जमीन उपलब्ध होऊ शकेल. ठाणे जवळही अशीच काही जमीन उपलब्ध आहे. यावर उपाध्यक्षांनी आश्वासन दिले की, या प्रकरणी जरूर तो अभ्यास करून नंतर ही बाब प्राधिकरणापुढे मांडली जाईल.
यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठकीचे कामकाज संपले.

**Meeting No.** 65 **Meeting Date** 22-Dec-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १६-११-१९८८ रोजी झालेल्या ६४ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : व्यापारी उपयोगासाठी दिलेल्या गाळ्यांच्या हस्तांतरणास परवानगी देण्यासाठी आकारावयाच्या फीचा दर ठरविणे.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : इस्लामपूर जिल्हा सांगली येथील पुणे मंडळाच्या जमिनीबाबत.

ठराव :

**Item No.** 4 **Resolution No.** 1598

विषय : नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अधिकारक्षेत्रातील अचलपूर, अमरावती व यवतमाळ येथील गाळ्यांचे वाटप.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, अचलपूर, अमरावती येथी चिलमशहावली आणि यवतमाळ येथील बजोरियानगर येथे बांधलेले अनुक्रमे ५२, ६९ आणि ८३ अल्प उत्पन्न गटाच्या गाळ्यांपैकी उरलेल्या गाळ्यांचे वाटप करण्यासाठी अर्जदारांच्या पात्रतेच्या अटी खालीलप्रमाणे शिथिल करण्यास मान्यता देण्यात येते.

अचलपूर आणि अमरावती :

१) अर्जदारांच्या पात्रतेसाठी ठरविलेली उत्पन्न मर्यादा पुढील उत्पन्न गटाच्या म्हणजे मासिक उत्पन्न रुपये २,५००/- मर्यादेपर्यंत वाढवावी.
२) एका व्यक्तीस दोन गाळे देऊ शकेल.
३) प्रारंभी भरावयाच्या किंमतीचा हप्ता सुरुवातीस ५० टक्के घेऊन बाकी रक्कम दोन वर्षात व्याजासह घ्यावी.

यवतमाळ :

१) अर्जदारांच्या कौटुंबिक उत्पन्नाची मर्यादा दरमहा रुपये २,५००/- एवढी ठरवावी.
२) गाळ्यांच्या किंमतीचा प्रारंभी भरावयाचा हप्ता सुरुवातीस ५० टक्के घेऊन बाकी ५० टक्के दोन वर्षांच्या कालावधीत व्याजासह घ्यावा.

हा निर्णय प्राप्त परिस्थितीत अपवाद म्हणून घेण्यात येत आहे.
या गाळ्यांचे वाटप शासकीय नोकरांना करण्याच्या दृष्टीने संबंधित जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. बजोरियानगर येथील बांधकामाच्या संदर्भात श्री. सोनी यांनी पाहणी करून आपला अहवाल प्राधिकरणास सादर करावा.

**Item No.** 5 **Resolution No.** 1599

विषय : गोरेगाव, तीन डोंगरी (पश्चिम) विभागातील प्रेमनगर वसाहत व भगतसिंग नगर १, २, ३ विभागातील रहिवाशांना विद्युत पुरवठा करण्यासाठी विद्युत सब स्टेशनकरिता दोन भूखंड देण्यासंबंधी.

ठराव : एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतला की,

१) मुंबई मंडळाच्या व क्षेत्रविकास मंडळाच्या प्रेमनगर, गोरेगाव (पूर्व) व भगतसिंग नगर, गोरेगाव (पूर्व) येथील परिसरातील रहिवाशांना विद्युत पुरवठा उपलब्ध करण्यासाठी २० फूट बाय २० फूट आकाराचे २ भूखंड बॉम्बे सबर्बन इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीला प्रथम ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने खालील अटींवर देण्यात यावेत.

२) भूखंडाचे अधिमूल्य प्राधिकरणाच्या प्रचलित जमिनीच्या किंमतीच्या धोरणानुसार आकारण्यात यावे.

३) जमिनीच्या अधिमूल्याच्या रकमेच्या १ टक्के वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा. भाडेपट्ट्याच्या ३० वर्षांच्या कालावधीनंतर भाडेपट्ट्याचे नूतनीकरण भाडेपट्ट्याच्या दराचा फेरविचार प्राधिकरणाने आपल्या अधिकारात करावा.

४) भूखंडाच्या भाडेपट्टा करारनामाच्या इतर नेहमीच्या अटी व शर्तीचे अवलंबन करण्यात यावे.

---

**Item No.** 6 **Resolution No.** 1600

विषय : १) मेघावाडी (जोगेश्वरी) व २) गोळीबार (सांताक्रूझ) येथी सबस्टेशनसाठी भूखंड उपलब्ध करण्याबाबत.

ठराव : एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतला,

१) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातील मेघावाडी, जोगेश्वरी (पश्चिम) व गोळीबार, सांताक्रूझ (पूर्व) येथील परिसरातील झोपडपट्टीतील रहिवाशांना विद्युत पुरवठा करण्यासाठी २० फूट बाय २० फूट आकाराचे दोन भूखंड ''बॉम्बे सबर्बन इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी''ला प्रथम ३० वर्षांच्या भाडेपट्टयाने खालील अटींवर देण्यात यावेत.

२) भूखंडाचे अधिमूल्य प्राधिकरणाच्या प्रचलित जमिनीच्या किंमतीच्या धोरणानुसार आकारण्यात यावे.

३) जमिनीच्या अधिमूल्याच्या रकमेच्या १ टक्का वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा. भाडेपट्ट्याच्या ३० वर्षांच्या कालावधीनंतर भाडेपट्ट्याचे नूतनीकरण/भाडेपट्ट्याच्या दराचा फेरविचार प्राधिकरणाने आपल्या अधिकारात करावा.

४) भूखंडाच्या भाडेपट्टा करारनामाच्या इतर नेहमींच्या अटी व शर्तीचे अवलंबन करण्यात यावे.

---

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै, १९८८ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देणे.

ठराव :

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : श्री. बी. के. शिरगावकर, सेवानिवृत्त उपमुख्य अधिकारी यांची जागतिक बँक प्रकल्पात कंत्राटी पद्धतीवर नेमणूक करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.** 1601

विषय : गृहनिर्माण भवनातील उपहारगृहाच्या भाडेपट्टे, पाणी व विद्युत देयके यांच्या थकबाकीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, या विषयावर निर्णय घेण्याचे अधिकार प्राधिकरणाचे माननीय अध्यक्ष यांना देण्यात यावेत.

**Item No.** 10 **Resolution No.** 1602

विषय : ॲप्रेन्टिसशीप ॲक्ट १९६१ खाली प्रशिक्षण घेतलेल्या शिकाऊ उमेदवारांना लिपिक म्हणून सेवेत सामावून घेणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, ज्या १०० शिकाऊ उमेदवारांना प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केल्यानंतर प्राधिकरणाच्या सेवेत सामावून घेण्यात आले नाही त्यांना त्याबाबतची आवश्यक ती परीक्षा घेतल्यानंतर त्यात उत्तीर्ण झाल्यास सेवेत सामावून घेण्यात यावे. या कारवाईबाबत शासनास मा. अध्यक्ष यांचे सहीने पत्र पाठवावे.

**Item No.** 11 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या १० कर्मचाऱ्यांना दिलेल्या सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या नोटीसा.

ठराव :

**Item No.** 12 **Resolution No.** 1603

विषय : नागपूर येथे प्राधिकरणातर्फे गृहनिर्माण मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणापुढे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाचा विचार करून नागपूर येथे प्राधिकरणातर्फे गृहनिर्माण मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. मात्र सदर गृहनिर्माण केंद्रासाठी बांधण्यात येणारी इमारत सदर केंद्रास "नाममात्र भाडे" तत्वावर देण्यात यावी. त्यासाठी होणारा रुपये ५ लाख हा खर्च सुरुवातीस प्राधिकरण निधीतून करण्यात यावा. परंतु त्याची वसूली राज्य शासनाकडून करून घेण्यात यावा. सदर केंद्राच्या स्थापनेचा अन्य (रुपये ३ लाख साधनसामुग्री व रुपये २ लाख दैनंदिन व्यवस्थापन) खर्च शासनामार्फत अनुदान मिळवून त्यानंतरच करण्यात यावा.
यापुढे शासनाकडून अनुदानाविषयक निश्चित निर्णय मिळाल्याशिवाय अन्य ठिकाणी मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात येऊ नयेत.
केंद्र शासनाची राष्ट्रीय गृहनिर्माण धोरणासंबंधीची कागदपत्रे प्राधिकरणाच्या सदस्यांमध्ये प्रसृत करण्यास यावीत असे ठरविण्यात आले.
यानंतर माननीय अध्यक्षांनी मांडलेल्या खालील दोन प्रस्तावांचा विचार करून प्राधिकरणाने,

**Item No.** 13 **Resolution No.** 1604

विषय :

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, झोपडपट्टीतील लोकांना कायदेशीर सल्ला देण्याची योजना अंमलात आणण्यात मान्यता देण्यात येते.

**Item No.** 14 **Resolution No.** 1605

विषय :

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, अल्प उत्पन्न गट - २ आणि मध्यम उत्पन्न गट या गटांतील लोकांसाठी बांधण्यात येणारे गाळे आणि विकसित करण्यात येणारे भूखंड भाडेखरेदी पद्धतीवर विकत घेणे सर्वांना परवडावे या दृष्टीकोनातून व्याजात अर्थसहाय्य (सब्सीडी) देण्यासाठी एक योजना तयार करून शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

यानंतर श्री. सोनी यांनी नागपूर येथील [illegible] या वसाहतीतील गाळेधारकांना समस्यांचा प्रश्न उपस्थित केला. या विषयावर एक टिप्पण तयार करून [illegible] ठेवावे असे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे बांधकामाच्या दर्जाच्या संदर्भात एक टिप्पण तयार करून प्राधिकरणाच्या पुढे ठेवावे असेही ठरविण्यात आले. तसेच मंडळाकडून गाळे विक्री करण्यात येते त्या गाळ्यांची किंमत ठरविण्याची कोणती पद्धत अवलंबिली जाते याबाबतही एक टिप्पण प्राधिकरणाचे माहितीसाठी सादर करण्यात यावे. राष्ट्रीय गृहनिर्माण धोरणाबाबतची कागदपत्रे सर्व सदस्यांना पाठवावी असेही ठरले.

यानंतर माननीय अध्यक्षांनी अशा सूचना दिल्या की, जर प्राधिकरणाच्या सदस्यांनी एखाद्या बांधकामाची पाहणी करण्याची इच्छा प्रदर्शित केली तर किंवा त्यासंबंधीचा काही तपशील मागितला तर संबंधित अधिकाऱ्यांनी आवश्यक तो तपशील त्यांना पुरवावा व पाहणी भेटीची व्यवस्था करावी अशा सूचना सर्व संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात याव्यात.

यानंतर उपाध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठकीचे कामकाज संपले.

**Meeting No.** 66 **Meeting Date** 30-Dec-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २२/१२/१९८८ रोजी भरलेल्या ६५ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : व्यापारी उपयोगासाठी दिलेल्या गाळ्यांच्या हस्तांतरणास परवानगी देण्यासाठी आकारावयाच्या फीचा दर ठरविणे.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : इस्लामपूर जिल्हा, सांगली येथील पुणे मंडळाच्या जमिनीबाबत.

ठराव :

**Item No.** 4 **Resolution No.** 1606

विषय : श्री. बी. के. शिरगावकर, सेवानिवृत्त उपमुख्य अधिकारी यांची जागतिक बँक प्रकल्पात कंत्राटी पद्धतीवर नेमणूक करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. बी. के. शिरगावकर यांना प्राधिकरणाच्या कामाचा असलेला प्रदीर्घ अनुभव लक्षात घेऊन त्यांची नेमणूक जागतिक बँक प्रकल्पावर तहसीलदार संवर्गातील रिकाम्या पदावर कंत्राटी पद्धतीने एक वर्षाच्या कालावधीसाठी करण्याकरिता संचालक, जागतिक बँक प्रकल्प यांनी केलेली शिफारस स्वीकारण्यात येते.

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या १० कर्मचाऱ्यांना दिलेल्या सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या नोटीसा.

ठराव :

**Item No.** 6 **Resolution No.** 1607

विषय : नेमणूका/बढत्या

परिवीक्षा/अन्वीक्षा कालावधीचे त्रैमासिक अहवालाची पद्धती बंद करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांची प्रारंभिक नेमणूक केल्यानंतर/पदोन्नतीनंतर त्यांना परिवीक्षा/अन्वीक्षा कालावधी पूर्ण करून सेवेत कायम करणे/पदोन्नती दिलेल्या जागेवर कायम करणे, यासाठी त्यांचे त्रैमासिक अहवाल लिहिण्याची प्रचलित असलेली पद्धती यापुढे थांबविण्यात यावी. त्याऐवजी त्यांचे वार्षिक गोपनीय अहवाल विचारात घेऊन त्यांना सेवेत कायम करणे/पदोन्नती मिळालेल्या जागेवर कायम करणे याबाबतचे निर्णय घेण्यात यावेत.

वर्ग १ आणि २ च्या अधिकाऱ्यांसाठी परिवीक्षा/अन्वीक्षा कालावधी दोन वर्षांचा असावा आणि वर्ग ३ मधील कर्मचाऱ्यांसाठी परिवीक्षा/अन्वीक्षा कालावधी एक वर्षाचा असावा.

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : प्राधिकरण, विभागीय मंडळ, जागतिक बँक प्रकल्प व पंतप्रधान अनुदान प्रकल्पातील कर्मचाऱ्यांच्या नेमणूका.

ठराव :

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : पेट्रोल पंप व सर्व्हिस स्टेशनसाठी आरक्षित करण्यात आलेल्या भूखंडांना आकारावयाच्या दराबाबत. शासनाचे दिनांक २५.१०.१९८८ क्रमांक एडीएल-११८४/१५२२/का-१० चे पत्र.

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत ६० गाळे रामराव आदिक शिक्षण संस्थेस देण्यासंबंधी.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.**

विषय : ओशिवरा, सर्व्हे क्र. ४१ (अंशत:), मुंबई येथे मध्यम उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात यावयाच्या कामाच्या निविदा मंजूर करण्याबाबत.

ठराव :

| Item No. | 11 | Resolution No. | 1608 |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना नैमित्तिक रजांचे रोखीकरण करण्यास परवानगी देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना नैमित्तिक रजेचे/वैकल्पिक रजांचे रोखीकरण करण्याचा लाभ देण्याच्या दृष्टीने योग्य तो प्रस्ताव तयार करून शासनाच्या विचारार्थ पाठविण्यात यावा.
विषय सूचीवरील सर्व बाबींवर विचार केल्यानंतर मा. अध्यक्षांच्या परवानगीने खालील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या :

| Item No. | 12 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : केंद्र शासनाने मे, १९८८ मध्ये लोकसभेत मांडलेले राष्ट्रीय गृहनिर्माण धोरण.

ठराव :

| Item No. | 13 | Resolution No. | 1609 |
|---|---|---|---|

विषय : हुडको अर्थसहाय्यित खराडी, पुणे येथील अल्प उत्पन्न गट - २ अंतर्गत योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाला अनुमती व अधिकृती मिळणेबाबत. (४१४ गाळ्यांची योजना) योजना क्रमांक ६१७०.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, खराडी, पुणे येथील अल्प उत्पन्न गट - २ अंतर्गत ४१४ गाळ्यांच्या योजनेसाठी ८७.०५ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 5 **Resolution No.** 1613

विषय : "अभ्युदय को. ऑप. बँक लिमिटेड" यांना नेहरूनगर, कुर्ला येथील देण्यात आलेल्या इ. क्र. ७१ चे पुनर्बांधणीचे काम करण्यासाठी त्या इमारतीमध्ये रहात असलेल्या प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना तात्पुरती पर्यायी जागा देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) अभ्युदय को. ऑप. बँकेने नेहरूनगर, कुर्ला येथील इ. क्र. ७१ ची पुनर्बांधणी करून सध्या त्या इमारतीत रहात असलेल्या प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना पर्यायी जागा देण्याच्या बाबतीत हमीपत्र (गॅरंटी ऑफ परफॉर्मन्स) द्यावे.

२) प्राधिकरणाकडून १२ महिन्याच्या कालावधीसाठी देण्यात यावयाच्या सुमारे १४४.९२ चौ. मी. जमिनीवर बँकेने, प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या निवासी व्यवस्थेसाठी हंगामी पद्धतीने बांधकाम स्वखर्चाने करणे. या मुदतीसाठी प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतीविषयक धोरणानुसार बँकेने भाडेपट्टी भरली पाहिजे. तसेच जमिनीच्या संबंधात आवश्यक तो भाडेपट्टा करार प्राधिकरणाशी करावा.

३) बँकेने संक्रमणकाळात कर्मचाऱ्यांना पाणी, वीजपुरवठा, सांडपाण्याची सोय इत्यादी सुविधा पुरविण्याची व्यवस्था करावी.

४) बँकेने १२ महिन्यांच्या भाडेपट्टीची संपूर्ण रक्कम आगाऊ भरली पाहिजे.

५) बँकेच्या संकल्पित इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्यात प्राधिकरणाकरिता बांधण्यात येणाऱ्या १६ गाळ्यांच्या ताबा बँकेने प्राधिकरणाकडे ताबडतोब द्यावा. त्या गाळ्यांचे वाटप बँकेने परस्पर कर्मचाऱ्यांना करू नये.

६) हंगामी बांधकामामुळे आजूबाजूच्या स्थानिक रहिवाशांना कोणत्याही प्रकारचा त्रास व गैरसोय सोसावा लागणार नाही याची दक्षता बँकेने घ्यावी.

---

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : कन्नमवार नगर, विक्रोळी येथील सिनेमागृहासाठी आरक्षित केलेल्या भूखंडाच्या मागणीबाबत.

ठराव :

---

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : खेरनगर, वांद्रे येथील वसाहतीमध्ये "उत्तम बुक डेपो"साठी अल्प मुदतीने देण्यात आलेल्या भूखंडाबाबत.

ठराव :

---

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : पवई येथील भूखंड "नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर ट्रेनिंग इन इंडस्ट्रियल इंजिनियरींग" (निटी) मधील कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला देण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 9 **Resolution No.** 1614

विषय : रत्नागिरी नगरपरिषदेच्या ताब्यातील जमिनीवर अतिक्रमण केलेल्या लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी कोकण मंडळातील जमीन देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, रत्नागिरी, व्हिलेज नाचणे, सर्व्हे क्रमांक १९८ मधील सुमारे १ हेक्टर जमीन १०० रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी प्रथम ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने रत्नागिरी नगरपरिषदेत बाब टिप्पणीत नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून देण्यास मान्यता देण्यात येते. या जमिनीचे अधिमूल्य, जमिनीची मूळ किंमत, विकासावरील खर्च मिळून येणाऱ्या रकमेएवढी आकारण्यात यावी. अधिमूल्याच्या रकमेच्या १ टक्क्याएवढी भाडेपट्टी आकारण्यात यावी. भाडेपट्ट्याचे नूतनीकरण व भाडेपट्ट्याचा वार्षिक दर ठरविण्याचे अधिकार प्राधिकरणाकडे राहतील.

---

**Item No.** 10 **Resolution No.** 1615

विषय : धारावी विभागाची मंजूर विकास योजना.

झोपडपट्टीतील अंतर्गत रस्त्यांचे नियोजन व सेवा उद्योगांसाठी वाढीव जागांचे आरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ३७ अनुसार मंजूर विकास योजनेत किरकोळ फेर बदलाबदल.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणात जोडलेल्या अधिसूचनेनुसार धारावीच्या मंजूर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अनुसार पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. यासाठी विहित मुदतीत आलेल्या तक्रारी व सूचनांच्या सुनावणीसाठी अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, यांची समिती नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येते. या समितीने संबंधितांच्या तक्रारी आणि सूचना ऐकून घेतल्यानंतर आपला अहवाल प्राधिकरणात सादर करावा.

**Item No.** 11 **Resolution No.** 1616

विषय : एकसर, बोरीवली, मुंबई येथील सेंट्रल गव्हर्नमेंट ग्रुप इन्शुरन्स गृहनिर्माण योजनेकरिता हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत. योजना क्रमांक ६१६७. मध्यम उत्पन्न गट ८० गाळे, उच्च उत्पन्न गट ४० गाळे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, एकसर, बोरीवली, मुंबई येथील सेंट्रल गव्हर्नमेंट ग्रुप इन्शुरन्स गृहनिर्माण योजनेअंतर्गत बांधावयाच्या ८० मध्यम उत्पन्न गट व ४० उत्पन्न गटाच्या गाळ्यांसाठी रुपये १७८.०९ लक्ष कर्ज हुडकोकडून घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 12 **Resolution No.** 1617

विषय : औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातील वर्ग ३ व ४ चे कर्मचाऱ्यांना सायकल विकत घेण्यासाठी अग्रिम मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातील खालील सह कर्मचाऱ्यांना सायकल विकत घेण्यासाठी प्रत्येकी रुपये ६००/- एवढी आगाऊ रक्कम म्हणून मंजूर करण्यात येत आहे. मात्र दोन महिन्यांचे वेतनापेक्षा कमी रक्कम होत असल्यास तेवढीच रक्कम मंजूर करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १) श्री. व्ही. एस. कुळकर्णी | कनिष्ठ लिपिक |
| २) श्री. सी. एस. पठाण | लघुलेखक |
| ३) श्री. एस. बी. धुळे | कनिष्ठ लिपिक |
| ४) श्री. ओ. पी. चौधरी | कनिष्ठ लिपिक |
| ५) श्री. डी. टी. सानप | वरिष्ठ लिपिक |
| ६) श्री. बी. जी. शिंदे | नाईक. |

आगाऊ देण्यात येणाऱ्या रकमेची वसूली शासनाचे प्रचलित धोरणानुसार व्याजाची आकारणी करून करण्यात यावी.

**Item No.** 13 **Resolution No.**

विषय : पुणे गृहनिर्माण मंडळातील संत तुकाराम नगर वसाहतीस मा. मंत्री (गृहनिर्माण) यांच्या भेटीनंतर त्यांच्या सूचनेनुसार करावयाच्या कामाबाबत.

ठराव :

**Item No.** 14 **Resolution No.**

विषय : तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद येथील मंडळाच्या वसाहतीमध्ये खुल्या जागेत बांधलेल्या गोदामाची विक्री.

ठराव :

| **Item No.** | **15** | **Resolution No.** | **1618** |
|---|---|---|---|

विषय : जागतिक बँक प्रकल्पाअंतर्गत चारकोप येथील संकुलित सहकारी गृहनिर्माण संस्थांना हुडकोकडून कर्ज मिळविण्याकरिता प्राधिकरण/मंडळाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, संजीवनी को. ऑप. हौसिंग सोसायटी, चारकोप, कांदिवली, मुंबई या सहकारी संस्थेसाठी हुडकोकडून रुपये ८.३९ लक्ष एवढे कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

| **Item No.** | **16** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाचे सल्लागार म्हणून श्री. पी. एम. आपटे यांचा सल्ला घेण्यासाठी मे. आपटे कन्सल्टन्सी या संस्थेची पुन्हा नेमणूक करणेबाबत.

ठराव :

| **Item No.** | **17** | **Resolution No.** | **1619** |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या प्रादेशिक मंडळाच्या सभापतींना अभ्यागतांच्या स्वागतासाठी खर्च करण्याकरिता रक्कम मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या प्रादेशिक मंडळांच्या सभापतींना कार्यालयात भेटीसाठी किंवा अन्य कामाच्या निमित्ताने येणाऱ्या अभ्यागतांच्या स्वागतासाठी खर्च करण्याकरिता दरमहा प्रत्येकी रुपये ५००/- पर्यंत खर्च करण्यास मंजूरी देण्यात येते.

| **Item No.** | **18** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : ओशिवरा, मुंबई येथे उच्च उत्पन्न गटाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी विकसित केलेल्या ४२ भूखंडांचे वाटप.

ठराव :

| **Item No.** | **19** | **Resolution No.** | **1620** |
|---|---|---|---|

विषय : श्री. ल. रं. घाडगे, चौकशी अधिकारी/प्राधिकरण यांच्या कंत्राटी पद्धतीवरील पुनर्नेमणूकीस मुदतवाढ देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. ल. रं. घाडगे, चौकशी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांच्या कंत्राटी पद्धतीवरील दिनांक २ फेब्रुवारी १९८९ (म.पू.) पासून ६ महिन्यांच्या मुदतीसाठी पुनर्नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 20 **Resolution No.** 1621

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, आवास व नगरविकास निगम, नवी दिल्ली, (हुडको) यांनी विहित केलेल्या अटीवर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता ''अ'' मध्ये दर्शविल्याप्रमाणे हुडको अर्थसहाय्यित अमरावती/जळगाव/नांदेड/अकोला/सोलापूर व बुलढाणा जिल्ह्यातील बेघर भूमिहीनांकरिता ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी एकूण रुपये ३३४.७८ लक्ष कर्ज हुडकोकडून घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

**Item No.** 21 **Resolution No.**

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पातील अधिकाऱ्यांना प्राधिकरण कायद्याच्या पाचव्या प्रकरणातील तरतुदीप्रमाणे अधिकार प्रदान करणे.

ठराव :

**Item No.** 22 **Resolution No.** 1622

विषय : मुंबई मंडळाच्या आस्थापनेवर दि. २०.८.१९८६ ते २.९.१९८६ पर्यंत फक्त चौदा दिवसांकरिता कार्यकारी अभियंत्याचे एक अधिसंख्य पद (सुपरन्युमररी पोस्ट) निर्माण करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई मंडळाच्या आस्थापनेवर दिनांक २०.८.१९८६ ते २.९.१९८६ या १४ दिवसांचे कालावधीकरिता कार्यकारी अभियंता या दर्जाचे रुपये १०००-५०-१५०० या वेतनश्रेणीमध्ये एक अधिसंख्य पद निर्माण करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 23 **Resolution No.** 1623

विषय : नोव्हेंबर, १९८८ मध्ये धारावीच्या मंजूर विकास योजनेत केलेल्या किरकोळ बदलाबाबत आलेल्या तक्रारी व सूचना करणाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यावर अंतिम निर्णय घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अनुसार धारावीच्या मंजूर विकास आराखड्यात किरकोळ बदल करण्याबाबत दिनांक ३.११.१९८८ रोजी शासन राजपत्रात प्रसिद्धी देण्यात आली होती. यासंबंधात आलेल्या तक्रारी व सूचनांच्या सुनावणीसाठी अध्यक्ष, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग या दोघांची एक समिती नेमण्यास मान्यता देण्यात येते. या समितीने आपला अहवाल एक महिन्याच्या कालावधीत शिफारशींसह सादर करावा.

| Item No. | 24 | Resolution No. | 1624 |
|---|---|---|---|

विषय : ७-९ मिल लेन स्टॅंडर्ड (मानाजी राजाजी चाळ) प्रभादेवी येथील नागरी नूतनीकरण योजना ज्योत्यावरील बांधकामाच्या निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, वरील योजनेखालील पुनर्रचित इमारत क्रमांक ७-९ स्टॅंडर्ड मिल लेन येथील ज्योत्यावरील बांधकामासाठी "मे. सुपरस्टार कन्स्ट्रक्शन कंपनी" यांची अंदाजित रकमेपेक्षा (रुपये ६१,४२,६१६) २.७८६ प्रतिशत कमी बोली (बोलीची रक्कम रुपये ५९,७१,४८२.७१) मंजूर करण्यात येत आहे.

| Item No. | 25 | Resolution No. | 1625 |
|---|---|---|---|

विषय : भारतनगर येथील संक्रमण शिबिर टप्पा दोन बांधकामाच्या निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, वरील योजनेच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामासाठी (४७० गाळे बांधणे) "मे. क्लासिक कन्स्ट्रक्शन प्राईव्हेट लिमिटेड" कंपनी यांच्या अंदाजित रकमेपेक्षा (रु. १,३६,६०,०१२/-) २.८३ प्रतिशत कमी बोली (बोली रक्कम रुपये १,३२,७३,४३४/-) मंजूर करण्यात येत आहे.

| Item No. | 26 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : भाडेवसूलीचे काम दिलेल्या कर्मचाऱ्यांकडून अनामत घेण्याबाबत.

ठराव :

| Item No. | 27 | Resolution No. | 1626 |
|---|---|---|---|

विषय : किर्लोस्करवाडी येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बांधलेल्या ८८ गाळ्यांची विक्री.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, किर्लोस्करवाडी येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बांधलेले ८८ गाळे गेली सुमारे ५ वर्षे सातत्याने प्रयत्न करूनही मागणीअभावी रिकामे आहेत. या गाळ्यांसाठी ठरविलेल्या प्रत्येकी रुपये १०,६००/- या किंमतीस गाळ्यांना मागणी मिळण्याचा संभव नसल्याने आता प्रत्येकी रुपये ५,५००/- एवढ्या किंमतीस गाळे घेण्यासाठी पुढे आलेल्या २२ अर्जदारांना गाळ्यांचे वाटप करण्यास मंजूरी देण्यात येते. यापुढेही या किंमतीस गाळे घेण्यासाठी अर्ज आले तर त्या अर्जदारांना गाळ्यांचे वाटप करण्यास मंजूरी देण्यात येते.

यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठकीचे कामकाज संपले.

**Meeting No.** 68 **Meeting Date** 09-Feb-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ३.२.१९८९ रोजी झालेल्या ६७व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 1627

विषय : प्रादेशिक मंडळांच्या मुख्य अधिकाऱ्यांना अधिकारप्रदान.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक ४२२ अनुसार मंजूर केलेल्या अधिकारप्रदानातील कायदेविषयक बाबींची देयके मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी पारित करण्याआधी ती प्राधिकरणाचे विधी सल्लागार यांनी प्रमाणित करण्याची तरतूद काढून टाकण्यात येत आहे. मात्र कायदेविषयक व्यावसायिक खर्चाची इतर देयके विधी सल्लागार यांनी प्रमाणित केल्यानंतरच मुख्य अधिकारी यांनी पारित करावीत.

**Item No.** 3 **Resolution No.** 1628

विषय : प्राधिकरणाचे सल्लागार म्हणून श्री. पी. एम. आपटे यांचा सल्ला घेण्यासाठी मे. आपटे कन्सल्टन्सी या संस्थेची पुन्हा नेमणूक करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मे. आपटे कन्सल्टन्सी यांची सल्लागार म्हणून पुन्हा नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येते. या नेमणूकीचा कालावधी तीन वर्षांचा असावा आणि या कामासाठी त्यांना दरमहा रुपये ४,०००/- कन्सल्टन्सी फी देण्यात यावी.

**Item No.** 4 **Resolution No.** 1629

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पातील अधिकाऱ्यांना प्राधिकरण कायद्याच्या पाचव्या प्रकरणातील तरतुदीप्रमाणे अधिकारप्रदान करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पंतप्रधान अनुदान प्रकल्पावर नेमणूक केलेल्या अधिकाऱ्यांना बाब टिप्पणाच्या जोडपत्रात दाखविल्याप्रमाणे अधिकारप्रदान करण्यास मान्यता देण्यात येते. हे अधिकारप्रदान या अटींवर करण्यात येते की, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अधिकाऱ्यांना केलेल्या अधिकारप्रदानापेक्षा एखाद्या बाबतीत जादा अधिकारप्रदान पंतप्रधान अनुदान प्रकल्पावरील अधिकाऱ्यांना केले असल्यास त्या बाबी प्राधिकरणापुढे मंजूरीसाठी ठेवण्यात याव्यात.

| **Item No.** | **5** | **Resolution No.** | **1630** |
|---|---|---|---|

विषय : माडेवसूलीचे काम दिलेल्या कर्मचाऱ्यांकडून अनामत घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, माडेवसूलीचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून कोणतीही अनामत रक्कम न घेता अशा कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाहनिधी खात्यात जमा असलेल्या रकमेवर त्यांच्याकडून हमीपत्र योग्य त्या स्टॅम्पपेपरवर घेण्यात यावे. या हमीपत्राचा खर्च संबंधित कर्मचाऱ्यांनी करावयाचा आहे.

| **Item No.** | **6** | **Resolution No.** | **1631** |
|---|---|---|---|

विषय : तुळजापूर, जि. उस्मानाबाद येथील मंडळाच्या वसाहतीमध्ये खुल्या जागेत बांधलेल्या गोदामाची विक्री.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, तुळजापूर येथे औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गट यांच्यासाठी विकसित केलेल्या वसाहतीतील गोदामाची मंडळास आता उपयुक्तता नसल्याने ते तुळजापूर नगरपरिषदेस विक्री करण्यात यावे. या गोदामाखालील जमीन तुळजापूर नगरपरिषदेकडे, आधी हस्तांतरीत केलेल्या तेथील जमिनीप्रमाणेच देण्यात यावी आणि जमीन आणि गोदामाची विक्री प्राधिकरणाच्या यासंबंधीच्या धोरणानुसार निश्चित करून नगरपरिषदेस आकारण्यात यावी.

| **Item No.** | **7** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : ओशिवरा, मुंबई येथे उच्च उत्पन्न गटाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी विकसित केलेल्या ४२ भूखंडाचे वाटप.

ठराव :

| **Item No.** | **8** | **Resolution No.** | **1632** |
|---|---|---|---|

विषय : खेरनगर, वांद्रे येथील वसाहतीमध्ये 'उत्तम बुक डेपो' साठी अल्प मुदतीने देण्यात आलेल्या भूखंडाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, खेरनगर, वांद्रे या वसाहतीत श्री. चंदुलाल शहा यांना बुकडेपोसाठी अल्प मुदतीच्या भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या भूखंडाच्या भाडेपट्ट्याचा कालावधी पुढे वाढविण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

| **Item No.** | **9** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : पवई येथील भूखंड "नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर ट्रेनिंग इन इंडस्ट्रियल इंजिनियरींग" (निटी) मधील कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला ...

ठराव :

| **Item No.** | **10** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : पुणे गृहनिर्माण मंडळातील संत तुकाराम नगर वसाहतीस मा. मंत्री (गृहनिर्माण) यांच्या भेटीनंतर त्यांच्या सूचनेनुसार करावयाच्या कामाबाबत.

ठराव :

| **Item No.** | **11** | **Resolution No.** | **1633** |
|---|---|---|---|

विषय : बोधचिन्ह

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीस जोडलेल्या बोधचिन्हास मान्यता देण्यात येते.

यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठकीचे कामकाज संपले.

**Meeting No.** **Special** **Meeting Date** **28-Feb-19**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ९-२-१९८९ रोजी झालेल्या . ६८ व्या बैठकीचा कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** .1634

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९८८-८९ चे सुधारलेले अंदाज व सन १९८९-९० चा अर्थसंकल्प.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन १९८८-८९ चे सुधारलेले अंदाज व सन १९८९-९० चा अर्थसंकल्पास मान्यता देण्यात येत आहे.

मुंबई बेटातील उपकरपात्र इमारतींची पुनर्रचना कार्यक्रमाची वेगाने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने रुपये १००० ते १२०० कोटी खर्च उभारण्याची योजना तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे नेमण्यात येत आहे.

१) सभापती, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, अध्यक्ष.
२) मुख्य अधिकारी/मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
३) संचालक/पंतप्रधान अनुदान प्रकल्प.
४) मुख्य अभियंता/मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
५) वित्त नियंत्रक/महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
५) डॉ. सुरेश खेडेकर, सदस्य, म. गृ. नि. व क्षे. वि. प्रा.
७) श्री. सुरेश मांजरेकर, सदस्य, म. गृ. नि. व क्षे. वि. प्रा.
८) श्री. व्ही. व्ही. बडवे, सदस्य, म. गृ. नि. व क्षे. वि. प्रा.
९) श्री. व्ही. डी. देसाई, सदस्य, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
१०) मुख्य अभियंता/महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (समितीचे निमंत्रक)

मुख्य अभियंता, प्राधिकरण यांनी या समितीचे निमंत्रक म्हणून काम करावे, समितीने आपला अहवाल दिनांक १.५.१९८९ पूर्वी सादर करावा.

वरील बाब विषयावार चर्चा झाल्यानंतर सदस्य, श्री. मांजरेकर, यांनी माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या मागण्या व दिनांक २०.२.१९८९ पासून कर्मचाऱ्यांचे सुरू असलेले आंदोलन याबाबतीत चर्चा उपस्थित केली. त्यावर महाराष्ट्र गृहनिर्माण संयुक्त कृती समितीचे अध्यक्ष यांनी दिनांक २४.२.८९ रोजी मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांना त्यांचे पत्रासोबत दिलेल्या दोन ठरावांबाबत चर्चा करण्यात आली. त्यामध्ये पहिला ठराव प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात यावी याबाबत होता. त्या ठरावाच्या अनुषंगाने विचार करताना दिनांक १८.१२.१९८२ रोजी प्राधिकरणाच्या ३५ व्या बैठकीत एकमताने मंजूर झालेला ठराव क्रमांक ६०२ वाचून दाखविण्यात आला. तो खालीलप्रमाणे आहे.

"प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांकरिता निवृत्तीवेतन योजना अंमलात आणण्यात यावी. मात्र ही जबाबदारी संपूर्णपणे शासनाने उचलावी."

संयुक्त कृती समितीचे निमंत्रक व सदस्य/प्राधिकरण, श्री. मांजरेकर यांनी त्यांचे वरील पत्रासोबत पाठविलेल्या सुधारित ठरावाचा मसुदा वाचण्यात आला व त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यावर चर्चा करताना डॉ. खेडेकर, सदस्य यांनी प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांसाठी निवृत्तीवेतनाची योजना स्वीकारावी का याबाबत पृच्छा केली असता, श्री. मांजरेकर, सदस्य, यांनी प्राधिकरणाची आर्थिक स्थिती कशी आहे याबाबतची विश्लेषण केले. त्याला पूरक व अत्यावश्यक माहिती वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांनी पुरविली. त्याप्रमाणे सदर विषयावर अधिक चर्चा करताना श्री. मांजरेकर, सदस्य, यांनी चर्चेच्या ओघात असे निदर्शनास आणले की, महाराष्ट्रात जवळजवळ सुमारे ७० महामंडळे अस्तित्वात असून त्यातील तीन-चतुर्थांश महामंडळे कंपनी ॲक्ट खाली निर्माण झालेली

आहेत. त्यांची वेतनश्रेणी शासकीय कर्मचाऱ्यांपेक्षा अधिक असून त्यांना अन्य इतर सवलती या शासकीय कर्मचाऱ्यांपेक्षा अधिक प्रमाणात दिल्या जातात. त्यामुळे अनेक महामंडळातील कर्मचाऱ्यांकडून निवृत्तीवेतन मिळण्याबाबत मागणी केली जात नाही व याबाबतचा आग्रहही धरला जात नाही. प्राधिकरणाने आपल्या कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी स्वीकारलेली असल्यामुळे व शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे इतर सोयीसवलती उपलब्ध असल्यामुळे ज्याप्रमाणे शासकीय कर्मचाऱ्याला निवृत्तीवेतन योजना लागू आहे त्याप्रमाणे प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्याबद्दल शासनाकडे आग्रह धरावा अशी विनंती केली. त्यांनी चर्चेच्या ओघात असेही सूचित केले की, प्राधिकरणाकडे जो सध्या कर्मचारीवृंद आहे त्यातील सुमारे २०० ते २५० कर्मचारी भूतपूर्व दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ व गलिच्छवस्त्या मंडळातील असून त्यांना मात्र कायद्यानुसार निवृत्तीवेतन देण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारलेली आहे व त्याप्रमाणे भूतपूर्व वरील मंडळातील कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनाचा लाभ देण्यात येत आहे. एकाच संस्थेतील काही कर्मचाऱ्यांस निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली असताना काही कर्मचाऱ्यांस शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे समान वेतनश्रेणी स्वीकारलेली असताना निवृत्तीवेतन योजना लागू न करणे हे अन्यायकारक आहे असे त्यांनी निदर्शनास आणले. सदर मुद्यांवर विस्तृत चर्चा करून व सखोल अभ्यास करून प्राधिकरणाने असा निर्णय घेतला की, वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांनी प्राधिकरणाच्या आर्थिक स्थितीबाबत प्राधिकरणाचे कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन योजना लागू करण्यासाठी आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीचा व प्राधिकरणाचे आर्थिक स्थितीबाबत सविस्तर टिप्पणी तयार करून पुढील बैठकीत विचारार्थ सादर करण्यात यावी. मात्र प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत शासनाकडे आग्रह धरण्यात यावा ही सूचना तत्वतः मान्य करण्यात आली. प्राधिकरणाची आर्थिक स्थिती व त्यावरील टिप्पणी यांचा सखोल अभ्यास करून अंतिम निर्णय प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत घेण्याचे ठरविण्यात आले.

श्री. मांजरेकर, सदस्य यांनी वर नमूद केलेल्या पत्रासोबत दुसरा ठराव कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीबाबत पाठविला होता. त्या ठरावाच्या मसुद्यावर चर्चा करताना असे निदर्शनास आणले की, ज्येष्ठ व सक्षम अशा कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी देऊन जागतिक बँक प्रकल्प, पंतप्रधान अनुदान प्रकल्प व विभागीय मंडळे यामध्ये प्राधान्याने नेमणूका करण्याबाबत दिनांक १३-८-१९८७ रोजी माजी गृहनिर्माण मंत्र्यांच्या दालनात झालेल्या निर्णयाप्रमाणे त्वरित पदोन्नती देण्याची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी करावी असे प्रस्तावित केले. अशा पदोन्नतीमुळे विभागात रिक्त होणाऱ्या पदी प्रशिक्षित शिकाऊ उमेदवार, अनुकंपा तत्वावर नेमणूका देण्यायोग्य उमेदवार व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे वारस यांच्या नेमणूका करून भरण्यात याव्यात असे सुचविले. त्यावर चर्चा करताना असे ठरविण्यात आले की, सदर प्रकरणी मा. उपाध्यक्ष व मुख्य अधिकारी/प्राधिकरण, संचालक, जागतिक बँक प्रकल्प, श्री. मांजरेकर, सदस्य/प्राधिकरण व डॉ. सुरेश खेडेकर, सदस्य/प्राधिकरण यांनी या विषयावर संयुक्तपणे चर्चा करून निश्चित स्वरुपाचे टिप्पण विचारार्थ प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात यावे.

वरील मुद्यांवर चर्चा करून झाल्यानंतर विषयसूचीवरील पुढील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**Item No.** 3 **Resolution No.** 1635

विषय : स्टाफिंग पॅटर्न

प्राधिकरण व विभागीय मंडळे यांचेकरिता सन १९८९-९० या वर्षाकरिता कर्मचारी वर्ग अनुसूची.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीसोबत जोडण्यात आलेल्या सन १९८९-९० या वित्तीय वर्षाकरिता प्रस्तावित करण्यात आलेल्या कर्मचारीवर्ग अनुसूचीला मंजूरी देण्यात येत आहे.

---

**Item No.** 4 **Resolution No.**

विषय : नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले व ज्यांची प्राधिकरणामार्फत कंत्राटी पद्धतीने जागतिक बँक प्रकल्प विभागामध्ये नेमणूक करण्यात आलेली आहे अशा अधिकाऱ्यांची मुदत संपल्यानंतर त्यांना एक वर्षाची मुदत वाढवून देण्याबाबतचे अधिकार मुख्य अधिकारी, प्राधिकरण यांना प्रदान करणेबाबत.

ठराव :

---

**Item No.** 5 **Resolution No.** 1636

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पाअंतर्गत धारावी पुनर्बांधणी योजनेखालील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या समासद लाभार्थींसाठी एच.डी.एफ.सी. कडून कर्ज घेणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत धारावी पुनर्बांधणी योजनेखाली १) खांबदेवनगर सहकारी गृहनिर्माण संस्था, धारावी (६५ गाळे), २) बालाजी सहकारी गृहनिर्माण संस्था, राजेंद्रप्रसाद नगर, धारावी ७२ गाळे, ३) नेताजी सहकारी गृहनिर्माण संस्था, धेवरनगर, धारावी, १०० गाळे आणि ४) ९० फूटी रुंद रस्ता, धारावी येथील नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्था, अ) १२० गाळे, ब) १२० गाळे आदी संस्थांच्या समासद लाभार्थीसाठी पंतप्रधान अनुदान प्रकल्पातर्फे करण्यात यावयाच्या एकूण ४७७ गाळ्यांच्या पुनर्बांधणीसाठी प्रत्येकी रुपये २०,०००/- प्रमाणे एकूण रुपये ९५,४०,०००/- चे कर्ज बँक हमीच्या जारणावर "एच.डी.एफ.सी." कडून घेण्यास पंतप्रधान अनुदान प्रकल्पास प्राधिकरण अनुमती देत आहे.
विषय सूचीवरील विषय संपल्यानंतर मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय चर्चेसाठी घेण्यात आले.

| Item No. | 6 | Resolution No. | 1637 |
|---|---|---|---|

विषय : मुंबई नागरी विकास प्रकल्प - १ अंतर्गत चारकोप - २ आणि गोराई - १ येथील भूखंड विकसित करणे, मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कं. लि. यांना कर्ज पुरवठा करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सुधारित अंदाजपत्रक १९८८-८९ मध्ये करण्यात आलेली तरतूद १०० लक्ष रुपयांवरून रुपये २५० लक्ष वाढविण्याचा तसेच १९८९-९० साठी २५० लक्ष रुपयांची तरतूद रुपये १०० लक्ष कमी करण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीस रुपये २५० लक्ष कर्ज देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

| Item No. | 7 | Resolution No. | 1638 |
|---|---|---|---|

विषय : नियोजित ९० फूट रस्ता, धारावी येथील इ-१ व इ-२ प्रकारच्या इमारतींच्या बांधकामाच्या निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, वरील योजनेतील इमारतींच्या बांधकामासाठी "मेसर्स माय कन्स्ट्रक्शन कंपनी" यांची रुपये १,२२,४६,९६०/- रकमेची बोली मंजूर करण्यात येत आहे.

| Item No. | 8 | Resolution No. | 1639 |
|---|---|---|---|

विषय : नागरी नूतनीकरण योजना उमरखाडी टप्पा चार (उत्तर) बांधकमाच्या निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, वरील योजनेच्या बांधकामासाठी "मेसर्स ताराचंद एन. एंटरप्रासेस" यांची अंदाजित रकमेपेक्षा (अंदाजित रक्कम रुपये ७३,०७,८२४/) तीन प्रतिशत जास्त बोली (खोलीची रक्कम रुपये ७५,९१,९४८/-) मंजूर करण्यात येत आहे.

| Item No. | 9 | Resolution No. | 1640 |
|---|---|---|---|

विषय : सर्व्हे नंबर १३८, मानखुर्द येथे १९३ संक्रमण शिबिराचे गाळे बांधकामाच्या निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, वरील योजनेच्या सर्व्हे नंबर १३८, मानखुर्द येथील (१९२ संक्रमण शिबिराचे गाळे) इमारतींच्या बांधकामासाठी "मेसर्स क्लासिक कन्स्ट्रक्शन कंपनी" यांची रुपये ५९,३१,४१८.४३ ची बोली (०.९ प्रतिशत सूटसहित) मंजूर करण्यात यावी.

| Item No. | 10 | Resolution No. | 1641 |
|---|---|---|---|

विषय : सर्व्हे नंबर १३८ येथे ४२० झोपडपट्टीवासियांसाठी गाळे - इमारतीच्या बांधकामाच्या निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, वरील योजनेच्या सर्व्हे नंबर १३८ मानखुर्द येथील (४२० झोपडपट्टीवासियांसाठी गाळे) इमारतींच्या बांधकामासाठी "मेसर्स क्लासिक कन्स्ट्रक्शन कंपनी" यांची रुपये १,३४,६१,१४४.४५ ची बोली (०.९ प्रतिशत सूटसहित) मंजूर करण्यात यावी.

**Item No. 11** **Resolution No. 1642**

विषय : सर्व्हे नंबर १३८, मानखुर्द येथे ६५१ झोपडपट्टीवासियांसाठी गाळे - इमारतींच्या बांधकामासाठी निविदा.

ठराव : *एकमताने निर्णय घेतला की, वरील योजनेच्या सर्व्हे नंबर १३८ मानखुर्द येथील (६५१ गाळे) इमारतीच्या बांधकामासाठी "मेसर्स क्लासिक कन्स्ट्रक्शन कंपनी" यांची रुपये २,०३,६९,०१४/- ची बोली (०.९ प्रतिशत सूटीसहित) मंजूर करण्यात यावी.*

**Item No. 12** **Resolution No.**

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पातर्फे राबविण्यात येणाऱ्या नागरी नूतनीकरण योजनेखाली उपलब्ध होणारे जादा गाळे - जादा गाळ्यांच्या विक्रीबाबत ठराव.

ठराव :

**Meeting No.** 69 **Meeting Date** 10-Mar-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २८-२-१९८९ रोजी झालेल्या खास बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 1643

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९८८ अनुसार सुधारित वेतन देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या सर्व सेवावर्गातील पदांच्या सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा.

**Item No.** 3 **Resolution No.** 1644

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांची सध्याची ज्येष्ठतासूची रद्द करून जून, १९८६ मध्ये जाहिर केलेली ज्येष्ठतासूची अंमलात आणण्याबद्दल.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांची मे, १९८७ मध्ये प्रकाशित केलेली ज्येष्ठतसूची रद्द करून न्यायालयाने मान्य केलेल्या १९६० च्या तत्वानुसार तयार केलेली जून, १९८६ ज्येष्ठतासूची पुन्हा अंमलात आणावी.

**Item No.** 4 **Resolution No.** 1645

विषय : संचालक, जागतिक बँक प्रकल्प यांना अधिकार प्रदान.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या ठराव क. १३५८ अनुसार मंजूर केलेल्या अधिकार प्रदानातील बँकेत नवीन खाते उघडण्याविषयक बाबीचे अधिकार, संचालक/जागतिक बँक प्रकल्प यांना देण्यात आले आहेत. मात्र असे एखादे नवीन खाते उघडल्यानंतर संचालक/जागतिक बँक प्रकल्प यांनी त्याबद्दलची माहिती प्राधिकरणाचे वित्त नियंत्रक यांना ताबडतोब पुरवावी.

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले व ज्यांची प्राधिकरणामार्फत कंत्राटी पद्धतीने जागतिक बँक प्रकल्प विभागामध्ये नेमणूक करण्यात आलेली आहे अशा अधिकाऱ्यांची मुदत संपल्यानंतर त्यांना एक वर्षाची मुदत वाढवून देण्याबाबतचे अधिकार मुख्य अधिकारी, प्राधिकरण यांना प्रदान करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 6 **Resolution No.** 1646

विषय : प्राधिकरणाचे १९८९-९० चे अर्थसंकल्पिय अंदाज तयार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, १९८९-९० च्या अंदाजपत्रकाच्या कामासाठी प्राधिकरणाने वित्त नियंत्रक यांच्या विभागातील विभागीय लेखापाल, वरिष्ठ लेखा परीक्षक, वरिष्ठ लिपिक आणि कनिष्ठ लिपिक या पदांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेनंतर काम करावे लागले. या अतिरिक्त कामाचा "विशेष भत्ता" म्हणून मोबदला देण्यासाठी त्यांच्या वेतनश्रेणीनुसार अंदाजे रुपये १६,०००/- एवढ्या खर्चास मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 7 **Resolution No.** 1647

विषय : प्राधिकरणाच्या मालकीच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासियांना मोफत कायदेविषयक सल्ला व सहाय्य देण्याची योजना.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या मालकीच्या जमिनीवरील ओळखपत्रधारक झोपडपट्टीवासियांना मोफत कायदेशीर सल्ला व सहाय्य देण्याच्या दृष्टीने बाब टिप्पणात मांडलेल्या योजनेस मान्यता देण्यात येते. ही योजना शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावी.

**Item No.** 8 **Resolution No.** 1648

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पातर्फे राबविण्यात येणाऱ्या नागरी नूतनीकरण योजनेखाली उपलब्ध होणारे जादा गाळे.
जादा गाळ्यांच्या विक्रीबाबत ठराव.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या नागरी नूतनीकरण योजनेतील उपलब्ध होणाऱ्या जादा गाळ्यांची विक्री बाब टिप्पणास जोडलेल्या परिशिष्ट १ मध्ये दर्शविलेल्या दरानुसार ठरविण्यास मान्यता देण्यात येत आहे.
विषयसूचीवरील बाबी संपल्यानंतर मा. अध्यक्षांच्या परवानगीने खालील दोन आयत्या वेळचे विषय विचारार्थ घेण्यात आले.

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम, १९७६ अंतर्गत शासनाने नियुक्त केलेल्या (योजना मंजूर करणाऱ्या) समित्या.

प्रतिनिधीत्व मिळविण्याबाबत म्हाडाने केलेली विनंती.

ठराव :

**Item No.** **10** **Resolution No.** **1649**

विषय : ''ॲस्ट्रा'' या बंगलोर येथील संस्थेस ''स्टॅबेलाईज्ड सॉईल ब्लॉक्स्'' बनविण्याकरिता कन्सल्टन्सी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, ''ॲस्ट्रा'' या बंगलोर येथील संस्थेस ''स्टॅबेलाईज्ड सॉईल ब्लॉक्स्'' बनविण्याकरिता सल्लागार म्हणून नेमण्यात येणाऱ्या अंदाजित रुपये ५०,०००/- एवढ्या खर्चास मान्यता देण्यात येते.
यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठकीचे कामकाज संपले.

**Meeting No.** 70 **Meeting Date** 25-Apr-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १०.३.१९८९ रोजी झालेल्या ६९ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 1650

विषय : प्रवास भत्त्याच्या दरात सुधारणा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शासनाच्या वित्त विभागाच्या दिनांक ३.१०.१९८८ च्या आरपीएस-१२८८/५६८/सेवा-१० क्रमांकाच्या शासन निर्णयानुसार प्रवास भत्त्याचे सुधारित नियम व दर प्राधिकरणाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना लागू करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 3 **Resolution No.** 1651

विषय : श्री. आर. ए. कुळकर्णी, सेवानिवृत्त सहसचिव, विधी व न्याय विभाग यांच्या पुनर्नेमणूकीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सेवेत अधिकारी सेवा वर्ग-१ च्या पदावर नेमणूका करण्यासाठी असलेल्या निवड समितीच्या शिफारशीनुसार श्री. आर. ए. कुळकर्णी यांची विधी सल्लागार म्हणून दिनांक १५.७.१९८९ च्या आदेशांनुसार केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 4 **Resolution No.** 1662

विषय : अर्जित रजा साठविणे व रजेचे रोखीकरण करणे यांच्या कमाल मर्यादा वाढविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, शासनाच्या वित्त विभागाच्या दिनांक ११.१०.१९८८ च्या वेआशि-१२८७/३९९/८७/सेवा-१० क्रमांकाच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील सुधारित तरतुदी प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 5 **Resolution No.** 1653

विषय : श्री. पी. के. रामचंद्रन्, अर्थतज्ज्ञ, जागतिक बँक प्रकल्प यांच्या कंत्राटी नेमणूकीचा कालावधी वाढविणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. पी. के. रामचंद्रन्, अर्थतज्ज्ञ, जागतिक बँक प्रकल्प यांच्या सेवेचा कालावधी दिनांक ३.४.१९८९ पासून १ वर्षाच्या मुदतीसाठी त्यांच्या नेमणूकीच्या मूळ अटी व शर्तीवर वाढविण्यास प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 6 **Resolution No.** 1654

विषय : महिला मंडळ, कुळगाव यांनी कुळगाव, बदलापूर येथील कोकण मंडळाच्या ताब्यात असलेल्या सर्व्हे क्रमांक - ४२ मधील मागणी केलेल्या जमिनीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, कुळगाव, बदलापूर येथे महिला मंडळ, कुळगाव या संस्थेच्या जमिनीस लागून असलेला सुमारे १२०० चौ. वार (१००३.२० चौ. मीटर) मोकळी जमीन, महिला मंडळास त्यांच्या शाळेच्या विस्तारासाठी प्रथमतः ३० वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देण्यास मान्यता देण्यात येते. यासाठी प्राधिकरणाच्या, जमिनीच्या किंमतीविषयक धोरणानुसार अधिमूल्य आणि भाडेपट्टी आकारण्यात यावी. या जमिनीचे वाटप महिला मंडळास जमीनविषयक नेहमीच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून करावे.

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : सर्व्हे क्रमांक १६३ (भाग) कांदिवली (पूर्व) येथील माध्यमिक शाळेसाठी भुवनेश्वरी एज्युकेशन सोसायटीला वितरित केलेल्या भूखंडाबाबत.

ठराव :

**Item No.** 8 **Resolution No.** 1655

विषय : प. खानदेश जिल्हा पिपल्स एज्युकेशन सोसायटी, धुळे या संस्थेला चाळीसगाव सर्व्हे क्रमांक - ४६६ व ४६७ मधील पर्यायी जागा देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प. खानदेश जिल्हा पिपल्स एज्युकेशन सोसायटी, धुळे या संस्थेला धुळे येथे चाळीसगाव रोड लगत सर्व्हे क्रमांक - ४६६ व ४६७ मधील सुमारे १७०८ चौ. मीटर क्षेत्रफळाचा भूखंड खालील अटींवर प्रथम ३० वर्षांच्या कालावधीसाठी शाळेसाठी भाडेपट्ट्याने देण्यात यावा.
१) भूखंडाचे अधिमूल्य प्राधिकरणाच्या जमिनीविषयक धोरणानुसार आकारण्यात यावे.
२) जमिनीच्या अधिमूल्याच्या रकमेच्या १ टक्का वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा.
३) शिक्षणाचे माध्यम मराठीतून असावे.
४) वसाहतीमधील रहिवाशांना मुलांना प्राधान्याने प्रवेश देण्यात यावा.
५) या प्रयोजनासाठी (शाळेसाठी) भूखंड देण्यात आला आहे त्या प्रयोजनाचे पालन केले जात आहे याची खात्री करून घेण्यासाठी औरंगाबाद मंडळाचे मुख्य अधिकारी किंवा त्यांनी नेमणूक केलेल्या अधिकाऱ्यांची कार्यकारी मंडळावर नेमणूक करावी.
६) भाडेपट्टा करारनाम्यातील इतर शर्ती व अटी बंधनकारक राहतील.

**Item No.** 9 **Resolution No.** 1656

विषय : वर्सोवा व मुलुंड येथे जागतिक बँक प्रकल्पांतर्गत उच्च उत्पन्न गटाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी विकसित केलेल्या भूखंडासाठी अधिमूल्य ठरविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, वर्सोवा, मुलुंड, कांदिवली, गोराई, पाचपाखडी व ठाणे येथे जागतिक बँक प्रकल्पांतर्गत विकसित भूखंड उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण सहकारी संस्थांना वितरित करताना चटईक्षेत्रासाठी खालीलप्रमाणे दर आकारण्यास मान्यता देण्यात येते.

| | नाव | दर चौ. मीटर चटईक्षेत्रासाठी ठरविण्यात आलेल्या अधिमूल्याचा दर |
|---|---|---|
| १. | गोराई रोड | रुपये १०५०/- |
| २. | कांदिवली | रुपये १०५०/- |
| ३. | वर्सोवा | रुपये २५००/- |
| ४. | मुलुंड | रुपये १६००/- |
| ५. | पाचपाखडी | रुपये ७२०/- |
| ६. | माजिवडे-ठाणे | रुपये ७२०/- |

मात्र हे दर चालू आर्थिक वर्षासाठी १० टक्के वाढ करून आकारावेत आणि त्यानंतर दरवर्षी त्या दरात १० टक्के वाढ करण्यात यावी.

**Item No.** 10 **Resolution No.** 1657

विषय : नागरी नूतनीकरण योजना "कामाठीपुरा ११, १२ व १३ वी गल्ली (टप्पा - ३) बांधकामाच्या निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, या योजनेच्या बांधकामासाठी "मे. राहुल कन्स्ट्रक्शन कंपनी" यांची अंदाजित रकमेच्या (अंदाजित रक्कम रुपये ९७,९७,२०४/-) ४.६८ टक्के जास्त बोलीची रक्कम रुपये १,०२,५५,७१३.१४ ची निविदा मंजूर करण्यात येते.

**Item No.** 11 **Resolution No.** 1658

विषय : सर्व्हे क्रमांक ३८६ मुलुंड (पूर्व) येथे झोपडपट्टीवासियांसाठी ६१२ (तळमजला अधिक १) गाळे इमारतीच्या बांधकामासाठी निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, या योजनेच्या सर्व्हे क्रमांक ३८६ मुलुंड (पूर्व) येथील झोपडपट्टीवासियांसाठी ६१२ गाळ्यांच्या बांधकामासाठी "मे. क्लासिक कन्स्ट्रक्शन कंपनी" यांची रुपये १,६६,००,०००/- ची बोली मंजूर करण्यात येते.

| Item No. | 12 | Resolution No. | 1659 |
|---|---|---|---|

विषय : धारावी मंजूर विकास योजनांमध्ये नोव्हेंबर १९८८ मध्ये केलेल्या किरकोळ फेरबदलाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, धारावीच्या मंजूर विकास योजनेमध्ये प्राधिकरणाने, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अनुसार नोव्हेंबर १९८८ मध्ये काही किरकोळ बदल करण्याचे ठरविले होते, हे किरकोळ बदल कायद्यातील कलम ३७ अनुसार प्रसिद्ध करण्यात आले हे त्यावर आलेल्या तक्रारी व सूचना यांच्या सुनावणीसाठी नेमलेल्या अध्यक्ष/प्राधिकरण व सचिव (नगर विकास) यांच्या समितीने सादर केलेल्या सुनावणी अहवालानुसार विकास योजनेमध्ये केलेल्या किरकोळ बदलास मान्यता देण्यात येते.

| Item No. | 13 | Resolution No. | 1660 |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणातर्फे बृहन्मुंबई येथे घ्यावयाची मोठ्या प्रमाणात घरबांधणी योजना (मास हाऊसिंग प्रोजेक्ट) विकसकांची निवड निश्चित करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बृहन्मुंबईत हाती घ्यावयाच्या मोठ्या प्रमाणावरील घरबांधणी योजनेसाठी विकसकांची निवड करण्याच्या दृष्टीने आलेल्या अर्जदारांचे मूल्यमापन करण्यासाठी प्राधिकरणाने नेमलेल्या समितीने केलेल्या शिफारशीस अनुसरून बाब टिप्पणात जोडलेल्या यादी क्रमांक १ व यादी क्रमांक २ मध्ये दर्शविलेल्या पात्र विकसकांच्या सूचीस मान्यता देण्यात येते. विकसकांची पूर्वपात्रता ही विशेष पंजीकरणाचे स्वरुपात असल्यामुळे अशा सर्व पात्र विकसकांकडून निविदा प्राप्त झाल्यावर त्यावेळी गुणवत्ता व इतर अनुषंगिक बाबी लक्षात घेऊन निर्णय घेण्यात येईल. समितीने ज्या पद्धतीने माहितीचे चिकित्सकपणे विश्लेषण करून आपले अभिप्राय सदर केले त्याबद्दल प्राधिकरणाचे विशेष समाधान व्यक्त केले.

| Item No. | 14 | Resolution No. | 1661 |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ कर्मचारी को. ऑप. क्रेडिट सोसायटी (लिमिटेड)ला कर्ज मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ कर्मचारी को. ऑप. क्रेडिट सोसायटी (लिमिटेड) ला रुपये १० लाखांचे कर्ज खालील अटींच्या अधीन राहून मंजूर करण्याच्या केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

१) सदर अर्जाची परतफेड १२ मासिक हप्त्याने व्याजासहित करावयाची आहे.

२) सदर कर्जावर दरसाल दर शेकडा रुपये १०/- याप्रमाणे व्याजाची आकारणी करण्यात यावी.

३) व्याजासहित मासिक हप्ता पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत येणे आवश्यक राहील.

**Item No.** 15 **Resolution No.** 1662

विषय : मुख्य लेखा अधिकारी/मुंबई मंडळ या पदाच्या वेतनश्रेणीत वाढ करणे.
आणि
वित्त नियंत्रक/पंतप्रधान अनुदान प्रकल्प या पदनामाऐवजी मुख्य लेखाधिकारी/पंतप्रधान अनुदान प्रकल्प असा बदल करून त्यानुसार वेतनश्रेणी ठरविणे.

ठराव : एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतला.
१) मुख्य लेखा अधिकारी/मुंबई मंडळ या पदाची वेतनश्रेणी रुपये १०००/- १५००/- याऐवजी रुपये १५००-१९५२ (सुधारित वेतनश्रेणी रुपये ३०००/-५०००/- एवढी वाढविण्यात यावी.
२) वित्त नियंत्रक/पंतप्रधान अनुदान प्रकल्प या पदनामाऐवजी "मुख्य लेखा अधिकारी/पंतप्रधान अनुदान प्रकल्प" असा बदल करण्यात यावा व त्या पदाची वेतनश्रेणी रुपये १५००/- १९२५/- याऐवजी रुपये १०००/- १५००/- (सुधारित वेतनश्रेणी रुपये ३०००/- ४७००/-) एवढी करण्यात यावी.
३) वरीलप्रमाणे बदल करण्याची कार्यवाही दिनांक ११.४.१९८९ पासून पूर्वलक्षी प्रभावाने करण्यात यावी.

---

**Item No.** 16 **Resolution No.**

विषय : रोजंदारीवर किंवा कार्यव्ययी आस्थापनेवर मिळून पाच वर्षे सेवा पूर्ण झाल्यावर कामगारांना हंगामी नियत आस्थापनेवर घेणे.

ठराव :

---

**Item No.** 17 **Resolution No.**

विषय : आय. आय. टी. बॉम्बे स्टाफ सहकारी गृहनिर्माण संस्थेस पवई येथे जमीन देण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 18 **Resolution No.**

विषय : सिद्धार्थ नगर विभाग - १ गोरेगाव येथील बैठी इमारत क्र. १७ मिळण्याबद्दल महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची विनंती.

ठराव :

---

**Item No.** 19 **Resolution No.** 1663

विषय : रत्नागिरी येथे निर्मिती केंद्र स्थापन करण्यासाठी दोन गाळे आणि त्यालगतची जमीन देणेबाबत.

ठराव : एकमताने असा निर्णय घेतला की,
१) रत्नागिरी येथील मध्यम उत्पन्न गटाच्या ब्लॉक क्रमांक १९ मधील २ गाळे निर्मिती केंद्रासाठी भाडेपट्टीने देण्यास मान्यता देण्यात येत आहे व त्यासाठी आर्थिक भाडे आणि सेवाआकार करण्यात यावेत.
२) मध्यम उत्पन्न गटाच्या ब्लॉक क्रमांक १९ ला लागून असलेल्या सुविधांसाठी राखून ठेवलेल्या १६४४.९८ चौ. मीटर क्षेत्रफळाच्या भूखंड निर्मिती केंद्रासाठी ३० वर्षांच्या मुदतीकरिता लायसेन्स पद्धतीवर देण्यास व त्यासाठी दरवर्षी रु. १/- लायसेन्स फी आकारावी. या भूखंडाची किंमत रत्नागिरी येथील गृहनिर्माण योजनेच्या लाभार्थीकडून वसूल करण्यात यावी.

---

**Item No.** 20 **Resolution No.** 1664

विषय : दिंडोशी, मालाड येथील मध्यम उत्पन्न गट - २ अंतर्गत योजनेसाठी कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.
मध्यम उत्पन्न गट - २ बरोबर ३६० गाळे
(योजना क्रमांक - ६५२७)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, आवास व नगरविकास निगम, नवी दिल्ली (हुडको) यांनी विहित केलेल्या अटींवर, दिंडोशी, मालाड येथील मध्यम उत्पन्न गट-२ अंतर्गत ३६० गाळ्यांच्या योजनेसाठी रुपये २३०.९६ लक्ष कर्ज हुडकोकडून घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

---

**Item No.** 21 **Resolution No.** 1665

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या गृहनिर्माण योजनांच्या हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, आवास व नगरविकास निगम, नवी दिल्ली (हुडको) यांनी विहित केलेल्या अटींवर विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता ''अ'' मध्ये दर्शविल्याप्रमाणे यवतमाळ, नाशिक, परभणी, अहमदनगर, नागपूर, उस्मानाबाद, सोलापूर आणि पुणे जिल्ह्यातील बेघर भूमिहीनांकरिता ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी एकूण रुपये १५२.६७ लक्ष हुडकोकडून कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

| Item No. | 22 | Resolution No. | 1666 |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, आवास व नगरविकास निगम, नवी दिल्ली (हुडको) यांनी विहित केलेल्या अटींवर, बाब टिप्पणीस जोडलेल्या तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण रुपये ६८१.९३ कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.
यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठकीचे कामकाज संपले.

**Meeting No.** 71 **Meeting Date** 29-May-1

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २५.४.१९८९ रोजी झालेल्या ७०व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 1680

विषय : रोजंदारीवर किंवा कार्यव्ययी आस्थापनेवर व दोन्ही आस्थापनांवर मिळून पाच वर्षे सेवा पूर्ण झाल्यावर कामगारांना हंगामी नियत आस्थापनेवर घेणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या कार्यालयातील रोजंदारी किंवा कार्यव्ययी आस्थापनेवर वा दोन्ही आस्थापनांवर मिळून पाच वर्षे सेवा पूर्ण केलेल्या बाब टिप्पणात जोडलेल्या यादीमधील २४ कामगारांना, दिनांक १.१०.१९८८ पासून एका कामगाराला दिनांक १.१०.१९८४ पासून व एका कामगाराला दिनांक १.१०.१९८५ पासून हंगामी नियत आस्थापनेवर घेण्यास व सेवा विषयक फायदे देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 2 **Resolution No.** 1680

विषय : रोजंदारीवर किंवा कार्यव्ययी आस्थापनेवर व दोन्ही आस्थापनांवर मिळून पाच वर्षे सेवा पूर्ण झाल्यावर कामगारांना हंगामी नियत आस्थापनेवर घेणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या कार्यालयातील रोजंदारी किंवा कार्यव्ययी आस्थापनेवर वा दोन्ही आस्थापनांवर मिळून पाच वर्षे सेवा पूर्ण केलेल्या बाब टिप्पणात जोडलेल्या यादीमधील २४ कामगारांना, दिनांक १.१०.१९८८ पासून एका कामगाराला दिनांक १.१०.१९८४ पासून व एका कामगाराला दिनांक १.१०.१९८५ पासून हंगामी नियत आस्थापनेवर घेण्यास व सेवा विषयक फायदे देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 3 **Resolution No.** 1667

विषय : प्राधिकरणाच्या कार्यालयाकडे असलेल्या वाहनांची देखभाल व दुरुस्ती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या अखत्यारीत असलेल्या वाहनांची दुरुस्ती व देखभालीसाठी येणाऱ्या खर्चासाठी प्रत्येक वाहनावर दरवर्षी १५,०००/- पर्यंत खर्च करण्याचे अधिकार सचिव/प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत. मात्र प्रत्येक वाहनावर एकावेळी करावयाचा खर्च रुपये ४०००/- च्या मर्यादित असावा.

**Item No.** 4 **Resolution No.** 1668

विषय : “एचडीएफसी”, “हुडको” व इतर वित्तीय संस्था तसेच बँका आदींबरोबर पंतप्रधान अनुदान प्रकल्प/प्राधिकरणाच्या वतीने कर्जाचे करारपत्र करण्याचे अधिकार मुख्य लेखाधिकारी/पंतप्रधान अनुदान प्रकल्प व उपमुख्य अभियंता, पंतप्रधान अनुदान प्रकल्प यांना देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत विविध योजना कार्यान्वित करण्यासाठी “एचडीएफसी”, “हुडको” वा इतर वित्तीय संस्थाकडून वा बँकांकडून पंतप्रधान अनुदान प्रकल्पास मिळणाऱ्या कर्जाचे, पंतप्रधान अनुदान प्रकल्प, प्राधिकरणाचे वतीने करारपत्र करण्याचे तसेच करारपत्रावर प्राधिकरणाची सामान्य मुद्रा (कॉमन सील) लावण्याचे अधिकार पृथकपणे मुख्य लेखाधिकारी, पंतप्रधान अनुदान प्रकल्प व उपमुख्य अभियंता, पंतप्रधान अनुदान प्रकल्प यांना देण्यास मान्यता देण्यात येते. त्याचप्रमाणे कर्जास तारण म्हणून बँक हमी देण्याऱ्या बँकेने मागितल्यास प्रति हमी (काऊंटर गॅरंटी) देण्याचे अधिकार, मुख्य लेखाधिकारी, पंतप्रधान अनुदान प्रकल्प यांना देण्यात मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 5 **Resolution No.** 1674

विषय : सर्व्हे क्रमांक १६३/(भाग) कांदिवली (पूर्व) येथील माध्यमिक शाळेसाठी भुवनेश्वरी एज्युकेशन सोसायटीला वितरित केलेल्या भूखंडाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, भुवनेश्वरी एज्युकेशन सोसायटीस सर्व्हे क्रमांक १६३ (भाग) कांदिवली (पूर्व) येथे माध्यमिक शाळेसाठी वाटप केलेल्या भूखंडाचा प्राधिकरणाने विकास करून द्यावा ही संस्थेची विनंती अमान्य करण्यात यावी.

---

**Item No.** 5 **Resolution No.** 1674

विषय : सर्व्हे क्रमांक १६३/(भाग) कांदिवली (पूर्व) येथील माध्यमिक शाळेसाठी भुवनेश्वरी एज्युकेशन सोसायटीला वितरित केलेल्या भूखंडाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, भुवनेश्वरी एज्युकेशन सोसायटीस सर्व्हे क्रमांक १६३ (भाग) कांदिवली (पूर्व) येथे माध्यमिक शाळेसाठी वाटप केलेल्या भूखंडाचा प्राधिकरणाने विकास करून द्यावा ही संस्थेची विनंती अमान्य करण्यात यावी.

---

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : सर्व्हे क्रमांक १६३/(भाग) कांदिवली (पूर्व) येथील माध्यमिक शाळेसाठी भुवनेश्वरी एज्युकेशन सोसायटीला वितरित केलेल्या भूखंडाबाबत.

ठराव :

| **Item No.** | **6** | **Resolution No.** | **1669** |
|---|---|---|---|

विषय : कोकण मंडळाच्या भिवंडी येथील गृहनिर्माण योजनेच्या जागेवर जाण्यासाठी वाट तयार करण्याकरिता हलवाव्या लागणाऱ्या सुमारे ४० झोपडपट्टीवासियांना विकसित भूखंड देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

भिवंडी येथे कोकण मंडळाच्या कार्यान्वित केलेल्या गृहनिर्माण योजनेच्या जागेवर जाण्यासाठी वाट करून देण्याच्या दृष्टीने त्या जमिनीवर असलेल्या झोपडपट्टीवासियांना तेथून हलवून त्यांना पर्यायी जागा म्हणून त्या गृहनिर्माण योजनेत विकसित केलेल्या सोयींसह भूखंडांपैकी सुमारे ४० भूखंड झोपडपट्टीवासियांना विक्री तत्त्वावर वाटप करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मात्र प्रत्येक लाभार्थींचे उत्पन्न लक्षात घेऊन त्या त्या उत्पन्न गटासाठी हुडकोने ठरवून दिलेल्या दराने व्याज आकारून भूखंडाची किंमत वसूल करावी.

या झोपडपट्टीवासियांना भूखंडाचे वाटप करताना उत्पन्न मर्यादा व महाराष्ट्र राज्यात १५ वर्षांचे वास्तव्य इत्यादी पात्रतेच्या अटी शिथिल करण्यात याव्यात.

| **Item No.** | **6** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : कोकण मंडळाच्या भिवंडी येथील गृहनिर्माण योजनेच्या जागेवर जाण्यासाठी वाट तयार करण्याकरिता हलवाव्या लागणाऱ्या सुमारे ४० झोपडपट्टीवासियांना विकसित भूखंड देणे.

ठराव :


| **Item No.** | **6** | **Resolution No.** | **1669** |
|---|---|---|---|

विषय : कोकण मंडळाच्या भिवंडी येथील गृहनिर्माण योजनेच्या जागेवर जाण्यासाठी वाट तयार करण्याकरिता हलवाव्या लागणाऱ्या सुमारे ४० झोपडपट्टीवासियांना विकसित भूखंड देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

भिवंडी येथे कोकण मंडळाच्या कार्यान्वित केलेल्या गृहनिर्माण योजनेच्या जागेवर जाण्यासाठी वाट करून देण्याच्या दृष्टीने त्या जमिनीवर असलेल्या झोपडपट्टीवासियांना तेथून हलवून त्यांना पर्यायी जागा म्हणून त्या गृहनिर्माण योजनेत विकसित केलेल्या सोयींसह भूखंडांपैकी सुमारे ४० भूखंड झोपडपट्टीवासियांना विक्री तत्त्वावर वाटप करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मात्र प्रत्येक लाभार्थींचे उत्पन्न लक्षात घेऊन त्या त्या उत्पन्न गटासाठी हुडकोने ठरवून दिलेल्या दराने व्याज आकारून भूखंडाची किंमत वसूल करावी.

या झोपडपट्टीवासियांना भूखंडाचे वाटप करताना उत्पन्न मर्यादा व महाराष्ट्र राज्यात १५ वर्षांचे वास्तव्य इत्यादी पात्रतेच्या अटी शिथिल करण्यात याव्यात.

**Item No. 7 Resolution No. 1670**

विषय : पलुस येथे औद्योगिक कामगारांसाठी बांधलेल्या १०० गाळ्यांचे विक्रीखत करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, जेथे एखाद्या सहकारी संस्थेने/गाळेधारकांनी गाळ्यांची संपूर्ण किंमत व इतर देणी भरली आहेत तेथे गाळ्यांना केलेले अतिरिक्त बांधकाम विचारात न घेता इमारतींचे/गाळ्यांचे विक्रीखत करून त्यांच्या मालकीचे हस्तांतरण सहकारी संस्था/व्यक्तिगत गाळाधारक यांच्याकडे करण्यास मान्यता देण्यात येते. मात्र गाळ्याचे जे अधिकृत बांधकाम असेल तेवढेच विचारात घेऊन विक्रीखत करण्याची कार्यवाही करावी.

**Item No. 8 Resolution No. 1671**

विषय : श्री. रामदास शं. गायकवाड, विधानसभा सदस्य यांना अकोला येथे मध्यम उत्पन्न गटाचा एम-२० क्रमांकाचा गाळा शासनाच्या स्वेच्छा निर्णयानुसार वाटप करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. रामदास शं. गायकवाड, विधानसभा सदस्य यांना अकोला येथील मध्यम उत्पन्न गटाचा एम-२० क्रमांकाचा गाळा त्यातील कार्यालय अन्यत्र हलवून वाटप करावा. या शासनाच्या आदेशांची अंमलबजावणी करण्यात यावी. या गाळ्याला कार्यालयासाठी जे अतिरिक्त बांधकाम केले आहे त्यासह गाळ्यांची विक्री अतिरिक्त बांधकामाच्या किंमतीसह गाळ्याची किंमत आकारून त्याचे वाटप श्री. गायकवाड यांना करावे. गाळ्याला केलेल्या अतिरिक्त बांधकामामुळे त्याच्या किंमतीत वाढ झाली असल्याने तो उच्च उत्पन्न गटाचा गाळा असे धरून तो श्री. गायकवाड यांना वाटप करावा.

**Item No. 8 Resolution No. 1671**

विषय : श्री. रामदास शं. गायकवाड, विधानसभा सदस्य यांना अकोला येथे मध्यम उत्पन्न गटाचा एम-२० क्रमांकाचा गाळा शासनाच्या स्वेच्छा निर्णयानुसार वाटप करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. रामदास शं. गायकवाड, विधानसभा सदस्य यांना अकोला येथील मध्यम उत्पन्न गटाचा एम-२० क्रमांकाचा गाळा त्यातील कार्यालय अन्यत्र हलवून वाटप करावा. या शासनाच्या आदेशांची अंमलबजावणी करण्यात यावी. या गाळ्याला कार्यालयासाठी जे अतिरिक्त बांधकाम केले आहे त्यासह गाळ्यांची विक्री अतिरिक्त बांधकामाच्या किंमतीसह गाळ्याची किंमत आकारून त्याचे वाटप श्री. गायकवाड यांना करावे. गाळ्याला केलेल्या अतिरिक्त बांधकामामुळे त्याच्या किंमतीत वाढ झाली असल्याने तो उच्च उत्पन्न गटाचा गाळा असे धरून तो श्री. गायकवाड यांना वाटप करावा.

**Item No.** 9 **Resolution No.** 1672

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पातर्फे राबविण्यात येणाऱ्या नागरी नूतनीकरण योजनेखाली उपलब्ध होणाऱ्या गाळ्यांची विक्री बाजार भावानुसार ठरलेल्या विक्री रकमेबाबत हप्त्यांची विक्री.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पंतप्रधान अनुदानाच्या प्रकल्पाच्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या नागरी नूतनीकरण योजनेत उपलब्ध होणाऱ्या जादा गाळ्यांची विक्री प्राधिकरणाच्या ६९ व्या बैठकीपुढे विचारार्थ ठेवलेल्या बाब क्रमांक ६९/८ च्या टिप्पणात नमूद केलेली कार्यपद्धती अनुसरून करण्यास मान्यता देण्यात येते.
या प्रकल्पाच्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या नागरी नूतनीकरण योजनेत उपलब्ध होणाऱ्या जादा गाळ्यांची विक्री मूळ भाडेकरूंना प्राधिकरणाने मान्य केलेल्या दरानुसार करताना विक्री किंमत पाच हप्त्यात फेडण्याची सवलत देण्यास मान्यता देण्यात येते. मात्र हे सर्व हप्ते गाळ्यांच्या वाटपानंतर दोन वर्षांच्या कालावधीत दहा टक्के व्याजासह फेडले पाहिजेत.

**Item No.** 10 **Resolution No.** 1675

विषय : जागतिक बँक प्रकल्पाखालील चारकोप, कांदिवली येथील सोयीसह भूखंड योजनेतील दुकाने व इतर व्यवसायासाठी राखून ठेवलेल्या भूखंडाचे वितरण.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, या प्रस्तावावर सर्व दृष्टीने विचार करून निर्णय घेण्याचे अधिकार प्राधिकरणाच्या उपाध्यक्षांना देण्यात यावेत.

**Item No.** 10 **Resolution No.** 1675

विषय : जागतिक बँक प्रकल्पाखालील चारकोप, कांदिवली येथील सोयीसह भूखंड योजनेतील दुकाने व इतर व्यवसायासाठी राखून ठेवलेल्या भूखंडाचे वितरण.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, या प्रस्तावावर सर्व दृष्टीने विचार करून निर्णय घेण्याचे अधिकार प्राधिकरणाच्या उपाध्यक्षांना देण्यात यावेत.

**Item No.** 11 **Resolution No.** 1676

विषय : महाराष्ट्रात विपुल प्रमाणात घरबांधणी करण्यासाठी विश्वसनीय व उत्तम प्रकारचे बांधकाम करता यावे यासाठी सुदृढ गरजा मागविण्यासाठी नव्या धोरणाचा शोध.

मेसर्स बी. जी. शिर्के, आणि कंपनी यांना बांधकाम देण्यासंबंधी.

ठराव : निर्णय घेतला की,
शासन निर्णय, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाच्या पत्र क्र. एचएससी-३३८४/(६४)/का. ६, दिनांक ११.१२.१९८४ मधील आणि शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २१.४.१९८९ च्या बीआरएफ-१०८७/सीआर-१४५/का. ६ क्रमांकाच्या पत्रातील आदेशांची अंमलबजावणी करण्यात यावी. त्यासाठी उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई मंडळाचे सभापती आणि प्राधिकरणाचे दोन सदस्य, श्री. व्ही. व्ही. बडवे व डॉ. सुरेश खेडेकर यांची समिति विभिन्न मंडळे आणि संचालनालये यांना शासनाच्या वरील आदेशानुसार बांधकामाचे ठेके देण्याच्या मार्गदर्शक सूचना तयार करण्यासाठी नेमण्यात यावी. त्या समितीने मार्गदर्शक सूचना तयार करून प्राधिकरणाच्या विचारार्थ ठेवाव्यात.

**Item No.** 11 **Resolution No.** 1676

विषय : महाराष्ट्रात विपुल प्रमाणात घरबांधणी करण्यासाठी विश्वसनीय व उत्तम प्रकारचे बांधकाम करता यावे यासाठी सुदृढ गरजा मागविण्यासाठी नव्या धोरणाचा शोध.

मेसर्स बी. जी. शिर्के, आणि कंपनी यांना बांधकाम देण्यासंबंधी.

ठराव : निर्णय घेतला की,
शासन निर्णय, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाच्या पत्र क्र. एचएससी-३३८४/(६४)/का. ६, दिनांक ११.१२.१९८४ मधील आणि शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २१.४.१९८९ च्या बीआरएफ-१०८७/सीआर-१४५/का. ६ क्रमांकाच्या पत्रातील आदेशांची अंमलबजावणी करण्यात यावी. त्यासाठी उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई मंडळाचे सभापती आणि प्राधिकरणाचे दोन सदस्य, श्री. व्ही. व्ही. बडवे व डॉ. सुरेश खेडेकर यांची समिति विभिन्न मंडळे आणि संचालनालये यांना शासनाच्या वरील आदेशानुसार बांधकामाचे ठेके देण्याच्या मार्गदर्शक सूचना तयार करण्यासाठी नेमण्यात यावी. त्या समितीने मार्गदर्शक सूचना तयार करून प्राधिकरणाच्या विचारार्थ ठेवाव्यात.

**Item No.** 12 **Resolution No.** 1677

विषय : मानेवाडा, नागपूर येथे अल्प उत्पन्न गटाखाली विणकरांसाठी बांधलेल्या २२४ गाळ्यांच्या ठेकेदारास भाववाढी पोटी (एस्कलेशन) रक्कम देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मानेवाडा, नागपूर येथील २२४ गाळ्यांचे बांधकाम पूर्ण करण्यास १२ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी लागल्यामुळे सदरील कामाचे ठेकेदार मेसर्स अत्तरसिंग सेठी आणि कंपनी यांना त्यांनी १२ महिन्यांनंतर केलेल्या/करावे लागणाऱ्या प्रमाणशीर कामावर भाववाढ (एस्कलेशन) देण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 12 **Resolution No.** 1677

विषय : मानेवाडा, नागपूर येथे अल्प उत्पन्न गटाखाली विणकरांसाठी बांधलेल्या २२४ गाळ्यांच्या ठेकेदारास भाववाढी पोटी (एस्कलेशन) रक्कम देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मानेवाडा, नागपूर येथील २२४ गाळ्यांचे बांधकाम पूर्ण करण्यास १२ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी लागल्यामुळे सदरील कामाचे ठेकेदार मेसर्स अत्तरसिंग सेठी आणि कंपनी यांना त्यांनी १२ महिन्यांनंतर केलेल्या/करावे लागणाऱ्या प्रमाणशीर कामावर भाववाढ (एस्कलेशन) देण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 13 **Resolution No.** 1673

विषय : सर्व्हे क्रमांक ५०१, धारावी येथील स्थलांतरित झोपडपट्टीवासियांसाठी ४०० गाळे ज्योत्यावरील बांधकामासाठी निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे नं. ५०१, धारावी येथील ४०० गाळ्यांच्या ज्योत्यावरील बांधकामाची विभागणी करण्यास मान्यता देण्यात येते. त्याचप्रमाणे २४० गाळ्यांच्या बांधकामासाठी "मेसर्स क्लासिक कन्स्ट्रक्शन कंपनी" यांनी रुपये ८७,४८,०००/- ची बोली आणि "मेसर्स माय कन्स्ट्रक्शन कंपनी" यांची १६० गाळ्यांच्या बांधकामासाठी रुपये ५८,३२,०००/- ची बोली मंजूर करण्यास मान्यता देण्यात येते.

यानंतर बैठकीचे काम तहकूब करून ते दिनांक २९.५.१९८९ रोजी सकाळी ११.०० वाजता पुढे चालू करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार त्यादिवशी बैठक पुढे चालू झाली तेव्हा खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| | |
|---|---|
| १. श्री. प्रभाकर का. कुंटे | अध्यक्ष |
| २. श्री. अवधेश प्रसाद सिन्हा | उपाध्यक्ष |
| ३. श्री. व्ही. व्ही. बडवे | सदस्य |
| ४. डॉ. सुरेश खेडेकर | सदस्य |
| ५. श्री. सरदारीलाल सोनी | सदस्य |
| ६. श्री. सुरेश मांजरेकर | सदस्य |

बैठकीस खालील सदस्य अनुपस्थित होते.

१. सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग.
२. सचिव, महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग.
३. श्री. पी. एम. आपटे सदस्य

या बैठकीस विशेष निमंत्रित म्हणून प्रादेशिक मंडळाचे खालील सभापती उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. प्रा. जनार्दन सी. चांदुरकर | सभापती/मुंबई मंडळ |
| २. श्री. विठ्ठल लडकत | सभापती/पुणे मंडळ |

बैठक सुरू झाल्यानंतर कार्यसूचीवरील उरलेले विषय खालीलप्रमाणे विचारार्थ घेण्यात आले.

**Item No.** 14 **Resolution No.** 1678

विषय : संत तुकाराम, पिंपरी, पुणे येथे उच्च उत्पन्न गटाच्या १८० गाळ्यांच्या प्रकल्पातील गट - ३ खालील जमीन आर. ए. एज्युकेशन सोसायटी या संस्थेला भाडेपट्ट्याने देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे येथील उच्च उत्पन्न गटाच्या १८० गाळ्यांच्या प्रकल्पातील तिसऱ्या गटातील ६० गाळ्यांच्या बांधकामासाठी आरक्षित करून ठेवलेली जमीन त्यावर केलेल्या कामासह आर. ए. एज्युकेशन सोसायटी या संस्थेस खालील अटींवर भाडेपट्ट्याने वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतीविषयक धोरणानुसार प्रत्यक्ष किंमत आणि वार्षिक भाडेपट्टी आकारण्यात यावी.
२. या जमिनीवर ठेकेदाराने जे काम केले आहे त्याची किंमत तसेच नुकसान भरपाईपोटी ठेकेदारास द्यावी लागणारी संपूर्ण रक्कम संस्थेकडून वसूल करण्यात यावी.
३. या जमिनीवर प्राधिकरणाने गाळे बांधले असते तर त्यांच्या किंमतीमधून प्राधिकरणास जो नफा झाला असता त्याची रक्कम संस्थेकडून वसूल करावी.
४. जमिनीच्या भाडेपट्ट्याच्या नेहमीच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून संस्थेस जमिनीचे वाटप करण्यात यावे.

**Item No.** 15 **Resolution No.** 1679

विषय : पुणे येथील सिव्हील जज सिनियर डिव्हिजन यांचे निर्णयानुसार मेसर्स बी. जी. शिर्के आणि कंपनीच्या अनामत रक्कम व्याजासह परत करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणात नमूद केल्याप्रमाणे मेसर्स बी. जी. शिर्के आणि कंपनी यांनी दाखल केलेल्या दाव्यासंबंधित त्यांची जप्त करून महसुलात जमा केलेली इसाऱ्याची रक्कम रुपये ५०,०००/- दाव्याच्या कर्जासह व व्याजासह मिळून एकूण रुपये ८६,६९५/- (बाब टिप्पणात दिलेल्या तपशीलाप्रमाणे) त्यांना कोर्टाच्या आदेशानुसार परत देण्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 16 **Resolution No.**

विषय : गाळ्यांच्या विक्रीची किंमत ठरविण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 17 **Resolution No.**

विषय : मुंबई बेटांतली उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्रचना कार्यक्रमाची अंमलबजावणीबाबत नेमलेल्या समितीचा अहवाल.

ठराव :

**Item No.** **17** **Resolution No.**

विषय : मुंबई बेटांतली उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्रचना कार्यक्रमाची अंमलबजावणीबाबत नेमलेल्या समितीचा अहवाल.

ठराव :

**Meeting No.** 72 **Meeting Date** 29-Jun-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २५.५.१९८९ व २९.५.१९८९ या दोन दिवशी झालेल्या ७१ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 1681

विषय : श्री. श्री. ग. सहस्त्रभोजनी, जनसंपर्क अधिकारी, जागतिक बँक प्रकल्प यांना मुदतवाढ देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. श्री. ग. सहस्त्रभोजनी, जनसंपर्क अधिकारी, जागतिक बँक प्रकल्प यांच्या नेमणूकीस दिनांक २.७.१९८९ पासून १ वर्षाची मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येते. सुरुवातीस त्यांची पुनर्नेमणूक ज्या अटी व शर्तीवर करण्यात आली होती, त्याच अटी व शर्तीवर त्यांना १ वर्षाची मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 3 **Resolution No.** 1682

विषय : श्री. ना. ल. कासले, सेवानिवृत्त जिल्हा निरीक्षक भूमि-अभिलेख जागतिक बँक प्रकल्प यांना मुदतवाढ देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. ना. ल. कासले, सेवानिवृत्त जिल्हा निरीक्षक, भूमि-अभिलेख यांच्या कंत्राटी पद्धतीवरील पुनर्नेमणूकीस दिनांक १.८.१९८९ पासून आणखी १ वर्षाची मुदतवाढ त्याच अटी व शर्तीवर देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 4 **Resolution No.**

विषय : गाळ्यांच्या विक्रीची किंमत ठरविण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : राष्ट्रीय गृहनिर्माण धोरण.

ठराव :

**Item No.** 6 **Resolution No.** 1683

विषय : सर्व्हे क. ३८६ (विभाग) मुलुंड (पूर्व) येथे झोपडपट्टीवासियांसाठी ९५२ (तळमजला अधिक १) गाळे इमारतीच्या बांधकामासाठी निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे नं. ३८६ मुलुंड (पूर्व) येथील झोपडपट्टीवासियांसाठी ९५२ गाळ्यांच्या बांधकामासाठी मेसर्स क्लासिक कन्स्ट्रक्शन कंपनीची रुपये २,५२,४०,०००/- बोलीची निविदा मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** **7** **Resolution No.** **1684**

विषय : नागरी नूतनीकरण योजना.

गन पाऊडर लेन, माझगाव "ई" वॉर्ड, इमारतीच्या बांधकामाच्या निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, या कामाच्या निविदांबाबत मेसर्स माय कन्स्ट्रक्शन कंपनीशी प्रत्यक्ष वाटाघाटी करण्यात याव्या. या वाटाघाटी संचालक/पंतप्रधान अनुदान प्रकल्प/प्राधिकरण, मुख्य अभियंता/प्राधिकरण व मुख्य अभियंता/पंतप्रधान अनुदान प्रकल्प/प्राधिकरण यांनी कराव्या आणि वाटाघाटीद्वारे मेसर्स माय कन्स्ट्रक्शन कंपनीने जर बोली रकमेच्या (रुपये १,४२,६४,७५७/-) आणखी ३ प्रतिशत खाली येणेस कंपनीने तयारी दर्शविल्यास त्यांची निविदा मंजूर करण्यात यावी अन्यथा या कामासाठी पुन्हा निविदा मागविण्यात याव्यात.

यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठकीचे कामकाज संपले.

**Item No.** 6 **Resolution No.** 1687

विषय : मुंबई नागरी विकास निवारा प्रकल्प योजनेअंतर्गत लाभार्थींना, जागतिक बँक प्रकल्पातर्फे, दिलेल्या कर्जाच्या मदतीने बांधलेल्या घरांचा आयुर्विमा उतरविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई नागरी विकास निवारा प्रकल्पांतर्गत ज्या लाभार्थींनी, जागतिक बँक प्रकल्पातर्फे देण्यात आलेल्या कर्जाच्या मदतीने, त्यांना वितरित करण्यात आलेल्या भूखंडावर बांधकाम केले आहे, अशा लाभार्थींनी, गहाणखत करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे, कर्जाऊ रकमेची व्याजासहित परतफेड होईपर्यंत प्राधिकरणाने प्रमाणित केलेल्या संस्थेकडूनच संबंधित बांधकामाचा विमा उतरविणे आवश्यक असल्याने या निर्णयाद्वारे, प्रमाणित करण्यात येत की, वरील बाबीसाठी लाभार्थींनी विमा संचालनाय, महाराष्ट्र राज्य या संस्थेकडूनच आग विमा उतरवावा.

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : महर्षीनगर, पुणे या वसाहतीत बांधलेले गोडाऊन प्राथमिक श्शाळा चालविण्याकरिता मिळण्याची ज्ञानमंदिर शिक्षण संस्था यांची विनंती.

ठराव :

**Item No.** 8 **Resolution No.** 1688

विषय : ओशिवरा सर्व्हे क्रमांक ४१ (भाग) मुंबई येथे मध्यम उत्पन्न गटांतर्गत २८० गाळे बांधण्यात यावयाच्या कामाचा निविदा स्वीकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणी क्रमांक ७३/८ मधील बाबींचा विचार करून सर्व्हे क्रमांक ४१ (भाग) ओशिवरा येथे मध्यम उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात यावयाच्या गाळ्यांच्या कामाच्या मे. सोलंकी ब्रदर्स यांच्या गट क्रमांक १ (१६० गाळे) व गट क्रमांक २ (१२० गाळे) यासाठी आलेल्या निम्नतम निविदा खालील तपशीलानुसार स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| गट क्रमांक | कामाची अंदाजित रक्कम | मे. सोलंकी ब्रदर्स यांचा निविदेतील दर | निविदेची रक्कम |
|---|---|---|---|
| १)१६० गाळे | रु. ६८,८४,०४८/- | १.२० टक्के कमी | रु. ६८,०१,४३९.५० (रुपये अडसष्ट लक्ष एक हजार चारशे एकोणचाळीस आणि पन्नास पैसे फक्त) |
| २)१२० | रु. ५१,६३,०३६/- | १.२० टक्के कमी | रु. ५१,०१,०७९.६० (रुपये एक्कावन्न लक्ष एक हजार एकोणऐंशी आणि पैसे साठ फक्त) |

**Item No.** 9 **Resolution No.** 1689

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाद्वारे इमारत निर्मिती केंद्र हाताळण्याकरिता संस्थेची निर्मिती करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, शासनाने इमारत निर्मिती केंद्राबाबत ठरविलेल्या धोरणांनुसार प्राधिकरणाचे या क्षेत्रातील कार्य लक्षात घेऊन प्राधिकरणापुढे सादर करण्यात आलेल्या बाब टिप्पणातील तीन प्रस्तावास खालील अटींवर मान्यता देण्यात येत आहे.

१. प्राधिकरणातर्फे सोसायटी स्थापन करण्यात यावी व त्याकरिता जरूर त्यावेळी तात्पुरती आर्थिक मदत प्राधिकरणाकडून घेण्यात यावी. मात्र सदर संस्थेची स्थापना झाल्यानंतर त्यातील विविध कार्यवाहीचा आर्थिक बोजा प्राधिकरणाच्या निधीवर पडता कामा नये.

२. प्राधिकरणाच्या ताब्यातील धारावी येथील सुमारे ४००० चौ. मी. जागा निर्मिती केंद्रासाठी सदर सोसायटीस नाममात्र भाडेपट्ट्यावर देण्यात यावी.

३. प्राधिकरणाच्या ताब्यातील औंध येथील सुमारे १५,३७९ चौ. मीटर जागा निर्मिती केंद्रासाठी सदर सोसायटीस नाममात्र भाडेपट्ट्यावर देण्यात यावी.

यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठकीचे कामकाज संपले.

**Meeting No.** 74 **Meeting Date** 16-Aug-1

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १२.७.१९८९ रोजी नागपूर येथे झालेल्या ७३ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 1691

विषय : रोख रक्कम हाताळण्याबद्दल विशेष वेतन मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, वित्त विभागाच्या दिनांक १७ ऑक्टोबर, १९८८ च्या शासन निर्णयानुसार रोख रक्कम हाताळण्याबद्दल विशेष वेतनाचे सुधारित नियम व दर प्राधिकरणाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना दिनांक १.१.१९८९ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देणे.

ठराव :

**Item No.** 4 **Resolution No.** 1692

विषय : हृदयावरील शस्त्रक्रिया, मूत्रपिंड रोपण रक्ताचा कर्करोग व बायपास कारोनरी शस्त्रक्रियेसाठी अग्रिम मंजूर करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, शासन निर्णय क्रमांक एसएजी-१०८३/४११९/पीएच-९ दिनांक २१.८.१९८५ याचा लाभ परिशिष्टातील अटींच्या अधीन राहून प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांनाही देण्यात यावा. या आदेशान्वये उपलब्ध असलेली परिपूर्ती व अग्रिम देण्याचे अधिकार उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सर्व प्रादेशिक मंडळांचे मुख्य अधिकारी यांना प्रदान करण्यात यावेत.

**Item No.** 5 **Resolution No.** 1693

विषय : अंध व अस्थिव्यंगामुळे अधू असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना विशेष वाहन भत्ता.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, वित्त विभागाच्या दिनांक ८ मार्च १९८९ च्या शासन निर्णयानुसार अंध व हातापायांच्या विकलांगतेसहित अस्थिव्यंगामुळे अधू असलेल्या प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना सुधारित दराने विशेष वाहनभत्ता लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 6 **Resolution No.** 1694

विषय : गृहनिर्माण भवनातील उपहारगृहाच्या भाडेपट्टा, पाणी व विद्युत देयके यांच्या थकबाकीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, या विषयावर निर्णय घेण्याचे अधिकार प्राधिकरणाचे मा. अध्यक्ष, यांना प्राधिकरणाच्या ६५ व्या बैठकीच्या ठराव १६०१ अन्वये देण्यात आले असल्याने त्यांनी याबाबत निर्णय घ्यावा.

**Item No.** 7 **Resolution No.** 1695

विषय : श्री. ल. रं. घाडगे, चौकशी अधिकारी/प्राधिकरण यांच्या कंत्राटी पद्धतीवरील पुनर्नेमणूकीस मुदतवाढ देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. ल. रं. घाडगे यांना दिनांक २.८.१९८९ पासून तीन महिन्यांच्या कंत्राटी पद्धतीवरील पुनर्नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येऊन कंत्राटी नेमणूकीचा कालावधी तीन महिन्यांचे ऐवजी सहा महिन्यांपर्यंत वाढविण्यात यावा. तसेच प्रशासकीय नियमांस अधीन राहून त्यांना १) वार्षिक वेतनवाढ, २) पगारी रजा आणि ३) रजेच्या कालावधीत प्रवासभत्ता आदी लाभांश देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 8 **Resolution No.** 1690

विषय : महाराष्ट्र राज्यातील पूरग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी मदतनिधी उभारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पूरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी यांचे एक दिवसाच्या वेतनामधून सुमारे ३ ते ३ १/४ लाख रुपये जमा करुन प्राधिकरणातर्फे ६ ते ७ लाख रुपये किंवा रुपये १०/- लाख या रकमेस कमी पडतील, एवढ्या रकमेची भर घालून प्राधिकरणातर्फे एकूण रुपये १०/- लाख पूरग्रस्त निधी म्हणून मुख्यमंत्र्यांचे निधीमध्ये सूपूर्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 9 **Resolution No.** 1696

विषय : महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळास पोईसर, कांदिवली येथे एक रकमी विक्री पद्धतीने वितरित केलेल्या इमारती महामंडळाचे कर्मचाऱ्यांना मालकी हक्काने हस्तांतरित करण्याची विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळास दिलेल्या पोईसर, कांदिवली येथील मध्यम उत्पन्न गटाच्या दोन इमारती (४० गाळे) आणि अल्प उत्पन्न गटाच्या २ इमारती (२४ गाळे) महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थाने पुरविण्याकरिता वाटप करण्याच्या अटींवर दिल्या असल्याने त्या इमारती महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना विक्री तत्वावर द्याव्या, यासंबंधीचा मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे. वित्तीय महामंडळास कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थाने पुरविण्याकरिता या इमारतींची गरज उरली नसल्यास त्यांनी त्या प्राधिकरणास परत कराव्यात. विहित कार्यपद्धतीनुसार त्यातील गाळ्यांचे वाटप करता येईल.

| Item No. | 10 | Resolution No. | 1697 |
|---|---|---|---|

विषय : संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे येथील पिठाच्या गिरणीसाठी वितरित केलेल्या भूखंडाची जागा बदलण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे येथे श्री. पालांडे यांना पिठाच्या गिरणीकरिता त्यांनी सादर केलेल्या निविदेनुसार वाटप केलेल्या भूखंडावर पिठाची गिरणी चालू करण्यास आजूबाजूच्या रहिवाशांनी विरोध दर्शविल्याने पिंपरी-चिंचवड नगरपालिकेच्या शिफारशीवरून त्याच वसाहतीत व्यापारी संकुलासाठी राखून ठेवलेल्या जमिनीवर श्री. पालांडे यांना आधीच्या भूखंडाच्या आकाराएवढा भूखंड बदलून देण्याच्या मुख्य अधिकारी/पुणे मंडळ यांनी केलेल्या कार्यवाहीस मंजूरी देण्यात येते. त्यासाठी आधीच्या भूखंडांकरिता प्राधिकरणाने जी किंमत स्वीकारली होती, त्याच किंमतीच्या दराने पर्यायी भूखंडांकरिता श्री. पालांडे यांचेकडून किंमत वसूल करावी. पर्यायी भूखंडावर बांधकाम करण्यास महानगरपालिकेची परवानगी मिळविण्याची जबाबदारी श्री. पालांडे यांची राहील.

| Item No. | 11 | Resolution No. | 1698 |
|---|---|---|---|

विषय : खादी आणि ग्रामोद्योग आयोगाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडून खरेदी केलेल्या इमारतींचे विक्रीखत करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, खादी आणि ग्रामोद्योग आयोगाने प्राधिकरणाकडून खरेदी केलेल्या इमारतींचे विक्रीखत करण्याचे संदर्भात, प्राधिकरण (मुंबई मंडळ - विक्रेता) आयोग (मान्यता देणारा पक्ष) आणि भारताचे राष्ट्रपती (खरेदीदार) यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करून इमारतींच्या मालकीचे हस्तांतरण करण्यासंबंधीच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. त्यासाठी खादी आणि ग्रामोद्योग आयोगाच्या नावे इमारतींचे वाटप करताना काढलेले वाटपपत्र रद्द करून ते भारताचे राष्ट्रपती यांच्या नावे करण्यास संमती देण्यात येते.

| Item No. | 12 | Resolution No. | 1699 |
|---|---|---|---|

विषय : पुणे शहराच्या विकास आराखड्यामध्ये म्हाडाच्या प्रयोजनासाठी केलेल्या आरक्षणातील जमिनीवरील आरक्षण काही अंशी रद्द करण्याबाबत.

ठराव : अ) ६० टक्के जमीन अतिक्रमण मुक्त असावी.

ब) ६० टक्के जमिनीस प्रवेशमार्ग उपलब्ध राहील व त्यासाठी भूधारकाने त्या त्या ठिकाणी त्यावेळी असलेल्या परिस्थितीनुरूप प्रवेशमार्गासाठी (जरूर असल्यास) काही प्रमाणात अधिक जमीन मुक्त करणे त्यास बंधनकारक राहतील.

क) ६० टक्के जमीन सर्वसाधारणपणे सलग म्हणजे एका तुकड्यात असेल किंवा किमानपक्षी म्हाडाच्या कार्यक्रमाच्या दृष्टीने सोयीच्या आकारमानाच्या एकापेक्षा अधिक भूखंडामध्ये असेल.

**Item No.** 13 **Resolution No.** 1700

विषय : महाराष्ट्रातील मुंबई महानगर (बीएमआर) क्षेत्राबाहेरील शहरांसाठी गलिच्छवस्ती दर्जा सुधारणा कार्यक्रमासाठी (एसयूपी) केएफडब्ल्यू या पश्चिम जर्मनीतील आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेकडून एचडीएफसी मुंबई यांचेमार्फत मिळणाऱ्या कर्जातून अत्यल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई महानगर क्षेत्राबाहेरील शहरांसाठी गलिच्छवस्ती सुधारणा कार्यक्रमासाठी (एसयूपी) केएफडब्ल्यू या पश्चिम जर्मनीतील आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेचे एचडीएफसी मुंबई यांचेमार्फत मिळणाऱ्या कर्जाच्या सहाय्याने अत्यल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजना राबविण्याच्या राज्य शासनाने कळविलेल्या योजनेबद्दलच्या बाबींची प्राधिकरणाने नोंद घेतली. ही योजना संबंधित महानगरपालिका/नगरपरिषद यांनी राबवावी व त्यासाठी सर्व प्रकारचे मार्गदर्शन योजना तयार करणे, योजना मंजूर करून घेणे व अंमलबजावणी करणे यासाठी प्राधिकरणाने मदत करावी या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. या योजनेसाठी मिळणारे कर्ज व त्याची परतफेड या व्यवहाराची प्राधिकरणाने जबाबदारी न घेता सदर कर्ज एचडीएफसीने संबंधित महानगरपालिका/नगरपरिषद यांना परस्पर द्यावे व व्याजफेड पण संबंधित महानगरपालिका/नगरपरिषद यांनी करावी.

**Item No.** 14 **Resolution No.** 1701

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, आवास व नगरविकास विभाग, नवी दिल्ली (हुडको) यांनी विहित केलेल्या अटींवर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता ''अ'' मध्ये दर्शविलेल्या हुडको अर्थसहाय्यित औरंगाबाद/वर्धा/जालना/चंद्रपूर व बीड जिल्ह्यातील बेघर भूमिहीनांकरिता ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी एकूण १४६.९१ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

माननीय अध्यक्ष/प्राधिकरण यांचे परवानगीने आयत्यावेळी प्राधिकरणाच्या विचारार्थ ठेवण्यात आलेले बाब टिप्पण.

**Item No.** 15 **Resolution No.**

विषय : इमारत दुरुस्ती व पुनर्रचना कार्यक्रमासाठी १९८८-८९ अखेरपर्यंत दिलेल्या उचल रकमेची परतफेड.

ठराव :

**Meeting No.** 75 **Meeting Date** 06-Sep-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १६-८-१९८९ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 2 **Resolution No.** 1702

विषय : इमारत दुरुस्ती व पुनर्रचना कार्यक्रमासाठी १९८८-८९ अखेरपर्यंत दिलेल्या उचल रकमेची परतफेड.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मा. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्तावित केल्यानुसार प्राधिकरणाची येणे बाकी रु. २०८१.४६ लाख ही रक्कम तक्त्यामध्ये दर्शविलेल्या हप्त्यामध्ये दहा वर्षाच्या मुदतीत वसूल करण्यास व त्यावर १० टक्के व्याज आकारणेस मान्यता देण्यात येते. त्याचप्रमाणे परिस्थितीनुसार शक्य असल्यास जास्त रक्कम किंवा हप्तेही वसूल करण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 3 **Resolution No.** 1703

विषय : कन्नमवार नगर, विक्रोळी व नेहरू नगर, कुर्ला येथील इमारतींच्या दुरुस्ती व नवीकरण योजनेस दुरुस्ती व नवीकरण योजनेस हुडकोंचे अर्थसहाय्य घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत. (योजना क्र. ६६७४)
१) कन्नमवार नगर, विक्रोळी ४४० गाळे (१३ इमारती)
२) नेहरूनगर, कुर्ला ३२० गाळे (८ इमारती)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण व नगरविकास महामंडळ, नवी दिल्ली (हुडको) यांनी विहित केलेल्या अटीवर कन्नमवार नगर, विक्रोळी व नेहरूनगर, कुर्ला येथील इमारतींच्या दुरुस्ती व नवीकरण योजनेस रु. ७४.७८ लक्ष कर्ज हुडकोकडून घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

---

**Item No.** 4 **Resolution No.** 1704

विषय : नागरी नूतनीकरण योजनेस "सी जयराम चाळ" शिवडी ज्योत्यावरील बांधकामाच्या निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, वरील योजनेच्या बांधकामासाठी "मे. आर. एस. गुप्ता ॲन्ड कंपनी" यांची अंदाजित रकमेपेक्षा (अंदाजित रक्कम रु. ७२,७०,२९५) ४.८ प्रतिशत कमी अशी बोली (बोलीची रक्कम रु. ६९,२१,३३१/-) मंजूर करण्यात येत आहे.

---

**Item No.** 5 **Resolution No.** 1705

विषय : नागरी नूतनीकरण योजना

गन पावडर लेन, माझगाव "ई" वॉर्ड, इमारतीच्या बांधकामाच्या निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गन पावडर लेन, माझगाव "ई" वॉर्ड नागरी नूतनीकरण योजनेतील इमारतींच्या बांधकामासाठी "मे. मसीन ब्रदर्स" यांची अंदाजित रकमेपेक्षा (अंदाजित रक्कम १,२५,१२,९४५/-) ९.४ प्रतिशत अधिक अशी बोली (बोलीची रक्कम रु. १,३६,८९,१६२) मंजूर करण्यात येत आहे.
मा. अध्यक्ष, प्राधिकरण यांचे परवानगीने आयत्यावेळी प्राधिकरणाच्या विचारार्थ ठेवण्यात आलेले बाब टिप्पण.

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण क्षेत्रात संशोधन, प्रशिक्षण, विकास तसेच सुकरक (फॅसिलिटेटर) स्वरुपाची कार्यवाही करण्याकरिता संस्थेची (सोसायटी) स्थापना करण्याबाबत.

ठराव :

**Meeting No.** 76 **Meeting Date** 13-Sep-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ६.९.८९ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 1706

विषय : गृहनिर्माण क्षेत्रात संशोधन, प्रशिक्षण विकास तसेच सुकरक (फॅसिलिटेटर) स्वरुपाची कार्यवाही करण्याकरिता संस्थेची (सोसायटी) स्थापना करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गृहनिर्माण क्षेत्रात संशोधन, प्रशिक्षण, विकास तसेच सुकरक (फॅसिलिटेटर) स्वरुपाची संस्था स्थापन करणे बाबतचे तत्त्व मान्य करण्यात आले. तथापि संस्थेची घटना तयार करणेसाठी खालील सदस्यांची समिती स्थापन करण्यात यावी व समितीने आपला अहवाल लवकरात लवकर प्राधिकरणास सादर करावा असे ठरविण्यात आले.

१. मा. उपाध्यक्ष
२. श्री. व्ही. व्ही. बडवे
३. संचालक, नगर रचना, पुणे
४. मुख्य अभियंता/प्राधिकरण - सदस्य/निमंत्रक

**Item No.** 3 **Resolution No.** 1707

विषय : मोतीलाल नगर, गोरेगाव येथील ए. पी. ब्लॉक पद्धतीच्या संडास मूलीगत गटारांद्वारा मुंबई महानगर पालिकेच्या मुयारी गटारांना जोडण्याचे काम विभागून करण्यासाठी परवानगी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मोतीलाल नगर विभाग, १, २, ३ गोरेगाव येथील ए. पी. ब्लॉक पद्धतीच्या संडासाचे जोड (कनेक्शन) मुंबई महानगरपालिकेच्या मुयारी गटारांना जोडण्याच्या अंदाजे रुपये १८१.३० लक्ष खर्चाच्या कामाची विभागणी १६ गटांत करण्याच्या मुंबई मंडळाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आहे.

**Item No.** 4 **Resolution No.** 1708

विषय : स्वामी विवेकानंद, हडपसर, पुणे येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात यावयाच्या ८८ गाळ्यांच्या निविदा स्वीकृताबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
स्वामी विवेकानंद नगर हडपसर, पुणे येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात यावयाच्या ८८ गाळ्यांच्या कामाची रुपये ७३,६२,२७६ (रुपये त्र्याहत्तर लक्ष बासष्ट हजार दोनशे शहात्तर फक्त) किंमतीची रुपये ५५,९८,६८९ (रुपये पंचावन्न लक्ष अठ्ठ्याण्णव हजार सहाशे एकोणनव्वद) या कामाच्या निविदेत दर्शविलेल्या अंदाजित किंमतीवर वाटाघाटीने आलेली ३१.५ टक्के अधिक दराची व १९८८-८९ च्या दरपत्रकावर सिमेंट व लोखंड यांचे लोडींग विचारात घेऊन ४.३४ टक्के अधिक दराची श्री. ए. सी. गांधी, पुणे या कंत्राटदाराची निम्नतम टक्केवारीची निविदा स्वीकारण्यात मान्यता देण्यात येते.

**Item No.** 5 **Resolution No.** 1709

विषय : धारावी मंजूर विकास योजनेमध्ये मार्च १९८९ मध्ये केलेल्या किरकोळ फेरबदलाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
धारावीच्या मंजूर विकास योजनेत मार्च, १९८९ मध्ये केलेल्या किरकोळ फेरबदलात आलेल्या सूचना व तक्रारीवर सुनावणी देण्यासाठी प्राधिकरणाने नेमलेल्या समितीच्या अहवालानुसार विकास योजनेतम केलेले फेरबदल प्राधिकरण मान्य करत असून हे फेरबदल आता शासनाकडे अंतिम मंजूरीसाठी पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 6 **Resolution No.** 1710

विषय : सर्व्हे नं. ४२ (हिस्सा क्र. ३ व ५ भाग) मजासवाडी जोगेश्वरी येथे झोपडपट्टीवासियांसाठी ८९६ गाळे (तळमजला - ३) इमारतीच्या बांधकामाच्या निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे नं. ४२ (हिस्सा नं. ३ व ५ भाग) मजासवाडी, जोगेश्वरी येथील गलिच्छवस्ती श्रेणीवाढ योजनेअंतर्गत स्थलांतरित झोपडपट्टीवासियांसाठी इमारतीच्या बांधकामासाठी मे. क्लासिक कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अंदाजित रकमेपेक्षा (अंदाजित रक्कम रुपये २,९२,९७,५७२/-) १.३० प्रतिशत कमी अशी बोली (बोलीची रक्कम रुपये २,८९,१६,७०३.५७) मंजूर करण्यात आली.

**Item No.** 7 **Resolution No.** 1711

विषय : सिद्धार्थ नगर, गोरेगाव येथील बैठी इमारत क्र. १७ मिळण्याबद्दल महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बैठ्या गाळ्यांच्या विक्री योजनेचा पुनर्विचार शासनाकडून करण्यात येत असल्याने सिद्धार्थ नगर, गोरेगाव येथील बैठी इमारत क्रमांक १७ मिळण्याबद्दल महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने केलेली विनंती शासनाने मंजूरी दिली तर मान्य करण्यात यावी. त्यासाठी योग्य तो प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात यावा.

मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांचे परवानगीने आयत्यावेळी प्राधिकरणाच्या विचारार्थ ठेवण्यात आलेले बाब टिप्पण.

---

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात असलेली मोरारका आणि कंपनीच्या मालकीची सोलापूर येथील लिलावातील जमीन खरेदी करण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात असलेली मोरारका आणि कंपनीच्या मालकीची सोलापूर येथील लिलावातील जमीन खरेदी करण्याबाबत.

ठराव :

---

**Meeting No.** 77 **Meeting Date** 13-Oct-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १३.९.१९८९ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 1712

विषय : गारखेडा, औरंगाबाद येथे बांधण्यात येत असलेल्या ४४४ गाळ्यांमध्ये १) अंध व अपंग, २) स्वातंत्र्य सैनिक यांच्यासाठी प्रत्येकी ५० गाळे राखून ठेवणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गारखेडा, औरंगाबाद येथे बांधण्यात येत असलेल्या अल्प उत्पन्न गटाच्या ४४४ गाळ्यांच्या योजनेतील १) अंध व अपंग, २) स्वातंत्र्य सैनिक या श्रेणीतील लोकांकडून प्राप्त झालेल्या अर्जानुसार अनुक्रमे ३७ व २१ गाळ्यांचे वाटप करून उरलेल्या गाळ्यांचे वाटप मिळकत व्यवस्थापन विषयक विनियमातील विनियम ४ अनुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून सर्वसाधारण लोकांना विहित कार्यपद्धती अनुसरून करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : मुंबई मंडळाच्या गोराई रोड, बोरीवली (पश्चिम) येथील वसाहतीतील ६७ अनधिकृत स्टॉलधारकांना पर्यायी जागा देणे.

ठराव :

**Item No.** 4 **Resolution No.**

विषय : कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात असलेली मोरारका आणि कंपनीच्या मालकीची सोलापूर येथील लिलावातील जमीन खरेदी करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : नवव्या वित्त आयोगाने, मुंबई शहरासाठी शिफारित केलेल्या रुपये ५०/- कोटींच्या विशेष अनुदानातून घ्यावयाचा कार्यक्रम.

ठराव :

**Item No.** 6 **Resolution No.** 1713

विषय : श्री. आर. डी. मालुष्टे, सेवानिवृत्त अधिकारी यांची कंत्राटी पद्धतीने सहविधी सल्लागार म्हणून नियुक्ती करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. आर. डी. मालुष्टे, सेवानिवृत्त मुख्य दंडाधिकारी यांची पुनर्नेमणूकीच्या अटी व शर्तीनुसार एक वर्षाकरिता सहविधी सल्लागार/जागतिक बँक प्रकल्प या रिक्त पदी नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : एस. पी. मिल्स कंपाऊंड येथील गलिच्छवस्ती पुनर्विकास योजना - १६८ गाळ्यांसाठी निविदा.

ठराव :

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : जागतिक बँक प्रकल्पातील चारकोप, कांदिवली येथील वसाहतीमध्ये शाळा सुरू करणेसाठी.
''इंडियन एज्युकेशन सोसायटी''ला भाडे तत्वावर जागा देणेबाबत.

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना भूखंड देण्याच्या बाबतीत प्राधिकरणाने ठराव क्रमांक ९१६ मागे घेण्याच्या संबंधात शासनाने काढलेले निर्देश.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.**

विषय : मोतीलाल नगर, गोरेगाव येथील कार्यालयीन इमारत क्रमांक - ६ (पूर्वीची क्र. १) ची विक्री मोतीलाल नगर टेनन्ट्स् असोसिएशनला करण्याचा निर्णय रद्द करणे.

ठराव :

**Meeting No.** 78 **Meeting Date** 03-Nov-1

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १३.१०.१९८९ रोजी झालेल्या ७७ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 2 **Resolution No.** 1714

विषय : डॉ. ए. टी. वागळे, यांची रिटेनर पद्धतीने केलेल्या नेमणूकीची मुदतवाढ देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, डॉ. ए. टी. वागळे, यांच्या रिटेनर पद्धतीने तैलेल्या नेमणूकीस दिनांक १.१०.१९८९ पासून एक वर्ष मुदतवाढ पूर्वीच्याच अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

---

**Item No.** 3 **Resolution No.** 1715

विषय : मोतीलाल नगर, गोरेगाव येथील कार्यालयीन इमारत क्रमांक - ६ (पूर्वीची क्र. १) ची विक्री मोतीलाल नगर टेनन्टस् असोसिएशनला करण्याचा निर्णय रद्द करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई मंडळाने इमारत क्रमांक ६ ही श्रेणी १ मध्ये दर्शवून सदर इमारत मोतीलालनगर भाडेकरू संघटनेस विक्री करण्याचा मुंबई मंडळाचा ठराव क्रमांक १५३५ दिनांक ६.५.१९८८ अनुसार घेतलेला निर्णय चुकीचा असल्याने निदर्शनास आल्यामुळे रद्दबादल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. या विषयावर सविस्तरपणे चर्चा करताना प्राधिकरणाच्या वसाहतीमधील गरीब विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका आणि सुशिक्षित बेकारासाठी स्टॉल अशा दोन स्वतंत्र योजना तयार करण्यात याव्यात. या योजना राबविण्यासाठी प्राधिकरणाच्या निरनिराळ्या वसाहतीमधून उपलब्ध असलेली जमीन निर्देशित करून योजना तयार करावी व योजनेचा खर्च आमदार निधीतून उपलब्ध करून देण्याबाबत शासनाला सूचित करावे असे अभिप्राय मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांनी व्यक्त केले.

२. बैठ्या कार्यालयीन विक्री किंवा पुनर्बांधणी करण्याच्या प्राधिकरणाच्या धोरणानुसार अशा कार्यालयीन इमारतीची ३ श्रेणीत जी वर्गवारी करण्यात आली आहे तिचा डॉ. खेडेकर व श्री. मांजरेकर, सदस्य/प्राधिकरण यांनी अभ्यास करून प्राधिकरणाला अहवाल सादर करावा.

---

**Item No.** 4 **Resolution No.** 1716

विषय : कोल्हापूर येथे विडी कामगारांसाठी योजना राबविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे नं. १०५०-५१ करवीर कोल्हापूर येथे २.५१ हेक्टर जमिनीवर अल्प उत्पन्न गट - १ यामधील २४६ गाळ्यांची योजना विडी कामगारांसाठी हाती घेण्यासाठी मान्यता देण्यात येते. या योजनेसाठी अभिप्रेत असलेली केंद्र शासनाची अनुदान मिळविण्याची योग्य ती कार्यवाही उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी गृहनिर्माण व कामगार विभागाच्या सहकार्याने करावी. या योजनेमधील लाभधारक ठरविताना प्राधिकरणाच्या धोरणानुसार महाराष्ट्रातील १५ वर्षांचे वास्तव्य, योग्य असा उत्पन्न गट तसेच सदर उद्योगात सदर लाभधारक केंद्र शासनाच्या कल्याण व उपकर आयुक्ताच्या धोरणानुसार गुंतलेले आहेत, याबाबत राज्य शासनाच्या कामगार विभागाकडून छाननी करण्यात यावी. केंद्र शासनाचे अनुदान मिळेपर्यंत सदर योजना हुडको या वित्तीय संस्थेच्या सर्वसाधारण योजनेप्रमाणे राबविण्यात यावी आणि लाभधारक त्यानुसार गाळ्यांची किंमत प्राधिकरणाकडे भरण्यास बांधील राहतील. अनुदानाची रक्कम प्राधिकरणास प्रत्यक्ष प्राप्त झाल्यानंतर सदर योजनेतील पात्र लाभधारकांच्या खात्यामध्ये वर्ग करण्यात यावी.

**Item No.** 5 **Resolution No.** 1717

विषय : एम. पी. मिल कंपाऊंड येथील गलिच्छ पुनर्विकास योजना १६८ गाळ्यांची निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, एम. पी. मिल कंपाऊंड येथील यांची रु. ५९,९०,८१४/- (रु. एकोणसाठ लक्ष नव्वद हजार आठशे चौदा मात्र) ची बोली मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 6 **Resolution No.** 1718

विषय : पद्मशाली को. हाऊसिंग सोसायटी, राजेंद्र प्रसाद नगर, धारावी येथील गलिच्छवस्ती पुनर्बांधणी योजनेखाली १८० गाळ्यांच्या ज्योत्यावरील बांधकामासाठी निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, राजेंद्र प्रसाद नगर, धारावी येथे पद्मशाली को. हाऊसिंग सोसायटीसाठी बांधण्यात येणाऱ्या १८० गाळ्यांच्या ज्योत्यावरील बांधकामासाठी ''मेसर्स सुपर कन्स्ट्रक्शन कंपनी'' यांची रु. ७०,४३,०६१.८० (रु. सत्तर लाख त्रेचाळीस हजार एकसष्ट व ऐंशी पैसे मात्र) ची बोली मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 7 **Resolution No.** 1719

विषय : नागरी नूतनीकरण योजना.

इमारत क्रमांक १३, १५-१७-१२ अ, ब, तुकाराम जावजी मार्ग ''डी'' वॉर्ड बांधकामासाठी निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, तुकाराम जावजी मार्ग ''डी'' वॉर्ड येथील नागरी नूतनीकरण योजनेच्या बांधकामासाठी ''मेसर्स विरल बिल्डर्स'' यांची अंदाजित रकमेपेक्षा (अंदाजित रक्कम रु. ५७,९५,२५१/-) (रुपये सत्तावन्न लाख पंच्याण्णव हजार दोनशे एक्कावन्न मात्र) ९.३० प्रतिशत अधिक बोली मंजूर करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**Item No.** 8 **Resolution No.** 1720

विषय : धारावी ९० फूट रस्ता येथे नियोजित संकल्पना गृहनिर्माण संस्थेसाठी १५३ गाळ्यांची तरतूद करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, संकल्पना गृहनिर्माण संस्थेसाठी १५३ गाळ्यांच्या बांधकामासाठी ''मेसर्स कर्मा कन्स्ट्रक्शन कंपनी'' यांची रु. ६१,२०,०००/- (रु. एकसष्ट लाख वीस हजार मात्र) ची बोली मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 9 **Resolution No.** 1721

विषय : श्री. म. स. मुंढे, प्रतिनियुक्तीवरील मुख्य समाज विकास अधिकारी/जा. बँ. प्र. नियत वयोमानानुसार दिनांक ३०.११.८९ मध्यान्हानंतर सेवानिवृत्त होत असल्यामुळे त्यांच्या रिक्त पदावरील पर्यायी व्यवस्थेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. म. स. मुंढे यांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर (३०.११.१९८९) दिनांक १.१२.१९८९ पासून जागतिक बँक प्रकल्पाच्या कालावधीपर्यंत किंवा एक वर्ष यापैकी जो कालावधी कमी असेल त्या कालावधीपुरती कंत्राटी पद्धतीने पुनर्नेमणूकीच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून पुनर्नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 10 **Resolution No.** 1722

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पातील अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पंतप्रधान अनुदान प्रकल्पातील योजना अधिक वेगाने व परिणामकारकरित्या कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने पंतप्रधान अनुदान प्रकल्पातील बाब टिप्पणास जोडलेल्या परिशिष्ट २ मध्ये नमूद केलेल्या काही विषयांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार परिशिष्टात नमूद केलेल्या अधिकाऱ्यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मात्र परिशिष्ट एकमध्ये नमूद केलेले अधिकार संचालक, पंतप्रधान अनुदान प्रकल्प/प्राधिकरण यांचेकडे राखून ठेवण्यात यावेत.

विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर माननीय अध्यक्ष/प्राधिकरण यांच्या परवानगीने आयत्यावेळी खालील बाब टिप्पण्या विचारार्थ घेण्यात आल्या.

**Item No.** 11 **Resolution No.** 1723

विषय : जागतिक बँक प्रकल्पांतर्गत योजनेखालील चारकोप, कांदिवली येथील वसाहतीमध्ये रात्रशाळा सुरू करणेसाठी.

इंडियन एज्युकेशन सोसायटीला भाडे तत्त्वावर जागा देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, उपरोक्त योजनेतील शाळेच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत तात्पुरती सोय म्हणून इंडियन एज्युकेशन सोसायटी, दादर या संस्थेस चारकोप, कांदिवली येथील प्रकल्पातील आठ खोल्या प्रत्येकी दरमहा रु. २५०/- (रु. दोनशे पन्नास मात्र) भाडे (लाईट व पाण्याचे दर वगळून) आकारून भाडे तत्वावर विहित अटींच्या अधीन राहून वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 12 **Resolution No.** 1724

विषय : महाराष्ट्रातील मुंबई महानगर (बीएमआर) क्षेत्राबाहेरील शहरांसाठी गलिच्छ वस्ती दर्जा सुधारणा कार्यक्रमाखाली (एसयुपी) के. एफ. डब्ल्यू. या पश्चिम जर्मनीतील आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेकडून एच.डी.एफ.सी. मुंबई यांचेमार्फत मिळणाऱ्या कर्जातून अत्यल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजना राबविण्याबद्दल.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई महानगर क्षेत्राबाहेरील शहरांसाठी गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रमासाठी (एसयुपी) के.एफ.डब्ल्यू. या पश्चिम जर्मनीतील आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेचे एच.डी.एफ.सी., मुंबई यांचेमार्फत मिळणाऱ्या कर्जाच्या सहाय्याने अत्यल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजना राबविण्याच्या राज्य शासनाने कळविलेल्या योजनेबद्दलच्या बाबींची प्राधिकरणाने नोंद घेतली. ही योजना संबंधित महानगरपालिका/नगरपरिषदा यांनी राबवावी व त्यासाठी सर्व प्रकारचे मार्गदर्शन योजना तयार करणे, योजना मंजूर करून घेणे व अंमलबजावणी करणे यासाठी प्राधिकरणाने मदत करावी या प्रस्तावास प्राधिकरण मान्यता देत आहे. त्यासाठी शासनाकडून वा महापालिका/नगरपरिषदा यांच्याकडून व्यवस्थापकीय सहाय्य साधारणपणे योजनेच्या रकमेवर १/२ टक्के इतके प्राधिकरणास उपलब्ध व्हावे. या योजनेसाठी मिळणारे कर्ज व त्याची परतफेड हा व्यवहार शासनाने मान्य केल्याप्रमाणे एच.डी.एफ.सी.ने संबंधित महानगरपालिका/नगरपरिषदा यांचेशी परस्पर करावा.
यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठकीचे कामकाज संपले.

**Meeting No.** 79 **Meeting Date** 16-Nov-1

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ३.११.१९८९८ रोजी झालेल्या ७८व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना दिनांक १.७.१९८९ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देणे.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 1725

विषय : भूतपूर्व दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील व महाराष्ट्र गलिच्छ वस्ती सुधारणा मंडळातील कर्मचाऱ्यांना निवृत्त वेतन योजनेचा फायदा मिळण्याबाबत व त्याबाबतची निवृत्ती वेतनाची अंशराशी वर्गणी भरण्यासंबंधी निर्णय घेणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, भूतपूर्व मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील व महाराष्ट्र गलिच्छ वस्ती सुधारणा मंडळातील जे कर्मचारी त्यांच्या शासनाकडे झालेल्या सेवेसह शासन सेवेतील अटी व शर्ती अबाधित ठेवून दिनांक ५.१२.१९७७ पासून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील कलम २२ नुसार विलीन करण्यात आले आहेत त्या सर्व कर्मचाऱ्यांना (बाब टिप्पणास जोडलेल्या यादीप्रमाणे) सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना नियमाप्रमाणे अभिप्रेत असलेले निवृत्ती वेतन व कुटुंब निवृत्ती वेतन मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्राधिकरणाने दिनांक ५.१२.१९७७ पासूनची वर्गणी या कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करून जमा करावी.

**Item No.** 4 **Resolution No.** 1726

विषय : विडी कामगार, सोलापूर येथील गाळेधारकांकडून हप्त्यांची वसूली करण्याबाबत पंजाब नॅशनल बँकेला एक्स्टेंशन काऊंटरसाठी दोन गाळ्यांचे वाटप करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पुणे मंडळाच्या अखत्यारीतील सोलापूर येथे विडी कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या एकूण ३०४१ गाळ्यांच्या योजनेतील गाळेधारकांकडून गाळ्यांचे भाडे/हप्ते वसूल करण्यासाठी सदर योजनेतील २४१ व २४२ क्रमांकाचे दोन गाळे एक्स्टेंशन काऊंटर उघडण्यासाठी पंजाब नॅशनल बँकेला मासिक रु. १०००/- याप्रमाणे भाडे आकारून दिनांक १.११.१९८९ पासून भाडेतत्वावर वितरित करण्यात आलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 5 **Resolution No.** 1727

विषय : श्री. के. स्वामीनाथन्, उपसंचालक-१, जागतिक बँक/प्राधिकरण यांची कंत्राटी पुनर्नेमणूक आणखी एक वर्षाकरिता वाढविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. के. स्वामीनाथन्, उपसंचालक-१, जागतिक बँक प्रकल्प/प्राधिकरण यांना दिनांक १.१२.१९८९ पासून जागतिक बँक प्रकल्पाच्या कालावधीपर्यंत किंवा एक वर्ष यापैकी जो कालावधी कमी असेल त्या कालावधीपुरता कंत्राटी पद्धतीने पुनर्नेमणूकीच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 6 **Resolution No.** 1728

विषय : धारावी ९० फूट रस्ता येथे नियोजित विजयनगर गृहनिर्माण संस्थेसाठी १३८ गाळ्यांसाठी निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, धारावी ९० फूट रस्ता येथे "विजयनगर गृहनिर्माण संस्थे"साठी १३८ गाळ्यांच्या बांधकामासाठी मेसर्स स्वस्तिक कन्स्ट्रक्शन, यांची रु. ५२,४६,१३६/- (रु. बावन्न लाख सहेचाळीस हजार एकशे छत्तीस मात्र) ची बोली मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांचे आदेशानुसार आयत्यावेळी विचारार्थ घेण्यात आलेल बाब टिप्पण.

**Item No.** 7 **Resolution No.** 1729

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सन १९८८-८९ या वित्तीय वर्षासाठी तदर्थ बोनस देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सन १९८८-८९ या वित्तीय वर्षासाठी राज्य शासकीय कर्मचारी आणि इतर यांना सतरा दिवसांच्या वित्तलब्धी एवढा शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांना मंजूर केलेला तदर्थ बोनस प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या आदेशातील अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मात्र शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर बोनसची रक्कम अदा करण्यात यावी.
यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Item No.** 7 **Resolution No.** 1729

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सन १९८८-८९ या वित्तीय वर्षासाठी तदर्थ बोनस देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सन १९८८-८९ या वित्तीय वर्षासाठी राज्य शासकीय कर्मचारी आणि इतर यांना सतरा दिवसांच्या वित्तलब्धी एवढा शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांना मंजूर केलेला तदर्थ बोनस प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या आदेशातील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मात्र शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर बोनसची रक्कम अदा करण्यात यावी.
यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

---

**Meeting No.** 80 **Meeting Date** 06-Dec-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १६-११-१९८९ रोजी झालेल्या ७९व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांचा सर्वसाधारण आढावा घेणे.

ठराव :

---

**Item No.** 3 **Resolution No.** 1730

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत धारावी, मानखुर्द, जोगेश्वरी, कांदिवली, मुलुंड व मांडुप येथील नऊ योजनांसाठी हुडकोचे कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, हुडकोने विहित केलेल्या अटींवर बाब टिप्पणासोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत धारावी, मानखुर्द, जोगेश्वरी, कांदिवली, मुलुंड व मांडुप एकूण ६४६५ गाळ्यांच्या येथील नऊ योजनांसाठी हुडकोकडून रु. ११९८.८८ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.
विषय संपल्यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 81 **Meeting Date** 14-Dec-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ६.१२.१९८९ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : विडी कामगार, सोलापूर येथील गाळेधारकांकडून हप्त्याची वसूली करण्याबाबत पंजाब नॅशनल बँकेला एक्स्टेंशन काऊंटरसाठी दोन गाळ्यांचे वाटप मंजूर करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 1731

विषय : श्री. बी. के. शिरगावकर, मिळकत व्यवस्थापक, जागतिक बँक प्रकल्प यांची कंत्राटी पुनर्नेमणूक आणखी एक वर्षाकरिता वाढविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. बी. के. शिरगावकर, मिळकत व्यवस्थापक, जागतिक बँक प्रकल्प/प्राधिकरण यांना दिनांक १६.१.१९९० मा. पूर्वपासून एक वर्ष किंवा जागतिक बँक प्रकल्पाच्या कालावधीपर्यंत यापैकी जो कालावधी कमी असेल त्यानुसार कंत्राटी पद्धतीने पुनर्नेमणूकीच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 4 **Resolution No.** 1732

विषय : चारकोप, कांदिवली येथील प्रकल्पाच्या बांधकामावरती काम करीत असलेल्या मजुरांच्या मुलांसाठी शिशुगृहे चालविण्यासाठी "मोबाईल क्रेश" या स्वयंसेवाभावी संस्थेला चारकोप येथील प्रकल्पाच्या कचेरीमध्ये दोन खोल्यांचा वापर करण्यास परवानगी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, चारकोप, कांदिवली येथील प्रकल्पाच्या बांधकामावर काम करीत असलेल्या मजुरांच्या मुलांसाठी शिशुगृहे चालविण्यासाठी "मोबाईल क्रेश" या स्वयंसेवाभावी संस्थेला चारकोप येथील प्रकल्पाच्या कचेरीमध्ये सध्या रिकाम्या असलेल्या दोन खोल्यांचा वापर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मात्र या खोल्यांचा ताबा प्रकल्पाकडेच राहील, या अटींवर देण्यात यावा.
त्यानंतर माननीय अध्यक्ष/प्राधिकरण यांचे परवानगीने आयत्यावेळी प्राधिकरणाच्या विचारार्थ घेण्यात आलेले बाब टिप्पण.

सन १९८५ पर्यंत ज्या झोपड्यांची गणना झालेली आहे त्यांना सुविधा पुरवणे हे शासनाचे व म्हाडाचे कर्तव्य आहे असा मतप्रवाह दिसून आला.
मुंबईत ४८ टक्के गलिच्छवस्त्या खाजगी जमिनीवर व ५२ टक्के गलिच्छवस्त्या शासकीय, निमशासकीय व केंद्र शासनाच्या जमिनीवर आहेत. ४८ टक्के गलिच्छवस्त्यांनी व्यापलेली जमीन संपादन करून तेथील रहिवाशांची सोय करावी असाही विचार मांडण्यात आला.

४) इमारत दुरुस्ती व पुनर्रचना :

मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारतीच्या दुरुस्त्या व पुनर्बांधणी कार्यक्रमावरही सविस्तरपणे चर्चा करण्यात आली. त्याबाबत चर्चा करताना असा विचार मांडण्यात आला की, नामधारकांनी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करून गाळे खरेदी करावेत.

५) माननीय अध्यक्ष/प्राधिकरण यांनी सुचविले की, नागरी विकास

अर्थसहाय्य महामंडळ स्थापन करून निधी उभारण्यात यावा व त्यामधून खालील योजना राबविण्यात याव्या.

१) शहरी योजना क्षेत्रांना पाणीपुरवठा
२) मल:निस्सारण योजना
३) विजबत्ती
४) रस्ते

प्राधिकरणाच्या बांधकामाची तांत्रिकदृष्ट्या उत्कृष्ट प्रत कशी ठेवता येईल यासाठी श्री. व्ही. व्ही. बडवे, सदस्य/प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास गट नेमण्यात यावा असे सुचविण्यात आले.
अशा प्रकारे विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर सभापती/पुणे मंडळ यांनी मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष व उपस्थित प्रादेशिक मंडळाचे सभापती/मुख्य अधिकारी यांचे आभार मानले. त्यानंतर अध्यक्ष/प्राधिकरण यांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर करण्यात आले.

**Item No.** 5 **Resolution No.** 1733

विषय : माई एस. ए. डांगे, गौरव समितीला भूखंड देण्याविषयी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणात सुचविण्यात आलेला भूखंड प्राथमिक शाळेसाठी राखून ठेवलेल्या भूखंडाचे आरक्षण बदलण्यास शासनाने मान्यता दिल्यास प्राधिकरणाच्या जमीनवाटप विषयक विनियमानुसार श्री. माई डांगे गौरव समितीने ट्रस्ट किंवा सोसायटी स्थापन केली तर सदर समितीला प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतीविषयक धोरणानुसार अधिमूल्य आणि भाडेपट्टी आकारून वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर जागतिक बँक प्रकल्प/प्राधिकरणाचे संचालक यांनी जागतिक बँक प्रकल्प स्थापन झाल्यापासून ज्या विविध योजना राबविण्यात आल्या त्यांची माहिती प्राधिकरणाचे सदस्याचे माहितीसाठी सादर करण्यात आली. त्यावेळी त्यांनी जागतिक बँक प्रकल्पाद्वारे आतापर्यंत राबविल्या गेलेल्या विविध योजनांची उद्‌बोधक माहिती प्राधिकरणापुढे मांडली. प्रकल्पामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांपैकी काही महत्वाच्या व प्रगतीपथावर वाटचाल करीत असलेल्या योजनांच्या तयार केलेल्या माहितीदर्शक स्लाईडस् प्रोजेक्टद्वारे दाखविण्यात आल्या. जागतिक बँक प्रकल्पामार्फत ज्या विविध योजना राबविण्यासाठी प्रकल्पाने जी योजनाबद्ध पद्धत अंगिकारून ज्या तऱ्हेने कामाची प्रगती केली आहे त्याबद्दल अध्यक्ष/प्राधिकरण यांनी समाधान व्यक्त केले व संचालक जागतिक बँक प्रकल्प/प्राधिकरण यांची प्रशंसा केली.

त्यानंतर म्हाडामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा सविस्तरपणे आढावा घेण्यात आला. प्रामुख्याने खालील बाबींवर विचार विनिमय करण्यात आला.

१) भूसंपादन :

म्हाडाला घरबांधणी कार्यक्रमासाठी खालीलप्रमाणे जमीन उपलब्ध होऊ शकते.

१) भूसंपादन
२) नागरी कमाल जमीन धारणा कायद्याखाली उपलब्ध होणारी जमीन.
३) शासनाची जमीन.
४) इतर शासकीय एजन्सीकडून उपलब्ध होणारी जमीन.

वरील उपक्रमाद्वारे उपलब्ध होणारी जमीन संपादन करण्याच्या बाबतीत उद्‌भवणाऱ्या अडचणी याबाबत सविस्तर चर्चा झाली.

२) जमीन खरेदी करण्यासाठी कर्ज देण्यात येते त्याबाबत.

शासन जमीन संपादन करण्यासाठी कर्ज देते त्यावर प्राधिकरणाला ११.५ टक्के व्याज द्यावे लागते. हुडको वित्त संस्था ज्याप्रकारे विविध योजनांसाठी कमी जास्त प्रमाणात स्कीमप्रमाणे व्याज आकारते. त्याप्रमाणे शासनानेही व्याज आकारावे असा आग्रह मतप्रवाह व्यक्त करण्यात आला.

३) गलिच्छवस्ती सुधारणा व श्रेणीवाढ :

सन १९८५ पर्यंत ज्या झोपड्यांची गणना झालेली आहे त्यांना सुविधा पुरवणे हे शासनाचे व म्हाडाचे कर्तव्य आहे असा मतप्रवाह दिसून आला.
मुंबईत ४८ टक्के गलिच्छवस्त्या खाजगी जमिनीवर व ५२ टक्के गलिच्छवस्त्या शासकीय, निमशासकीय व केंद्र शासनाच्या जमिनीवर आहेत. ४८ टक्के गलिच्छवस्त्यांनी व्यापलेली जमीन संपादन करून तेथील रहिवाशांची सोय करावी असाही विचार मांडण्यात आला.

४) इमारत दुरुस्ती व पुनर्रचना :

मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारतीच्या दुरुस्त्या व पुनर्बांधणी कार्यक्रमावरही सविस्तरपणे चर्चा करण्यात आली. त्याबाबत चर्चा करताना असा विचार मांडण्यात आला की, लाभधारकांनी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करून गाळे खरेदी करावेत.

५) माननीय अध्यक्ष/प्राधिकरण यांनी सुचविले की, नागरी विकास

अर्थसहाय्य महामंडळ स्थापन करून निधी उभारण्यात यावा व त्यामधून खालील योजना राबविण्यात याव्या.

१) शहरी योजना क्षेत्रांना पाणीपुरवठा
२) मल:निस्सारण योजना
३) विजबत्ती
४) रस्ते

प्राधिकरणाच्या बांधकामाची तांत्रिकदृष्ट्या उत्कृष्ट प्रत कशी ठेवता येईल यासाठी श्री. व्ही. व्ही. बडवे, सदस्य/प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास गट नेमण्यात यावा असे सुचविण्यात आले.
अशा प्रकारे विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर सभापती/पुणे मंडळ यांनी मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष व उपस्थित प्रादेशिक मंडळाचे सभापती/मुख्य अधिकारी यांचे आभार मानले. त्यानंतर अध्यक्ष/प्राधिकरण यांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर करण्यात आले.

**Meeting No.** 82 **Meeting Date** 22-Dec-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १३ व १४.१२.१९८९ रोजी झालेल्या ८१ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 2 **Resolution No.** 1734

विषय : भगतसिंग नगर - १, गोरेगाव येथील झोपडीवासियांना वीजपुरवठा करण्याकरिता बॉम्बे सबर्बन इलेक्ट्रिक सप्लाय लिमिटेड यांना भूखंड देण्यासाठी विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणात प्रस्तावित केल्याप्रमाणे गोरेगाव येथील भगतसिंग नगर विभाग - १ या झोपडपट्टीस वीजपुरवठा करण्याच्या दृष्टीने सबस्टेशन उभारण्याकरिता ४० बाय ४० फूट मापाचा भूखंड बॉम्बे सबर्बन इलेक्ट्रिक सप्लाय लिमिटेड यांना जमिनीची प्रत्यक्ष किंमत आणि त्यावर दरवर्षी एक टक्का या दराने भाडेपट्टी आकारून त्याचप्रमाणे जमीन भाडेपट्ट्याने देण्याच्या नेहमीच्या इतर अटींवर देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 3 **Resolution No.** 1735

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण व नगरविकास महामंडळ, नवी दिल्ली (हुडको) यांनी विहित केलेल्या अटींवर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता "अ" मध्ये [illegible]
रायगड व ठाणे जिल्ह्यातील बेघर भूमिहीनांकरिता ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी एकूण रुपये २४.३९ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.
माननीय अध्यक्ष/प्राधिकरण्या यांच्या परवानगीने आयत्यावेळी प्राधिकरणाच्या विचारार्थ घेण्यात आलेले बाब टिप्पण.

---

**Item No. 4 Resolution No. 1736**

विषय : मास हाऊसिंग प्रकल्पासाठी नेमावयाच्या बांधकाम व्यवस्थापन सल्लागारांची पूर्व निवड.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मास हाऊसिंग प्रकल्पासाठी समितीने शिफारस केलेल्या खालील बांधकाम व्यवस्थापन सल्लागारांची पूर्व निवडीची अग्रक्रम यादीस मान्यता देण्यात येत आहे.

१. मे. होले इंडिया प्रा. लि., नवी दिल्ली
२. मे. इयाग कन्सल्टंटस् प्रा. लि., मुंबई
३. मे. डिझाईनर्स इंडिया, मुंबई
४. मे मास्टर ॲन्ड असोसिएटस्, मुंबई
५. मे. प्रेमनाथ ॲन्ड असोसिएटस्, मुंबई
६. मे. मॉडर्न आर्किटेक्टस् प्रा. लि., पुणे
७. मे. कन्साल, मुंबई
८. मे. पी. एच. ई. कन्सल्टन्सी सर्व्हिसेस प्रा. लि., मुंबई.

त्याचप्रमाणे या बांधकाम व्यवस्थापन सल्लागारांना, कामापोटी कामाच्या किंमतीच्या २ १/२ टक्के रक्कम मोबदला म्हणून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.
आयत्यावेळी चर्चेसाठी मा. अध्यक्षांचे परवानगीने घेण्यात आलेला विषय.

**Item No. 5 Resolution No. 1737**

विषय : महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक क्षेत्रामधील उपक्रमांची संयुक्तपणे जाहिरात करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, संयुक्तपणे प्रसारित करण्यात येणाऱ्या प्रसारण मोहिम म्हाडाने भाग घेण्यात यावा व या मोहिमेसाठी प्राधिकरणाचा वाटा म्हणून रुपये ५.०० लाखाची रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.
यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे काम संपल्याचे जाहिर करण्यात आले.

**Meeting No.** 83 **Meeting Date** 05-Jan-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २२.१२.१९८९ रोजी झालेल्या ८२ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 1738

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणास जोडलेल्या तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण रुपये २५४.७६ कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : सर्व्हे क्रमांक ३८६ मुलुंड येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत ३७४ गाळ्यांसाठी व ३४ दुकानांसाठी निविदा.

ठराव :

**Item No.** 4 **Resolution No.** 1739

विषय : विशेष गटासाठी गृहनिर्माण योजना.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणात जोडलेल्या विवरणपत्र "ब" मध्ये दर्शविल्याप्रमाणे गाळ्यांच्या योजना विभिन्न गटातील लोकांसाठी विशेष गृहनिर्माण योजना कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 5 **Resolution No.** 1740

विषय : बोरीवली येथे रेल्वेवरील उड्डाण पुलासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेस द्यावयाच्या राजेंद्र नगर या प्राधिकरणाच्या वसाहतीतील जमिनीसाठी आणि त्या जमिनीवरील बैठ्या इमारतीसाठी नुकसान भरपाई मागणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणात नमूद केल्याप्रमाणे नुकसान भरपाईच्या रकमेची वसुली करून बोरीवली येथे रेल्वेवर उड्डाण पूल बांधण्यासाठी लागणारी जमीन त्या जमिनीवरील इमारतींसह एम.आर.टी.पी. कायद्याखाली बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात येते.
कार्यसूचीवरील सर्व विषय त्याचप्रमाणे मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्राधिकरणाच्या विचारार्थ घेतलेले आयत्यावेळचे विषय संपल्यानंतर मा. अध्यक्षांनी उपस्थित केलेला खालील विषय विचारार्थ घेण्यात आला.
विषय : वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स ब्लॉक "सी" मधील सर्व्हे क्रमांक-७ आणि ८ मधील जमीन श्री. सी. डी. शाह यांना भाडेपट्ट्याने देणे.

**Meeting No.** 84 **Meeting Date** 18-Jan-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व प्राधिकरणाच्या दिनांक ५.१.१९९० रोजी झालेल्या ८४ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 1741

विषय : श्री. राजाभाऊ अ. कुळकर्णी, विधी सल्लागार/प्राधिकरण यांच्या कंत्राटी पद्धतीवरील पुनर्नेमणूकीचा कालावधी वाढविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. राजाभाऊ अ. कुळकर्णी, विधी सल्लागार/प्राधिकरण यांचा या पदाच्या कामाचा अनुभव लक्षात घेऊन त्यांचा या पदावरील कंत्राटी पद्धतीवरील पुनर्नेमणूकीचा कालावधी पूर्वीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २०.१.१९९० (म.पू.) पासून सहा महिनेपर्यंत वाढविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 3 **Resolution No.** 1742

विषय : श्री. ल. रं. घाडगे, चौकशी अधिकारी/प्राधिकरण यांच्या कंत्राटी पद्धतीवरील पुनर्नेमणूकीस मुदतवाढ देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. ल. रं. घाडगे, चौकशी अधिकारी/प्राधिकरण यांचा या पदावरील कामाचा असलेला अनुभव लक्षात घेऊन त्यांचा या पदावरील कंत्राटी पद्धतीवरील पुनर्नेमणूकीचा कालावधी दिनांक २.२.१९९० (म.पू.) पासून सहा महिनेपर्यंत अथवा पदाची पर्यायी व्यवस्था होईपर्यंत जो दिनांक आधीचा असेल त्या दिनांकापर्यंत पूर्वीच्याच अटी व शर्तीवर वाढविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 4 **Resolution No.** 1743

विषय : देवळाली (नाशिक) येथील सर्व्हे क्रमांक २५/क-२-१ (सीटीएस-४२६८) अंतर्गत ३३०९.९१ चौ. मी. जमिनीची रक्कम अदा करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणात प्रस्तावित केल्याप्रमाणे विषयांकित जमीन म्हाडा ॲक्ट, १९७६ अंतर्गत तरतुदीनुसार संपादन किंवा नागरी जमीन कमालधारणा कायद्याअंतर्गत अतिरिक्त म्हणून प्राप्त झालेली नसल्याने म्हाडा ॲक्ट, १९७६ मधील कलम २८ (३) व ५२ मधील तरतुदीनुसार खरेदीचा करार करून महाराष्ट्र शासन, सहाय्यक संचालक नगर रचना, नाशिक यांनी निश्चित केलेला सन १९८४ मधील प्रति चौरस मीटरचा रुपये ५५/- हा बाजारभाव लक्षात घेऊन प्रत्यक्ष कालावधीच्या व्याजासह ढोस रक्कम (ग्रॉस अमाऊंट) श्रीमती टिकेकर यांना अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे जमिनीपोटी औरंगाबाद मंडळाकडून यू.एल.सी. लॅन्ड म्हणून काही रक्कम शासनास दिली असल्यास ती रक्कम खरेदी खत तयार करून ढोस रक्कम अदा करताना वळती करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला.

| **Item No.** | **5** | **Resolution No.** | **1744** |
|---|---|---|---|

विषय : सर्व्हे क्रमांक ३८६ मुलुंड येथील गलिच्छवस्ती पुनर्वसन योजनेअंतर्गत ३७४ गाळ्यांसाठी व ३४ दुकानांसाठी निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, दिनांक ५.१.१९९० रोजी झालेल्या ८३व्या बैठकीत प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या समितीने दिनांक ६.१.१९९० रोजी मेसर्स क्लासिक कन्स्ट्रक्शन कंपनी या ठेकेदाराबरोबर वाटाघाटी केल्यानंतर त्यांची कमी केलेली रुपये १,६३,००,०००/- (रुपये एक कोटी त्रेसष्ट लक्ष मात्र) बोली स्वीकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | **6** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : कंत्राटदारास व मालमत्तेच्या देखरेखीच्या क्षेत्र राखण कामाचा मोबदला सहा महिन्याच्या कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी म्हणजे लाभधारकांच्या ताब्यात मालमत्ता देईपर्यंतच्या कालावधीसाठी देण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **7** | **Resolution No.** | **1745** |
|---|---|---|---|

विषय : तांत्रिक विभागातील पदे भरण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सध्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे हाती घेण्यात आलेला प्रकल्प राबविण्यासाठी मुंबई मंडळास एक उपमुख्य अभियंता व तीन कार्यकारी अभियंत्यांची असलेली गरज विचारात घेवून, प्राधिकरणाच्या आस्थापनेवर असलेल्या उपअभियंत्यांच्या एकूण मंजूर पदातील रिक्त असलेल्या ३४ पदापैकी ३ पदे वळती करुन त्यांच्या बदल्यात एक उपमुख्य अभियंत्याचे पद व आणखी ६ उपअभियंत्यांची पदे वळती करून त्यांच्या बदल्यात ३ कार्यकारी अभियंत्यांची पदे निर्माण करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** **8** **Resolution No.** **1746**

विषय : निवासी गाळे/विकसित भूखंडाची किंमत भरण्यासाठी मालक/वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जाच्या बदल्यात गाळा/विकसित भूखंड गहाण ठेवण्यास 'ना हरकत प्रमाणपत्र' देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, निवासी गाळे/विकसित भूखंडाची किंमत भरण्यासाठी शासनाकडून किंवा एखाद्या वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जाच्या बदल्यात गाळे/विकसित भूखंड गहाण ठेवण्यास, खालील अटीवर 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्याचे अधिकार मंडळाचे मुख्य अधिकारी/संचालनालयाचे संचालक यांना देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) निवासी गाळा/भूखंड ज्याच्याकडे गहाण ठेवावयाचा त्याला गाळ्याच्या/भूखंडाच्या वाटपाच्या सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

२) निवासी गाळा/भूखंड ज्याच्याकडे गहाण ठेवावयाचा त्याला महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण अधिनियम १९७६ खाली सर्व नियम, विनियम आणि त्यात वेळोवेळी केलेल्या सुधारणा लागू होतील. तसेच शासनाने, स्थानिक प्राधिकरणाने यासंबंधात केलेले सर्व नियम, विनियम त्याला लागू राहतील.

**Item No.** **9** **Resolution No.** **1747**

विषय : अंधार चाळ क्रमांक १८, २२, २६ व ३० अनंत गणपत पवार मार्ग, काळाचौकी "इ" विभाग या इमारतीखालील भूभाग व मुंबई महापालिकेच्या अखत्यारितील भूभाग यांची अदलाबदल करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणात प्रस्तावित केल्याप्रमाणे अंधार चाळीतील भाडेकरूंचे पुनर्वसन करण्याची योजना त्वरित राबविण्याच्या दृष्टीकोनातून महापालिकेच्या संमतीने महापालिकेच्या ताब्यात असलेली व शाळेसाठी आरक्षित केलेली अंदाजे ४४७८.१२ चौ. मीटर इतकी जागा पुनर्बांधणीसाठी वापरून व त्याच्या बदल्यात प्राधिकरणाच्या ताब्यात असलेल्या सुमारे ४९६०.३५ चौ. मीटर क्षेत्रफळाच्या जागेपैकी ४४७८.१२ चौ. मी. इतकी जागा महापालिकेस स्थलांतरित करून सुपुर्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, या अदलाबदलास कायदेशील अडचण उद्‌भवू नये म्हणून विधी सल्लागार/प्राधिकरण यांचा सल्ला घेण्यात यावा असेही ठरविण्यात आले.

**Item No.** 10 **Resolution No.** 1748

विषय : वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्समधील ब्लॉक ''सी'' मधील सर्व्हे क्रमांक - ७ आणि ८ ही जमीन श्री. सी. डी. शहा यांना भाडेपट्ट्याने देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. सी. डी. शहा, यांच्याकडून निविदेची ५० टक्के किंमत आणि आगाऊ भुईभाडे यापोटी रक्कम भरण्यास दिलेली १५ दिवसांची मुदत संपल्यानंतर १६ व्या दिवसापासून दरवर्षी ६ टक्के दराने रुपये १०,२६,११,६७०/- या रकमेवर व्याज आकारून जमीन भाडेपट्ट्याने श्री. सी. डी. शहा यांना देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

हा अत्यंत महत्वाचा प्रश्न सामोपचाराने सोडविण्यासाठी मा. उपाध्यक्षांनी विशेष लक्ष घालून व श्री. शहा यांना प्राधिकरणाची बाजू प्रभावीपणे पटवून प्राधिकरणाचा सुमारे तीन कोटी रुपयांचा आर्थिक फायदा करून दिला याबद्दल मा. अध्यक्ष तथा सदस्य यांनी उपाध्यक्षांची एकमुखी प्रशंसा करून अभिनंदन केले.

---

**Item No.** 11 **Resolution No.** 1749

विषय : गोराई भाग - २ येथील मे. प्रेरणा कन्स्ट्रक्शन कंपनीच्या क्लेम्स् (हक्क मागणी) बाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मेसर्स प्रेरणा कन्स्ट्रक्शन कंपनी, मुंबई यांना जागतिक बँक प्रकल्पातर्फे गोराईरोड भाग - २ येथील जमिनीच्या पुन:प्रापणाचे काम दिले होते. ते काम निविदाच्या कलम ३ प्रमाणे त्यांच्याकडून काढून घेऊन त्यांचे सिक्युरिटी डिपॉझिट जप्त करण्यात आले होते. परंतु त्यावेळच्या एकंदर परिस्थितीचा सारासार विचार करून निविदा कलम १५ प्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देऊन खालीलप्रमाणे देय असलेली रक्कम मात्र कंत्राटदाराला खालील अटींवर अदा करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला.

कंत्राटदारास देय असलेली रक्कम :

| | | |
|---|---|---|
| १) जप्त केलेले सिक्युरिटी डिपॉझिट | रुपये : | १,५५,९०४.०० |
| २) अंतिम देयकाची रक्कम | रुपये : | १५,४२१.०० |
| ३) निविदांतील शर्तीनुसार द्यावयाचे वाढीव देयक. (एस्कलेशन) | रुपये : | २४,७१०.०० |
| एकूण | रुपये : | १,९६,०३५.०० |

अट :

१) मिळणारी रक्कम ही करारनाम्याच्या संबंधीच्या सर्व मागण्यांच्या समझोत्यापोटी असून त्यानंतर काहीही मागणी करणार नाही व त्याकरिता न्यायालयातही दाद मागणार नाही, अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र कंत्राटदाराकडून लिहून घेण्यात यावे.

**Item No.** 12 **Resolution No.** 1750

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण व नगरविकास महामंडळ, मुंबई (हुडको शाखा) यांनी विहित केलेल्या अटींवर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता ''अ'' मध्ये दर्शविलेल्या हुडको अर्थसहाय्यित बुलढाणा/यवतमाळ/कोल्हापूर व अहमदनगर जिल्ह्यातील बेघर भूमिहीनांकरिता ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी एकूण रुपये ६१.०२ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 12 **Resolution No.** 1750

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण व नगरविकास महामंडळ, मुंबई (हुडको शाखा) यांनी विहित केलेल्या अटींवर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता ''अ'' मध्ये दर्शविलेल्या हुडको अर्थसहाय्यित बुलढाणा/यवतमाळ/कोल्हापूर व अहमदनगर जिल्ह्यातील बेघर भूमिहीनांकरिता ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी एकूण रुपये ६१.०२ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 13 **Resolution No.** 1751

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता ''अ'' मध्ये दर्शविल्याप्रमाणे नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण रुपये ४८.०७ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 14 **Resolution No.** 1752

विषय : मुंबई मंडळाच्या गोराई रोड, बोरीवली (पश्चिम) येथील वसाहतीतील ६७ अनधिकृत स्टॉलधारकांना पर्यायी जागा देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे या भूखंडावरील आरक्षण रद्द करण्यात येऊन प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक - १०८३ दिनांक २०.८.१९८५ मधील निर्णयानुसार या ५९ स्टॉलधारकांना या भूखंडावर जागा देण्यास मान्यता देण्यात येते.

यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहिर करण्यात आले.

**Meeting No.** 85 **Meeting Date** 22-Feb-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १८.१.१९९० रोजी झालेल्या ८४ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 2 **Resolution No.** 1753

विषय : वैद्यकीय खर्चाच्या परतफेडीच्या नियमावलीमधील क्रमांक - ६ नुसार हात्शाळवयाची प्रकरणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, वैद्यकीय नियमावलीच्या क्रमांक ५ अन्वये प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांच्या वैद्यकीय खर्चाच्या परिपूर्ती करण्यासंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार सचिव/प्राधिकरण यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मात्र सचिव/प्राधिकरण यांनी निर्णय घेण्यापूर्वी प्रत्येक प्रकरणी वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांची सहमती घ्यावी. ज्याप्रकरणी वित्त नियंत्रक/प्राधिकरण व सचिव/प्राधिकरण यांचे दुमत दिसून येईल अशी प्रकरणेच फक्त अंतिम निर्णयासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांच्याकडे पाठविण्यात यावीत. त्याचप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांना करावयाच्या वार्षिक वैद्यकीय खर्चाच्या परतफेडीस मंजूरी देण्याचे अधिकार सक्षम अधिकारी म्हणून सचिव/प्राधिकरण यांनाच प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 3 **Resolution No.** 1754

विषय : प्राधिकरणाच्या निविदा सूचना, नोकरीविषयक व गाळे वितरणाविषयक जाहिराती, जाहिरात संस्थेमार्फत प्रसिद्ध करण्याबाबत विचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या मुंबईमधील सर्व कार्यालयाच्या जाहिराती "मे. जॉर्ज जॉन ॲडव्हरटायजिंग" जाहिरात संस्थेमार्फत जाहिरात दरात ५ टक्के रोख सूट स्वीकारून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 4 **Resolution No.** 1755

विषय : श्री. मा. आ. चव्हाण, मुख्य अभियंता/प्राधिकरण यांना पुनर्नेमणूक देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. मा. आ. चव्हाण, निवृत्त मुख्य अभियंता/प्राधिकरण यांच्या दिनांक ३.१०.१९८९ पासून दिनांक १९.२.१९९० पर्यंतच्या नेमणूकीनुसार कार्योत्तर मंजूरी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.
मा. अध्यक्षांनी श्री. चव्हाण, यांनी मूलपूर्व विदर्भ गृहनिर्माण मंडळ त्याचप्रमाणे म्हाडाची सुमारे ३६ वर्षे केलेल्या प्रदीर्घ सेवेचा गौरवपूर्वक उल्लेख केला व त्यास सर्व सदस्यांनी अनुमती दिली. चर्चेनुसार असा निर्णय घेण्यात आला की, श्री. चव्हाण यांना मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी पत्र पाठवून प्राधिकरणाच्या सदस्यांच्या भावना कळवाव्यात.

---

**Item No.** 5 **Resolution No.** 1756

विषय : प्राधिकरणाचे १९९०-९१ चे अर्थसंकल्पिय अंदाज व सुधारित अंदाज १९८९-९० तयार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, १९९०-९१ च्या अंदाजपत्रकाच्या कामासाठी प्राधिकरणाचे वित्त नियंत्रक यांच्या विभागातील विभागीय लेखापाल किंवा अधिक्षक, वरिष्ठ लेखा परीक्षक, वरिष्ठ लिपिक, टंकलेखकासहित आणि कनिष्ठ लिपिक या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेनंतर काम करावे लागेल. अशा कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेता अतिरिक्त कामाचा ''विशेष भत्ता'' म्हणून मोबदला देण्याच्यासाठी त्यांच्या वेतनश्रेणीनुसार अंदाजे रुपये २५,०००/- एवढ्या खर्चास मंजूरी देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे इतर प्रादेशिक मंडळातही लेखा विभागातील कर्मचाऱ्यांना या कामासाठी अशाच प्रकारे कार्यालयीन कामकाजाचे वेळेव्यतिरिक्त सुट्टयांचे दिवशी करणे भाग पडले. अशा कर्मचाऱ्यांनाही त्याच समान तत्वावर मूळ वेतनाच्या मर्यादेपर्यंत ''विशेष भत्ता'' संजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : विधी विभाग/प्राधिकरणाच्या रुपरेखेविषयी माहिती.

ठराव :

**Item No.** 7 **Resolution No.** 1757

विषय : सर्व्हे नं. २९०-अ जळगाव या जागेवर उच्च उत्पन्न गटांतर्गत ९० गाळे बांधणे.

निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

सर्व्हे क्रमांक २९०-अ जळगाव या जागेवर बांधण्यात यावयाच्या उच्च उत्पन्न गटातील ९० गाळ्यांसाठी मे. ज्योती कन्स्ट्रक्शन कंपनी यांची मूळ निम्नतम दराची व वाटाघाटीने आणखी कमी आलेली रुपये ९१,१२,५४१/- (रुपये एक्याण्णव लक्ष बारा हजार पाचशे एकचाळीस फक्त) (मूळ निविदेतील अंदाजित किंमत रुपये ६९,३२,३२५/- यावर ३१.४५ अधिक दराची) किंमतीची निविदा खालील अटींवर स्वीकारण्यात यावी.

या घरांसाठी औरंगाबाद मंडळाकडे मागणी नोंदविलेल्या ४५ अर्जदारांना निविदा टक्केवारीमुळे वाढणारी किंमत कळवून व पूर्वी कळविलेली किंमत व वाढलेली किंमत यातील फरकाच्या १० टक्के एवढी जादा रक्कम सुरुवातीचा हप्ता म्हणून वसूल केल्यावर तसेच उर्वरित ४५ गाळ्यांसाठी वाढीव किंमतीनुसार जाहिरात देऊन १० टक्के रक्कमेसह प्राप्त होणारी एकूण मागणी विचारात घेऊन मगच मुख्याधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी निश्चित मागणीनुसार कंत्राटदारास निविदांची स्वीकृती कळवावी व निश्चित मागणीनुसार बांधकाम प्रत्यक्ष हाती घेण्यात यावे.

| **Item No.** | **8** | **Resolution No.** | **1758** |
|---|---|---|---|

विषय : ह्युमन सेटलमेंट इन्स्टिट्यूट यांच्या सहकार्याने प्रशिक्षण कार्यक्रम तयार करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, उपरोल्लेखित योजना राबविण्यासाठी एच.एस.एम.आय. यांचेबरोबर चर्चा करणे, करारपत्र करणे इत्यादींबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्राधिकरणाच्या विचारार्थ ठेवण्यात आलेले आयत्या वेळचे विषय.

| **Item No.** | **9** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : धारावी, कल्याणवाडी येथील नाताजी सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी १९५ निवासी व १० अनिवासी गाळ्यांसाठी प्लॉट क्रमांक-४ सी.एस. नं ३४३ (भाग) धारावी टप्पा - २ करिता निविदा स्वीकारणेबाबत.

ठराव :

| **Item No.** | **10** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : सिटी सर्व्हे नं. ३४३ (भाग) प्लॉट - १ धारावी कल्याणवाडी येथील नाताजी सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी १८२ गाळ्यांसाठी निविदा स्वीकारणेबाबत.

ठराव :

| **Item No.** | **11** | **Resolution No.** | **1759** |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणास जोडलेल्या तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण रुपये ८२.०८ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

| **Item No.** | **12** | **Resolution No.** | **1760** |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण व नगरविकास महामंडळ, मुंबई (हुडको) यांनी विहित केलेल्या अटींवर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण बाब टिप्पणास जोडलेल्या तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या हुडको अर्थसहाय्यित अमरावती, जळगाव व अकोला जिल्ह्यातील बेघर भूमिहीनांकरिता ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी एकूण रुपये ४३.६९ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

**Item No.** 13 **Resolution No.** 1761

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सन १९८८-८९ या वित्तीय वर्षासाठी तदर्थ बोनस देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक १७२९ दिनांक १६.११.१९८९ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या १७ दिवसांचा बोनस अधिक ५ दिवसांचा वित्तलब्धी एवढा अतिरिक्त बोनस देण्यास शासनाने दिलेली मंजूरी विचारात घेऊन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या आदेशातील अटी व शर्तीच्या अधीन राहून अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 14 **Resolution No.** 1762

विषय : वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्समधील ब्लॉक "सी" मधील सर्व्हे क्रमांक - ७ आणि ८ ही जमीन श्री. सी. डी. शहा यांनी भाडेपट्ट्याने देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१. श्री. शाह यांनी त्यांच्या दिनांक ८.२.१९९० च्या पत्राप्रमाणे भूखंडाची किंमत इत्यादीपोटी रक्कम भरण्यासाठी मागितलेली मुदतवाढ दिनांक २३.३.१९९० पर्यंत खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात यावी.

अ) भूखंडाची किंमत इत्यादिपोटी प्राधिकरणाचे येणे असलेली रक्कम श्री. शाह यांनी कमाल दोन हप्त्यांमध्ये भरावी. मात्र त्यांचेकडून येणे असलेली संपूर्ण रक्कम दिनांक २३.३.१९९० रोजी किंवा त्याआधी भरावी.

ब) श्री. शाह यांच्याकडून येणे असलेल्या रकमेवर त्यांनी दिनांक २.२.१९९० पासून १६ टक्के दराने व्याज भरावे.

क) श्री. शाह यांनी पाठविलेल्या रुपये १३,६८,२४८.९३ एवढ्या रकमेपेक्षा धनादेश वटला जाण्याच्या अटींवर स्वीकारण्यात यावा.

**Item No.** **15** **Resolution No.** **1763**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या तांत्रिक निविदांबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत सुचविलेल्या पर्याय क्रमांक (३) मान्य करण्यात यावा म्हणजेच सध्या झालेल्या सर्व विकसकांना त्यांनी सादर केलेल्या निविदांमध्ये ड्राइंग व इतर बाबीत मुंबई मंडळास मान्य होतील व मुंबई महानगरपालिका करील अशा प्रकारच्या दुरुस्त्या करण्यास परवानगी द्यावी. या दुरुस्त्या सुमारे १५ दिवसांत करण्यात याव्यात. वरील दुरुस्त्यांमुळे वित्तीय निविदात बदल संभवत असल्यास विकासकांना सुधारित वित्तीय देकार देण्याची संधी द्यावी. अंतिम निविदा दर हा मूळ व सुधारित वित्तीय देकार (विकसकांनी दिल्यास) यावर अवलंबून राहील.

मे. बी. जी. शिर्के यांनी त्यांच्या निविदात प्रस्तावित केलेल्या सिफोरेक्स स्लॅब्ज, ब्लॉक इ. इमारत साहित्याच्या व तंत्रज्ञानाच्या वापराबाबत असे ठरले की, याबाबत शासनाशी सत्वर पत्रव्यवहार करण्यात यावा व वाडेकर समिती, चव्हाण समिती यांच्या शिफारशींवर तसेच दिनांक १९.२.१९९० च्या मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांनी बोलाविलेल्या बैठकीचे संदर्भात शासनाचा अंतिम निर्णय मागवावा व तो आल्यावर पुढील कार्यवाही करावी.

यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** **Special** **Meeting Date** **28-Feb-19**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २२-२-१९९० रोजी झालेल्या ८५ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** **2** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन १९८९-९० च्या सुधारित व सन १९९०-९१ चा अर्थसंकल्प.

ठराव :

**Item No.** **3** **Resolution No.** **1764**

विषय : स्टाफिंग पॅटर्न.

प्राधिकरण व संचालनालये यांच्याकरिता कर्मचारीवर्ग अनुसूची सन १९९०-९१.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीसोबत जोडण्यात आलेल्या तक्त्यातील सन १९९०-९१ या वित्तीय वर्षाकरिता प्रस्तावित करण्यात आलेल्या कर्मचारी वर्गाचे अनुसूचीला मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** **4** **Resolution No.** **1765**

विषय : धारावी, कल्याणवाडी येथील नेताची सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी १९५ निवासी व १० अनिवासी गाळ्यांसाठी प्लॉट क्र. ४ सी. एस. नं. ३४३ (भाग) धारावी टप्पा - २ करिता निविदा स्वीकारणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सी. एस. नं. ३४३ (भाग) प्लॉट क्र. ४, धारावी टप्पा - २ कल्याणवाडी येथील नियोजित नेताजी गृहनिर्माण संस्थेसाठी १९५ निवासी व १० अनिवासी गाळ्यांच्या बांधकामासाठी मे. सहानी कन्स्ट्रक्शन कंपनी यांची रुपये ७६,३७,१४०/- (२ टक्के सूट धरून) ची निविदा मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No. 5** **Resolution No. 1766**

विषय : सिटी सर्व्हे नं. ३४३ (भाग) प्लॉट - १ धारावी कल्याणसाठी येथील नेताजी सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी १८२ गाळ्यांसाठी निविदा स्वीकारणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सिटी सर्व्हे नं. ३४३ (भाग) प्लॉट - १, धारावी कल्याणवाडी, 'अ' येथील नियोजित नेताजी गृहनिर्माण संस्थेसाठी १८२ गाळ्यांच्या बांधकामासाठी मे. सहानी कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे रुपये ६८,१२,९६०/- (२ प्रतिशत सूट धरून) ची बोली मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
माननीय अध्यक्षांचे परवानगीने आयत्यावेळी प्राधिकरणाच्या विचारार्थ घेण्यात आलेले बाब टिप्पण.

**Item No. 6** **Resolution No. 1767**

विषय : मुंबई नागरी विकास प्रकल्प - १, अंतर्गत गोराई भाग - २ आणि वर्सोवा येथील भूखंड विकसित करणे, मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कं. लि. यांना कर्ज पुरवठा करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई उपनगर पुरवठा कंपनी लिमिटेड यांना रुपये ३५० लक्ष कर्ज बाब टिप्पणात उल्लेखिलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
यानंतर मा. अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 86 **Meeting Date** 19-Mar-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २८-२-१९९० रोजी झालेल्या खास बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 1768

विषय : श्री. भगवानदास रुपाई, सुतार/मुंबई मंडळ यांच्या सेवानिवृत्तीनंतरच्या अधिक झालेल्या सेवेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. भगवानदास रुपाई, सेवानिवृत्त सुतार/मुंबई मंडळ यांना दिनांक ३०-४-१९८८ रोजी सेवानिवृत्त करून त्यांचा सेवानिवृत्तीनंतरचा दिनांक १-५-१९८८ पासून दिनांक ३१-७-१९८८ पर्यंतचा तीन महिन्याचा अधिक सेवेचा कालावधी पुर्ननेमणूक म्हणून समजण्यात येऊन त्या कालावधीसाठी त्यांना पुनर्नियुक्तीचे वेतन व इतर फायदे नियमानुसार देण्यास मान्यता देण्यात येत आहे.
तसेच या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात यावी असे ठरविण्यात यावी असे ठरविण्यात आले.

**Item No.** 2 **Resolution No.** 1768

विषय : श्री. भगवानदास रुपाई, सुतार/मुंबई मंडळ यांच्या सेवानिवृत्तीनंतरच्या अधिक झालेल्या सेवेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. भगवानदास रुपाई, सेवानिवृत्त सुतार/मुंबई मंडळ यांना दिनांक ३०-४-१९८८ रोजी सेवानिवृत्त करून त्यांचा सेवानिवृत्तीनंतरचा दिनांक १-५-१९८८ पासून दिनांक ३१-७-१९८८ पर्यंतचा तीन महिन्याचा अधिक सेवेचा कालावधी पुर्ननेमणूक म्हणून समजण्यात येऊन त्या कालावधीसाठी त्यांना पुनर्नियुक्तीचे वेतन व इतर फायदे नियमानुसार देण्यास मान्यता देण्यात येत आहे.
तसेच या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात यावी असे ठरविण्यात यावी असे ठरविण्यात आले.

**Item No.** 3 **Resolution No.** 1769

विषय : १) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण आणि गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ मधील विनियम १६ मध्ये सुधारणा.
२) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम, १९८२ मधील विनियम १६ मध्ये सुधारणा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण आणि गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ मधील विनियम १६.
२) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम, १९८२ मधील विनियम १६.

या दोन्ही समुच्चयांत विनियम १६ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद करण्यासाठी योग्य ती सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) गाळे/भूखंडाच्या वाटपाच्या प्रारंभिक तारखेपासून तीन महिन्यात शासनाने लाभार्थी नियुक्त केले नाहीत तर उरलेल्या गाळे/भूखंडांपैकी ५० टक्के गाळे/भूखंडाचे वाटप करण्याचे अधिकार प्राधिकरणाच्या अध्यक्षांना प्राप्त होतील व उरलेल्या ५० टक्के गाळे/भूखंडाचे वाटप करण्याचे अधिकार संबंधित मंडळांच्या सभापतींना प्राप्त होतील.
२) प्राधिकरणाचे अध्यक्ष/मंडळाचे सभापती यांनी त्यांच्या अधिकारातील गाळे/भूखंडाचे वाटप पुढील तीन महिन्यात केले नाही तर तीन महिन्याच्या कालावधीच्या अखेरीस उरलेले गाळे/भूखंड सर्वसाधारण लोकांना वाटप करण्याकरिता वळते केले जातील. त्यानंतर त्या विशिष्ट योजनेत शासनाच्या स्वेच्छा निर्णयानुसार वाटप करण्याकरिता राखून ठेवलेले गाळे/भूखंड संपले असे समजण्यात येईल.

वरीलप्रमाणे विनियमात दुरुस्ती करणेबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा.

**Item No.** 4 **Resolution No.** 1770

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी सहकारी पतपेढी (म.) यांस कर्ज मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ कर्मचारी सहकारी पतपेढी (म.) यांनी कर्जपुरवठाबाबतच्या सर्व अटी मान्य केल्या असल्याने रु. १८/- लाखाच्या (रु. अठरा लाख मात्र) कर्ज मंजूरीच्या कार्यवाहीस बाब टिप्पणीतील खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर कर्जाची परतफेड १२ समान मासिक हप्त्याने त्यावरील व्याजासहित करण्यात यावी.
२. सदर कर्जावर दरसाल दर शेकडा रु. १०/- याप्रमाणे व्याज आकारावे.
३. व्याजासहित समान मासिक हप्ता पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांचेकडे येणे आवश्यक राहिल.
४. सदर अटी महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी सहकारी पतपेढी (म.) यांना मान्य आहे हे धरून कार्योत्तर मंजूरी देण्यात आली आहे.

---

**Item No.** 5 **Resolution No.** 1771

विषय : प्राधिकरणाच्या जमिनीवर बांधण्यात येणाऱ्या व्यापारी केंद्रातील गाळ्यांची किंवा रहिवाशी वसाहतीत व्यापारी तत्वावर द्यावयाच्या गाळ्याची समतोल किंमत (अपसेट प्राइस) ठरविण्याचे अधिकार प्रदान करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या जमिनीवर प्रादेशिक मंडळाकडून हाती घेतल्या जाणाऱ्या व्यापारी केंद्राच्या योजनामधील किंवा रहिवाशी वसाहतीमधील व्यापारी तत्वावर दिल्या जाणाऱ्या गाळ्यांची समतोल किंमत (अपसेट प्राइस) ठरविण्याचे अधिकार, मुंबई मंडळातील अशा प्रकरणांसाठी मुख्य अभियंता/मुंबई मंडळ व पुणे, औरंगाबाद, नागपूर व कोकण मंडळातील अशा प्रकरणासाठी हे अधिकार विभागीय मंडळाचे मुख्याधिकारी यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मुंबई मंडळाव्यतिरिक्त इतर प्रादेशिक मंडळाच्या मुख्याधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकरणात समतोल किंवा निश्चित केल्यावर त्यासंबंधीची कागदपत्रे मुख्य अभियंता/प्राधिकरण यांना सत्वर पाठवावीत. मुख्य अभियंता/प्राधिकरण यांना त्यामध्ये काही फेरबदल सूचवावयाचे असल्यास त्यांनी १५ दिवसाचे आत मुख्य अधिकारी/प्रादेशिक मंडळे यांना कळवावा. मुख्य अभियंता/प्राधिकरण यांचेकडून काहीही सूचना दिल्या नाहीत तरी योग्य समतोल किंमत ठरविण्याची संपूर्ण जबाबदारी मुख्य अभियंता/मुंबई मंडळ किंवा मुख्याधिकारी प्रादेशिक मंडळे यांचीच राहील.

---

**Item No.** 6 **Resolution No.** 1772

विषय : ॲन्टॉप हिल वडाळा येथील संक्रमण शिबीराचे काम विभागून करण्यास मंजूरी देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, ॲन्टॉप हिल वडाळा, येथील तळमजल्याच्या ९० चाळी तोडून तेथे बहुमजली इमारतींमध्ये बांधावयाच्या ६१९ संक्रमण शिबिराचे बांधकाम खाली निर्दिष्ट केल्याप्रमाणे तीन गटांत विभागून करण्याच्या मुख्य अभियंता/मुंबई मंडळाने प्राधिकरणाची अनुमती अपेक्षित धरून केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

| गट | गाळे | निविदेत दर्शविली जाणारी कामाची अंदाजित किंमत |
|---|---|---|
| गट क्र. १ | १२६ गाळे | रु. ४४,२३,८६०/- |
| गट क्र. २ | २४० गाळे | रु. ८४,२६,४००/- |
| गट क्र. ३ | २४६ गाळे | रु. ८६,३७,०५०/- |

**Item No.** 7 **Resolution No.** 1773

विषय : गोखले नगर, पुणे येथे बांधण्यात यावयाच्या उच्च उत्पन्न गटातील १० गाळे व दुकानांचे ६ गाळे या योजनेचे जोत्यापर्यंतचे काम अपवादात्मक परिस्थिती म्हणून कोटेशन न मागविता करण्यास मंजूरी देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गोखले नगर, पुणे येथे बांधण्यात यावयाच्या उच्च उत्पन्न गटातील १० गाळे व ६ दुकाने या योजनेच्या मंडळाने विभागामार्फत केलेल्या अंदाजे रु. २०,०००/- च्या कामास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे त्याचप्रमाणे पुढे जोत्यापर्यंत करावयाच्या अंदाजे रु. १,००,०००/- (रु. एक लक्ष मात्र) च्या कामास निविदा न मागविता कार्यालयामार्फत काम करावयाच्या कार्यवाहीसाठी मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 8 **Resolution No.** 1774

विषय : नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत दादी संतूक लेन 'सी' विभाग, मु. प्रा. ६०५, मुलेश्वर विभाग टप्पा - १, येथील पूर्ण झालेल्या इमारतीच्या रक्षणासाठी सहा महिन्यापलिकडे कालावधीत झालेल्या पहारेकऱ्यांच्या खर्चाला मंजूरी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, दादी संतोक लेन मु. क्र. ६०५ मुलेश्वर विभाग टप्पा - १ येथील इमारतीच्या रक्षणासाठी बाब्र टिप्पणात प्रस्तावित केल्याप्रमाणे पुढील सहा महिन्याच्या पलिकडील कालावधीसाठी पहारेकऱ्यांच्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | **9** | **Resolution No.** | **1775** |
|---|---|---|---|

विषय : श्री. पी. के. रामचंद्रन, अर्थतज्ञ/जा. बँ. प्र. यांची कंत्राटी नेमणूक वाढविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. पी. के. रामचंद्रन, अर्थतज्ञ/जा. बँ. प्र. यांच्या सेवेचा कालावधी दिनांक ३-४-१९९० पासून १ वर्षाच्या मुदतीसाठी किंवा जागतिक बँक प्रकल्पाच्या कालावधीपर्यंत यापैकी आधीच्या कालावधीसाठी त्यांच्या नेमणूकीच्या मूळ अटी व शर्तीच्या अधिन राहून वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | **10** | **Resolution No.** | **1776** |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन १९८९-९० च्या सुधारित व सन १९९०-९१ च्या अंदाजित अर्थसंकल्पावर तपशीलवार चर्चा करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन १९८९-९० च्या सुधारलेले अंदाज व सन १९९०-९१ च्या अर्थसंकल्पास मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | **11** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : विधी विभाग/प्राधिकरणाच्या रुपरेखेविषयी माहिती.

ठराव :

| **Item No.** | **12** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : नागरी नूतनीकरण योजना.

इमारत क्रमांक १३, १५, १७, २१ तुकाराम रावजी मार्ग, डी. विभाग बांधकामासाठी निविदा.

ठराव :

| **Item No.** | **13** | **Resolution No.** | **1777** |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचारीवर्गाचा आकृतीबंध.

ठराव : निर्णय घेतला की, बाब टिप्पणीस जोडलेल्या कर्मचारीवर्ग अनुसूचित मागील बैठकीत मंजूर केलेली (ठराव क्रमांक : १७६४ दिनांक २८-२-१९९०) अनुसूची त्याप्रमाणात सुधारित केली आहे असे धरून मान्यता देण्यात येते. तसेच सुधारित अनुसूचीची अंमलबजावणी करताना किरकोळ बदल आवश्यक ठरल्यास ते करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यास मान्यता देण्यात आली.
विषयसूचीवरील सर्व विषय संपल्यानंतर कोकण मंडळाचे समापती श्री. रविंद्र राऊत यांची विधानसभेवर निवड झाल्याबद्दल प्राधिकरणातर्फे मा. अध्यक्षांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन हार्दिक अभिनंदन केले.
यानंतर मा. अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षाचे आभार मानल्यानंतर समेचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.